भाषणात, "भारतीय राष्ट्र निर्मितीची मूलतत्त्वेच त्यांनी कथन केली. भारताला एक राष्ट्र म्हणून उभे राहण्यासाठी काही अटी त्यांनी दिल्या. त्यांनी सांगितलेल्या अटी आजही तितक्याच महत्त्वाच्या दिसतात. हिंदू कोड बिल असो की भारतातील सेती, मजूर यांच्यासंदर्भातील त्यांचे विवेचन हे राष्ट्रनिर्मितीसाठी महत्त्वाचे आहे. डॉ. आबासाहेब आंबेडकर हे संघ संविधान समितीचे सदस्य होते. या समितीचा अहवाल संविधान सभेच्या अध्यक्षांना समितीचे अध्यक्ष जवाहरलाल नेहरू यांनी दि. 4 जुलै 1947 रोजी सादर केला. डॉ. बाचासाहेब आंबेडकरांनी विविध समित्यांवर जे कार्य केले, ते अत्यंत उपयोगी व मोलाचे मानले गेले आणि काँग्रेसच्या नेत्यांची निःसंकोचपणे खात्री पटली की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सेवा घेतल्याशिवाय स्वातंत्र्याचे दृढीकरण आणि विधिनियमिकरण सहजसुलभ होणार नाही. ज्या काँग्रेस पक्षाने त्यांच्या संविधानसभेतील प्रवेशाला अल्येत प्रखर विरोध केला होता तोच पक्ष पुढे आला आणि त्यांची उमेदवारी पुरस्कृत करता झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताची राज्यघटना सार्वभौम लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समता, न्याय आणि बंधुता, स्वातंत्र्य या तत्त्वावर स्वीकारून जगातील सर्वांत मोठी लिखित राज्यघटना निर्माण केली. ते राज्यघटनेसंदर्भात म्हणतात, 'जर घटना राबविणारेच वाईट वृत्तीचे असतील तर एखादी घटना कितीही उत्कृष्ट असली तरी ती बंद रुपयाप्रमाणेच ठरणार. त्याचप्रमाणो घटना राबविणारे चांगल्या वृत्तीचे असतील तर एखादी घटना कितीही टाकाऊ असली तरी उपकारकच ठरेल." डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राज्यघटनेसंदर्भातील भूमिका, राज्यकर्त्यांना राज्यकारभार करण्यासाठी मार्गदर्शक ठरते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एका चर्चेत अतिशय मार्मिक अभिप्राय व्यक्त केला होता. ते म्हणाले, "या घटनेत जी विचारधारा व्यक्त झाली आहे ती एका वर्तमान पिडीची आहे. नव्हे, या समितीच्या सदस्याची आहे. प्रत्येक पिढीला एक स्वतंत्र विचार असतो. बहुमताच्या जोरावर आपले नियंत्रण करण्याचा अधिकार आपल्याला आहे पण भावी पिड्यांना आपण मान्य केलेल्या बंधनात कायमचे बांधण्याचा अधिकार नाही. यावरून असे सिद्ध होते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संविधानातील विचार येणाज्या पिढ्यांवर लादत नाहीत तर ते राज्यघटनेला परिवर्तनीय ठरवतात. भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेतील तत्वज्ञान हे खज्या अर्थाने या देशातील जनतेला एकसंघ ठेवते. प्रास्ताविकेत धर्मनिरपेक्षता, समाजवादी, गणराज्य, समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व, न्याय या मूल्यांचा विचार मांडला आहे. हे प्रास्ताविकेतील तत्त्वज्ञान खज्या अर्थाने भारताचा राष्ट्रवाद आहे.

भारतीय राज्यघटना तयार करण्याचा दुहेरी उद्देश दिसतो. एक उद्देश राजकीय लोकशाही निर्माण करण्याचा, दुसरा उद्देश आर्थिक व सामाजिक लोकशाहीचे आदर्श ठेवण्याचा. भारतीय संविधान हे सर्व धर्मियांचे प्रतिनिधित्व करणारी राष्ट्रीय राज्यघटना आहे. भारतीय संविधान हे केवळ दलितांनाच प्रेरक ठरते असे नाही तर ते संपूर्ण भारतीयांचे प्रेरणास्थान आहे. "दि.25 नोव्हेंबर 1949 रोजी घटना समितीच्या बैठकीत राज्यघटनेशी संबंधित अखेरचे भाषण करताना घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या मनात येणारा पहिला महत्त्वाचा विचार भाषणाच्या सुरुवातीलाच सांगितला. "दि. 26 जानेवारी 1950 रोजी भारत देश खज्या अर्थाने सुंदर देश होईल पण त्याच्या स्वातंत्र्याचे काय होईल, तो आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवील की तो पुन्हा गमावून बसेल. स्वतंत्र भारताच्या स्वातंत्र्याची काळजी करणारे आणि स्वतंत्र भारताचा

राज्यकारभार लोकहितार्थ सुव्यवस्थित चालविण्यासाठी घटनाकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे थोर देशभक्त ठरतात. " लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात एकही रक्ताचा थेंब न सांडता सत्तेत झालेला बदल अथवा परिवर्तन म्हणजे लोकशाही होय, अशी लोकशाहीची प्रगल्भ व्याख्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर करतात.

भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून समतेवर आधारित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मनिरपेक्ष राज्यघटना राष्ट्राला अर्पण केली. भारतीय राज्यघटनेत कायद्यापुढे सर्व समान आहेत, कुणीही धर्म अथवा वंशपरंपरेने उच्च अथवा कनिष्ठ नाही, त्यांच्या या समतावादी संविधानाने हा देश एकसंघ ठेवला आहे. त्यांच्या या व्यापक भूमिकेने भारतीय संविधान आज जगाला प्रेरणा देते. 17 ऑगस्ट 1990 रोजी दक्षिण आफ्रिकेतील निग्रो चळवळीचे प्रणेते नेल्सन मंडेला भारतात आले. त्यावेळी ते म्हणाले की, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक अन्यायाविरुद्ध दिलेला लढा आम्हांला प्रेरणादायी ठरलेला आहे. उद्या दक्षिण आफ्रिकेची नवी राज्यघटना तयार करताना आमच्या डोळ्यासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले संविधान असेल." एकूणच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान राष्ट्र आणि राष्ट्रातील माणसाप्रति बंधुभाव निर्माण करते. भारतीय संविधान हे विविध धर्म असलेल्या भारतीयांना एकत्र ठेवते. कुठल्याही बाह्य बंधनाशिवाय भारत देश अंतर्गत कारभार आणि परदेशी व्यवहार आपल्या इच्छेप्रमाणे करतो. या लार्वभौमत्त्वाचे सर्व श्रेय भारतीय संविधानाला जाते. 'मी प्रथमतः भारतीय आणि अंतिमतः भारतीय' हा डॉ. बाबासाहेब आबेडकरांचा विचार भारतीय राज्यघटनेचा आत्मा आहे. सार्वभौमत्व, समाजबादी, धर्मनिरपेक्ष विचार हे भारतीय राष्ट्रवादाची प्रेरणा आहे.

**संदर्भसूची :-**

1) आंबेडकर बी.आर., भारतातील जाती, युगसाक्षी प्रकाशन, रिंग रोड, नागपूर,प्रथम आवृत्ती, 14 एप्रिल 2012
2) गायकवाड प्रदीप (संपादित), डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र भाषणे खंड 1
3) आंबेडकर बी.आर., दि ॲनीहिलेशन ऑफ कास्ट
4) गायकवाड प्रदीप (संपा.), भारताचे संविधान, संपादकीय
5) आबीद रीजबी, करीम शबाना, भारतरत्न डॉ.भिमराव आंबेडकर, रजत प्रकाशन, मेरठ,प्रथम आवृत्ती, 2000,

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचे विश्लेषण अध्ययन

**डॉ. सुनील बाळू घुगे**
(अर्थशास्त्र विभाग)
कला, विज्ञान व वाणिज्य महाविदयालय, मनमाड

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थतज्ञ होते. त्यांना भारतातील दारिद्र्याबद्दल अत्यंत चिंता होती. त्यांच्या मते अनैतिकतेचे मूळ कारण दारिद्र्य आहे. दारिद्र्यामुळे अनेक अनिष्ट बाबींचा शिरकाव होतो. त्यामुळे दुःखाचे मूळ कारण दारिद्र्य आहे. डॉक्टर आंबेडकरांनी दारिद्र्य निर्मूलनासाठी काही योजना मांडल्या. शेत जमिनीचे झालेले तुकडे आणि तिच्यावर वाढत्या लोकसंख्येचा पडलेला भार ही खरी शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची कारणे आहेत. सरकारने उद्योगधंदे सुरू करावेत. देशातील शेत जमिनीचे राष्ट्रीयकरण करून गरजूंना ती कसण्यासाठी द्यावी. देशातील प्रत्येकाचा विमा उतरवला पाहिजे. देशामध्ये सामाजिक समता प्रस्थापित होणे गरजेचे आहे. जल ही संपत्ती आहे असे विचार आंबेडकरांनी मांडले. जल विकासाची जबाबदारी केंद्रीय पातळीवर घेतली पाहिजे.तसेच जलसंपत्तीचा वापर फक्त एका उपयोगासाठी न करता सिंचन, नौकानयन, औद्योगीकरण आणि घरगुती वापरासाठी केला पाहिजे.सामाजिक सुधारणा घडवून आणून देशाच्या प्रगतीची वाट सुकर करणे ऐवजी केवळ शांतता टिकवण्यावर शासनाचा भर होता. म्हणून जातिभेद व अस्पृश्यता अशा दुष्ट चाली नष्ट करण्यासाठी शासनाने काहीच प्रयत्न केले नाहीत. शासनाचा सर्व खर्च लष्कर व शासन यंत्रणा यांवरच होत होता. शिक्षण प्रसार आणि उद्योगधंद्यांची वाढ या दृष्टीने शासनाने काही पावले टाकली नाहीत. तेव्हा आपल्या देशाच्या कारभारात आपणास काही हक्क मिळावे अशी येथील लोकांची मागणी सुरू झाली.

**शासकीय समाजवाद:**

मूलभूत उद्योगांची मालकी व व्यवस्थापन शासनाने आपल्याकडे ठेवावे तसेच विमा व्यवसायाची मक्तेदारी शासनाने स्वतःकडे ठेवून प्रत्येक नागरिकाला त्याच्या उत्पन्नाच्या प्रमाणात ठराविक रकमेचा विमा घेण्याची सक्ती करण्यात यावी. देशातील शेतजमिनीचे राष्ट्रीयीकरण करून ती गरजूंना भाडेतत्त्वावर कसण्यासाठी द्यावी. शेती व उद्योगात मालक, कुळे व सावकार म्हणून ज्यांचे हक्क असतील त्यांना त्यांच्या मोबदल्यात शासकीय कर्जरोखे देण्यात यावे. शेतकऱ्यांना लागणारे पाणी, बैल, अवजारे, खते, बी-बियाणे पुरवण्याची जबाबदारी सरकारने घ्यावी. त्यांच्या मोबदल्यात खंड व व्याज शेतकऱ्याकडून वसूल करावे.

मार्क्सवादातील हिंसेचा त्याग करून त्यातील समाजवादी आशयाशी सुसंग अशा दृष्टीने बुद्ध धर्माचा अर्थ लावण्याची त्यांची धडपड चालू होती.

**ईस्ट इंडिया कंपनीची शासनयंत्रणा आणि वित्त व्यवस्था:**

ईस्ट इंडिया कंपनीची शासनयंत्रणा व वित्त व्यवस्था हा आंबेडकरांनी कोलंबिया विद्यापीठाच्या एम.ए. परीक्षेसाठी सादर केलेला प्रबंध होता. या प्रबंधात इ.स. 1792 चे 1857 या काळातील ईस्ट इंडिया कंपनीचा

राज्यकारभार आणि वित्त विषयक धोरण यांचा आंबेडकरांनी आढावा घेतला आहे. कंपनी सरकारने बसवलेले निरनिराळे कर आणि निरनिराळ्या बाबींवर त्यांनी केलेला खर्च यांची आकडेवारी देऊन कंपनीचे धोरणे लोकहितास कशी घातक होती हे त्यांनी दाखवून दिले आहे. 1833 च्या कायद्याने कंपनीची व्यापाराची मक्तेदारी संपुष्टात आली. 1857 च्या बंड्यानंतर या प्रयत्नांना जोर वाढला व कंपनी बरखास्त करून तिचा कारभार ब्रिटिश सरकारने आपल्या हाती घेतला. कंपनी सरकारने भारतात व इंग्लंडमध्ये जे कर्ज काढले होते त्याचा भाग भारतावर सोपवला हे आंबेडकरांनी नमूद केले. भारत सरकारचे महसुली उत्पन्न हे भारतातील ब्रिटिश मुलखावर होणाऱ्या स्वाऱ्यांचा मुकाबला करण्यासाठी वापरण्यात आले. केंद्राकडे सर्व कर जमा करायचे आणि नंतर प्रांतांना वाटप करायचे ही पद्धत या कामात आवलंबली गेली. कर वाढवण्यावर भर दिल्याने सामान्य माणूस त्रस्त झाला. विशेषता जमिनीवरील कर वाढविल्याने शेतकरी त्रस्त झाला होता. एकूण उत्पन्नात जमिनीवरील कराचा वाटा 54 टक्के इतका झाला होता. या उत्पन्नातुन लोकांच्या कल्याणासाठी, विकासासाठी होणारा खर्च अत्यल्प आणि लष्करावर होणारा खर्च अधिक होता. लष्कर वाढवून भारताचा अधिकाधिक विभाग काबीज करायचा त्यासाठी भारतीय लोकांचा पैसा वापरायचा हे धोरण होते.

**ब्रिटिश काळातील प्रांतिक वित्त व्यवस्थेची उत्क्रांती:**

ब्रिटिश काळातील प्रांतिक वित्त व्यवस्थेची उत्क्रांती हा बाबासाहेबांचा ग्रंथ 1925 साली प्रसिद्ध झाला. कोलंबिया विद्यापीठात पीए.डी. पदवीसाठी त्यांनी सादर केलेला हा प्रबंध आहे. 1833 साली एक कायदा करून ब्रिटिश सरकारने ईस्ट इंडिया कंपनीला दिलेली भारतातील व्यापाराची मक्तेदारी रद्द केली. त्याला अनुसरून वित्त व्यवस्थेचेही केंद्रीकरण करण्यात आले. या ग्रंथात आंबेडकरांनी 1833 पासून 1919 पर्यंतच्या काळातील केंद्र व प्रांत यांच्यातील वित्त संबंधाचा आढावा घेतला आहे. बंगालमधील गव्हर्नरच्या हातात सत्तेचे केंद्रीकरण झाल्यानंतर महसूल आणि खर्च यांचे सर्व निर्णय केंद्र सरकारकडून घेण्यात येत. प्रांतिक शासनांना त्याबाबतीत कोणतेच अधिकार नव्हते. जमिनीवरील साराही शासनाच्या दृष्टीने उत्पन्नाची मोठी बाब होती पण जमीन ही पूर्वीपासून शासनाच्या मालकीची आहे असे गृहीत धरून साऱ्यांचे दर भरमसाठ वाढवण्यात आले त्यामुळे उत्पन्नाला खीळ बसली. आयात मालावरील कर इंग्लंडच्या सोयीनुसार ठरवले जात. आयातीवरील कर अंतर्गत व्यापारावरील जकातीपेक्षा कमी असल्याने परकीय मालाच्या स्पर्धेमुळे भारतीय उद्योगधंद्यांची वाताहत झाली. ही कर पद्धती न्यायाधीष्टीत नव्हती. उत्पन्नातील 45% भाग लष्करावर व 7.9% कर्ज फेडीवर खर्च होत असे. शिक्षण, आरोग्य, कालवे, रस्ते यांसारख्या समाज हिताच्या बाबींवर खर्च करण्याची शासनाला आवश्यकता भासत नसे. या पद्धतीमध्ये आपल्या जमाखर्चाची तोंड मिळवणी करण्याची प्रांतिक शासनावर काही जबाबदारी नसल्यामुळे ही उधळपट्टी करीत आणि त्यांचा जमा खर्च तुटीचा असे. जमिनीवर आकारलेला कर अधिक असल्याने शेतीचा विकास झाला नाही. केंद्र सरकारने उत्पन्नावरील कर रद्द करून श्रीमंतांना दिलासा दिला. त्याची भरपाई करण्यासाठी जमिनीवर आणि मिठावर कर वाढवण्यात आला. श्रीमंतांना सूट आणि गरिबांवर कर हे विचित्र धोरण होते. अर्थसंकल्पातील तूट भरून काढण्यासाठी कराचा अधिक बोजा गरिबांवर टाकण्यात आला. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील अंतर वाढविण्यास या धोरणांनी हातभार लावला असे आंबेडकरांचे मत होते.

**रुपयाचा प्रश्न- उद्धम आणि विकास:**

रुपयाचा प्रश्न- उद्धम आणि विकास हा आंबेडकरांचा ग्रंथ 1923 साली प्रथम प्रसिद्ध झाला. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या डी.एससी. पदवीसाठी त्यांनी लिहिलेल्या प्रबंधावर तो आधारित होता.1833 ते 1923 या काळातील भारतीय चलन पद्धतीचा त्यात आढावा घेतला होता. 1863 ते 1874 या काळात युरोपातील अनेक देश आणि अमेरिकेमध्ये सुवर्णमानकाची पद्धत स्वीकारली. या पद्धतीनुसार आपल्या देशातील नाणी किंवा नोटांच्या बदल्यात ठराविक दराने सोने देण्याची आणि सोन्याच्या बदल्यात आपले चलन देण्याची जबाबदारी प्रत्येक देशातील मध्यवर्ती बँकेने स्वीकारल्यामुळे आंतरराष्ट्रीय चलनाची बाजारपेठ ही व्यवस्थितपणे चालू राहिली व विनिमयाचे दरही स्थिर राहिले. भारताचे चलन रुपयाशी निगडित होते. अनेक राष्ट्रांनी रोप्य परिणामाचा त्यात केल्याने रुपयाची मागणी कमी होऊन त्याच्या किमती घसरत होत्या. त्यामुळे आंतरराष्ट्रीय चलन बाजारात पौंडा सारख्या सुवर्ण परिणामावर आधारलेल्या चलनाच्या सापेक्षतेत रुपयाचा भाव घसरून त्याचे अवमूल्यन होऊ लागले. रुपयाच्या या अवमूल्यनाने भारतीय अर्थव्यवस्थेवर फार अनिष्ट परिणाम झाले. भारतातील खर्चासाठी इंग्लंडला पौंड द्यावे लागत. त्यामुळे रुपयाच्या बदल्यात पौंडाची किंमत वाढल्यावर या खर्चाचा रुपयातील भार वाढत गेला व त्यासाठी सरकारला नवे कर बसवावे लागले. बाजारात रुपयाचे अवमूल्यन होत होते त्याला भारतातील वाढती महागाई कारणीभूत होती असे आंबेडकरांचे म्हणणे होते. आंबेडकरांच्या मते भाववाढीचे खरे कारण भारतात झालेली बेसुमार चलनवाढ हे होते. सुवर्ण विनिमय परिमाणाचा विचार भारतीय अर्थव्यवस्थेसाठी योग्य परिणाम करणारा ठरेल असे मत प्रोसेसर केन्स यांनी मांडले. डॉ. आंबेडकरांनी आपले वेगळे मत मांडले. ते म्हणतात की, सुवर्ण विनिमय परिमाणांमध्ये लवचिकता, परिवर्तनीयता जरूर असावी. मात्र लवचिकता, परिवर्तनीयता दुधारी शस्त्रासारखी घातकही असू शकते. परिवर्तनियता वा लवचिकतेतून भाववाढ होऊन रुपयाची किंमत घसरू शकते. हे सामान्य माणसासाठी अहिताचे आहे. केन्स यांनी आपल्या सिद्धांतात म्हटले आहे की, चलन व्यवस्थेमध्ये सुवर्ण विनिमय परिमाण हे फार फलदायी ठरते. हे परिमाण लवचिक असल्याने देशांमध्ये किती चलन निर्मिती व्हावे हे देशांतर्गत असलेल्या सोन्याच्या साठ्यावर अवलंबून राहत नाही. त्यामुळे चलन व्यवस्थेवर कुठलीच बंधने येत नाही. विनिमयाचा दर बदलला की चलनाचे प्रमाण बदलते आणि त्या देशाला चल निर्मिती करणे सोपे जाते.

**कामगार आणि भारत:**

आंबेडकरांच्या मते, कामगार संघटनांचे मुख्य उद्दिष्ट कामगारांचे जीवनमान खाली येऊ न देणे हे असले पाहिजे. भारतातील ट्रेड युनियनची अवस्था मात्र साठलेल्या पाण्याच्या डबक्यासारखी झालेली आहे. याचे कारण बरेच नेते भित्रे, स्वार्थी आणि गोंदळलेले आहेत. काही कामगार नेते कामगारांची संघटना बांधण्याऐवजी केवळ पत्रके काढण्यावर समाधान मानतात. कामगारांशी फारसा संबंध न ठेवता त्यांचे प्रतिनिधी म्हणून निरनिराळ्या ठिकाणी ते भाषणे करतात. डॉ. आंबेडकरांनी किमान वेतन कायदे, कामाचे तास, कामगारांसाठी उपहारगृह, महागाई निर्देशांकानुसार महागाई भत्ता, रास्तभावातील धान्य केंद्र, प्रॉव्हिडंट फंडाची नियमावली, कामगारांचे सेवांतर्गत प्रशिक्षण, कामगारांच्या पाल्यांना शिक्षण तसेच कामगारांना नुकसान भरपाई देण्यासाठी विमा संरक्षण लागू करण्यात आले. स्त्री- पुरुष वेतनात समानता आणली. कम्युनिस्ट यांच्यामुळे कामगार चळवळीची फार मोठी हानी झाली आहे. त्यांनी कामगार चळवळीवर त्यांना मिळालेल्या वर्चस्वाचा दुरुपयोग केला आहे. क्रांतीचा हेतू समोर ठेवून कामगारांमध्ये असंतोष निर्माण करणे

एवढेच त्यांचे उद्दिष्ट होते. पण क्रांतीसाठी केवळ असंतोष असून भागत नाही. त्यासाठी राजकीय व सामाजिक हक्कांचे न्यायतत्त्व, त्यांचे महत्त्व व त्यांची आवश्यकता यांवर कामगारांचा दृढ विश्वास असावा लागतो. भारतीय मार्क्सवाद्यांनी मात्र कामगारांमध्ये असंतोष निर्माण करण्याचे हत्यार म्हणून संपाचा वापर केला. केवळ मजुरी देऊन श्रमिकांना गुलामाप्रमाणे राबवणारी ही व्यवस्था नाहीशी करून स्वातंत्र्य समता व बंधुता या मूल्यांवर आधारलेली नवी समाज व्यवस्था स्थापित करणे हे श्रमिकांच्या चळवळीचे उद्दिष्ट असले पाहिजे. त्यासाठी मूलभूत सामाजिक परिवर्तनाची गरज आहे. राजकीय सत्ता हे असे मूलभूत परिवर्तन घडवून आणण्याचे एक प्रभावी साधन आहे. म्हणून राजकीय सत्ता हस्तगत करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून श्रमिकांनी आपला वेगळा पक्ष स्थापन केला पाहिजे. मार्क्सवादाची उद्दिष्ट आंबेडकरांना मान्य असली तरी या उद्दिष्टाच्या प्राप्तीसाठी त्यांनी सुचवलेल्या मार्गाबाबत आंबेडकरांचे मतभेद होते. मार्स यांनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग सुचवला होता. त्यावरून कम्युनिस्ट हिंसा एक श्रेष्ठ तत्व मानतात. क्रांतीनंतर कम्युनिस्ट कामगार वर्गाची हुकूमशाही स्थापू इच्छितात. हुकूमशाही व्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच होतो. आपले ध्येय साध्य करण्यासाठी बलाचा वापर करणे उचित मानले गेले की समाजात अनितीचे साम्राज्य पसरते. सर्वत्र गोंधळ व अराजक माजते आणि समाजाचा ऱ्हास होतो असा आंबेडकरांच्या म्हणण्याचा आशय आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार :**

शेतजमिनीवरील वाढत्या लोकसंख्येच्या भारामुळेच जमिनीचे लहान लहान तुकडे व त्यातून शेतकऱ्यांचे दारिद्र्य निर्माण झाले आहे. जर का शेतजमिनीवरील लोकांच्या उपजीविकेचा भार कमी केला नाहीतर जमिनीचे लहान लहान तुकडे असेच होत राहतील. शेतकरी तसाच दारिद्र्याच्या अवस्थेत राहील. त्यासाठी देशात औद्योगीकरण होणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात ग्राम उद्योगांची स्थापना होणे गरजेचे आहे. शेतीची प्रगती होण्यासाठी भूतारण बँका, सहकारी संस्था, खरेदी विक्री संघ यांची स्थापना होणे गरजेचे आहे. खोती, तालुकादारी यासारख्या पद्धतींमध्ये जमीनदारांकडून शेतकरी कुळांची जी पिळवणूक होते तिच्यापासून शेतकरी कुलांचे संरक्षण करणे गरजेचे आहे असे बाबासाहेबांचे विचार होते. बेकारी निवारण ही शासनाची जबाबदारी आहे. सावकारांपासून शेतकऱ्यांचे संरक्षण होण्यासाठी कठोर कायदे करणे गरजेचे आहे. शेतीतील उत्पन्नाचा विचार न करता वसूल केल्या जाणाऱ्या शेतसाऱ्यास त्यांनी विरोध केला. आतिक उत्पन्न असणाऱ्यांना अधिक कर आणि उत्पन्न कमी असणाऱ्यांना कमी कर हा नियम शेतकऱ्यांना सुद्धा लागू करावा असे आंबेडकरांचे म्हणणे होते. कोकणातील खोतांनी शेती असणाऱ्या कुळांना जेरीस आणले होते. त्याविरुद्ध शेतकरी संघटित झाले होते. कोकण प्रांत शेतकरी संघाची स्थापना झाली. कोकणातील शेतकऱ्यांच्या या चळवळीचे नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नारायण पाटील, भाई चित्रे आणि शामराव परुळेकर अशा मान्यवरांनी केले. अन्यकारक खोती पद्धती विरुद्ध रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लढा दिला.1933 ते 1939 अशी सात वर्षे हा संप चालला. बाबासाहेबांच्या प्रयत्नातून खोती निर्मूलन अधिनियम 15 मे 1950 पासून लागू करण्यात आले. त्यानुसार खोती पद्धती नष्ट झाली. कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम 1948 नुसार कसेल त्याची जमीन हे तत्व लागू करण्यात आले. शेती, शेतीसाठी पाणी आणि शेतीसाठी वीज यासंबंधीचे संपूर्ण नियोजन आणि त्याची अंमलबजावणी करण्यात डॉ. आंबेडकरांनी विशेष कामगिरी केली. शेती ही सरकारची मालमत्ता आहे आणि शेतकरी हा कर्जदार आहे ही शासनाची भूमिका डॉ.आंबेडकरांना मान्य नव्हती. त्यामुळे शेतीतील उत्पन्नाचा विचार न करताच वसूल

केल्या जाणाऱ्या शेतसाऱ्यास त्यांनी विरोध केला. शेतीतील निव्वळ काल्पनिक उत्पन्नाच्या अंदाजावरून सरसकट सेतसारा आकारणी गैर आणि अन्यकारक आहे असे ते म्हणाले. अधिक उत्पन्न असणाऱ्यांना अधिक कर आणि कमी उत्पन्न असणाऱ्यांना कमी कर हा नियम शेतकऱ्यांनाही लागू करावा. शेती, शेतीसाठी पाणी, पाण्यातून वीज, शेतीसाठी वीज यासंबंधीचे संपूर्ण नियोजन याची अंमलबजावणी करण्यात डॉ.आंबेडकरांनी केलेली कामगिरी महत्त्वाची आहे.

**संदर्भ:**


1. नलिनी पंडित, 'आंबेडकर', ग्रंथाली प्रकाशन, 2005
2. शंकरराव खरात, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार', इंद्रायणी साहित्य प्रकाशन, 2008
3. भास्कर भोळे, 'डॉ.आंबेडकरांचा वैचारिक वारसा' सुगावा प्रकाशन, पुणे, 1998
4. अरविंद पोळ, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे लोकसंख्या नियंत्रणावरील विचार' सुगावा प्रकाशन,पुणे 1986
5. गंगाधर पानतावणे, 'पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर' प्रतिमा प्रकाशन, 1996
6. प्रल्हाद लुळेकर 'अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा' सायन पब्लिकेशन, 2015
7. चांगदेव खैरमोडे, 'डॉ.भीमराव रामजी आंबेडकर' सूगावा प्रकाशन, पुणे 1998
8. सुभाष खंडाळे, 'रुपयाची समस्या: याचे मूळ आणि त्यावरील उपाय' सुधीर प्रकाशन, वर्धा 2013

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांसाठी केलेले कार्य

**डॉ. सारिका विष्णू केदार**
पाली विभाग प्रमुख
पु. अ. होळकर महाविद्यालय, राणीसावरगाव ता. गंगाखेड जि.परभणी

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक महान तत्वचिंतक बुद्धी प्रामाण्यवादी विचारवंत आणि लोकशाही मूल्यांचा पुरस्कार करणाऱ्या आंतरराष्ट्रीय किर्तीचे युगपुरुष अशी जगभरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ओळख आहे. संपूर्ण आयुष्यभर त्यांनी जोपासलेली तत्वनिष्ठ आणि भारतीय समाजाप्रती असलेली कार्यनिष्ठा ही त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर सुद्धा अनेक विविध चळवळींना प्रेरणेच्या स्वरूपात आजही प्रेरणादायी ठरली आहे. त्यांनी भारतीय समाज जीवनातल्या प्रतिगामी रूढी परंपरांना विषमता आणि शोषणाला विरोध करून समतेची तत्व रुजविण्याचा प्रयत्न केला. भारताला लोकशाहीवादी देश करण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान अभूतपूर्व आहे. त्यांनी आयुष्यभर केलेल्या कार्यामुळे सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली. त्यांनी समताधिष्ठित समाज व्यवस्थेचे स्वप्न पाहिले त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी त्यांनी स्वतःला झोकून दिले त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार आज अनेक दशकांनंतर ही महत्त्वाचा वाटतो. बाबासाहेबांनी विविध क्षेत्रात आपले कार्य केले आहे. शिक्षण,समाज, राजकारण,अर्थकारण, शेती, उद्योग, कायदा अशा विविध क्षेत्रांमध्ये कार्य करत असताना आपले विचार मांडले आहे. त्यांनी शिक्षणाला महत्त्व देऊन शिक्षणामुळेच मानवाचा सर्वांगीण विकास होतो हे त्याने ओळखले होते. मानवी जीवनातील दारिद्र्य हे केवळ शिक्षणामुळे संपते असे त्यांना वाटत होते. समता न्याय स्वातंत्र्य यावर त्यांचा विश्वास होता. त्यांनी आयुष्यभर समतेची लढाई विविध टप्प्यावर लढलेली आहे. त्यांनी भारतीय समाजातील प्रत्येक घटकासाठी त्यांची योगदान दिलेले आहे. त्यामध्ये अस्पृश्यता निवारण, स्त्री शिक्षण, समता, न्याय,स्वातंत्र्य यासाठी त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून भारतीय समाजाला योगदान दिले आहे त्यांनी समतेसाठी काळाराम मंदिर प्रवेश, महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, विविध शिक्षण संस्थाची स्थापना, विविध वस्तीगृहांची निर्मिती, राज्यघटनेची निर्मिती, रिपब्लिकन पक्षाची स्थापना, बहिष्कृत भारत आणि मूकनायक सारखी वर्तमानपत्रे, हिंदू कोड बिल, वारसा हक्क, कुळ कायदे अशा विविध क्षेत्रात कार्य केले आहे. त्यापैकी स्त्रियांच्या उद्धाराचे सर्वात महत्त्वपूर्ण कार्य डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे त्यांनी महात्मा फुलेंची प्रेरणा घेऊन त्यांना गुरुस्थानी मानून शिक्षणाचा वसा पुढे चालू ठेवला. सावित्रीबाईंना सोबत घेऊन महात्मा फुलेंनी स्त्री शिक्षणासाठी लढा दिला. तोच लढा पुढे बाबासाहेबांनी सर्वांसाठी शिक्षण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. स्त्री-पुरुष, जातीभेद, असा कोणताच भेद न मानता सर्वांसाठी कार्य केले आहे. त्यापैकी भारतीय स्त्रियांसाठी केलेली कार्य खूप महत्त्वाचे आहे. प्रस्तुत शोधनिबंधातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांसाठी केलेल्या कार्याचा आढावा घेतला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जीवन परिचय अभ्यासणे.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध कार्याचा आढावा घेणे.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांसाठी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

**विषय विवेचन :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ साली तत्कालीन मध्ये प्रांतातील मऊ येथील लष्करी छावणी सुभेदार रामजी मालोजी सकपाळ व भिमाबाई यांच्या पोटी झाला. भीमराव हे चौदावे आपत्य होते. सुभेदार त्यावेळी मोहोळ येथील लष्करी शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत होते. १८९४ मध्ये सुभेदार रामजी लष्करी सेवेतून निवृत्त होऊन दापोलीला स्थलांतरित झाले. काही दिवस दापोलीस राहून त्यांनी आपले बिऱ्हाड साताऱ्यास हलविले. पेन्शनच्या रकमेत कुटुंबाचा खर्च भागत नसल्याने सुभेदारांनी सातारा जिल्ह्यातील गोरेगाव येथे सार्वजनिक बांधकाम विभागात स्टोअर किपरची नोकरी पत्करली. भीमरावांचे नाव सातारा येथील प्राथमिक शाळेत नोंदविण्यात आले. डिसेंबर १८९६ मध्ये भीमा बाईचे निधन झाले. ७ नोव्हेंबर १९०० मध्ये भीमरावांचे नाव सातारा येथील सरकारी माध्यमिक शाळा सातारा हायस्कूल आत्ताचे प्रताप सिंह हायस्कूल या शाळेत सुभेदराने नोंदविले. या शाळेतील भीमरावांची ब्राह्मण शिक्षक कृष्णाजी केशव आंबेडकर या शिक्षकाने भीमरावांचे मूळ गावावरून पडलेले अंबावडेकर हे नाव बदलून आपले स्वतःचे आंबेडकर हे आडनाव दिले व शाळेच्या दप्तरात तशी नोंदणी करून टाकली. मुळगाव तेव्हाचे आंबडवे ता.मंडणगड जिल्हा रत्नागिरी हे होते. नोव्हेंबर १९०४ मध्ये भीमराव सातारा हायस्कूल मधून इंग्रजी चौथी परीक्षा उत्तीर्ण झाले. डिसेंबर १९०४ मध्ये मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून सुभेदारांनी आपले घर मुंबईत हलविले. मुंबई ते एलफिस्टंट रोडच्या डबक चाळीत राहावयास गेले. सुभेदारांनी प्रथम भीमराव ना मराठा हायस्कूलमध्ये दाखल केले परंतु तेथील अभ्यासक्रम उच्च दर्जाचे नसल्याने भीमरावने एलफिस्टन हायस्कूलमध्ये दाखल केले. जानेवारी १९०७ मध्ये भीमराव मॅट्रिकच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. अस्पृश्य समाजातील मॅट्रिक उत्तीर्ण झालेले ते पहिले विद्यार्थी होत. भीमराव मॅटर ची परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी राव 72 सीके बोले यांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित करण्यात आले याप्रसंगी सुविधांचे मित्र व भीमरावांचे मार्गदर्शक गुरुवर्य कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांनी आपले भगवान बुद्धाचे चरित्र (१८१८) हे पुस्तक भेट दिले. तेव्हापासूनच बाबासाहेबांच्या विचारांमध्ये व मनामध्ये बुद्धाचे विचार बिंबवले गेले होते. त्याचा प्रभाव त्यांच्यावर पडला आणि बाबासाहेबांनी त्यांच्या हयातीच्या शेवटच्या काळात म्हणजे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माचा स्वीकार केला. बौद्ध धम्माचा स्वीकार करणे ही त्या काळातील सगळ्यात मोठी क्रांती होती. त्याची चर्चा संपूर्ण जगात झाली. नंतर बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी वेगवेगळ्या देशांमध्ये जाऊन शिक्षण त्यांनी घेतले. त्यांना बडोद्याचे सयाजी महाराज गायकवाड तसेच कोल्हापूरचे शाहू महाराज यांनी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन मदत केली. त्यामुळेच बाबासाहेब एवढ्या मोठ्या उच्च शिक्षणाच्या पदव्या घेऊन आपल्या मायदेशी म्हणजे भारत देशामध्ये पोहोचले आणि भारताच्या संविधानाची निर्मिती केली. जानेवारी १९१३ मध्ये उत्तीर्ण केली.२ जून १९१५ रोजी भीमराव आणि सादर केलेला 'ऍडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी' या विषयावरचा प्रबंध कोलंबिया विद्यापीठाने स्वीकारून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना एम. ए. ची पदवी बहाल केली. जून १९१६ मध्ये बाबासाहेबांनी पीएच. डी.च्या पदवीसाठी द नॅशनल डिव्हीडंड ऑफ इंडिया: अ हिस्टॉरिकल अँड ऍनालिटिकल स्टडी या नावाचा प्रबंध कोलंबिया विद्यापीठाला सादर केला तो विद्यापीठाने स्वीकारला. ११ ऑक्टोबर १९१६ मध्ये लंडनच्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स या

संस्थेत अर्थशास्त्राच्या मास्टर ऑफ सायन्स आणि डॉक्टर ऑफ सायन्स या पदव्यांसाठी प्रवेश डिसेंबर १९१६ मध्ये लंडन विद्यापीठाच्या सिनेटने भीमरावांचे अर्जावर चर्चा करून भीमरावांना सरळ एम. एस्सी.च्या पदवी परीक्षेला बसण्याची परवानगी देणारा ठराव संमत केला.

बाबासाहेबांना शिक्षणाची अफाट आवड होती आणि जिद्दीन आणि चिकाटीने उच्च शिक्षण घेऊन आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यामध्ये त्यांचा मोलाचा सहभाग होता हे नाकारता येत नाही. त्यांनी सिडनेहहॅाम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी केली. आणि येथून पुढे हळूहळू आपल्या सामाजिक कार्याला सुरुवात केली. त्यांचे विविध क्षेत्रातले कार्य महत्त्वाचे आहे.

३१ जानेवारी १९२० मध्ये अस्पृशांत जागृती करण्यासाठी तसेच अस्पृश्यांची बाजू देशासमोर व सरकार पुढे मांडण्यासाठी डॉक्टर आंबेडकरांनी मूकनायक हे पत्र सुरू केले सरकारी नोकरीत असल्याने त्यांना अधिकृतपणे संपादक राहता येत नसल्याने त्यांनी पांडुरंग नंदराम भटकर यांना मूकनयकचे संपादक नेमले होते. नंतर पंधरा मार्च१९२० मध्ये बाबासाहेबांनी शून्य हम कॉलेजमधील प्राध्यापक पदाचा राजीनामा दिला आणि त्यांना २० मार्च १९२० रोजी सेवा मुक्त करण्यात आले.२१ व २२ मार्च १९२० मध्ये कोल्हापूर संस्थानातील माणगाव येथे दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाची परिषद डॉ.आंबेडकरांचे अध्यक्षतेखाली भरली या परिषदेला दुसऱ्या दिवशी छत्रपती शाहू महाराज जातीने हजर राहिले व त्यांनी भाकीत केले की डॉ. आंबेडकर हे तुमचा उद्धार केल्याशिवाय कधी राहणार नाहीत इतकेच नव्हे तर अशी एक वेळ येईल की ते सर्व हिंदुस्तानचे पुढारी होतील. डॉ. आंबेडकरांच्या सार्वजनिक जीवनातील पहिली परिषद होती.२० जुलै १९२४ मध्ये दामोदर हॉल परळ येथे डॉक्टर आंबेडकरांचे अध्यक्षतेखाली सभा होऊन बहिष्कृत हितकारणी सभा या संस्थेची ९ मार्च १९२४ च्या ठरावानुसार स्थापना झाली. “शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा” हे या संस्थेचे ब्रीद वाक्य होते. या सभेचे अध्यक्ष सर चिमणलाल हरिलाल सेटलवाड होते कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर आणि कार्यवाह सिताराम नामदेव शिवतरकर होते.४ जानेवारी १९२५ रोजी बहिष्कृत हितकारणी सभेच्या विद्यमाने डॉ.आंबेडकरांनी जीवाप्पा ऐदाळे यांच्या सहकार्याने सोलापूर येथे अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी पहिले मोफत वस्तीगृह सुरू केले.१ जानेवारी १९२७ रोजी पुण्याजवळ भीमा कोरेगाव विजयस्तंभ डॉ. आंबेडकरांचे अध्यक्षतेखाली सभा भरली तेव्हा डॉ.आंबेडकर मानले की ज्या महार जातीच्या शेकडो सैनिकांनी अनेक लढ्यात ब्रिटिश सरकारला यश मिळवून दिले त्या महार जातीतील तरुणांना सैन्यात प्रवेशनाकडून सहकार्य महा जातीचा विश्वासघात केला आहे. १९ व २० मार्च २९२७ रोजी महाड येथे कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली बहिष्कृत हितकारणी सभेचे विद्यमाने भरली. दुसऱ्या सकाळी ठरल्याप्रमाणे आभार प्रदेशाच्या ठरावावर बोलताना अनंत चित्रे यांनी चवदार तळ्यावर जाऊन पाणी पिण्याची व त्याद्वारे बोले ठराव अमलात आणण्याची सूचना केली त्यावर एकमत होऊन डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली भव्य मिरवणूक चवदार तळ्यावर गेली प्रथमता डॉ.आंबेडकर तळ्याच्या पायऱ्यावरून तळ्यात उतरले आणि ओंजळ भरून पाणी प्याले. त्यांचे अनुकरन हजारो सत्याग्रह यांनी केले अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांनी आपल्या समता प्रस्थापनेच्या चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. डॉ.आंबेडकर डाग बंगल्यावर गेले पण परतणाऱ्या अस्पृश्य सत्याग्रहींवर सवर्णाने लाट्याकटाने हल्ला केला शिजवलेल्या जीवनात माती कालवली.२१ मार्च १९२७ रोजी अस्पृश्याने तळे पाठवले म्हणून महाडा तील ब्राह्मणांनी शास्त्रोक्त विधी करून तळ्याचे शुद्धीकरण केले. ३ एप्रिल १९२७ रोजी डॉक्टर आंबेडकरांनी स्वतःच्या

संपादकत्वाखाली चळवळीचे मुखपत्र म्हणून बहिष्कृत भारत हे पाक्षिक सुरू केले. डॉक्टर आंबेडकरांनी संस्कारापूर्वक समतेचा कार्यप्रचार करण्यासाठी समाज समता संघ ही संस्था स्थापन केली ४ सप्टेंबर १९२७ मध्ये. डॉक्टर आंबेडकरांचे ज्येष्ठ बंधू बाळाराम यांचे मुंबईत हृदय विकारां निधन त्यावेळी डॉक्टर आंबेडकर अमरावती येथे अंबादेवी मंदिरात प्रवेश सत्याग्रहाला पाठिंबा देण्यासाठी गेले होते ती तारीख होती १२ नोव्हेंबर १९२७. बाबासाहेबांनी दोन मार्च १९३० मध्ये नाशिक येथे काळाराम मंदिर प्रवेश केला. गोलमेज परिषदांमध्ये सहभाग नोंदवून आपली बाजू भक्कमपणे मांडली मांडली. समाजातील सर्व घटकांचे प्रश्न बाबासाहेबांनी मांडले. सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना मुंबई येथे आणि मिलिंद महाविद्यालय स्थापना छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) येथे केली. बाबासाहेबांचे कर इतके मोठे आहे की जेवढे आपण लिहू तेवढे कमीच असणार आहे. त्यांच्या सामाजिक कार्यातील स्त्रिया विषयीचे कार्य महत्त्वाचे आहे.

स्त्रियांविषयीचे महत्त्वाचे कार्य म्हणजे मनोज स्मृती हा हिंदू धर्माचा त्यावेळेसचा पवित्र ग्रंथ याचे दहन करण्यात आले.ते २५ व २६ डिसेंबर १९२७ मध्ये महाड सत्याग्रह परिषद डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली आणि २५ डिसेंबर रोजी डॉ.आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली विषमतेची शिकवण देणाऱ्या मनुस्मृति या पवित्र हिंदूंच्या ग्रंथाची बापूसाहेब सहस्त्रबुते यांच्या हस्ते परिषदेच्या मंडपा समोर खास तयार केलेल्या विविध दहन करण्यात आले. त्यामुळे भारतीय समाजातील सर्व स्त्रियांना समता नाकारणाऱ्या या ग्रंथाचे दहन केल्यामुळे भारतीय समाज स्त्रिया आज ताठ मानेने जीवन जगत आहेत. हे केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच हे विसरून चालणार नाही. २८ जुलै १९२८ रोजी मुंबई विधिमंडळात मांडलेल्या स्त्री कामगारांना प्रसूती काळात रजा वगैरे सवलती संबंधिचा बिलास डॉ.आंबेडकर यांनी ठाम पाठिंबा जाहीर केला होता. आज ज्या महिलांना प्रसूती रजा मिळत आहेत त्या केवळ बाबासाहेबांनी लढा दिला म्हणूनच आपल्याला त्या प्रसूती रजा मिळत आहेत. हे बाबासाहेबांचे स्त्रियांसाठी केलेले महत्वाचे कार्य आहे. स्त्रियांच्या हक्कासाठी हिंदू कोड बिल सादर केले ते मंजूर झाले नाही म्हणून बाबासाहेबांनी राजीनामा दिला. यावरून बाबासाहेब स्त्रियांच्या उद्धारासाठी किती प्रयत्नशील होते यातून दिसून येते. स्त्री स्वातंत्र्याचे कैवारी असणाऱ्या या प्रख्यात प्रकांड विद्वान पंडिताला कळून चुकले होते की कोणतेही समाजाची प्रगती करायची असेल उन्नती करायची असेल तर त्या समाजात शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होणे आवश्यक आहे म्हणून शिक्षणाचा हा सार्वत्रिक प्रसार केवळ पुरुषातच होऊन चालणार नाही तर तो स्त्रियांमध्ये हे होणे आवश्यक आहे कोणत्या समाजाचे दर्जा हा त्या समाजाच्या सुधारणेचा मापदंड असतो म्हणूनच बाबासाहेबांनी स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करताना अनेक सभा संमेलनातून परिषदेतून विशेषतः महिला परिसंवादातून तसेच आपल्या लेखनातून हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून राज्यघटनेतून स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार करून स्त्री शिक्षणावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष भर दिला आणि मुंबई औरंगाबाद पंढरपूर येथे तर शिक्षण संस्था वस्तीगृहाची स्थापना करून आपले स्त्री शिक्षण विषयक स्वप्न साध्य करण्याचा प्रयत्न केला त्यांच्या या कृतीतून स्त्रियांचा उन्नतीचा आणि स्त्री शिक्षणाचा त्यांना अभिप्रेत असलेला जो समाज आहे तो निर्माण होईल याची अपेक्षा त्यांना होती म्हणूनच त्यांनी हे सगळे कार्य केले आहे. भारतातले हिंदू धर्मातील चातुर्वरण व्यवस्था आणि स्त्री पुरुष विषमतेवर आधारित समाजाचे एक अभिषेक समाजाला आणि समस्त स्त्रीवर्गला शूद्र समजून शूद्र आणि स्त्रियांना वेद अभ्यासाचा अधिकार नाकारला होता त्यांना माणूस या संज्ञेपासून वंचित करून पशु पेक्षाही हेन लेखन त्यांना शिक्षणात वंचित केले होते अशा शुद्रांना

सांगण्याजोग आहे शिक्षण मार्ग तो म्हणजे शिक्षणामुळे माणूस पण येईल आणि पशुत्व निघून जाईल. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार,वारसा हक्क मिळवून देणे,घटस्फोटाचा अधिकार सर्व प्रकारचे स्वातंत्र्याचे अधिकार बाबासाहेबांनी स्त्रियांना मिळवून दिले. ते त्यांच्या राज्यघटनेच्या माध्यमातून आपल्या कृतीतून हे विसरून चालणार नाही. म्हणून स्त्रियांचे उद्धारक, स्त्रियांचे कैवारी, समतेचे दूत, शिक्षण प्रेमी असे बाबासाहेबांना म्हटले जाते. बाबासाहेबांना शिक्षणाची प्रचंड आवड होती. त्यामुळेच बाबासाहेब विश्वविख्यात पंडित बनले आहेत. याची जाणीव प्रत्येक भारतीयांना असायलाच हवी. त्यातल्या त्यात भारतातील भारतीय समाजातील प्रत्येक स्त्रियांनी बाबासाहेबांचे हे कार्य समजून, वाचून, जाणून घेतले पाहिजे तरच त्यांनी केलेल्या कार्याची सफलता समग्र स्त्री जातीला कळेल. व त्यांच्या जीवनाची वाटचाल अतिशय चांगल्या पद्धतीने होईल यात काही शंका नाही असे मला वाटते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध क्षेत्रात काम करून आपला ठसा संविधानाच्या माध्यमातून भारतीय लोकांच्या मनावर तसाच जगाच्या जगातील लोकांच्या मनावर उमटवलेला आहे. बाबासाहेब आर्थिक सामाजिक शैक्षणिक राजकीय कायदा समता स्वातंत्र्य बंधुता अशा विविध पैलू वर काम करत असताना त्यांच्या जीवनामध्ये अनेक चढउतार आले. त्यांची पत्नी मुले आई वडील भाऊ असे अनेक त्यांना सोडून गेले तरी बाबासाहेब न डगमगता शेवटच्या क्षणापर्यंत स्त्रियांच्या उद्धारासाठी आपले कार्य करीत राहिले या अतिशय विद्वान चौफेरदृष्टी असणाऱ्या महान शिक्षण तज्ञ, घटनाकार, भारतभूषण, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना स्त्री कार्याबद्दल आणि इतर सर्व कार्याबद्दल आम्ही भारतीय समाज म्हणून त्यांचे ऋण कधीच विसरू शकणार नाही. अशा महामानवाचा मृत्यू ६ डिसेंबर १९५६ रोजी झाला. सर्व प्रकारचे कार्य पूर्ण करून या महामानवाने जगाचा अखेरचा निरोप घेतला.

**निष्कर्ष :**

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्त्रियांचे उद्धार करते होते.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री शिक्षणावर विशेष भर दिलेला आहे.

३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी मनुस्मृतीचे दहन केले आहे.

४. स्त्रियांच्या उद्धारासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक शिक्षण संस्थाची वस्तीगृहाची स्थापना केली आहे.

५. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व यावर आधारित त्यांचे विचारसरणी होती.

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना प्रसूती रजा मिळण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते.

७. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांच्या विचाराचा वारसा पुढे चालवल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :**

१. धनंजय कीर; डॉ. बाबासाहेब आंबेडकर; पॉप्युलर प्रकाशन, मुंबई चौथी आवृत्ती पुनर्मोधन २०१३

२. सोहनलाल शास्त्री; हिंदू कोड बिल और डॉ. आंबेडकर; सम्यक प्रकाशन, नई दिल्ली; चतुर्थ संस्करण २००३

३. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर; भारताचे संविधान; भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय; सारनाथ प्रकाशन, बुक डेपो परभणी; पहिली आवृत्ती डिसेंबर २०१२

४. सर्वदर्शी डॉ बाबासाहेब आंबेडकर; संपादक डॉ. पी. विठ्ठल व डॉ.नागोराव कुंभार; डायमंड पब्लिकेशन, पुणे प्रथम आवृत्ती १७ सप्टेंबर २०१६

५. चांगदेव भवानराव खैरमोडे; डॉ. भीमराव रामजी आंबेडकर खंड तीन; सुगावा प्रकाशन,पुणे

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार; संपादक डॉ.धनराज डाहाट खंड-६ धम्म; संकेत प्रकाशन, नागपूर

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक योगदान

**गंगाधर सायलू पेंटावार**
कुंडलवाडी ता. बिलोली जि. नांदेड

**प्रस्तावना :-**

शिका, संघटित व्हा, संघर्ष करा,' हा उद्धाराचा राजमार्गच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण भारतीयांना दिला. महात्मा. फुले यांच्या सामाजिक, शैक्षणिक, विषमतानिर्मूलनाच्या कार्याचा वारसा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पुढे चालविला आणि त्यांना गुरुस्थानी मानून सामाजिक क्रांतीचे कार्य अधिक सक्षम बनविले. शोषितवर्गाचे शिक्षण झाले पाहिजे, हा त्यांचा आग्रह होता. देशातील विषमतेला नष्ट करणारा एकमेव उपाय म्हणजे शिक्षण होय, असे त्यांचे मत होते. शांताराम गरुड यांच्या मते 'शिक्षणाची ओढ, अध्यापन निष्ठा, यांचे पूर्वसंचित आणि महात्मा फुले यांच्या समाजपरिवर्तनासाठी प्रबोधन, संघटन व आंदोलन यांच्या लोकविलक्षण कार्यसिद्धीचे सांस्कृतिक पूर्वसंचित अशी अनेकविध पूर्वसंचितांची शिदोरी पचवित भारतरत्न डॉ. बाबासाहेबांचे उत्तुंग व्यक्तिमत्व घडलेले आहे.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अमेरिकेत 4 वर्षे राहिले. त्यांना उत्तम प्राध्यापकांचे मार्गदर्शनही लाभले. त्यांनी नवा देश पाहिला, नवी संस्कृती पाहिली, नवे ज्ञान अनुभवले, माणसा-माणसातील संबंधाची जाण त्यांना आली. आपल्या भारतीय परिस्थितीशी तुलना करण्यासाठी त्यांना नवे गवसले. भेदभावाची कृत्रिम बंधने नसलेला मुक्त समाज त्यांनी पाहिला. नवे जग पाहून ते भारतात आले. भारतात आल्यावर त्यांनी सामाजिक समतेसाठी प्रयत्न करण्याचे ठरविले. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, याची त्यांना खात्री पटली. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानव वंश शास्त्र, कायदा इत्यादी विविध शास्त्रांचा अभ्यास केलेला व त्या विषयात पारंगत असलेला शिवाय सामाजिक बांधिलकी मानणारा नेता त्यावेळी दुसरा कोणी नव्हता. त्यांना पर्शियन, संस्कृत, फ्रेंच आणि जर्मन हया परदेशी भाषेचेही त्यांना चांगले ज्ञान होते.शिक्षणाचे महत्व ओळखणाऱ्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिनांक 20 जून, 1946 साली मुंबई येथे सिध्दार्थ महाविद्यालय आणि दिनांक 19 जून, 1950 साली औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. बाबासाहेबांना कोलंबीया विद्यापीठातर्फ दिनांक 5 जून, 1952 साली डॉक्टर ऑफ लॉज आणि हैद्राबाद, उस्मानिया विद्यापीठातर्फ दिनांक 12 जाने. 1953 साली डॉक्टर ऑफ लिटरेचर पदवी अर्पण करण्यात आली.' त्यांचे आयुष्य तीन गुरूंनी घडले. ते बुध्द, संत कबीर, महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहु महाराज यांना आपले गुरू मानत असत. दिनांक 6 डिसेंबर, 1956 साली दिल्ली येथे त्यांच्या निवासस्थानी महापरिनिर्वाण झाले. या ठिकाणी फक्त त्यांच्या शैक्षणिक जीवनपटावर प्रकाश टाकण्यात आला.वाचनाच्या संदर्भात विचार, विद्यार्थ्यांच्या संदर्भात शैक्षणिक विचार, अध्यापकाच्या संदर्भात शैक्षणिक विचार, वसतीगृहाच्या संबंधी विचार, मागासवर्गीयांच्या शैक्षणिक तरतूदी. भारतीय संविधानातील सर्वसमावेशक शैक्षणिक तरतूदी इत्यादी स्वरूपाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचाराचा मागोवा या ठिकाणी घेता येईल.

**जीवन परिचयः-**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म दिनांक १४ एप्रिल १८९१ मध्ये मध्यप्रदेशातील महू येथे झाला. त्यांचे मुळगाव हे महाराष्ट्रातील रत्नागीरी जिल्हयातीलदापोली जवळील अंबावडे हे होते. त्यांचे पूर्ण

नाव भिमराव रामजी आंबेडकर. त्यांनी इ.स १९०८ मध्ये मॅर्टिकची परीक्षा पास केली. इ.स १९१५ मध्ये कोलंबिया विद्यापीठातून एम. ए. ची परीक्षा पास केली. त्यांनतर इ.स १९१६ मध्ये पीएच. डी पदवी प्राप्त केली. दिनांक ६ डिसेंबर १९५६ मध्ये दिल्ली येथे त्यांचे महापरिनिर्वाण झाले.

**भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे ग्रंथ:-**

भारतरत्न डॉ. आंबेडकरांनी आपल्या हयातीत अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहीले ते पुढिल प्रमाणेः- 1) थॉट्स ऑन पाकिस्तान 2) हू वेअर द शुद्राजः 3) व्हॉट कॉग्रेस अॅण्ड गांधी हॅव्ह डन टू दी अनटचेबल 4) ॲनिहिलेशन ऑफ कास्टस इट्स ओरिजीन अॅण्ड सोल्युशन 5) द प्राब्लेम ऑफ

**शैक्षणिक योगदान :-**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तळागाळातील लोकांना जागृत केले. यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी प्राणाची बाजी लावली. इंग्रजांसमोर आपल्या समाजबांधवाची कैफियत मांडली. येवढेच करून ते थांबले नाही. त्यासाठी समाजाला संघटित करून दिनांक २० जुलै इ.स १९२४ रोजी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. इ.स १९२८ मध्ये दलितवर्ग शिक्षण संस्थेची स्थापना केली. सिडनेहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक व इ.स १९३५ मध्ये शासकीय महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्य केले. त्याचबरोबर दिनांक ८ जुलै १९४५ मध्ये पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. त्याअंतर्गत इ.स १९४६ मध्ये सिध्दार्थ महाविद्यालयाची मुंबई व इ.स १९५० मध्ये मिलिंद महाविद्यालयाची औरंगाबाद येथे स्थापना केली.

**शिक्षणाचा विस्तार :-**

गुणभेदाचे अंतर नाहीसे झाले पाहिजे. त्यासाठी शिक्षणाचा विस्तार झाला पाहिजे. आपण फार जागृत झाले पाहिजे, संधी प्राप्त होणे आणि ती पदरात पाडून घेणे हे आपल्याकडे आहे. शिक्षणाच्या अभावी हे सुसाध्य होत नाही.आज समाजास अत्यंत निकडीचे असे कोणते कार्य असेल तर ते शिक्षण विस्तार हे होय. समाजातील प्रत्येक व्यक्तीने तसेच हर एक संस्थेने शिक्षणाच्या बाबतीत आपल्या तरूण पिढीचे पाउल पुढे कसे पडेल हया प्रश्नांकडे आपले लक्ष पुरविले पाहिजे व त्या अनुरोधाने आपल्या कार्याची दिशा ठरविली पाहिजे.बहिष्कृत विद्यार्थ्यांच्या कर्तव्यावरच बहिष्कृतांचे भवितव्य विद्यार्थ्यांनी आपले कर्तव्य यथायोग्य पार पाडण्यावर बहिष्कृतांचे भवितव्य अवलंबून आहे, असे सांगितले. त्याचप्रमाणे बहिष्कृतातील सुशिक्षित स्त्रियांनीही आपले शील व कर्तव्य सांभाहून समाजाच्या प्रगतीस हातभार लावण्याचा उपदेश केला.

**मिलिंद महाविद्यालयाची स्थापना :-**

जी ध्येये गौतमांनी आपल्या शिष्यांपुढे ठेवली होती आणि हीच ध्येय सिध्दार्थ कॉलेज अनुसरणार आहे. 1. सत्य शोधून काढणे व 2. जो धर्म आपल्याला मानवता शिकविलं त्याच धर्माचे अनुसरण करणे. मिलिंद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये विद्या, प्रज्ञा, करूणा, शील व मैत्री ही पंचतत्वे रूजविणे, शिकविणे हे ध्येय मिलींद महाविद्यालयाचे आहे. अलिकडील शिक्षण सम्राटांप्रमाणे बाबासाहेबांनी आपल्या शैक्षणिक संस्थेस स्वतःचे नाव दिले नाही. त्यांचे वडील सुभेदार रामजी आंबेडकर व त्यांची आई भिमाई यांचे नावही आपल्या संस्थेस देवू शकले असते. पण त्यांनी असे केले नाही. तर संस्थेस पिपल्स एज्युकेशन सोसायटी व महाविद्यालयांना सिध्दार्थ, मिलिंद ही नावे दिली. औरंगाबादच्या 150 एकर मिलिंद कॉलेजच्या परिसरास नागसेनवन असे नाव दिले आहे. पिपल्स, सिध्दार्थ, मिलिंद, नागसेन ही नावे लोकशाही,

विचारस्वातंत्र, चिकित्सा व प्रामाणिक, बौध्दीक वादविवादाची प्रतिके आहेत. बाबासाहेबांचे शैक्षणिक कार्य-कर्तृत्व पाहता शिक्षण क्षेत्रात आज जी अराजक सदृश्य स्थिती निर्माण होवून गुणवत्तेची घसरण होत आहे आणि शैक्षणिक संस्था सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून नव्हे तर नफेखोरीच्या दृष्टीकोनातून उभारण्यात येत आहे. ते पाहता, बाबासाहेबांच्या मुल्यगर्भ शैक्षणिक विचारांचे सदोदित मनन-चिंतन होणे गरजेचे आहे.

**स्वातंत्र्य, समता, व बंधुता :-**

फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिलेली अभूतपूर्व देणगी म्हणजे स्वातंत्र्य, समता, व बंधुता. ज्याठिकाणी स्वातंत्र्य नसेल त्या ठिकाणी गुलामगिरी आणि पारतंत्र्य येते. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी केलेली अधिकारांची मागणी म्हणजे स्वातंत्र्य. ज्या देशांमध्ये जात, धर्म, वंश, पंथ, लिंग, वर्ग या कारणांमुळे विषमता असते तेथे समानता नाहीशी होऊन समाजात भेदभाव निर्माण होतो. असा भेदभाव राष्ट्राला घातक असल्यामुळे डॉ. आंबेडकरांनी संविधानात समान दर्जा व समान संधीची तरतूद करून समता प्रस्थापित करण्यासाठी अथक प्रयत्न केले. स्वातंत्र्य, समता व बंधुता ही राष्ट्र बांधण्याची साधने आहेत व त्यातूनच शोषणमुक्त समाज निर्माण होऊन देशाची आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रगती होईल असे ते मानतात.

**समारोप :-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फक्त एकाच जातीतील स्त्रीचा विचार केला नाही तर संपूर्ण जाती धर्मातील स्त्रींयाकरीता त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे कार्य केले. डॉ. आंबेडकरांची भारताच्या भवितव्यावर प्रगाढ निष्ठा होती. परिस्थिती अनुकुल असेल तर या जगातील कोणतीही शक्ती भारताला एकात्म होण्यापासुन प्रतिबधित करू शकणार नाही, असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृढविश्वास होता. यामध्येच भारतरत्न डॉ. बाबासाहेबांचे शैक्षणिक विचार दिसून येतात.आजच्या युगात ज्ञान ही विकासाची गुरुकिल्ली असताना एखाद्या समुहाला त्यापासुन वंचीत करने महणजे एक प्रकारे त्यावर नव्या प्रकारची गुलामगिरी लादणे हीच भारतरत्न डॉ आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांमुळे दलित, पिडीत, आदिवासी समुदायात कमालिचे परिवर्तन दिसुन येत आहे. त्याचवरीवर संपुर्ण भारतीय समाजव्यवस्थेत परिवर्तन घडुन येत आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरच्या शिक्षणविषयक विचारांच्या विश्लेषणावरून त्यांच्या मानविय जिवनाच्या सफल व प्रतिष्ठापुर्न जीवन जगण्यासाठी शिक्षण हा अविभाज्य घटक असल्याचा दृष्टीकोण स्पष्ट होतो.

**संदर्भ:-**

1) शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र कुंडले, म. बा.

2) भारतीय व पाश्चात्य विचारवंत डॉ. कला व कृष्णा घौरमोडे

3) धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

4) शंकरराव खरात, दलितांचे शिक्षण, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे.

5) शेषराव मारे-हीं आंबेडकरांचे सामाजिक धोरण एक अभ्यास राजहंस प्रकाशन पुणे

6) डॉ.फाडके भालचंद्र फुले आंवेडकर शीथ आणि बोध, आनंद प्रकाशन औरंगाबाद आवृत्ती १९८५

7) गायकवाड ज्ञानराज काशीनाथ (ऑगस्ट २०१६), महामानव डॉ भीमराव रामजी आबेडकर: कोल्हापूर, रिया पब्लिकेशन

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधानाचे शिल्पकार, स्वतंत्र भारताचे पहिले न्याय मंत्री, ते प्रमुख कार्यकर्ता आणि समाज सुधारक

**डॉ. फारुकी मोहम्मद खय्युम म. यूनुस**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
मिल्लिया कला, विज्ञान व व्यवस्थापन शास्त्र महाविद्यालय बीड.

**सुचनक शब्द**:- प्रस्तावना, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान, पत्रकारिता आणि विचार, जनता, आरक्षित मतदारसंघांसाठी मान्यता, स्वातंत्र्याची आणि राष्ट्राची संकल्पना, आर्थिक विकास धोरण, निष्कर्ष

**प्रस्तावना:-**

"देशप्रेमापुढे ज्याने स्वतःच्या विश्रांतीचा त्याग केला माणसाला स्वाभिमान शिकवला ज्यांनी आम्हाला संकटाशी सामना करणे शिकवले असा या आकाशात एकमेव तारा बाबासाहेब होता." भारतीय समाजात जातिपातीच्या भेदभावामुळे पसरलेल्या दुराचाराला संपवण्यात आपली मोलाची भुमिका बजावली. जातीपातीच्या भेदभावाने भारतीय समाजाला संपुर्णतः विस्कळीत आणि अपंग बनविले होते त्याला पाहाता आंबेडकरांनी दलितांच्या हक्काची लढाई लढली आणि देशातील सामाजिक स्थितीत बऱ्याच प्रमाणात बदल केला.

बाबासाहेबांना लहानपणापासुनच अभ्यासाची रूची होती आणि ते एक हुशार आणि कुशाग्र बुध्दीचे विद्यार्थी होते म्हणुन ते आपल्या प्रत्येक परिक्षेत चांगल्या गुणांनी यशस्वी होत गेले. **1908** ला डॉक्टर भिमराव आंबेडकरांनी Dr. Br Ambedkar एलफिन्सटन कॉलेज ला प्रवेश घेउन पुन्हा ईतिहास घडवला. उच्च शिक्षणाकरता कॉलेज ला प्रवेश घेणारे ते पहिले दलित होते. त्यांनी **1912** ला मुंबई विश्वविद्यालयातुन पदवी परिक्षा उत्तिर्ण केली. संस्कृत शिकण्यास विरोध झाल्याने ते फारसी भाषेतुन उत्तीर्ण झाले. या महाविद्यालयातुन त्यांनी अर्थशास्त्र आणि राजनिती विज्ञान या विषयातुन पदवी प्राप्त केली.

भिमराव आंबेडकरांना बडौदा राज्य सरकारने आपल्या राज्यात रक्षामंत्री बनविले पण येथे देखील जातीभेदाने त्यांची पाठ सोडली नाही आणि त्यांना ब.याचदा अपमानाला सामोरे जावे लागले. त्यांनी बराच काळ या ठिकाणी काम केले नाही कारण त्यांना त्यांच्या अंगभुत प्रतिभेकरता बडौदा राज्य शिष्यवृत्तीने सन्मानित करण्यात आले होते, त्यामुळे त्यांना न्युयर्क येथे कोलंबिया विश्वविद्यालयात उच्चपदवी प्राप्त करण्याची संधी मिळाली. आपल्या शिक्षणाला पुढे सुरू ठेवण्यासाठी 1913 ला ते अमेरिकेत निघुन गेले.

1915 साली आंबेडकरांनी B.R. Ambedkar अमेरिकेतील कोलंबिया विश्वविद्यालयातुन समाजशास्त्र, इतिहास, दर्शनशास्त्र, मानव विज्ञान या सोबत अर्थशास्त्रातुन एम.ए ची मास्टर डिग्री प्राप्त केली. या नंतर त्यांनी 'प्राचीन भारताचे वाणिज्य' यावर संशोधन केले. 1916 साली अमेरिकेतील कोलंबिया विश्वविद्यालयातुन आंबेडकर यांनी पीएच.डी प्राप्त केली. त्यांच्या शोध प्रबंधाचा विषय होता 'ब्रिटिश भारतात प्रांतिय वित्त याचे विकेन्द्रीकरण'.

फेलोशिप संपल्यानंतर त्यांना भारतात परतावे लागले. ब्रिटन मार्गे ते भारतात परत येत असता स्कुल ऑफ इकोनोमिक्स ॲण्ड पॉलिटीकल सायन्स यात एम.एस.सी आणि डी.एस.सी व विधि संस्थानात बार.एट. लॉ करीता त्यांनी आपले रजिस्ट्रेशन केले आणि मग भारतात परतले. भारतात परतल्यानंतर त्यांनी प्रथम शिष्यवृत्ती च्या नियमानुसार बडौदा येथील राजांच्या दरबारात सैनिक अधिकारी आणि वित्तीय सल्लागाराची जवाबदारी स्विकारली. राज्याचे रक्षा सचिव या रूपात देखील त्यांनी काम केले.1)

**उद्दिष्टे:-**

1.सामाजिक समता निर्माण होणे.

2.जतिवादाचे निर्मूलन होणे.

3.कायदेशीर कृतीचे उच्चाटन होणे.

4.राष्ट्र उभारणी साठी बळकटी निर्माण करणे.

**अस्पृश्यता आणि जातीगत भेदभाव संपवण्याची लढाई**

१९१९ साली भारत सरकार अधिनियमाच्या तयारी करता दक्षिणबोरो समितीपुढे आंबेडकर म्हणाले की अस्पृश्य आणि अन्य समुदायांकरता वेगळी निवडणुक प्रणाली असायला हवी त्यांनी दलितांकरता व खालच्या जातींकरता आरक्षणाचा हक्क देण्याचा प्रस्ताव देखील ठेवला. जातीपातीचा भेदभाव संपवण्याकरता, लोकांपर्यंत आपला आवाज पोहोचवण्याकरता, समाजात पसरलेली किड, मनोवृत्ती समजण्याकरता आंबेडकरांनी शोध सुरू केला. जातीगत भेदभावाला संपविण्याकरीता, अस्पृश्यतेला मिटविण्याकरता डॉ. आंबेडकरांनी 'बहिष्कृतांच्या हिताकरता सभा' हा पर्याय शोधला. या संघटनेचा मुख्य उद्देश मागासलेल्या वर्गात शिक्षणाचा आणि सामाजिक, आर्थिक सुधारणा करण्याचा होता. यानंतर 1920 ला त्यांनी कलकापुर चे महाराजा शाहजी व्दितीय यांच्या मदतीने 'मुकनायक' या सामाजिक पत्राची स्थापना केली. आंबेडकरांच्या या भुमिकेने सामाजिक आणि राजनितीक क्षेत्रात खळबळ उडवुन दिली. यानंतर लोकांमधे भीमराव आंबेडकरांची ओळख निर्माण होउ लागली.

1927 दरम्यान डॉ.आंबेडकरांनी अस्पृश्यता मिटवण्याकरता आणि जातिगत भेदभावाला पुर्णतः संपविण्याकरता सक्रीय स्वरूपात काम केले. या करीता हिंसेचा मार्ग न स्विकारता ते महात्मा गांधींच्या पदचिन्हांवर चालले आणि दलितांच्या अधिकाराकरता पुर्णगतिने आंदोलनाला सुरूवात केली. या दरम्यान दलितांच्या अधिकारांकरता ते लढले. या आंदोलना दरम्यान त्यांनी ही मागणी केली की सार्वजनिक पाण्याचे स्त्रोत सर्वांकरता खुले केले जावे आणि सर्व जातींकरता मंदिरातला प्रवेश खुला करण्यात यावा.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान**:-

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी महत्वपूर्ण योगदान दिले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाचे महत्त्व जाणले होते. ते शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या समाजात जे मागास लोक आहेत त्यांना सुधरविण्यासाठी प्रयत्न करत होते. त्यांनी समाजातील मागास आणि अस्पृश्य जातिजमातीतील लोकांना स्वतः शिक्षण घेण्यासाठी आणि समाजात घडत असलेल्या वाईट चालिरीतींचा, गोष्टींचा विरोध करण्यासाठी प्रोत्साहित केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे स्वतः एक न्यायवादी, राजनीतीज्ञ, अर्थशास्त्री, मानवतावादी, लेखक होते. ते स्वतंत्र भारताचे पहिले

कायदेमंत्री होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय इतिहासातील एक महान व्यक्ती आणि आपल्या देशाचे खरे नायक होते.

**पत्रकारिता आणि विचार:-**

सुधारणेचा कायदा अंमलात आला आहे. इंग्रजांच्या हातची सत्ता काही प्रमाणात वरिष्ठ हिंदी लोकांच्या हाती गेली आहे. बहिष्कृत वर्गाची प्रतिनिधीच्या बाबतीत मुळीच दाद न लावता ज्याप्रमाणे एखाद्या जनावराला त्याचा निर्दयी धनी कसाबाच्या स्वाधीन करतो, त्याचप्रमाणे बहिष्कृत वर्गाच्या लोकांना त्यांच्या मायबाप सरकारने वरिष्ठ हिंदी लोकांच्या स्वाधीन केले आहे. अस्पृश्यांची स्थिती सहा वर्षापर्वीपेक्षा आज जास्त शोचनीय आहे. ही शोचनीय स्थिती जगजाहीर करुन होत असलेली हेळसांड टाळावयाची असेल व घडत असलेल्या अन्यायापासून व जुलुमापासून बचाव करावयाचा असेल तर वृत्तपत्राची जरुरी सहा वर्षापूर्वीपेक्षा आज अधिक तीव्र आहे.

बहिष्कृत वर्गाच्या लोकांना जर त्यांना संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी मिळाले नाही, तर त्यांच्या उन्नतीची इतिश्री झाली असेच समजावे. कारण ब्रिटिश सरकारचे नि:पक्षपाती धोरण आमच्या वरिष्ठ समाजाकडून ठरवले जाईल, इतकी त्यांची मनोभूमिका शुद्ध व सात्विक बनलेली नाही हा घोर प्रसंग टाळावयाचा असेल तर, आतापासूनच चळवळीला सुरुवात केली पाहिजे. बाबासाहेबांच्या मृत्युनंतर 1961 साली प्रबुद्ध भारत बंद पडले.

**जनता**:-

जनता वृत्तपत्राचा प्रथम अंक 24 नोव्हेंबर 1930 रोजी प्रकाशित झाला. संपादक श्री. देवराव विष्णू नाईक होते. जनता प्रारंभी पाक्षिक होते. 31 ऑक्टोबर 1931 रोजी ते साप्ताहिक झाले.या वृत्तपत्राची बिरुदावली म्हणून "गुलामाला तु गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करुन उठेल" हे वाक्य होते. जनतेत त्यांनी सर्व निकडीचे प्रश्न चर्चिलेच पण जनतेतून विशेष म्हणजे त्यांनी विलायतेहून लिहून पाठविलेली पत्रे प्रकाशित झाली आहेत. 1955 पर्यंत ‘जनता’ हे साप्ताहिक सुरु होते. या वृत्तपत्राचे संपादक वेळोवेळी बदलले. कधी त्यात अनियमितपणा निर्माण झाली पण तरी ते खूप दिवस टिकले. 4 फेब्रुवारी 1956 रोजी जनताचे नामकरण ‘प्रबुद्ध भारत’ असे करण्यात आले.4)

प्रासंगिक प्रश्नावर लेख हे साधारण! स्फ‍ुट लेखनाचे स्वरुप असते. या स्फुट लेखनाला विषयांची मर्यादा नसली तरी विस्तार मर्यादा निश्चित आहे. अशा स्फुटलेखनात लेखकाच्या व्यक्तिमत्वाचे, त्यांच्या जीवनदृष्टीचे, त्याच्या चिकित्सकतेचे आणि त्यांच्या विचार वैशिष्ट्याचे प्रतिबिंब उमटत असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्फुट लेखन प्राधान्याने 'बहिष्कृत भारतात' आढळते. 'जनता' आणि 'प्रबुद्ध भारतात' स्फुट लेखन प्रकाशित होत असले तरी ते डॉ. बाबासाहेबांचे नव्हते. बहिष्कृत भारताच्या 1927 सालच्या पहिल्या वर्षाच्या अंकात "आजकालचे प्रश्न" या सदरांतर्गत तर दुसऱ्या वर्षी 'प्रासंगिक विचार' या सदराखाली त्यांचे स्फुटलेखन प्रकाशित झाले आहे. विषयांचे वैविध्य हे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होय.

**आरक्षित मतदारसंघांसाठी मान्यता:-**

जेव्हा ब्रिटिशांनी आंबेडकरांची मागणी मान्य केली, तेव्हा गांधीजींनी येरवडा तुरूंगात उपोषण सुरू केले. सनातनी हिंदू समाजाला अस्पृश्यतेचे निर्मूलन करण्यास सांगून हिंदूंमध्ये राजकीय आणि सामाजिक एकी आणण्याचे आव्हान केले. गांधीजींच्या उपोषणाला लोकांकडून मोठा पाठिंबा मिळाला आणि हिंदू

नेत्यांनी आंबेडकरांबरोबर येरवडा येथे बैठका घेतल्या. गांधीजींच्या मृत्यूनंतर दलित समाजाविरुद्ध दंगली होऊन विनाकारण त्रास होईल असे वाटून आंबेडकरांनी स्वतंत्र मतदारसंघाऐवजी आरक्षित मतदारसंघांसाठी मान्यता दिली. यामुळे स्वतंत्र मतदारसंघ मिळाले नसले, तरी दलितांना जास्त जागा मिळाल्या. दलितांच्या राजकीय अधिकारांना बगल देण्यासाठी गांधीजींनी खेळलेली राजकीय चाल असे आंबेडकरांनी या उपोषणाचे नंतर वर्णन केले.शिक्षण -एम. ए.पीएच. डी.डी. एस्सी.एल्एल. डी.डी. लिट.बॅरिस्टर ऍट, लॉ.

राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष एप्रिल १९४६ मध्ये नवीन प्रांतिक सरकारांच्या कामकाजाला सुरुवात झाली. प्रांतिक कायदेमंडळांना एक महत्त्वाचे काम करावयाचे होते. ब्रिटिश सरकारने भारताला स्वातंत्र्य देऊ केले होते; आणि स्वतंत्र होणार्या भारताचा राज्यकारभार राज्यघटनेनुसार होत राहावा, म्हणून निवडून आलेल्या मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळांनी काही प्रतिनिधी निवडून घटना समिती तयार करावी आणि त्या घटना समितीने राज्य घटना तयार करण्याचे काम सुरू करावे, असे त्यांनी सुचविले होते. त्याप्रमाणे मध्यवर्ती आणि प्रांतिक कायदेमंडळांनी घटना समितीचे प्रतिनिधी सभासद निवडण्याचे काम केले.मुंबई कायदेमंडळात डा. आंबेडकरांच्या शेडयुल्ड कास्ट्स फेडरेशनचे निवडून आलेले सभासद नव्हते. त्यामुळे काग्रेस पक्षाच्या सहकार्याशिवाय ते मुंबई कायदेमंडळातून घटना समितीचे प्रतिनिधी सभासद होऊ शकत नव्हते.

**स्वातंत्र्याची आणि राष्ट्राची संकल्पना:-**

डॉ. आंबेडकर स्वत:च्या पद्धतीने स्वातंत्र्य लढय़ात सहभागी होते. सन १९३०-३२ च्या पहिल्या गोलमेज परिषदेत ब्रिटिशांना त्यांनी सांगितले, ‘‘केवळ स्वराज्यातील राज्यघटनेमुळेच दलित वर्गास राजकीय सत्तासहभागाची संधी मिळू शकते. तसे न झाल्यास आमच्या लोकांना मुक्ती मिळणार नाही.’’ मात्र ‘स्वातंत्र्या’ची डॉ. आंबेडकरांची कल्पना काँग्रेस व इतरांपेक्षा वेगळी होती. त्यांच्या मते, राजकीय स्वातंत्र्य हा स्वातंत्र्याचा निव्वळ एक भाग झाला. अन्य भाग म्हणजे सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्य, असमान हक्कांपासून मुक्ती. अस्पृश्य मानले गेलेल्यांना समान सामाजिक व आर्थिक हक्क. समान नागरिकत्वाचे हक्क देण्यात ‘जात’ हा अडथळा असल्यामुळे आधी सामाजिक- आर्थिक समानतेच्या हक्काचे संरक्षण करणाऱ्या तरतुदी करा, मग ब्रिटिशांकडून राजकीय स्वातंत्र्य घेऊच, असे त्यांचे मत होते. हा एकमेव मतभेद काँग्रेस आणि डॉ. आंबेडकर यांच्या संकल्पनेत होता. डॉ. आंबेडकर यांनी हा जो विषय तेव्हा लावून धरला, तो आजही महत्त्वाचाच ठरतो, कारण राज्यघटनेद्वारे अनुसूचित जातींना समान हक्क मिळूनही, त्यांना नागरिक म्हणून समान हक्क नाकारले जाण्याचे प्रसंग आजही येतात.

राष्ट्राची ही संकल्पना विकसित होण्यात डॉ. आंबेडकरांची मदत झालीच, पण ‘राष्ट्रीयत्वा’ची एक पूर्वअट आपल्या देशात पूर्ण झालेली नसल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले होते. त्यांचे याबाबतचे निरीक्षण असे की, ‘स्वत:स राष्ट्र म्हणविणाऱ्या सर्व लोकांचा संवाद, सहभाग आणि भागीदारी यांतून आलेली सामाजिक एकोप्याची भावना म्हणजे राष्ट्रीयत्व.’ राष्ट्रभावनेत एकोपा किती आहे, हे सामाजिक जीवनात समता आणि बंधुता किती आहे, यावर ठरते. देशात आर्थिक व सामाजिक पातळ्यांवर मोठी विषमता असताना आणि अलीकडल्या काळात आंतर-जातीय, वांशिक आणि धर्मीय तणाव वाढत असताना ‘राष्ट्र’ विकसित होण्यासाठी आणि राष्ट्रीयत्वाची भावना प्रत्यक्षात दिसण्यासाठी आपण डॉ. आंबेडकर यांच्याकडून शिकवण घेतली पाहिजे.

**आर्थिक विकास धोरण:-**

डॉ. आंबेडकर यांनी देशाच्या आर्थिक विकासात दिलेल्या योगदानाची पुरेशी चर्चा सहसा होत नाही. स्वातंत्र्यपूर्व कायदेमंडळात कामगार खात्याचे मंत्रिपद त्यांच्याकडे असताना, 'पुनर्बांधणी आणि पुनर्वसन योजना १९४२-४६' तयार झाली व प्रत्यक्षात आली. १९५१-५५ च्या पहिल्या पंचवार्षकि योजनेने त्या योजनेचा आधार घेतला. डॉ. आंबेडकरांनी कामगारविषयक धोरण आखलेच, पण अनुसूचित जातींविषयीचे धोरण आणि महत्त्वाचे म्हणजे पाणी आणि वीज यांच्या विकासाचेही धोरण त्यांनी आखले होते. आजही त्या कामगारविषयक धोरणाचा आधार घेतला जातो, कोलकात्यात पहिले रोजगार – विनिमय केंद्र सुरू झाले, तेही याच धोरणामुळे. अनुसूचित जातींसाठी सरकारी नोकऱ्या व शिक्षणसंधींमध्ये आरक्षण (१९४३) हे निर्णय त्यांच्या धोरणांमुळे झाले. केंद्रीय जल आयोग आणि केंद्रीय वीज प्राधिकरण या आजही कार्यरत असलेल्या यंत्रणांची सुरुवात डॉ. आंबेडकरांच्या पाणी आणि वीजविषयक धोरणातून झाली. दामोदर, हिराकुड, शोण ही धरणे तसेच दख्खनचा पाटबंधारे विकास हे या धोरणामुळे मार्गी लागले. वास्तविक, केंद्र सरकारचे पाणी आणि वीजविषयक आद्य धोरणकत्रे असे रास्त श्रेय डॉ. आंबेडकर यांना मिळायला हवे.7)

**निष्कर्ष:-**

डॉ. आंबेडकर यांनी शासनसंस्थेला धार्मिक बहुसंख्याकतावादाचा धोका असण्याची शक्यता विचारात घेतली होती, म्हणून त्यांनी या सूचना केल्या होत्या. त्यांचे भाकीत काहीसे आज प्रत्यक्षात दिसते आहे. त्यामुळे याही बाबतीत, डॉ. आंबेडकरांची शिकवण आज उपयोगी आहे. अल्पसंख्याकांखेरीज स्त्रियांच्याही समान हक्कांचा डॉ. आंबेडकरांनी विचार केला आणि 'हिंदू कोड बिल' हे विधेयक तयार केले. त्या विधेयकाच्या मसुद्याला जोरदार विरोध झाला. सामाजिक व्यवहारांत आणि आर्थिक संधींमध्ये जर समताच नसेल आणि हिंसक प्रक्रिया घडत असतील, तर अखेर अशा राष्ट्रातील एकोप्याची भावनाच कमकुवत होत राहते आणि म्हणून राष्ट्रजीवनापुढे आव्हाने उभी राहतात. आज आपण अशाच वास्तवाला सामोरे जात आहोत.

**सन्दर्भ:-**

1. https://www.majhimarathi.com/dr-babasaheb-ambedkar
2. I bid.
3. https://trendingmarathi.in/dr-babasaheb-ambedkar.
4. https://mr.vikaspedia.in/education/childrens-corner.
5. Anil Patil, Dr.Br Ambedkar.
6. https://www.loksatta.com/sampadkiya/wanchitanche-vartaman/b-r-ambedkar.
7. I bid.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लहान राज्य विषयक विचार

**प्रा. डॉ. संजय सु. आहिरे**
(सहाय्यक प्राध्यापक) राज्यशास्त्र विभाग,
एच.पी.टी. आर्ट्स अँड आर.वाय.के. सायन्स कॉलेज, नाशिक-422005.

**प्रस्तावना :**

स्वतंत्र भारताला 75 वर्ष पूर्ण झाली. भारतीय संविधानानुसार भारताने संघराज्य शासन पद्धतीची रचना स्वीकारलेली आहे. राज्यकारभाराच्या सोयीसाठी भारतात घटक राज्य निर्माण केलेली आहेत. केंद्राच्या ठिकाणी मध्यवर्ती सरकार आणि घटक राज्यांच्या ठिकाणी राज्य सरकारे निर्माण केलेली आहेत. भारताच्या राज्यघटनेत 'संघराज्य' (Federation) हा शब्दप्रयोग कुठेही आढळत नाही. राज्यघटनेच्या पहिल्याच कलमात 'भारत हा राज्यांचा संघ आहे' (Union of states) असा शब्दप्रयोग योजलेला आहे. सध्या भारतात 28 घटक राज्ये व 8 केंद्रशासित प्रदेश अस्तित्वात आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात दार समिती, जे. व्ही. पी. आयोग व त्यानंतर 1953 मध्ये राज्य पुनर्रचना आयोग राज्यांच्या पुनर्रचनेसाठी नेमण्यात आले होते. राज्य पुनर्रचना आयोगाचा भाषावार प्रांतरचनेला विरोध असला तरीही 1956 च्या राज्य पुनर्रचना कायद्यानुसार भाषा हा निकष लावून राज्यांची पुनर्रचना करण्यात आली. भाषावर प्रांतरचना करूनही पुढील काळात अन्य कारणांनी नवीन राज्य निर्माण करावी लागली. तरीही अनेक राज्यांमधून नवीन राज्यांच्या मागण्या होतच आहेत. मुख्यतः प्रादेशिक असंतुलन व विषमता या कारणामुळे नव्या राज्यांच्या मागण्या जोर धरू लागल्या आहेत. आकाराच्या दृष्टीने पाहता लहान व मोठ्या राज्यांमध्ये फार मोठ्या प्रमाणात असमानता दिसून येते. म्हणूनच मोठ्या राज्यातील विकासात प्रादेशिक असमतोल निर्माण होतो. कारण मोठ्या, विशालकाय राज्यातील प्रभावी राजकीय नेतृत्वाकडून आपापल्या प्रादेशिक विकासावर अधिक भर दिला जातो व अन्य प्रदेशाकडे दुर्लक्ष केले जाते. उदाहरणार्थ महाराष्ट्रातच मराठवाडा, विदर्भ, कोकण व पश्चिम महाराष्ट्र या विभागातील विकासाच्या अनुशेषावरून वेळोवेळी असंतोष प्रगट होताना दिसतो. त्याचे मुख्य कारण म्हणजे विकासातील प्रादेशिक असमतोल हे दिसून येते. म्हणून विशालकाय राज्यांचे विभाजन करून लहान राज्य निर्माण करण्याची मागणी प्रत्येक मोठ्या राज्यातून मोठ्या प्रमाणात जोर धरू लागली आहे. औद्योगिक विकास, कृषी व जलसिंचन योजना, वीज, रोजगार मिळण्याच्या संधी व आर्थिक वाटप या कारणामुळे विषमता वाढुन त्या प्रदेशातील लोकांमध्ये वेगळेपणाची, अन्याय व उपेक्षा केल्याची भावना वाढीस लागते. परिणामी स्वतंत्र राज्याच्या मागणीत वाढ होऊ लागल्याचे सर्वत्र दिसून येते. आर्थिक मागासलेपणा आणि वाढत्या विकासाच्या आकांक्षांच्या उत्पत्तीतूनच लहान राज्यांची मागणी होत आहे. विस्तार आणि लोकसंख्या वाढीच्या दृष्टीने मोठ्या राज्यातच क्षेत्रिय असंतुलन सर्वाधिक असल्यामुळे महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश यासारख्या मोठ्या राज्यातील दुर्लक्षित प्रदेशांमधून स्वतंत्र लहान राज्यांची मागणी केली जात आहे. भविष्यकाळातील हा धोका ओळखूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लहान राज्यांच्या निर्मितीचे समर्थन केले होते. प्रस्तुत शोधनिबंध "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लहान राज्य विषयक विचार" या विषयावरील असून त्याची सविस्तर मांडणी पुढील प्रमाणे,

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका :**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, धर्म, इतिहास, कायदा, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, यासारख्या विविध विषयावर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने विपुल लिखाण केलेले आहे. भाषावार प्रांतरचना व लहान राज्यांच्या निर्मिती विषयी देखील त्यांनी अत्यंत महत्वाचे व मौलिक विचार प्रसंगोपात्त, ग्रंथलेखन, सभा, संमेलने, मेळावे, बैठका व परिषदा इत्यादीद्वारे व्यक्त केलेले आहेत.

**भाषिक राज्यांचे फायदे तोटे :**

घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी भाषावार प्रांताच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी कायदेतज्ञ न्यायमूर्ती दार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमली. महाराष्ट्रातही त्यावेळी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र या मागणीसाठी लोकांची चळवळ उभी राहत होती. मुंबईचा महाराष्ट्रात समावेश करण्यात येऊ नये असे मत दार समितीने व्यक्त केले. काँग्रेस पक्षाने आपल्या जयपूर येथील अधिवेशनात या प्रश्नावर विचार विनिमय केला आणि संघटनेतील मतभेद ध्यानात घेऊन अंतिम निर्णय घेण्याचे काम जे. व्ही.पी. समितीकडे सोपविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सादर केलेले निवेदन 'महाराष्ट्र भाषिक राज्य' या नावाने 1948 साली प्रसिद्ध झाले आहे. या ग्रंथात मुंबईचा संयुक्त महाराष्ट्रात समावेश करणे कसे संयुक्तिक आहे याचे मुद्देसूद विवेचन केलेले आढळते. आंध्र प्रदेश राज्य होण्यास विलंब लागत आहे असे दिसून आल्यावर या मागणीसाठी शासनावर दडपण आणण्याच्या हेतूने तेथील नेते पोट्टी श्रीरामल्लू यांनी प्राणांतिक उपोषण सुरू केले आणि त्यातच त्यांचा अंत झाला. तेव्हा लोकांच्या प्रक्षुद्ध भावनांवर आवर घालण्यासाठी आंध्र प्रदेश राज्याची निर्मिती करणे केंद्र शासनाला भाग पडले. त्यानंतर या प्रश्नांचा संगोपांग अभ्यास करण्यासाठी राज्य पुनर्रचना आयोगाची नियुक्ती झाली. या आयोगाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'भाषिक पुनर्रचनेसंबंधी विचार' हे एक नवीन निवेदन सादर केले. त्यात भाषावार प्रश्नांची त्यांनी अधिक विस्तृत चर्चा केलेली दिसून येते.

भाषिक राज्य हा लोकांच्या भावनांचा प्रश्न बनला होता. भाषिक राज्यांचे काही फायदे आहेत हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मान्य होते. एक भाषा बोलणाऱ्या निरनिराळ्या जाती-जमातीतील लोकांचा परस्परांशी सतत संबंध येत असल्याने त्यांच्या सामाजिक परंपरा समान असतात आणि त्यांची संस्कृतीही एकच असते. या सामाजिक अभिसरणातून एकसंघ समाज निर्माण होतो. लोकशाहीतील मुक्त चर्चा व मतभेद आणि निरनिराळ्या गटांचे वेगवेगळे हितसंबंध यामधून समाजात फूट पडायची नसेल तर लोकांमध्येही एकात्मतेची भावना असणे आवश्यक आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे म्हणणे होते. समाजात स्वयंकेंद्रित असे अनेक गट असतील तर राज्यसत्ता निरपेक्षपणे व गुणवत्तेला महत्त्व देऊन वापरली न जाता एका गटाकडून दुसऱ्या गटावर आधी सत्ता गाजविण्यासाठी तिचा उपयोग केला जातो. शिवाय उत्तरेकडील पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, आसाम आणि ओरिसा ही राज्य भाषिक तत्त्वांवरच अधिष्ठित आहेत. तेव्हा दक्षिणेतील राज्यांनी यासाठी अनिश्चित काळ वाट पाहावी अशी अपेक्षा करणे न्यायाला धरून होणार नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. बहुभाषिक राज्यांमधील परिस्थिती आता स्फोटक बनत चालली आहे ती अधिक चिघळू देणे धोक्याचे आहे. तेव्हा भाषिक तत्त्वावर राज्यांची पुनर्रचना करणे अपरिहार्य आहे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मान्य केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते खरा प्रश्न फुटीरतेला आळा कसा घालावा हा होता. भाषिक राज्यांमधून आपल्या राज्याबद्दलचा

अभिमान व दुसऱ्या राज्यांबद्दलचा द्वेष वाढत जाण्याचा धोका होता. प्रत्येक राज्य शासनाने आपल्या भाषेत राज्यकारभार चालविण्याचा आग्रह धरल्यास केंद्र-राज्य संबंधात अडथळे निर्माण होतील आणि उच्च न्यायालयाचे कामकाज चालविणे अशक्य होऊन बसेल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. म्हणून भाषिक तत्त्वांवर प्रांतांची पुनर्रचना करण्यात यावी मात्र फुटीरतेचा धोका टाळण्यासाठी केंद्र शासनाची भाषा हीच प्रत्येक घटक राज्याची राज्यभाषा असेल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मनोमन वाटत होते. ही राज्यभाषा हिंदी असावी आणि कामकाजासाठी ती योग्य ठरेपर्यंत इंग्रजी हीच राज्यभाषा असावी असेही मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रदर्शित केले आहे.

**राज्य पुनर्रचना आयोगाच्या शिफारशीतील उणिवा :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्य पुनर्रचना आयोगाच्या शिफारशींचा (न्यायमूर्ती फजल अली कमिशन) सखोल अभ्यास करून त्यातील अनेक उणिवा दाखवून दिल्या. या शिफारशी मधील पहिला दोष हा होता की, क्षेत्रफळ आणि लोकसंख्या या दृष्टीने उत्तरेकडील बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश ही राज्य दक्षिणेतील राज्यांच्या मानाने फारच मोठी होती. अशा विषमतेमुळे संघराज्यात आपल्या हितसंबंधांचे नीट संरक्षण होईल का? याबाबत छोट्या राज्यांमध्ये संशय व असंतोष निर्माण होऊन संघराज्याला धोका पोहोचण्याची भीती व्यक्त केली. तसेच भारतातील 48% लोकांची भाषा हिंदी आहे हे लोक उत्तरेकडील प्रांतात राहतात. परंतु उत्तरेकडील लोक शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले सनातनी व श्रद्धाळू आहेत दक्षिणेत शिक्षणाचा प्रसार अधिक असल्याने तेथील लोकांवर आधुनिक विचारांचा पगडा अधिक आहे. बुद्धीला पटलेल्या गोष्टी परंपरेच्या विरोधी असल्या तरी त्या मान्य करण्याची त्यांची तयारी आहे. सहाजिकच उत्तरेकडील हिंदी भाषिकांच्या संघराज्यातील वर्चस्वामुळे देशाची प्रगती खुंटून राहील अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भीती वाटत होती.

**एक राज्य एक भाषा :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'एक भाषा एक राज्य' हे सूत्र नाकारून 'एक राज्य एक भाषा' या सूत्राचे समर्थन केले होते. त्यांच्या मते एक विशिष्ट भाषा बोलणाऱ्या लोकांचे एकच असे संपूर्ण राज्य असावे पण आकाराने ते कितीही मोठे झाले तरी चालेल या विचाराला त्यांचा तीव्र विरोध होता. एकच भाषा बोलणारे लोक जर फार मोठ्या प्रमाणावर असतील तर त्या भाषेच्या आधारावर एकापेक्षा अधिक राज्यांची निर्मिती केली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. म्हणूनच मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचे एकच मोठे महाराष्ट्र राज्य निर्माण करण्याच्या विचाराशी सुरुवातीस ते सहमत नव्हते.

**मराठी भाषिकांची चार राज्य :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संयुक्त किंवा एकीकृत महाराष्ट्र राज्या ऐवजी मराठी भाषिकांची चार राज्य असावी असे सुचविले.

1. महाराष्ट्र शहर राज्य 2. पश्चिम महाराष्ट्र 3. मध्य महाराष्ट्र 4. पूर्व महाराष्ट्र अशा चार लहान राज्यांच्या निर्मितीचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रकर्षाने मांडला होता. ह्या विचाराच्या समर्थनार्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी असे प्रतिपादन केले की प्राचीन काळापासून महाराष्ट्राचे तीन स्वतंत्र भाग होते. सम्राट अशोकाच्या (इ.सन पूर्व 304 ते इ. सन पूर्व 232) कालखंडापासून महाराष्ट्राचा उल्लेख इतिहासात आढळतो. इ. सन पूर्व तिसऱ्या शतकात बौद्ध भिक्षू मोगलीपुत्र तीरस याने आपल्या शिष्यांना महारठ्ठ

महिषमंडळ, वनवासी, अपरांतक या प्रदेशात पाठविले होते असा उल्लेख 'महावंस' या ग्रंथात आढळतो. यावेळी या प्रदेशाला 'महारठ्ठ' हे नाव होते. महाराष्ट्र हे संस्कृत रूपांतर होय. त्यानंतर पाली साहित्यातही 'त्रयी महाराष्ट्रीयन' (तीन महाराष्ट्र) असा उल्लेख जागोजागी आढळतो. प्राचीन काळापासूनच तीन महाराष्ट्र अस्तित्वात होते. त्यामुळे ऐतिहासिक संदर्भ लक्षात घेऊन त्यात मुंबईची भर टाकून चार स्वतंत्र मराठी भाषिक राज्ये निर्माण केली तर सर्व दृष्टीने ती सोयीची होतील अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धारणा होती. याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाराष्ट्राचे चार राज्यात विभाजन करण्यासंबंधी जी समर्थनार्थ कारणे दिली आहेत ती पुढील प्रमाणे,

1. संयुक्त महाराष्ट्रामुळे सरकारच्या राज्यकारभार करण्याच्या क्षमतेवर मर्यादा पडतील व लोकांच्या समस्या तातडीने न सोडविल्यास लोकांमध्ये असंतोष निर्माण होऊन लोक आंदोलने करतील.
2. मराठी भाषिकांची चार राज्ये झाल्यास एका ऐवजी चार मुख्यमंत्री मराठी भाषिकांचे प्रतिनिधित्व करून केंद्र शासनावर अधिक प्रभाव टाकू शकतील व मराठी भाषिक राज्ये शक्तिशाली बनतील.
3. मराठी भाषिकांचे एकच राज्य झाल्यास एका विशिष्ट जातीच्या लोकांचे प्रमाण अधिक होऊन त्यांच्या हाती राजकीय सत्तेचे केंद्रीकरण होईल.
4. ऐतिहासिक दृष्ट्या हे सुस्पष्ट आहे की प्राचीन काळापासूनच महाराष्ट्राचे तीन विभाग होते. त्यावरून हे स्पष्ट होते की परंपरा, जीवनशैली, सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती याबाबतीत तीनही विभागात साम्य नसून वेगळेपणा आहे.
5. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या प्रदेशात आर्थिक विषमता आहे. मराठवाडा, कोकण, विदर्भ हे विकासाच्या दृष्टीने मागासलेले आहेत. विशाल महाराष्ट्रात त्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष होणार नाही याची हमी देता येत नाही. म्हणून त्यांच्या विकासाची त्यांना स्वतंत्रपणे संधी देण्यासाठी स्वतंत्र राज्याचा दर्जा देणे अधिक संयुक्तिक ठरेल.
6. पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक दृष्ट्या अधिक विकसित असल्यामुळे विदर्भ व मराठवाडा या मागास भागांच्या औद्योगिक विकासाकडे संयुक्त महाराष्ट्रात काळजी घेतली जाईल याबाबत खात्री देता येत नाही.
7. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ यात शैक्षणिक विषमता फार मोठ्या प्रमाणावर आहे. याच कारणामुळे मराठवाड्याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चिंता व्यक्त केली होती कारण निजामाने विकासाकडे पूर्ण दुर्लक्ष केले होते. म्हणून मराठवाड्यातील लोकांना असा सल्ला दिला होता की त्यांनी स्वतंत्र वेगळे राज्य केल्यास त्यांचा विकास होईल.

लहान राज्यांची कल्पना मांडताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ महाराष्ट्रापुरताच विचार केला नव्हता. प्रशासनाच्या दृष्टीने आणि लोकशाहीच्या संवर्धनासाठी संपूर्ण भारतातील सर्व राज्यांचा आकार आटोपशीर असावा असे त्यांचे स्पष्ट मत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाराष्ट्र बरोबरच उत्तर प्रदेश, बिहार आणि मध्य प्रदेश या मोठ्या राज्यांचे विभाजन करून लहान लहान राज्य करावीत असेही सुचविले होते. उत्तर प्रदेशचे पश्चिम उत्तर प्रदेश, मध्य उत्तर प्रदेश आणि पूर्व उत्तर प्रदेश अशा तीन राज्यात विभाजन करावे आणि क्रमशः मिरत, कानपूर आणि अलाहाबाद या ठिकाणी त्यांची राजधानी ठेवावी असा विचार मांडला होता. बिहारचे विभाजन उत्तर बिहार आणि दक्षिण बिहार अशा दोन राज्यात करावे आणि मध्य

प्रदेशचे विभाजन उत्तर मध्य प्रदेश आणि दक्षिण मध्य प्रदेश अशा दोन राज्यात करावे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविले होते.

**समारोप :**

"डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लहान राज्यविषयक विचार" प्रस्तुत विषयावरील शोधनिबंधाची मांडणी करून मागोवा घेण्यात आला आहे. लहान राज्यांच्या निर्मिती विषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धोरण स्पष्ट होते. देशासमोरील भविष्यकाळातील धर्म, भाषा, जातीयता, प्रादेशिकता यासारखी आव्हाने त्यांना जाणवत होती. म्हणून प्रादेशिक भाषा ही त्या घटक राज्यांची भाषा होता कामा नये असे त्यांचे मत होते. भारताची सरकारी भाषा हिंदी हीच असली पाहिजे असाही त्यांचा आग्रह होता. असे भाषा विषयक विचार असताना त्यांनी भाषिक राज्यांचा पुरस्कार केला होता. कारण भाषिक राज्याने सामाजिक एकता निर्माण होऊन त्यात लोकशाही चांगल्या रीतीने विकसित होईल असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी अशा भाषिक राज्यांना आणि विशेषतः मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला पाठिंबा दिला, एवढेच नाही तर त्यांनाही संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात सामील होण्याची इच्छा होती. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संमतीने शेड्युल कास्ट फेडरेशन संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सामील झाले. कारण स्वयंपूर्ण प्रांत त्यामुळे निर्माण होईल असे त्यांना वाटत होते. भाषावाद आणि जातीवाद हे pहातात हात घालून चालत असतात आणि भाषिक राज्यात राजकीय सत्ता बहुसंख्या जमातीच्या हातात जात असते. हा दोष नाहीसा करण्यासाठी एक राज्य एक भाषा हे तत्व त्यांनी प्रतिपादन केले. कारण त्यामुळे उत्तर प्रदेश बिहार व महाराष्ट्र यासारखे प्रचंड विस्ताराचे प्रांत असू नयेत. कारण मध्यवर्ती सरकार व त्या प्रांतातील अल्पसंख्य यांना तो एक धोकाच असतो. महाराष्ट्रात मराठी भाषेची नव्हे, पण मराठा जातीचे लोकच राज्य करतील असे ते म्हणत. या विषयासंबंधीचे त्यांचे विचार दुर्लक्षित करण्यासारखे नाहीत. मराठा जातीचे वर्चस्व आणि अल्पसंख्य जमातीचे संरक्षण हे आजचे निकडीचे प्रश्न असलेले दिसून येतात.

**संदर्भसूची**

1. कुबेर वा.ना., (1998), डॉ. आंबेडकर विचार मंथन, सुगावा प्रकाशन, आवृत्ती तिसरी, पुणे
2. खैरमोडे चां.भ., (2000), डॉ. भीमराव रामजी आंबेडकर- खंड 10, सुगावा प्रकाशन, दुसरी आवृत्ती, पुणे
3. कीर धनंजय, (1998), डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, सहावी आवृत्ती, पुनर्मुद्रण, मुंबई
4. जाधव नरेंद्र, (2012), (अनुवाद आणि संपादन), बोल महामानवाचे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 500 मर्मभेदी भाषणे, खंड 3, (राजकीय), ग्रंथाली प्रकाशन, मुंबई
5. पंडित नलिनी, (1996), आंबेडकर, पहिली आवृत्ती, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई
6. दिवान मोहन व देवधर जयंत, (2004), (संपादित), भारतातील राज्यांचे राजकारण, प्रथम आवृत्ती, विद्या प्रकाशन, नागपूर.
7. खैरमोडे चां.भ., (2000), डॉ. भीमराव रामजी आंबेडकर- खंड 11, सुगावा प्रकाशन, दुसरी आवृत्ती, पुणे
8. https://mr.wikipedia.org

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चिंतनातील, समाजाची उभारणी सांस्कृतिक एकतेच्या आधारावर

**डॉ. दिलीप ह. सूर्यवंशी**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, कला महाविद्यालय मलकापूर, अकोला

**प्रस्तावना:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, आपल्याला जर भावी काळात धर्म, धर्माचे आचार नि धर्मावर आधारित समाज निर्माण करावयाचा असेल तर जेथे धर्मात सुधारणा करणे आवश्यक ठरते. तिथे ती आवर्जून करणे इष्ट ठरते. धर्माच्या बाबतीत आज आपण आपला मार्ग चुकलो आहोत. 'आपल्या धर्मात आता देव आणि नीतिही राहिली नाही. आजची अवस्था म्हणजे मानवी मनाचा संपूर्ण अधःपात आहे. म्हणूनच खऱ्या आणि श्रेष्ठ धर्माची पुनः स्थापना करण्याचे बिकट कार्य भावी पिढीवर येऊनच पडले आहे. देश आणि धर्म दोन्ही नाशाच्या मार्गावर चाललेत म्हणूनच मी राजकारणात येण्याचा निर्णय घेतला. त्यामुळेच नविन पिढीने देखील आपला भावी मार्ग सुकर करण्यासाठी धर्म आणि राजकारणात सुधारणात घडवून आणली पाहिजे, असे त्यांना वाटते.

**उद्देश** :-

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील सांस्कृतिक एकता अभ्यासणे.
2) डॉ.आंबेडकर यांनी सांगितलेला सामाजिक उभारणीचे तत्व यांचा आढावा घेणे.
3) डॉ. आंबेडकर यांनी सांगितलेला सामाजिक एकतेचा मार्ग अभ्यासणे .

**गृहीतके :-**

1. डॉ आंबेडकर यांच्या मते, समाजाची उभारणी एकतेच्या आधारावर करायची असेल तर प्रथम सांस्कृतिक एकता रुजवावी लागेल.

**विश्लेषण :-**

डॉ. आंबेडकरांच्या मते, संपूर्ण समाज एकाच संस्कृतीच्या अनुषंगाने निर्माण झाला असला तरी ते सामाजिक दृष्ट्या एक आहेत असे म्हणता येणार नाही. केवळ लोकांचा धर्म एक आहे, त्यांचे आचार विचार एक आहेत, ते एकाच परमेश्वराला भजतात नि त्यांच्या जन्मापासून तर मृत्युपर्यंत त्यांच्या वागण्याची तऱ्हा एकच आहे. म्हणून त्यांच्यात सांस्कृतिक ऐक्य आहे असे म्हणता येणार नाही. कारण 'संस्कृती आणि समाज या दोन गोष्टी अगदी भिन्न आहेत. एका समाजाची संस्कृती एकच असते. परंतु एका संस्कृतीचे लोक एकाच समाजाचे घटक, हा नियम सर्वत्र लागू पडणार नाही. उदाहरणार्थ युरोपातीलसर्व लोक ते एकाच समाजाचे घटक, एकाच खिस्ती संस्कृतीखाली वाढलेले आहेत. ते सारे एकच धर्म पाळतात. पण त्यामुळे ते सर्व एका समाजाचे लोक आहेत असे म्हणता येणार नाही. तोच प्रकार हिंदू राष्ट्राचा आहे. संस्कृती एक असली तरी समाज भिन्न आहेत हिंदू संस्कृतीत वाढले म्हणून एकच समाज होतो असे म्हणता येणार नाही. अशावेळी त्यांच्यात सांस्कृतिक ऐक्य निर्माण करणे गरजेचे असते. कारण सांस्कृतिक ऐक्य निर्माण झाल्याशिवाय समाजाची उन्नती साधता येणार नाही. परंतु यासाठी राजकीय स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे.'राजकारणाचे सर्वसाधारणपणे दोन हेतू असतात. एक शासन करणे दुसरा संस्कृती रुजविणे, शासन

करतांना शिस्त आणि शांतता हा हेतू असतो. कारण कोणतेही राष्ट्र असले तरी त्यात वर्गीय भेद असतो. वर्गावर्गातील किंवा व्यक्ति-व्यक्तितील सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक हितसंबंध परस्पर विरोधी असतात. अशा विरोधातून एका वर्गाने जर दुसऱ्या वर्गावर वर्चस्व निर्माण केले तर अंतर्गत शांतता भंग होण्याचा संभव असतो. अशावेळी राज्यपध्दतीने केवळ दंड करून, कायदा करून भागत नाही तर त्यांचा कल संस्कृती रुजविण्यात असला पाहिजे.' ही संस्कृती रुजविणे अथवा निर्माण करणे म्हणजे काय तर सर्व प्रजेची उन्नती कशी साधता येईल, त्यांच्यात समानता निर्माण करण्यासाठी त्यांना सारखी साधने उपलब्ध करून देणे. त्यांच्यात विकास घडून येण्यासाठी अनुकूल अशी परिस्थीत निर्माण करणे हा संस्कृतीचा हेतू असू शकतो. धार्मिक भेदामुळे, धार्मातील असमानतेमुळे समाजातील ऐक्य धोक्यात येते अशावेळी सांस्कृतिक पातळीवर ऐक्य निर्माण होणेचे डॉ. आंबेडकरांना योग्य वाटते. याहीपेक्षा जर धार्मिकतेमुळे सांस्कृतिक ऐक्य साधताच येत नसेल तर अशा परिस्थितीत, 'राष्ट्रवादा' सारखा भावनिक मार्ग पुढे करून सांस्कृतिक ऐक्य साधता येते. उदाहरणार्थ, 'मुस्लिम हे धार्मिक आणि सांस्कृतिक स्तरावर हिंदूपासून फारच भिन्न होते. त्यातच श्रीमंत आणि संपन्न आणि आपल्या हितसंबंधाबाबत अतिसंवेदनशील अशा मुस्लिम सरंजामी अभिजनांचे मुस्लिमांना नेतृत्व लाभले. याऊलट अस्पृश्यांचे होते. हिंदू म्हणून हिंदूनी नाकारलेले असले तरी धार्मिक आणि सांस्कृतिक स्तरावर जोडणारा त्यांच्यात थोडाबहुत राष्ट्रवादाच्या रुपात दुवा होता. देशाबाहेर त्यांनी धार्मिक निष्ठा ठेवण्याचा प्रश्न नव्हता. डॉ. आंबेडकरांसारख्या नेत्याने त्यांचे नेतृत्व केले. त्यांच्यावर बालपणात भारतीय परंपरेचे संस्कार झाल्याने त्यांनी अस्पृश्यांसाठी धर्मपरिवर्तन केले तरीही भारतीय धर्माची नाळ तुटू दिली नाही. त्यांनी भारतीय परंपरेतीलच बौध्द धर्म स्विकारला. म्हणजेच राष्ट्रवादाची भावना ठेऊन डॉ. आंबेडकरांनी सांस्कृतिक ऐक्य साधले होते.

सांरकृतिक ऐक्य निर्माण करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी लोकशाहीचा पाया भारतीय समाजात स्थापन केलेला होता. त्यांच्यामते लोकशाही जिवंत राहिली तरच आपल्याला सांरकृतिक ऐक्य साधता येईल परंतु, 'लोकशाहीचे प्रामुख्याने दोन शत्रू आहेत. एक म्हणजे हुकूमशाही आणि दुसरी म्हणजे माणसा-माणसात भेद माननारी नीति किवा संस्कृति ही भेद संस्कृती समाजिक, आर्थिक, भेदातून निर्माण होते. मानव संस्कृतीचा विध्वंस करण्याकरीता राष्ट्र युध्दासाठी, तंट्यासाठी, सामाजिक नि आर्थिक मूल्यांचा -हास करतात, परंतु तीच मूल्ये जर मानवजातीची सुधारणा करण्यासाठी खर्च केली तर एका नव्या संस्कृतीचा जन्म होईल असे त्यांना वाटते. राष्ट्रवादातून सांस्कृतिक ऐक्य साधण्याचा डॉ. आंबेडकरांनी प्रयत्न केलेला दिसतो. बहुभाषिकत्वामुळे भारतात ऐक्य निर्माण होणे त्यांना अडचण वाटते. परंतु 'भारताच्या सांस्कृतिक ऐक्यावर त्यांचा विश्वास होता. सर्व भारतीयांना जर एकत्र होऊन समान संस्कृती उभारवयाची असेल तर त्यांनी हिंदी ही आपली भाषा म्हणून अंगीकारणे हे त्यांचे कर्तव्य कर्म आहे, असे ते म्हणतात. कारण भाषा ही संस्कृतीचे वाहन असते म्हणून भाषेतून समाज संस्कृती साकार झाल्यास या देशातील सांस्कृतिक व वांशिक, धार्मिक संघर्ष कमी होईल असे त्यांना अभिप्रेत होते. डॉ. आंबेडकरांनी आधुनिक संस्कृतिला देखील मानवी विकासासाठी आवश्यक म्हणून तिचे समर्थन केले. याशिवाय मानवी जीवनाला गती येणार नाही असे त्यांचे मत होते. मानवी श्रमापासून जीवनाला मोकळा वेळ मिळणे आवश्यक असते, केवळ पशुवत श्रम करूनच मानवाचे भले होईल असे म्हणता येणार नाही. 'नुसते परिश्रम व्यक्तीची सांस्कृतिक पातळी उंचावू शकत नाही. माणसाचे वेगळेपणा त्यांच्या संस्कृतीत असते. म्हणून समाजाने व्यक्तिला सांस्कृतिक जीवन

उपलब्ध करून देण्याची आवश्यकता निर्माण होणे गरजेचे असते.' 'मानवी जीवनाच्या बाह्यांगाप्रमाणेच अंतरंगाशी निगडीत असलेल्या मूल्यांचाही यात अंतर्भाव आहे. कारण मानवी मनाची घडण ही देखील सौख्यपूर्ण जीवनाची व सांस्कृतिक विकासाची आद्य अट त्यांना वाटते.'

डॉ. आंबेडकरांच्या जीवनाची संपूर्ण कार्यप्रणाली नि विचारसरणी सांस्कृतिक विकासाची नांदी होती. समाजातील पददलित, अज्ञानी तसेच मागासलेल्या सर्व लोकांना आचार, विचार, धर्म, पंथ, जात, वर्ण या सर्व भेदापासून वर काढून सामाजिक पातळीवर इतर समान्य लोकांच्या बरोबरीने आणून सामाजिक जीवनाची उभारणी सांस्कृतिक ऐक्य साधून पूर्ण करावयाची होती. त्यासाठी त्यांनी सांस्कृतिक ऐक्यावर भर दिला.

**संदर्भ ग्रंथ :-**


1. सं. नरके हरी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे खंड 18 -भाग- 3 (डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन )वर्ष 2002
2. कसबे, रावसाहेब, 'आंबेडकरवाद तत्व आणि व्यवहार' सुगावा प्रकाशन,पुणे प्रथम आवृत्ती, 1989
3. भोळे, भा. ल., डॉ. आंबेडकरांचा वैचारिक वारसा, सुगावा प्रकाशन, पुणे वर्ष 2006
4. सं. गायकवाड, प्रदीप' बहिष्कृत भारत व मूकनायक अग्रलेख 'क्षितिज प्रकाशन, भुसावळ (वर्ष उपलब्ध नाही)
5. आंबेडकर, बी. आर. 'रानडे गांधी अँड जिना: थिकर अँड कंपनी पब्लिकेशन,बॉम्बे 1943.

# आंबेडकर आणि भारतीय संविधान

**प्रा. ॲड. प्रियांका विलास झोळे-पाटील**

राज्यशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय इस्लामपूर, ता. वाळवा,जि.सांगली- ४१५ ४०९

**प्रस्तावना :-**

भारताची राज्यघटना हा भारताचा सर्वोच्च कायदा आहे. हे सरकारची मूलभूत राजकीय तत्त्वे, रचना, कार्यपद्धती, अधिकार आणि कर्तव्ये परिभाषित करणारी चौकट मांडते.आणि 26 नोव्हेंबर 1949 रोजी संविधान सभेतील मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे आणि कर्तव्ये स्पष्ट करते, भारतीय संघराज्य एक सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक असल्याचे घोषित करते, तेथील नागरिकांना न्याय, समानता आणि स्वातंत्र्याची हमी देते आणि त्या सर्वांमध्ये प्रोत्साहन देते. बंधुत्व "सामाजिक "धर्मनिरपेक्ष", "एकात्मता" आणि "त्यांच्यामध्ये सर्व बंधुत्व वाढवणे" हे शब्द 1976 मध्ये घटनादुरुस्तीद्वारे व्याख्येमध्ये जोडले गेले आहेत.

भीमराव रामजी आंबेडकर, ज्यांना बाबासाहेब म्हणून ओळखले जाते, ते स्वतंत्र भारतीय राज्यघटनेच्या मसुद्यामध्ये एक महत्त्वपूर्ण व्यक्ती होते आणि त्यांना "भारतीय संविधानाचे जनक" म्हणून ओळखले जाते. ते देशभक्त, न्यायशास्त्रज्ञ, राजकीय नेते, कार्यकर्ते, तत्त्वज्ञ, विचारवंत, मानववंशशास्त्रज्ञ, इतिहासकार, वक्ते, प्रतिष्ठित लेखक, अर्थशास्त्रज्ञ, संपादक, क्रांतिकारक आणि बौद्ध पुनरुज्जीवनवादी होते. आयुष्यभर त्यांनी दलित आणि इतर उपेक्षित लोकांच्या हक्कांसाठी तसेच सामाजिक न्याय, समानता आणि मानवी हक्कांसाठी लढा दिला. डॉ. आंबेडकर हे राष्ट्राच्या इतिहासात भारताचे पहिले कायदा मंत्री बनणारे पहिले दलित होते.

भारत दरवर्षी २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त संविधानाचा स्वीकार करतो. इंग्रजी भाषेतील एकूण 117,369 शब्दांसाठी 22 भागांमध्ये 444 लेख, 12 वेळापत्रके आणि 105 दुरुस्त्या असलेले हे जगातील कोणत्याही सार्वभौम वर्षातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे.

**शोधनिबंधसार :-**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये डॉ. बी.आर. आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे जनक म्हणून सर्वत्र मान्यता दिली जात असताना, संविधानाच्या चौकटीला आकार देण्यामध्ये निर्णायक भूमिका बजावणाऱ्या संस्थापकांच्या सामूहिक प्रयत्नांना मान्यता देणे महत्त्वाचे आहे.भारतीय राज्यघटनेचे जनक डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांनी भारताच्या घटनात्मक जडणघडणीत विलक्षण भूमिका बजावली. न्याय, समानता आणि मूलभूत हक्कांसाठी त्यांची बांधिलकी लाखो लोकांना प्रेरणा देत आहे. स्पर्धा परीक्षेचे इच्छुक म्हणून, त्यांचे योगदान समजून घेणे केवळ परीक्षेसाठीच नाही तर आपल्या लोकशाही समाजाला आधार देणारी मूल्ये आत्मसात करण्यासाठी देखील उपयुक्त आहे त्यांच्या प्रयत्नांमुळे भारतीय संविधानाने अनेक महत्त्वाच्या अधिकारांची हमी दिली आहे. यामध्ये समानतेचा अधिकार, भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य, भेदभावापासून संरक्षण आणि धर्माचे पालन आणि प्रचार करण्याचा अधिकार यासारख्या मूलभूत अधिकारांचा समावेश आहे. उपेक्षित समुदायांसाठी आरक्षण आणि अल्पसंख्याकांच्या हक्कांचे संरक्षण

सुनिश्चित करण्यातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांचे कार्य आणि भारतीय राज्यघटनेसाठी त्यांनी केलेले उल्लेखनीय योगदान तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजना याची विस्तृत मांडणी केली आहे.

**अभ्यासाचा उद्देश :-**

१) भारतीय राज्यघटनेचे जनक म्हणून ओळखले जाणारे डॉ.बी.आर आंबेडकर यांचे कार्य आणि उल्लेखनीय योगदान यांचा सखोल अभ्यास करणे.

२) भारतीय राज्यघटनेची संकल्पना आणि महत्त्व समजून घेणे.

३) मूलभूत अधिकार, राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वे,सरकारची रचना आणि केंद्र आणि राज्य सरकारांमधील अधिकारांचे वितरण अशा विविध पैलूंचा अभ्यास करणे.

४) डॉ.बी.आर आंबेडकर यांनी राष्ट्राचे संचालन करणारी सर्वसमावेशक घटना तयार करण्याचे कार्य केले याचा सविस्तर अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत चे संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी द्वितीय तरल संकलन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.त्यासाठी भारताची राज्यघटना, शासनाचे प्रकाशित काही निर्णय, पुस्तके वृत्तपत्रे मासिके तसेच न्यायव्यवस्थेचे निर्णय याचा आधार घेतलेला आहे.

**भारतीय राज्यघटनेची पार्श्वभूमी :-**

1858 ते 1947 पर्यंत भारतीय उपखंडातील बहुसंख्य भाग ब्रिटीश वसाहतींच्या अधिपत्याखाली होता. या काळात परकीय राजवटीपासून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा हळूहळू उदय झाला. 15 ऑगस्ट 1947 रोजी पाकिस्तानच्या वर्चस्वासह भारताच्या अधिराज्याच्या निर्मितीमध्ये या शोधाचा पराकाष्ठा झाला. 26 जानेवारी 1950 रोजी भारताला सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक म्हणून घोषित करून भारताचे संविधान स्वीकारण्यात आले. त्यामध्ये ब्रिटीश राजवटीपासून स्वातंत्र्यानंतर भारतावर राज्य करणाऱ्या भूमीच्या कायद्याची मूलभूत तत्त्वे होती. ज्या दिवशी राज्यघटना लागू झाली, त्यादिवशी भारतावर ब्रिटीश राजवटीचे वर्चस्व राहणे बंद झाले.

**१) रचना -**

20 व्या शतकाच्या शेवटच्या दशकात भारताच्या घटनात्मक इतिहासाच्या अभिलेखागारात सुस्तपणे पडलेल्या संविधानाच्या 'मूलभूत संरचने'वरील वादविवाद पुन्हा सार्वजनिक क्षेत्रात दिसून आला. राज्यघटनेच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी राष्ट्रीय आयोगाची स्थापना करताना, राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने (24 राष्ट्रीय आणि प्रादेशिक स्तरावरील पक्षांच्या युतीने स्थापन केलेले) राज्यघटनेच्या मूलभूत संरचनेशी छेडछाड केली जाणार नाही असे सांगितले.

**२) फेडरल संरचना-**

राज्यघटनेत केंद्र आणि राज्यांमध्ये अधिकारांचे वितरण करण्याची तरतूद आहे. हे संसदेचे आणि राज्य विधानमंडळांचे अधिकार तीन याद्यांमध्ये गणले जाते, म्हणजे संघ सूची, राज्य सूची आणि समवर्ती सूची. राष्ट्रीय संरक्षण, परराष्ट्र धोरण, चलन जारी करणे यासारखे विषय संघाच्या यादीत राखीव आहेत. सार्वजनिक व्यवस्था, स्थानिक सरकारे, काही कर ही राज्य सूचीतील विषयांची उदाहरणे आहेत, ज्यावर अपवादात्मक परिस्थिती वगळता संसदेला त्या संदर्भात कायदे करण्याचा अधिकार नाही.

शिक्षण, वाहतूक, फौजदारी कायदा हे समवर्ती यादीतील काही विषय आहेत, जेथे राज्य विधानमंडळ तसेच संसद या दोघांना कायदे करण्याचे अधिकार आहेत. अवशिष्ट अधिकार युनियनकडे निहित आहेत. संसदेचे वरचे सभागृह, राज्यसभा, ज्यामध्ये राज्यांचे प्रतिनिधी असतात, हे देखील सरकारच्या संघीय स्वरूपाचे उदाहरण आहे.

**३) संसदीय लोकशाही-**

भारताचे राष्ट्रपती संसद आणि राज्य विधानसभेद्वारे निवडले जातात, थेट लोकांद्वारे नाही. राष्ट्रपती हा राज्याचा प्रमुख असतो आणि संसदेने अंमलात आणलेल्या कार्यकारी आणि कायदे यांचे सर्व कामकाज त्यांच्या नावावर असते. तथापि, हे अधिकार केवळ नाममात्र आहेत आणि राष्ट्रपतींनी केवळ पंतप्रधान आणि मंत्री परिषदेच्या सल्ल्यानुसार कार्य केले पाहिजे.

४) **भारताच्या संविधानाचे जनक-डॉ. बाबासाहेब आंबेडकर-**

भारतीय राज्यघटनेचे जनक म्हणून ओळखले जाणारे डॉक्टर बी आर आंबेडकर यांनी मूलभूत अधिकार राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वे सरकारची रचना आणि केंद्र राज्य सरकार यांच्यातील अधिकारांचे वितरण केले 15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, काँग्रेसच्या नेतृत्वाखालील नवीन सरकारने आंबेडकरांना देशाचे पहिले कायदा मंत्री म्हणून काम करण्यासाठी आमंत्रित केले, जे त्यांनी स्वीकारले. 29 ऑगस्ट रोजी, आंबेडकरांना संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले, ज्यावर विधानसभेने स्वतंत्र भारताची नवीन राज्यघटना लिहिण्याचा आरोप केला होता. आंबेडकरांनी त्यांच्या सहकाऱ्यांकडून आणि समकालीन निरीक्षकांकडून त्यांच्या मसुदा तयार करण्याच्या कामाची प्रशंसा केली. या कार्यात आंबेडकरांचा आरंभीच्या बौद्धांमधील संघ प्रथेचा अभ्यास आणि बौद्ध धर्मग्रंथांचे विस्तृत वाचन त्यांना मदत करणार होते.

त्याचबरोबर आंबेडकरांनी तयार केलेल्या मजकुरात धर्मस्वातंत्र्य, अस्पृश्यता निर्मूलन आणि सर्व प्रकारचे भेदभाव बेकायदेशीर ठरवणे यासह वैयक्तिक नागरिकांच्या विविध नागरी स्वातंत्र्यांसाठी घटनात्मक हमी आणि संरक्षण प्रदान केले आहे. आंबेडकरांनी स्त्रियांच्या व्यापक आर्थिक आणि सामाजिक अधिकारांसाठी युक्तिवाद केला, आणि अनुसूचित जातीच्या सदस्यांसाठी नागरी सेवा, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची प्रणाली सुरू करण्यासाठी विधानसभेचे समर्थन देखील मिळवले.

देशाचा सर्वोच्च कायदा असल्याने, सरकारने लागू केलेला प्रत्येक कायदा संविधानाशी सुसंगत असणे आवश्यक आहे. बी.आर. आंबेडकर हे संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष होते आणि भारतीय राज्यघटनेच्या मसुदा तयार करण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.

संघाच्या प्रथेमध्ये मतपत्रिकेद्वारे मतदान, वादविवादाचे नियम आणि अग्रक्रम आणि कार्यसूची, समित्या आणि व्यवसाय चालवण्यासाठी प्रस्ताव यांचा समावेश होतो. शाक्य आणि लिच्छवी यांसारख्या प्राचीन भारतातील आदिवासी प्रजासत्ताकांनी अनुसरून शासकिय शासन पद्धतीवर संघाची प्रथा तयार केली होती. अशाप्रकारे, आंबेडकरांनी आपल्या संविधानाला आकार देण्यासाठी पाश्चात्य मॉडेल्सचा वापर केला असला तरी, त्याचा आत्मा भारतीय आणि खरे तर आदिवासी होता.ग्रॅनविले ऑस्टिन यांनी डॉ. आंबेडकरांनी तयार केलेल्या भारतीय राज्यघटनेचे वर्णन 'पहिले आणि सर्वात महत्त्वाचे सामाजिक दस्तऐवज' असे केले

आहे.... "भारतातील बहुतांश घटनात्मक तरतुदी एकतर थेट सामाजिक क्रांतीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी किंवा या क्रांतीला चालना देण्याचा प्रयत्न करतात."

५) **मूलभूत हक्कांचे रक्षणकर्ते:डॉ.बी.आर.आंबेडकर –**

राज्यघटना हा देशाचा सर्वोच्च कायदा आहे, जो देशाच्या कारभारासाठी एक चौकट प्रदान करतो. हे मूलभूत राजकीय तत्त्वे स्थापित करते, सरकारची रचना परिभाषित करते आणि नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये ठरवते.डॉ. आंबेडकरांनी लोकशाहीचा आधारस्तंभ म्हणून मूलभूत अधिकारांचे महत्त्व पटवून दिले. त्यांची पार्श्वभूमी काहीही असो, सर्व नागरिकांच्या हक्कांचे आणि स्वातंत्र्यांचे संरक्षण करण्यासाठी राज्यघटनेत मजबूत तरतुदी समाविष्ट केल्या आहेत याची खात्री करण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

६) **आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना**

या कायद्यातून राज्यघटनेची 27 प्रमुख वैशिष्ट्ये थेट घेतली आहेत. सरकारची संघराज्य रचना, प्रांतीय स्वायत्तता, एक संघराज्यीय विधानसभा आणि राज्यांची परिषद असलेली द्विसदनी विधानमंडळ, केंद्र आणि प्रांतांमधील विधान शक्तींचे पृथक्करण या कायद्यातील काही तरतुदी आहेत ज्या भारतीय संविधानात आहेत.

७) **कॅबिनेट मिशन योजना–**

1946 मध्ये, ब्रिटीश पंतप्रधान क्लेमेंट ॲटली यांनी ब्रिटीश राजाकडून भारतीय नेतृत्वाकडे सत्ता हस्तांतरित करण्याच्या योजनांवर चर्चा करण्यासाठी आणि अंतिम रूप देण्यासाठी तसेच कॉमनवेल्थ ऑफ नेशन्समध्ये भारताला डोमिनियन दर्जा अंतर्गत स्वातंत्र्य प्रदान करण्यासाठी भारतात एक कॅबिनेट मिशन तयार केले.मिशनने राज्यघटनेच्या चौकटीवर चर्चा केली आणि संविधानाचा मसुदा तयार करणाऱ्या संस्थेने कोणत्या कार्यपद्धतीचे पालन केले याची काही तपशीलवार माहिती दिली. ब्रिटिश भारतीय प्रांतांना नियुक्त केलेल्या 296 जागांसाठीच्या निवडणुका ऑगस्ट 1946 पर्यंत पूर्ण झाल्या. संविधान सभेची पहिली बैठक झाली आणि 9 डिसेंबर 1946 रोजी कामाला सुरुवात झाली.

८) **भारतीय स्वातंत्र्य कायदा 1947–**

18 जुलै 1947 रोजी अंमलात आलेल्या भारतीय स्वातंत्र्य कायद्याने ब्रिटीश भारतीय भूभागाची दोन नवीन राज्यांमध्ये विभागणी केली: भारत आणि पाकिस्तान, जे त्यांची राज्यघटना लागू होईपर्यंत राष्ट्रकुल राष्ट्रांच्या अंतर्गत वर्चस्व असणार होते. स्वतंत्र राज्यांसाठी संविधान सभेचे दोन भाग करण्यात आले. या कायद्याने ब्रिटीश संसदेला भारत किंवा पाकिस्तान यांच्याबाबतचे कोणतेही अधिकार किंवा दायित्व मुक्त केले आणि संबंधित संविधान सभांना जमिनींवर सार्वभौमत्व दिले.

26 जानेवारी 1950 रोजी भारताची राज्यघटना लागू झाली तेव्हा त्याने भारतीय स्वातंत्र्य कायदा रद्द केला. ब्रिटीश राजवटीचे वर्चस्व राहून भारत एक सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक बनला. 26 नोव्हेंबर 1949 हा दिवस राष्ट्रीय कायदा दिवस म्हणूनही ओळखला जातो.

डॉ. आंबेडकरांचे कायद्यातील सखोल ज्ञान आणि कौशल्यामुळे ते राज्यघटनेचा मसुदा तयार करण्याच्या कामासाठी एक आदर्श उमेदवार बनले. ते "भारताचे पहिले कायदा मंत्री" देखील होते.त्यांची

कायदेशीर कुशाग्रता आणि घटनात्मक तत्त्वांची समज त्यांना अचूकता आणि दूरदृष्टीने दस्तऐवज आकार देऊ शकली.

९) **संविधान सभा–**

संविधान सभेने संविधानाचा मसुदा तयार केला होता, ज्याची निवड प्रांतीय असेंब्लींच्या निवडून आलेल्या सदस्यांनी केली होती. जवाहरलाल नेहरू, सी. राजगोपालाचारी, राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद, श्यामा प्रसाद मुखर्जी आणि नलिनी रंजन घोष या विधानसभेतील काही महत्त्वाच्या व्यक्ती होत्या. अनुसूचित वर्गातील 30 हून अधिक सदस्य होते.

फ्रँक अँथनी यांनी अँग्लो-इंडियन समुदायाचे प्रतिनिधित्व केले आणि पारसी लोकांचे प्रतिनिधित्व एच.पी. मोदी यांनी केले. अल्पसंख्याकांचे अध्यक्ष डॉ.आंबेडकर: द मॅन ऑफ मिलेन छत्तीसने अँग्लो-इंडियन्सना वेगळे केले. समितीत हरेंद्र कुमार मुखर्जी होते, ज्यांनी गुरुरंग व्यतिरिक्त इतर सर्व ख्रिश्चनांचे प्रतिनिधित्व केले होते ते गोरखा समुदायाचे प्रतिनिधित्व करत होते.14 ऑगस्ट 1947 च्या विधानसभेच्या बैठकीत मुलभूत अधिकार, केंद्रीय अधिकार समिती आणि केंद्रीय समिती समिती ही घटना समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला.

9 ऑगस्ट 1947 रोजी, मसुदा नियुक्त केला, ज्यामध्ये डॉ. आंबेडकर अध्यक्ष होते आणि इतर सहा सदस्य होते. समितीने संविधानाचा मसुदा तयार केला आणि 4 नोव्हेंबर 1947 रोजी विधानसभेला सादर केला.विधानसभेची बैठक, 2 वर्षे, 11 महिने आणि 18 दिवसांच्या कालावधीत, 166 दिवसांसाठी, लोकांसाठी खुली सत्रांमध्ये झाली आणि काही सुधारणांचा अवलंब करण्यापूर्वी,विधानसभेच्या संविधानाने 24 रोजी कागदपत्राच्या दोन हस्तलिखित प्रतींवर स्वाक्षरी केली.26 नोव्हेंबर 1949 रोजी भारतीय संविधान स्वीकारण्यात आले आणि 26 जानेवारी 1950 रोजी भारतीय प्रजासत्ताकच्या जन्माच्या दिवशी ते लागू झाले. हे जगातील सर्वात लांब लिखित संविधान आहे, ज्यात प्रस्तावना आणि 470 कलमे आहेत, जी 25 भागांमध्ये गटबद्ध आहेत. या भागांमध्ये मूलभूत अधिकार, राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे, सरकारची रचना आणि केंद्र आणि राज्य सरकारांमधील अधिकारांचे वितरण यासह शासनाच्या विविध पैलूंचा समावेश आहे.

**सारांश –**

डॉ. आंबेडकर हे सामाजिक न्याय आणि समतेचे खंबीर पुरस्कर्ते होते. आयुष्यभर, त्यांनी भेदभावाविरुद्ध लढा दिला आणि समाजातील शोषित आणि उपेक्षित घटकांचे उत्थान करण्याचा प्रयत्न केला. न्याय्य आणि समतावादी समाजासाठीच्या त्यांच्या दृष्टीने या समस्यांचे निराकरण करणाऱ्या संविधानातील तरतुदींचा समावेश करण्यावर प्रभाव पाडला.

दलित समाजाचा एक सदस्य म्हणून भेदभावाला सामोरे जाण्याच्या डॉ. आंबेडकरांच्या स्वतःच्या अनुभवांमुळे त्यांना उपेक्षित गटांना भेडसावणाऱ्या आव्हानांचा एक अनोखा दृष्टीकोन मिळाला. त्यांचा संघर्ष आणि आकांक्षा समजून घेतल्याने या समुदायांचे उत्थान आणि सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने संविधानात तरतुदी समाविष्ट करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना मार्गदर्शन केले.

डॉ. आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि इतर घटनातज्ज्ञांसोबतच्या सहभागामुळे त्यांची लोकशाही तत्त्वांची समज अधिक समृद्ध झाली. त्यांनी जगभरातील विविध राज्यघटनेंमधून प्रेरणा घेतली आणि त्यांना भारताच्या अद्वितीय गरजांनुसार अनुकूल केले.

डॉ. आंबेडकरांचे नेतृत्वगुण, दृढनिश्चय आणि सामाजिक सुधारणा आणि न्यायप्रती अतुलनीय बांधिलकी यामुळे ते भारतीय इतिहासातील एक आदरणीय व्यक्तिमत्त्व बनले. राज्यघटनेला आकार देण्याचे त्यांचे प्रयत्न पिढ्यांना प्रेरणा देत आहेत आणि त्यांच्या अमूल्य योगदानासाठी त्यांना भारतीय संविधानाचे जनक म्हणून स्मरण केले जाते.

**संदर्भ–**

**१)** Ambedkar and The Indian Constitution : Dr.Bokephode

**२)** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा धम्मप्रवास आणि भारतीय राज्यघटना: ज.वि. पवार

**३)** डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राज्यघटना : डॉ. रावसाहेब कसबे

**४)** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार : शंकरराव खरात

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार

**प्रा. भोजराज व्ही. बोदेले**

यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लाखांदूर जि. भंडारा

**प्रस्तावना**

भारतातील इतर अनेक राजकीय विचारवंताप्रमाणे डॉ. आबेडकरांच्या विचारातही सलग व सैधांतिक स्वरूपात राजकीय तत्वज्ञान आढळून येत नाही. डॉ. आंबेडकर एका मानवतावादी सामाजिक क्रांतीचे नेता होते. त्यांनी त्या संदर्भात मांडलेल्या भारताच्या धार्मिक व सामाजिक वास्तवासंबंधी विचारातून तसेच त्यांची भाषणे, लेख, व निरनिराळया ग्रंथातून त्यांची राजकीय मते स्पष्ट होतात. डॉ. आंबेडकारांना राज्याची आवश्यकता मान्य असली तरी ते राज्याच्या उपयुक्ततेवर अधिक भर देतात. राज्यसंस्था समाजापेक्षा श्रेष्ट असू शकत नाही. राज्य हे साध्य नसून व्यक्तिमत्व विकासाचे साधन आहे. त्यामुळे त्याने व्यक्ति व समाजाच्या विकासाचे साधन व्हावे ही त्याची अपेक्षा होती. ते व्यक्तिस्वांतत्र व समतेचे कट्टर पुरस्कर्ते होते. प्रत्येक व्यक्तिला धार्मिक, सामाजिक, व राजकीय क्षेत्रात पूर्ण स्वातंत्र व आर्थिक, संरक्षण देवून समाजातील अविकसित आणि मागासवर्गाला आपला जास्तीत जास्त विकास करता येईल अशी परस्थिती राज्याने निर्माण करावी समाजाची सर्वांगीण प्रगती हे राज्याचे ध्येय असले पाहिजे ही त्यांची भूमिका होती. परंतु अमर्याद व्यक्तिस्वांतत्रही त्यांना मान्य नव्हते. समाजहीतासाठी आणि प्रामुख्याने दलित व शोषितांच्या उत्थानासाठी व्यक्तिस्वांत्रयावर आवश्यक त्या मर्यादा असाव्यात असे त्यांचे होते. कायदयाचे शासन ही संकल्पना त्यांना मान्य होती.

**कायद्याचे राज्य**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कायद्याचे राज्य अपेक्षित होते. सामाजिक शांतता व न्याय राखण्यासाठी हे आवश्यक ठरते. सर्व नागरिक कायद्यासमोर समान असून सर्वान समान हक्क मिळावेत. म्हणजेच कायद्याची अधिसत्ता चे तत्व त्यांनी उचलून धरले. “कायदा हा धर्मरिपेक्ष असून त्याचा कोणीही भंग करू शकतो, मात्र बंधुत्व किंवा धर्म हे पवित्र असून त्याचा प्रत्येकाने आदर करायलाच हवा.”[१] जीवित, स्वातंत्र आणि संपत्तीचे अपहरण फक्त कायद्याच्या प्रक्रीयेनेच करता येईल. ज्यामुळे नागरिकांच्या विषेशाधिकारावर निर्भयतेवर मर्यादा येईल अशी कोणतीही प्रथा किंवा कायदा यांची अंमलबजावणी राज्य करू शकणार नाही असे विचार आंबेडकरांनी मांडले. डॉ. आंबेडकरांच्या मते राज्याचे अस्तित्व हेच मुळी अन्याय, जुलूम, दृष्टपणा यांचा प्रतिकार करण्यासाठी आहे. म्हणून कमजोर घटक व गरजू लोक यांना सेवा देण्यासाठीच राज्य आहे. अधिकारांचे संरक्षण कायद्याने नव्हे तर समाजाच्या सामाजिक आणि नैतिक विवेकामुळे होते. परंतू मुलभूत अधिकार हे समाजाच्या विरूद्ध असेल तर कायदा, पार्लमेंट न्यायशाखाही त्याची हमी देऊ शकत नाही. डॉ. आंबेडकरांनी लोक आणि राज्याची विधीसत्ता याच्यांत समन्वय साधण्याचा प्रयत्न केला.

**राष्ट्र आणि राष्ट्रवाद**

डॉ. आंबेडकर राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते होते. परंतु राष्वादासंबंधीचे विचार त्यांच्या समकालीन राष्ट्रवाद्यापेक्षा वेगळे आणि वास्तववादी होते. भारतातील सामाजिक, आर्थिक, व धार्मिक परिस्थिती राष्ट्र

उभारणीच्या दृष्टीने प्रतिकुल व असमाधानकारक आहे त्यांचे स्पष्ट मत होते. 'थॉटस ऑन पाकिस्थान', 'स्टेट्स ॲण्ड मायनॉरिटिज', 'अनिहिलेशन ऑफ कॉस्ट', 'रानडे, गांधी ॲण्ड जीना', इत्यादी आपल्या ग्रंथामधून आणि प्रसंगोपात केलेल्या भाषणांमधून आंबेडकरांचे राष्ट्रवादासंबंधीचे विचार व्यक्त झाले आहेत. राष्ट्रवाद ही एक व्यक्तिनिष्ठ भावना असून तिचा संबंध मानवी मनाशी तिचे सामर्थ्य अगाध असून तिचे मुळे बळकट आहेत. आपन सर्व एक आहोत ही भावना जेव्हा एखाद्या भूभागातील लोकांना मनात खोलवर रूजते आणि त्या आधारे ते कोणत्याही संकटांना मुकाबला संघटीतपणे करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा राष्ट्र अस्तित्वात येते. त्यामुळे राष्ट्रीत्वाच्या भावनेवर आधारीत असलेला राष्ट्रवाद ही एक प्रंचड शक्ति आहे. सर्व भेदभाव बाजूला सारून लोकांमध्ये प्रबळ ऐक्य भावना निर्माण करण्याचे आणि राष्ट्रासाठी आपल्या सर्वस्वाचे बलीदान करण्याची वृत्ती निर्माण करण्याचे सामर्थ्य राष्ट्रवादात असते. राष्ट्रवादाने अनेक राष्ट्रांना जन्मही दीला आहे. अनेक राष्टांचे स्वातंत्रही साभांळलेही आहे. म्हणजेच राष्ट्रवाद ही केवळ विध्वंसक शक्ती नसून ती एक विधायक, रचनात्मक शक्तिही आहे. परंतु समाजातील प्रचलित भेदभावाकडे हेतुपरस्परपणे दुर्लक्ष करून फक्त राजकिय उद्धीष्टये गाठणारा राष्ट्रवाद टिकाऊ ठरत नाही. असे त्यांचे ठाम मत होते.

डॉ. आंबेडकराच्या राष्ट्रवादाचा संबंधीचा उगम गोरगरिब, दिन, दुबळे, दलित–अस्पृश्य यांच्या बद्दलचा कळवडा यातून दिसून येतो. शतकानुशतकापासून ज्यांची समान संधी नाकारली गेली होती व त्यांना मानवी हक्कापासून परावृत्त केले होते या सर्व दास्यांतुन व दारिद्रयातून मुक्त झाल्याखेरीज राष्ट्रजीवनाशी समरस होऊ शकणार नाही अशी डॉ. आंबेडकराची खात्री वाटत होती. केवळ देशाला स्वातंत्र मिळाल्याने त्यांची स्थिती सुधारणार नव्हती. देशाचे स्वातंत्र आणि जनतेचे स्वातंत्र या दोन्ही स्वतंत्र कल्पना असल्याचे डॉ. आंबेडकरांनी सांगितल्या आहेत. देशांतर्गत अन्याय, अत्याचार, जुलूम व गुलामगिरीची ती भक्षक ठरतात हे अमेरिकेतील निग्रोचे उदाहरण देऊन पटवून स्पष्ठ केले आहे. हजारो जातींमध्ये विभागलेले लोक सामाजिक व मानसशास्त्रीय अर्थाने राष्ट्र बनलेले नाही याची जाणीव शक्य तितक्या लवकर आपणास झाली पाहीजे असा इशाराही त्यांनी दिला होता.

राष्ट्रभावनेतून केवळ राजकिय ऐक्य डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत नव्हते तर मानसिक, सामाजिक व सांस्कृतिक ऐक्य अपेक्षित होते. बंधुभावनेच्या भावनेने एकत्र आलेले लोक हा त्यांच्या दृष्टीने राष्ट्रचा अर्थ होता. राष्ट्रवादातील हे तत्त्व अरात्मसात करणे भारतात अत्यंत कठीण आहे कारण जातीवाद व साप्रंदायीकता हा भारतीय राष्ट्रवादाच्या मार्गातील अडथळा आहे असे त्यांचे मत होते. भारत हा बहुभाषिक राष्ट्र आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेचे स्वप्न साकार होण्यास एक अडचन निर्माण होते याची जाणीव आंबेडकरांना होती. तरीपण भारताच्या सांस्कृतिक ऐक्यावर त्यांची अढळ श्रद्धा होती. भाषिक विविधता राष्ट्रवादाचा विकास अडवू शकत नाही हे गृहीत धरूनही आंबेडकरांना असे वाटले की एक समान भाषा असने राष्ट्रनिर्मितीस उपकारक ठरत असते. म्हणूनच, "सर्व भारतीयांना जर एकत्रित होऊन एक समान संस्कृती उभारावयची असेल तर त्यांनी हिंदी ही आपली भाषा म्हणून अंगीकारणे हे त्यांचे कर्तव्यकर्म आहे".[२] असे ते म्हणतात. राष्ट्रेक्य व राष्ट्रवाद या उभयतांचा समान भाषा हा मुख्य आधार ठरू शकतो असे त्यांना वाटत होते.

**लोकशाही:** डॉ. आंबेडकर लोकशाहीचे कट्टर पुरस्करर्ते होते. कोणत्याही प्रकारची हुकूमशाही त्यांना अजिबात मान्य नव्हती. भारतातील आर्थिक, सामाजिक, आणि राजकीय वास्तवातून त्यांचे विचार तयार

झालेले होते. त्यामुळे आदर्शवादापेक्षा व्यवहारवाद अधिक आढळून येतो. लोकशाही हा सर्वसामान्य मानसाची प्रतिष्ठा जोपासणारा एकमेव शासनप्रकार असल्यामुळे व्यक्तिस्वातंत्र आणि व्यक्तित्व विकासाला अग्रक्रम देणाऱ्या लोकशाही शासनाचा त्यांनी पुरस्कार केला होता. पंरपरेने चालत आलेल्या एका वर्गाचा सत्तेवरील एकाधिकार नष्ट करण्यासाठी आणि वर्षानुवर्ष सत्तावंचित राहीलेल्या दलित व शोषन वर्गाला सत्तेत सहभाग मिळवून देण्यासाठी लोकशाही शासनच उपयुक्त आहे. अशी त्यांची ठाम भूमिका होती.

**सामाजिक लोकशाही**

डॉ. आंबेडकरांनी फक्त राजकीय लोकशाही अपेक्षित नाही त्यांनी व्यापक दृष्टीने लोकशाहीचा विचार केला आहे. राजकिय लोकशाहीचे रूपांतर सामाजिक लोकशाहीत केले पाहीजे, असे त्यांचे मत होते. समता, स्वातंत्र, आणि विश्वबंधुतेवर आधारलेला जीवनमार्ग म्हणजे सामाजिक लोकशाही हे त्यांच्या दृष्टीने सामाजिक लोकशाहीचा अर्थ होता. “ज्या समाजात भिन्न सामाजिक गटाच्या सांस्कृतिक दृष्टीकोनातून प्रबळ तफावती असतात आणि भिन्न लोकसमुहाच्या ठायी सहजीवनाची भावनाच अपुरी वा अनुपस्थित असते तेथे लोकशाही वातावरण निर्माण होणे अवघड असते. हा विचार आंबेडकरांच्या लोकशाहीवरील चिंतनाचा केंद्रबिंदू होता.”[3] भारतात सामाजिक, आर्थिक क्षेत्रात प्रंचड विषमता आहे याकडे लक्ष घालून डॉ. आंबेडकर यांनी संविधान सभेच्या समारोपीय भाषणात म्हणाले होते की, राजकीय समता पण सामाजिक व आर्थिक क्षेत्रात विषमता अशा विसंवादी परिस्थितीत आपण ‘एक व्यक्ति एक मत व एक मत एक मूल्य’, हे तत्त्व स्वीकारत आहोत. परंतू भारतातील सामाजिक रचनेमुळे सामाजिक व आर्थिक जीवनात ‘एक मनुष्य एक मूल्य’ हे तत्त्व नाकारण्याची प्रक्रीया सुरू राहणार आहे. ही विसंगती शक्य तितक्या लवकर दूर केली नाही तर जे लोक विषमतेमुळे होरपळून निघालेले आहेत ते या संविधानसभेने मोठया परिश्रमाने उभी केलेली लोकशाही उडवून लावतील.

**संसदीय लोकशाही**

डॉ. आंबेडकरांनी सुरवातीला संसदीय लोकशाहीऐवजी अन्य प्रकारच्या लोकशाही अवस्थेची शिफारस केली होती. संसदीय लोकशाहीतून बहुसंख्यांक जातीगटाचे वर्चस्व स्थापित होण्याची आणि अल्पसंख्याक गटाला त्याचा कायम जाच होण्याची भीती त्यांना वाटत होती म्हणून अध्यक्षीय स्वरूपाची लोकशाही भारतासाठी उपयुक्त ठरू शकेल, असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते. पुढे त्यांनी आपली भूमिका बदलून संसदीय लोकशाहीचा पुरस्कार केला. व्यक्तिच्या अंगी आत्मनिर्भरता, उपक्रमशिलता व जबाबदारीची जाणीव निर्माण करू शकते. सहकार्य, शिस्त व समर्पणादी गुणांचा विकास होऊ शकतो, राष्ट्रीय चारित्र घडवून शील, सचोटी उद्यम, व धारीष्टये इत्यादींचा परिपोष या पद्धतीतच होऊ शकतो. आपल्याला या समाजरचनेत मानाचे स्थान आहे अशी जाणीव हीच पद्धती प्रादूर्भूत करित असल्यामुळे व्यक्तिच्या मुक्तीचा मार्ग तीमधून खुला होऊ शकतो. संसदीय लोकशाहीच मानवी जीवनाच्या स्वरूपाशी सुसंगत ठरते, कारण रक्तपात न घडविता सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात मुलभूत स्वरूपाचे बदल आणण्याचा मुलमंत्र फक्त तिलाच प्राप्त होतो.

संसदीय पद्धतीत आणखी दोन गोष्टी महत्वाच्या आहेत, ज्या डॉ. आंबेडकरांच्या दृष्टीने अतिमोलाच्या आहेत. पहीली विरोधी पक्ष आणि विरोधी वृत्तपत्रे, आणि दुसरी मुक्त व न्याय निवडनुका

सत्ताधारी पक्षाइतकाच प्रबळ विरोधी पक्ष संसदेत असणे आत्यावश्यक असते. सत्ताधारी पक्षाला हुकूमशाही व मनमर्जी वर्तन करण्यापासून दूर ठेवण्याचे कार्य फक्त खंबीर आणि प्रामाणिक विरोधी पक्ष करू शकतो. देशातील लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी संघटीत व शिस्तबद्ध राजकीय पक्षांचीही नितांत आवश्यकता आहे. टीका करण्याचा हक्क हा संसदीय लोकशाहीतील सर्वात महत्वाचा हक्क आहे. संघटीत विरोधी पक्ष अस्तित्त्वात असल्याखेरीज त्या हक्काला काही अर्थच उरत नाही. राजकीय पक्षाखेरीज लोकशाहीची कल्पनाच अश्यक्य आहे. शासन चालण्यासाठी राजकीय पक्ष असावाच लागतो पण ते शासन हुकूमशाही व्हायचे नसेल तर किमान दोन पक्ष असावे लागतात. सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष असे दोन असल्याखेरीज लोकशाही शासन राहूच शकत नाही.

**समाजवाद**

डॉ.आंबेडकर राज्यसमाजवादाचे पुरस्कर्ते होते. 'स्टेट्स अॅण्ड मायनॉरिटीज' या ग्रंथातून त्यांनी समाजवादासंबंधी विचार मांडले आहेत. आंबेडकरांच्या राजकीय विचारात संसदीय लोकशाहीचा समन्वय राज्य–समाजवादाशी घालण्यात आला आहे. या दोन्ही संकल्पना वरकरणी विसंगत वाटत असल्या तरी त्यांचा योग्य मेळ घातला गेल्यास त्या परस्परपूरक ठरू शकतात हा त्यांच्या लोकशाही समाजवादाच्या मुळाशी असलेला विचार आहे. भारतातून दारिद्रयाचे उच्चाटन करण्यासाठी आंबेडकरांनी आधुनिकीकरण, यांत्रीकीकरण व औद्योगिकीकरणाचे समर्थन करतात. मात्र यांत्रीकीकरण व औद्योगिकीकरणातून जे दोष निर्माण होतात त्यासाठी इथली समाजव्यवस्था कारणीभूत आहे, असे त्यांचे मत होते. म्हणून आधुनिक विज्ञाननिष्ठ संस्कृतीला विरोध न करता समाजरचनेत बदल घडवून आणण्यावर त्यांचा मुख्य भर होता. आधुनिक काळातील यंत्र–उद्योगप्रधान संस्कृतीचा स्वीकार केल्याशिवाय लोकशाही आणि समाजवाद अस्तित्त्वात येवू शकत नाही. व्यक्तीच्या जीवनात श्रमांना निश्चीत महत्व आहे. परंतू परिश्रम व्यक्तीची सांस्कृतिक पातळी उंचावू शकत नाहीत. मानसाचे वेगळेपण त्यांच्या संस्कृतीत आहे. संस्कृतीमुळे तो पशूपेक्षा वेगळा आणि श्रेष्ठ ठरत असतो. पशूचे संस्कृतीविना भागते, माणसाचे भागू शकत नाही. म्हणून समाजाने व्यक्तीला सांस्कृतिक जीवन उपलब्ध करवून देण्याची आवश्यकता निर्माण होते. यासाठी शारीरिक गरजांच्या पूर्तीबरोबरच त्याच्या मनाचाही विकास व्हावा लागतो. त्यासाठी स्वताच्या व्यक्तिविकास साधण्यासाठी त्याला उसंत मिळली पाहीजे. म्हणजेच त्याच्या कामाचे तास मर्यादीत असायला पाहीजे.

**सारांश:**

डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचारातही त्यांची एंकदर प्रेरणा ही मानवमात्राविषयी व त्यातही दीनदलिताविषयी त्यांना असणाऱ्या असीम कळवळा होता. मग तो राष्ट्रवादाचा असो, समाजावादाचा असो, शासणाच्या कार्याचा असो, की सामाजिक न्यायाचा असो त्यात नवविन प्रशासक, वस्तुनिष्ट अभ्यासक, प्रज्ञावंत, सव्यसाची नेता, जबाबदार लोकप्रतिनिधी अशा विविध भूमिका डॉ. आंबेडकरानी पार पाडल्या पण त्यापैकी प्रत्येक भूमिकेवर त्यांच्या मानवतावादी विचारसरणीची ठळक छाप पडलेली दिसून येते. मानव आणि समाज यांच्यातील संबंधाचा त्यांच्या विचाराचा चिंतनाचा केंद्रबिंदू मानव आणि मानवच आहे. केवळ राजकीय लोकशाहीचा व राजकीय हक्कांचा करून थांबत नाही तर त्यातून सामाजिक व आर्थिक लोकशाहीकडे आहे. आर्थिक – सामाजिक क्षेत्रात न्याय, समता, शोषनमुक्त आणि कौर्याचा अभाव अभाव हे त्यांच्या राजकीय लोकशाहीच्या आदर्शाचे परिपूर्ण रूप आहे.

**निष्कर्श:**

१) डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचाराने पद–दलितांच्या अंगी नवा स्वाभिमान, नवा आत्मविश्वास स्वावलंबन पुढाकारवृत्ती, व्यक्तिगत सचोटी व सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करू दिली.

२) डॉ. आंबेडकरांनी सामाजिक लोकशाहीमध्ये 'एक व्यक्ति एक मत' यापेक्षा 'एक व्यक्ति एक मूल्य' या तत्त्वाचा अधिक्याने स्विकार करून सामाजिक व राजकीय संबंधामध्ये व्यक्तिच्या व्यक्तिमत्वातील अंगभूत मूल्य स्थान दिलेला आहे.

३) डॉ. आंबेडकरांनी आपल्या भाषणातून तसेच साहित्यातून राष्ट्रवादाचा विचार व्यक्त केलेला दिसून येतो.

**संदर्भ :**

१) देवगांवकर श.गो.: 'राजकीय चारवंत चाश्चिमात्य आणि भारतीय' श्री साईनाथ प्रकाशन नागपूर २००७

२) भोळे भाष्कर लक्ष्मण: 'आधुनिक भारतातील राजकीय विचार' पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स नागपूर २०२१

३) हाशम शेख, गवई जोगेंद्र: 'राजकीय सिद्धांत आणि आधुनिक भारतीय राजकीय विचार' विश्व पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्यूटर्स, नागपूर २०२४

४) लोटे रा.ज.: 'राजकीय सिद्धांत आणि राजकीय विचारवंत' पिंपळापुरे ॲण्ड क.पब्लिशर्स, नागपूर २०१४

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लहान विदर्भ राज्य मागणी विषयक विचार

**पौर्णिमा लक्ष्मण देशमुख**
संशोधक विद्यार्थीनी

**डॉ. प्रमोद मनोहर पवार**
धनदाई माता कला व विज्ञान महाविद्यालय, अमळनेर

**प्रस्तावना –**

भारताच्या संघराज्य व्यवस्थेत राज्यांचा आकार आणि संरचना विविध भौगोलिक, सांस्कृतिक, आणि ऐतिहासिक घटकांवर आधारित आहे. भारताच्या राजकीय आणि सामाजिक परिप्रेक्ष्यात लहान राज्यांची मागणी एक दीर्घकालीन आणि महत्त्वपूर्ण मुद्दा बनले आहे. काही राज्यांतील विविधता, सांस्कृतिक वेगळेपण, आर्थिक मागण्या आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेंचा अभाव यामुळे लहान राज्यांची निर्मिती मागणीचे एक प्रमुख कारण ठरली आहे. लहान राज्यांची मागणी फक्त एका भौगोलिक क्षेत्रावर न थांबता, ती त्या प्रदेशातील लोकांच्या सामाजिक, सांस्कृतिक, आणि आर्थिक हक्कांच्या संरक्षणाच्या दृष्टिकोनातून केली जात आहे. लहान राज्यांची मागणी एक संघीय संरचनेतील नवा दृष्टिकोन आहे, ज्यामुळे भारतीय राज्यघटनेतील संघराज्य आणि विविधतेचे संमेलन पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. या मागणीमुळे समाजात प्रादेशिक असंतोष कमी करण्याचे, लोकांमध्ये समावेशक विकास साधण्याचे, आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेला चालना देण्याचे नवे मार्ग खुले झाले आहेत.

विदर्भ हा महाराष्ट्र राज्याचा एक ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण भाग आहे. मात्र, अनेक दशके विदर्भातील लोकांमध्ये असंतोष पाहायला मिळतो, ज्याचे प्रमुख कारण म्हणजे विकासाच्या बाबतीत विदर्भाचे अन्य भागांशी असलेले असंतुलन, स्थानिक प्रशासनाची उपेक्षा आणि सांस्कृतिक ओळख असलेली वेगळेपण. या असंतोषामुळे विदर्भात स्वतंत्र राज्य किंवा घटक राज्याच्या मागणीला उभारी मिळाली आहे. विदर्भ राज्याची मागणी एक व्यापक राजकीय, सामाजिक आणि आर्थिक प्रश्न बनला आहे, ज्यामध्ये स्थानिक नागरिकांच्या हक्कांचा संरक्षण, विकासाच्या समान संधी, आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे महत्त्व मोठ्या प्रमाणात दिसून येते. विदर्भातील लोकसंख्या, संस्कृती, भाषा आणि भौगोलिक स्थान यामुळे त्यांची स्वतःची ओळख आहे. विदर्भातील विकासावर लक्ष देण्याची मागणी अनेक वेळा एक सकारात्मक बदल म्हणून उभा राहिला आहे, ज्यामुळे या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासासाठी एक स्वतंत्र शासकीय प्रणाली आवश्यक आहे, असे विचार पुढे आले आहेत. विदर्भाची मागणी महाराष्ट्राच्या राजकीय संरचनेत विविधतेचा आदर आणि त्याच्या लोकांची सामाजिक न्यायाची मागणी दर्शवते. विदर्भ घटक राज्याची मागणी ही केवळ एक राजकीय नव्हे, तर एक सामाजिक चळवळ आहे, जी विकास, संसाधनांचा न्याय वाटप, प्रशासनाचे कार्यक्षमतेचे आणि सांस्कृतिक ओळखचे मुद्दे समोर ठेवते. यामुळे, विदर्भ राज्याच्या मागणीला महत्त्व देणारी चर्चा आजही सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय आहे.

**उद्दिष्टे -**

1) लहान राज्याच्या निर्मितीच्या संदर्भात स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीचे अध्ययन करणे.
2) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लहान राज्यांच्या मागणीच्या कारणांचे अध्ययन करणे.

**गृहीतकृत्य -**

1) लहान राज्य निर्माण झाल्याने राज्याचा आणि पर्यायाने देशाचा विकास चांगला होतो.
2) प्रशासकीय दृष्टिकोनातून लहान राज्यांची मागणी ही योग्य ठरते.

**विषय विवेचन -**

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले आणि त्यानंतर भारतात भाषावार प्रांत रचनेची मागणी झाली. घटक राज्याची मागणी होवू लागली. आणि त्यातून पुढे १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्याआधी विदर्भ हा भाग मध्यप्रांतात समाविष्ट होता तर तत्कालीन बॉम्बे स्टेट मध्ये आजचा मुंबई सह, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश समाविष्ट होता. भाषावार प्रांत रचनेच्या मागणीनुसार संयुक्त महाराष्ट्र चळवळ महाराष्ट्रात वाढली आणि महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. या संयुक्त महाराष्ट्र चळवळी दरम्यान दार कमिशन, द्विभाषिक राज्य समिती, फाजल अली कमिशन, राज्य पुनर्रचना आयोग, नागपूर करार, अकोला करार, जे. व्ही. पी. समिती इ. घडामोडी घडल्या. या आंदोलनानंतर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र भाषिक घटक राज्याची निर्मिती झाली.

विदर्भ प्रादेशिक विभागाची लोकसंख्या २०२४ पर्यन्त अंदाजे २ कोटी ३० लाख इतकी असून विदर्भाचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ९७,३२१ चौरस किलोमीटर इतकी असून विदर्भात ११ जिल्ह्यांचा समावेश होतो. विदर्भात १२० तालुक्यांच्या समावेश होतो. महाराष्ट्रातील विदर्भातून ११ खासदार लोकसभेवर निवडून जातात आणि ०२ राज्यसभेवर निवडून जातात. विदर्भातून ६२ आमदार विधान सभेवर निवडून पाठवले जातात. विदर्भातून २०२४ पर्यन्त मारोतराव कन्नमवार, वसंतराव नाईक, सुधाकरराव नाईक, देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री म्हणून कार्य केलेले आहे.

विदर्भ हा नागपूर करारामुळे महाराष्ट्रात सामील झाला नंतरही विदर्भाचे मागासलेपण, अनुशेष बाकी असल्याची मागणी विदर्भाच्या जनतेकडून सातत्याने होत राहते. विदर्भातील जनतेला पश्चिम महाराष्ट्रातील नेतृत्व हे आपल्या विदर्भावर अन्याय करते. असे विदर्भाच्या जनतेत सातत्याने बोलले जाते. त्यामुळे ते वेगळ्या विदर्भ राज्याची मागणी करीत असतात. विदर्भ ही पूर्वी मध्य प्रांताची राजधानी होती. सद्य स्थितीत नागपूर या महाराष्ट्राच्या उपराजधानीच्या शहरात स्वतंत्र विधान भवन अस्तित्वात आहे, त्याचप्रमाणे आमदार निवास, तसेच मुख्यमंत्री व इतर मंत्र्यांचे बंगले आहेत. शासकीय कार्यालय इत्यादी सुविधा अस्तित्वात आहे. महाराष्ट्राचे हिवाळी अधिवेशन विदर्भात नागपूर येथे होत असते. मात्र तरीही विदर्भाचे प्रश्न सुटत नाही असे विदर्भवाद्यांचे मत आहे. विदर्भाला आधीच वेगळे व्हायचे होते परंतु नागपूर करारामुळे विदर्भ महाराष्ट्रात सामील झाले परंतु इतक्या वर्षात देखील विदर्भाचा मागासलेपणा दूर झालेला नाही आणि पश्चिम महाराष्ट्रामुळे आमच्यावर अन्याय होतो असे विदर्भ जनतेचे मत आहे त्यामुळे विदर्भातून स्वतंत्र विदर्भ घटक राज्याची मागणी होते असते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, जयप्रकाश नारायण यांनी सर्वप्रथम लहान राज्यांच्या निर्मितीची मागणी केली. तत्पूर्वी या देशातील कोणताही मोठा पक्ष या मागणीचा समर्थक नव्हता. फाजल अली आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यांची निर्मिती झाली. द्विभाषिक मुंबई राज्याचे विभाजन करून १९६० साली मराठी भाषिकांचे महाराष्ट्र आणि गुजराथी भाषिकांचे गुजरात, हे राज्य अस्तित्वात आले. त्यानंतर २०१४ पर्यंत म्हणजे तब्बल ५५ वर्षात १३ लहान लहान राज्य निर्माण झाली. या १३ पैकी ईशान्येकडील नागालँड (राज्याचा दर्जा १९६१),

त्रिपुरा, मेघालय आणि मणिपूर (सर्व १९७२), सिक्किम (१९७५), अरुणाचल प्रदेश (१९८६) आणि मिझोरम (१९८७) ही सात राज्ये विविध वांशिक समस्या आणि त्यावरील उतारा म्हणून अस्तित्वात आली. १९६६ साली उत्तरेकडील पंजाबचे त्रिभाजन करून पंजाब आणि हरियाणा ही दोन राज्ये आणि केंद्रशासित हिमाचल प्रदेशाची निर्मिती झाली. हिमाचल प्रदेशाला १९७१ साली राज्याचा दर्जा प्राप्त झाला. गोव्याला १९८७ साली राज्यांचा दर्जा मिळाला. २००० साली झारखंड, छत्तीसगड आणि उत्तराखंडची निर्मिती झाली. २०१४ साली तेलंगणा ही अस्तित्वात आले.

वरील राज्यांच्या निर्मितीच्या वेळी भाषावार प्रांतरचनेच्या मुद्द्याला बगल देण्यात आली. त्याऐवजी, जनतेची इच्छा आणि विकास, हेच महत्त्वाचे निकष समजण्यात आले. मध्य प्रदेशाच्या विभाजनातून छत्तीसगड घटक राज्य, उत्तर प्रदेशातून उत्तराखंड घटक राज्यची आणि बिहार मधून झारखंड घटक राज्यची निर्मिती झाली. मूळ राज्य आणि नवनिर्मित राज्ये एकच हिंदी भाषेची. आंध्र प्रदेश विभाजन करून तेलंगणा घटक राज्य निर्माण करण्यात आले. ही दोन्ही राजे तेलुगु भाषिक ! याचा अर्थ असा की, भाषेवर आधारित प्रांत रचनेचा मुद्दा कालबाह्य झाला आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण आणि त्या अनुषंगाने विकास, हेच नव्या राज्य निर्मितीचे ठळक घटक समजल्या जाऊ लागले. मूळ राज्यातून वेगळे झाल्यावर पंजाब, हरियाणा, छत्तीसगड, झारखंड या राज्यांनी आणि मध्य प्रदेश व बिहारने केलेला विकास अचंबित करणारा ठरला.

**भारतातील असमान घटकराज्याची रचना**

| अ. क्र. | घटकराज्य | लोकसंख्या अदमासे (२०२४ नुसार) | भौगोलिक क्षेत्रफळ (चौ.कि.मी.) | लोकसभेवर जाणारे खासदार |
|---|---|---|---|---|
| १ | उत्तर प्रदेश | २५७,०५४,५६८ | २,४०,९२८ | ८० |
| २ | पश्चिम बंगाल | १०३,५५३,१५३ | ८८,७५२ | ४२ |
| ३ | बिहार | १२९,२०५,००० | ९४,१६३ | ४० |
| ४ | तामिळनाडू | ७७,१६५,००० | १३०,०५८ | ३९ |
| ५ | कर्नाटक | ६८,२५६,००० | १,९१,७९१ | २८ |
| ६ | महाराष्ट्र | १२७,६८४,००० | ३,०७,७१३ | ४८ |

| अ. क्र. | घटकराज्य | लोकसंख्या अदमासे (२०२४ नुसार) | भौगोलिक क्षेत्रफळ (चौ.कि.मी.) | लोकसभेवर जाणारे खासदार |
|---|---|---|---|---|
| १ | मिझोराम | १,२५२,००० | २१,०८१ | १ |
| २ | नागालँड | २,२५८,००० | १६,५७९ | १ |
| ३ | गोवा | १,५८५,००० | ३,७०२ | २ |
| ४ | त्रिपुरा | ४,२३०,००० | १०,४८६ | २ |
| ५ | हिमाचल प्रदेश | ७,५१८,००० | ५५,६७३ | ४ |
| ६ | उत्तराखंड | ११,७९५,००० | ५३,४८३ | ५ |

भौगोलिक क्षेत्रफळ हे जेवढे आहे तेवढेच राहते. मात्र लोकसंख्या वाढत जाते. त्यामुळे त्या त्या भागातील लोकांचे प्रश्न, समस्या आणि मागण्या शासनाकडे येत राहतात. या वाढत्या लोकसंख्येला आणि त्यांच्या समस्यांना समाधानकारक निर्णय घेण्यासाठी भारतातील वेगवेगळ्या घटक राज्यामधून आणखी काही वेगवेगळ्या घटक राज्यांची मागणी जनतेतून सातत्याने येत आहे. त्यामुळेच मागील काही वर्षात मध्यप्रदेश मधून छत्तीसगड, उत्तर प्रदेश मधून उत्तराखंड, बिहार मधून झारखंड, आंध्र प्रदेश मधून तेलंगणा अशा नवीन घटक राज्यांची निर्मिती झाली आहे. याच प्रकारची मागणी महाराष्ट्रातून विदर्भ राज्यातील जनतेद्वारा वेगळ्या विदर्भ राज्याची मागणी होताना दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या फाझल अली आयोगाचा राज्य पुनर्ररचनेचा अहवाल अभ्यासल्यानंतर त्यांनी आपली भूमिका विस्तृतपणे १९५५ ला "भाषावर प्रांतरचनेवरील भाष्य" या छोटेखानी

पुस्तिकेतून मांडलेली आहे. त्यामधील त्यांनी केलेले विश्लेषण सद्यपरिस्थितीत विदर्भाच्या वेगळे स्वतंत्र राज्य निर्मितीसाठी सुरू असलेल्या आंदोलनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांची परत पूनर्मांडणी व्हावी या हेतूने लेखनाचे प्रयोजन आहे. १९४८ ला भाषावर प्रांत निर्मिती समितीला सादर केलेल्या "Maharashtra as a Linguistic Province" महाराष्ट्र एक भाषावर प्रांत" शीर्षकाचे निवेदन "Need for Checks and Balances" या शीर्षकाचा भाषावर प्रांतासंबंधीचा 'दि टाईम्स ऑफ इंडिया' मधून प्रसिध्द झालेल्या २३ एप्रिल १९५३ ला लेखातून तसेच १९५५ ला राज्यपुनर्रचना समितीच्या अहवालाचा अभ्यास केल्यानंतर भाषावर प्रांतरचना एक चिंतन "Thoughts on Linguistic States" नावांच्या एका स्वतंत्र पुस्तिकेमधून त्यांनी राज्य निर्मितीचे मौलिक तत्त्वज्ञान मांडलेले आहे. भाषांवर प्रांतरचनेच्या नावाने मनमानी करून या अखंड भारत देशाचे विभाजन करणे योग्य नव्हे, हीच चूक राज्य पुर्नरचना आयोगाने केलेली आहे. ती त्यांच्या निदर्शनास आणण्याचे बौध्दिक सामर्थ्य त्यांनी दाखविलेले आहे. ही चूक जर वेळीच सुधारली नाही तर भविष्यात भारत देशाला त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतील, असा इशारा त्यांनी १९५५ लाच दिलेला होता. आज उत्तरप्रदेश, बिहार मध्यप्रदेशाचे जे छोट्या राज्यांत विभाजन करण्यात आले त्याची सगळी बीजं आणि योजना डॉ. आंबेडकरांनी १९५५ लाच मांडलेली आहे. एक भाषा बोलणाऱ्या लोकांना एकाच मोठ्या राज्यात न कोंबता, मोठ्या राज्याचे छोट्या राज्यात विभाजन करावे, हा उपाय त्यांनी सुचविलेला होता, पण पुर्नरचना आयोगाच्या 'एक भाषा एक राज्य' या अतिरेकी भूमिकेमुळे तो उपाय अंमलात आला. एकच भाषा बोलणाऱ्या मोठ्या राज्याचे, छोट्या छोट्या एक भाषा बोलणाऱ्या राज्यात रूपांतर केल्या जाऊ शकते. अशा रीतीने प्रशासकीयदृष्ट्या सुलभ व्हावे व राज्यांचा विकास विशिष्ट भागात एककेंद्रित न होता तो समतोल व्हावा या दृष्टिने त्यांनी हा उपाय सूचविलेला आहे. उत्तरप्रदेश, बिहार आणि मध्यप्रदेश यांचे छोट्या राज्यात रूपांतर करणे होय. त्यानुसार सविस्तर नकाशासह, क्षेत्रफळ, लोकसंख्या इत्यादिंच्या आधारावर त्यांनी विभाजनाची व्यवस्था मांडलेली आहे. या दूरदृष्टी असलेल्या नेत्यांची भविष्यवाणी तंतोतंत खरी असल्याची खात्री, आपण मागील पाच सहा दशकांतील भारतीय राजकारणावर दृष्टी टाकली तर किती यथार्थ होती याची जाणीव होते. अखेर उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश या महापुरुषांच्या योजनेनुसार छोट्या राज्यात उशिरा का होईना विभाजित झालेला आहे व संघपरिस्थितीत ही छोटी राज्ये विकासाची गती उत्तमपणे पकडत आहेत, ही आनंदाची बाब होय. डॉ. आंबेडकरांनी जे लोक संयुक्त महाराष्ट्राचे समर्थन करतात त्यांना ठासून सांगितले की, अखंड महाराष्ट्रातील लोकांच्या परंपरा, जीवनपध्दती आणि सामाजिक व आर्थिक स्थिती ही एकसारखी नाही. ज्या लोकांना संयुक्त महाराष्ट्राची घाई झालेली आहे त्यांना ही बाब फारशी गंभीर असल्याचे जाणवत नाही. याही व्यतिरीक्त खालील बाबींच्या आधारावरसुध्दा महाराष्ट्राचे विभाजन होणे अपरिहार्य आहे. ते मुद्दे म्हणजे १) केवळ एक सरकार एवढ्या मोठ्या विस्तीर्ण अखंड महाराष्ट्राचे प्रशासन चोखपणे चालवू शकत नाही. २) या तीनही भागांची किंवा प्रदेशांची आर्थिक विषमतेची दरी लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. मराठवाड्याची स्थिती तर दर्शनीय आहे, कारण निझामाच्या अधिपत्याखाली तो बराच काळपर्यंत होता. ३) औद्योगिक क्षेत्रातील विषमता ४) शैक्षणिक क्षेत्रातील विषमता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १० जानेवारी १९५६ ला भाषण करतांना वेगळा विदर्भ करण्याचे मत व्यक्त केले होते. बाबासाहेबांनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाला पाठिंबा केवळ मुंबई ही महाराष्ट्रात सामील व्हावी याकरिता केला होता. बाबासाहेबांनी नेहमी छोट्या राज्यांची संकल्पना मांडली. उत्तर प्रदेशाची तीन राज्ये व्हावीत.

महाराष्ट्राची पाच राज्ये व्हावीत, असे त्यांनी सूचविले होते. छोट्या राज्यांना विकासाची अधिक संधी असते. प्रशासकीय नियंत्रणाच्या दृष्टीने छोटी राज्ये असावीत, तसेच प्रभावी नेतृत्वही असावे लागते. छोटी राज्ये म्हणजे आपला सीमित परिसर राहतो, आपली स्वतंत्र यंत्रणा राहते. आपण आपले विकासात्मक निर्णय स्वयंपूर्ण घेऊ शकतो. दुसऱ्याच्या निर्णयावर अवलंबून राहण्याची गरज पडत नाही. डॉ. आंबेडकर म्हणाले की, "विदर्भाने कोणताही करार संयुक्त महाराष्ट्राशी करण्यापेक्षा स्वतःचे वेगळे राज्य निर्माण करणे कधीही योग्य. "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या 'थॉट्स ऑन लिंग्विस्टिक स्टेट्स' या पुस्तकात वरील मुद्दा वेगळ्या उदाहरणांनी मांडलेला आहे. 'संयुक्त महाराष्ट्र प्राचीन परंपरा, सामाजिक आणि आर्थिक स्थिती, जीवन पद्धती या संदर्भात कधीही एकजीनसी नव्हता. संयुक्त महाराष्ट्र सारख्या एकाच अवाढव्य राज्यात सुशासन अवघड आहे. मंत्रिमंडळात एका भागाला अधिकाधिक प्रतिनिधित्व तर दुसऱ्याला काहीच नाही असे चित्र दिसते. पश्चिम, मध्य आणि पूर्व महाराष्ट्र ही तीनही ' राज्ये ' आर्थिक रचनेच्या दृष्टीने परस्पराहून भिन्न आहेत. औद्योगिक विकासात विषमता आहे त्यामुळे महाराष्ट्राची चार राज्ये करण्यात यावीत' असे बाबासाहेबांनी १९५५ सालच्या या पुस्तकात म्हटले होते. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्रासाठी चळवळ सुरू होती. लोकनायक बापूजी अणे यांनीही विदर्भाची अस्मिता आणि पश्चिम महाराष्ट्राचे अस्मिता यात तफावत असल्याचे सांगितले होते. कर्मवीर बाबू हरिदास आवळे यांनी विदर्भ राज्याची मागणी लावून धरताना तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना पाठविलेला पत्रामध्ये 'राज्य रचनेचा प्रश्न राजकीय चळवळीचे साधन होऊ देऊ नका' अशी विनंती करून विदर्भाला पश्चिम महाराष्ट्राच्या दावणीत बांधून ठेवू नका, असे म्हटले होते. विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्राची अस्मिता एकसमान नाही यावर त्यांनी भर दिला होता.

| अ. क्र. | देश | क्षेत्रफळ (चौ.कि.मी.) | लोकसंख्या (२०२३) | अ. क्र. | देश | क्षेत्रफळ (चौ.कि.मी.) | लोकसंख्या (२०२३) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | इस्त्रायल | ८,५२२ | ९.६ लाख | ६ | बेल्जियम | ३०,६८८ | १.१८ करोड |
| २ | मॉरिशस | २,०४० | १२.६ लाख | ७ | डेन्मार्क | ४२,९५२ | ५९.५ लाख |
| ३ | स्वित्झर्लंड | ४१,२८५ | ८८.५ लाख | ८ | सिंगापूर | ७३४.३ | ५९.२ लाख |
| ४ | नेदरलँड | ४१,८५० | १.७९ करोड | ९ | स्वीडन | ४,५०,२९५ | १.०५ करोड |
| ५ | न्युझीलँड | २६८,०२१ | ५२.२ लाख | १० | स्पेन | ५,०४,७८२ | ४.६४ करोड |

जगामध्ये संभाव्य विदर्भाइतके स्वतंत्र देश अस्तित्वात आहेत, तर भारतातून लहान विदर्भ घटकराज्य व्हावे अशी विदर्भ जनतेची मागणी आहे.

जर हिंदी भाषिक राज्याचे ३-४ घटकराज्य आहेत. उदहणार्थ – मद्यप्रदेश, उत्तरप्रदेश, छत्तीसगड तर मराठी भाषिक राज्याचे २ घटकराज्य झाले तर काही नुकसान नाही. भारतातल्या वेगवेगळ्या राज्यातून वेगळ्या राज्याची होत असलेली मागणी

**निष्कर्ष -**

1) भारतातील अधिक राज्य वेगळे झाले आणि त्यांनी स्वतंत्र होऊन आपल्या विकासासाठी प्रयत्नशील आहेत.
2) लोकसंख्या आणि क्षेत्रफळ कमी असेल तर विकास आणि कामाचे नियोजन योग्यप्रकारे होते.
3) लहान राज्य झाले तर ते आपल्या विकासासाठी सतत प्रयत्नशील असतात.
4) लहान राज्यांचा किंवा विदर्भ स्वतंत्र विदर्भ राज्याचा राष्ट्रीय राजकारणाला फायदा होईल.
5) ज्याप्रमाणे भारतात हिंदी भाषिक अनेक राज्य आहेत त्याचप्रमाणे भारतीय नकाशावर मराठी भाषिकांचे दोन राज्य होतील.

**संदर्भ -**


1) आरसा विदर्भाचा प्रभाकर कोंडबत्तुनवार विश्वस्त प्रकाशन, नागपूर - ४४००२४ प्रथम आवृत्ती मे २०१५.
2) स्वतंत्र विदर्भाचे आंदोलन: एक दृष्टिक्षेप मार्शल सुनील सारिपुत्त आणि मार्शल केतन पिंपळपुरे समता संगर प्रकाशन, नागपूर प्रथम आवृत्ती ०५ मे २०१०.
3) विदर्भ राज्य निर्मितीचे महत्त्वाचे दस्तऐवज विदर्भ मिरर प्रकाशन
4) खांदेवाले श्रीनिवास - विदर्भ राज्य संकल्पना,विसा बुक्स प्रकाशन,२०१२.
5) खांदेवाले श्रीनिवास -छोट्या राज्यांची मागणी टाळता यईल का? - दैनिक लोकमत.
6) डॉ.शुभांगी दिनेश राठी - महाराष्ट्रातील सामाजिक-राजकीय चळवळ व प्रशासन,प्रकरण - ३ आणि ५.
7) महाराष्ट्र राज्य मंडळ, ११ वी जुने इतिहास पाठ्यपुस्तक प्रकरण- स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्र.
8) संपादकीय लेख -विदर्भ राज्याचा जंतर,मंतर - दैनिक लोकमत,१८ डिसेंबर २००९.
9) महाराष्ट्राचे शासन व राजकारण -डॉ. एकनाथ खांदेलावे, आरती प्रकाशन,कर्जत.
10) आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, व्ही.एम.सीरशीकर, डायमंड प्रकाशन,पुणे.
11) स्वतंत्र विदर्भाची चळवळ काल आणि आज - लोकसत्ता.
12) खांदेवाले श्रीनिवास -छोट्या राज्यांची मागणी टाळता यईल का? - दैनिक लोकमत.
13) लोणारे जे.टी. - विदर्भ वेगळा झालाच पाहिजे - दैनिक देशोन्नती, १९ जानेवारी २०१०.
14) https://images.app.goo.gl/MJWz९V३fMicxtmGe९
15) https://images.app.goo.gl/sBNksdwgTxtjEs३z५


**डॉ.**






# बाबासाहेब आंबेडकर थोर विचारवंत...मानवतेचे महामेरु

**प्रा. डॉ. मच्छिंद्र कडूबा सवई**
(सहा.प्राध्यापक) समाजशास्त्र
दगडोजीराव देशमुख कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ता.गंगापूर जि.छत्रपती संभाजी नगर
**विजय किसन शेळके**
(संशोधक विद्यार्थी) समाजशास्त्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजी नगर

**प्रस्तावना:**

"माणसांपेक्षा पुस्तकाचा सहवास मला अधिक आवडतो." या विचारांचे भारतीय घटनेचे शिल्पकार, दलितांचे कैवारी, दलितांना योग्य दिशा दाखवून तळा-गाळातून त्यांना माणूस म्हणून जीवन जगण्याचा अधिकार देणारे, बहुजनांचे कैवारी, जगद्विख्यात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्ण नाव भीमराव रामजी आंबेडकर जन्म 14 एप्रिल 1981 मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. रत्नागिरी जिल्हयातील अंबवडे हे त्यांचे मुळगाव. लष्करात सुभेदार म्हणून नोकरीस असणारे त्यांचे वडील पुढे साताऱ्यास स्थायिक झाल्यामुळे आंबेडकरांचे बालपण सातारा येथे गेले त्यानंतर मुलांचे शिक्षणामुळे त्यांचे कुटुंब मुंबईला आले.सण 1907 मध्ये बाबासाहेब मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले.1912 मध्ये मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमधून ते बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. सन 1913 साली ते उच्च शिक्षणासाठी अमेरिकेचे रवाना झाले. तेथील कोलंबो या विद्यापीठात त्यांनी अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व समाजशास्त्र या विषयाचा सखोल अभ्यास केला. सन 1915 मध्ये त्यांनी कोलंबिया विद्यापीठाची एम.ए. ही पदवी प्राप्त केली. त्यानंतर त्याच विद्यापीठांनी त्यांना त्यांच्या उत्कृष्ट प्रबंधाबद्दल पी.एच.डी. ही पदवी बहाल केली.

अमेरिकेतील अभ्यास पूर्ण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायदा व अर्थव्यवस्था यांचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडला गेले. परंतु आर्थिक अडचणीमुळे तेथील शिक्षण अर्धवट सोडून त्यांना भारतात परतावे लागले. काही काळ त्यांनी नोकरी बडोदा संस्थानात केली. पुढे मुंबईच्या "सीडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स" येथे ते प्राध्यापक म्हणून काम करू लागले. त्याचवेळी त्यांनी सार्वजनिक कार्यामध्ये सहभाग घेण्यास सुरुवात केली. माणगाव व नागपूर येथे भरलेल्या अस्पृश्य निवारण परिषदांमध्ये ते सहभागी झाले. सन 1920 साली डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुन्हा इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी बी.एस.सी. व डी. एस. सी. या पदव्या संपादन केल्या. याच वास्तव्यात बार ॲट लॉ, बॅरिस्टर ची पदवी प्राप्त करून सन 1923 मध्ये ते मायदेशी परतले. मग त्यांनी आपले सार्वजनिक काम अधिक जोमाने सुरू केले. सन 1924 मध्ये त्यांनी "बहिष्कृत हितकारिणी सभा" या संस्थेची स्थापना केली, व ते समाज सुधारण्याचे कार्य करू लागले. सण १९२७ मध्ये मुंबई कायदेमंडळाचे सदस्य म्हणून ते नियुक्त झाले. येथून त्यांच्या राजकीय जीवनास प्रारंभ झाला.

**जाती व्यवस्था एक भयानक वास्तव:**

डॉ. आंबेडकर यांच्या काळात भारतात चातुरवर्ण, जातीभेद, अस्पृश्यता, सरंजामशाही या वाईट रितींच्या अधिराज्य होते. दलित, आदिवासी, भटके, विमुक्त हे सर्वच हलाखी, अन्याय, अस्पृश्यता, दाष्य, अज्ञान यात गुंतून पडले होते. हा सर्व समाज जणू अत्यंत दयनीय झाला होता. डॉ. आंबेडकरांनी आपल्या बुद्धी तेजाच्या तेजस्वी विचारांनी या मरगळलेल्या समाजाच्या प्रत्येक वंचित व्यक्तीला फुंकर घालून चेतना

आणली. त्यांनी आपल्या अस्पृश्य बांधवांना अन्यायाचा प्रतिकार व न्याय हक्कासाठी संघर्ष करण्यास जागृत केले. “शिका! संघटित व्हा! आणि संघर्ष करा !” हा बाबासाहेबांचा नारा सर्व देशभर गाजू लागला. अस्पृश्य हेही याच देशाचे नागरिक आहेत व या देशावर इतर कोणाही नागरिका इतकाच त्यांचाही अधिकार आहे. अशी भीमगर्जनाच बाबासाहेबांनी केली होती. अस्पृश्यांचे हक्क त्यांना मिळावेत, त्यांना गुलामीची द्वार तोडून बाहेर येण्याचा रस्ता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखविला.

अस्पृश्यांनाही न्याय देण्यात यावा यासाठी डॉ.आंबेडकरांनी सर्वतोपरी अथक प्रयत्न केले.

**चवदार तळ्याचा एक सामाजिक संघर्ष:**

अस्पृश्यांना पाणी भरणे सार्वजनिक ठिकाणी अशक्य होते. महाडच्या चवदार तळ्याचे पाणी डॉ. आंबेडकरांनी 20 मार्च 1927 रोजी महाडला सत्याग्रह करून अस्पृश्यांसाठी खुले केले. 2 मार्च 1930 रोजी नाशिक येथे काळाराम मंदिरात अस्पृश्यांनाही प्रवेश करता यावा म्हणून त्यांनी सत्याग्रह करून हिंदू मंदिरांचे दरवाजे अस्पृश्यांना खुले केले. अस्पृश्यता व स्रिदास्य यांचा पुरस्कार करणारी मनुस्मृती जाळली..या सर्व प्रतिकात्मक कृती मधून डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांची अस्मिता जागृत केली. त्यांना सुधारणेचा मार्ग दाखविला.तरीही सवर्णांकडून कोणताच प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारून धर्मांतर केले. बौद्ध धर्माच्या प्रदीर्घ व सखोल अभ्यासानंतर डॉ. आंबेडकरांना या धर्माची तत्वे पटली. या धर्माचे श्रेष्ठत्व पटले, भगवान बुद्धांनी दिनदलित जनतेला आपल्या धर्माचे दरवाजे खुले, केले समतेवर उभारलेल्या बौद्ध धर्माची डॉ. आंबेडकरांनी 14 ऑक्टोबर 1956 रोजी नागपूर येथे दीक्षा घेतली, आणि हिंदू धर्मातून मुक्त झाले.

**संशोधनाची गृहितके:**

1.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान देशासाठी अमूल्य व अतुलनीय आहे.

2.बाबासाहेबांच्या कार्याचा जगभर गौरवा व प्रसिद्ध झालेली आहे.

3. बाबासाहेबांच्या विचारातून भावी पिढीला प्रेरणा मिळणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे शाश्वत विचार अभ्यासणे.
2. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वातंत्र्य समता बंधुता न्याय सर्वांगीण विषयाचे उत्खलन करणे.

**संशोधनाचे महत्त्व:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वेगवेगळ्या भूमिकेतून समाज हित साधण्याचा प्रयत्न केला आहे. तो प्रयत्न समाजापर्यंत तळागाळातील गरजवंतापर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. बाबासाहेबांनी त्यांच्या काळात ज्या ज्या योजना आखल्या आणि अस्तित्वात आणल्या, त्या साऱ्या देश हिताच्या होत्या मानवी कल्याणाच्या होत्या पण आजची राज्यकर्त्यांची धोरणं माणसांच्या न्याय हक्काच्या विरोधात आहेत. देश नव्या वळणावर स्थिरावतो आहे. देशाला पुन्हा एकदा सार्वभौम करण्यासाठी बाबासाहेबांच्या विचाराची पुन्हा एकदा गरज भासणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्वांगीण विचारा संदर्भात छत्रपती संभाजी नगर येथील कवी विजय शेळके यांच्या “भरलेल्या आभाळाच्या मोकळ्या वाटा” या कवितासंग्रहातून या कवितेला उल्लेखित करण्यापासून रोखता येणार नाही.

**—विचारो कि दृष्टी—**

बाबासाहेब के विचारो को
घर घर मे पहुचाना हैं।
खून पसिना एक करके
सुख और शांती लानां हैं।
यही कसम हम खायेंगे
बाबा के गीत गायेंगे।
देश में शांती बनी रहे
देश को आगे बढायेंगे।
शांती उन्हे तभी मिलेगी
जब मिलकर हम गायेंगे।
भारत देश की अखंडता को
पुरी जहाँ से निभायेंगे।
स्वतंत्र,समता,बंधुता को
मन-मन मे पहूचाना है।
खुलवायेंगे रास्ते दिलोके
मंजिल तक ले जाना है।
तोड देंगे हम वो दिवारे
जो जात-धरम को बिघडायेगी।
सन्मान होगा जहाँ उसिका
जो भाई-चारा लायेगी।
उससे होगा देश हमारा
सबसे प्यारा सबसे न्यारा।
सुख और शांती मिले सभीको
भारत देश सबका दुलारा।

कवी: विजय किसन शेळके

**राजकारण :**

भारतीय राजकारणातही डॉ. आंबेडकरांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. सण 1930 ते 1932 या दरम्यान इंग्लंड मधील तीन गोलमेज परिषदांना ते अस्पृश्यांची प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले. अस्पृश्यांसाठी राखीव जागा मान्य करणारा “पुणे करार” त्यांनी महात्मा गांधीजी बरोबर केला, सण १९३७ मध्ये डॉ. आंबेडकरांनी “स्वतंत्र मजूर पक्षाची” स्थापना केली. 1942 मध्ये त्यांनी “शेड्युल कास्ट फेडरेशन” या पक्षाची स्थापना केली. या पक्षाच्या माध्यमातून अस्पृश्यांचे प्रश्न सोडवण्याचे त्यांनी आटोकाट प्रयत्न केले. डॉ.आंबेडकर भारताच्या घटना समितीचे सभासद होते.व त्यात ते मसुदा समितीचे ते अध्यक्ष सुद्धा

होते. भारतीय राज्यघटना तयार करण्यात डॉ.आंबेडकरांचा सिंहाचा वाटा होता. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना "भारतीय घटनेचे शिल्पकार" म्हणून आपण त्यांना गौरवीत असतो.

**अस्पृश्यता एक कलंक:**

जातीय व्यवस्थेचे संदर्भात डॉ. बाबासाहेब म्हणतात आजही जातीय पद्धतीचे जातीव्यवस्थेचे डिफेंडर्स प्रवर्तक आहेत. याची मला कीव करावीशी वाटते. जातीव्यवस्थेला उचलून धरण्यात त्यांचा मुद्दा असा आहे की, ही एक प्रकारची कामाची विभागणी आहे. प्रत्येक सुसंस्कृत समाजात अशी कामाची विभागणी असते, त्यामुळे या जातीव्यवस्थेत तसे काहीच वावगे चुकीचे दिसत नाही. जातिव्यवस्थेच्या प्रवर्तकांना डिफेंडर्सना डॉ. बाबासाहेब यांनी उत्तर दिले, ते फार महत्त्वाचे आहे, ते म्हणतात "जातीव्यवस्था ही केवळ कामाची विभागणी नाही, ही कामगारात विभागणी झालेली आहे. ही कामगारात झालेली विभागणी अनैसर्गिक असून, ही कामगारातली विभागणी पक्की कप्पे बंद झालेली आहे, तसेच या जाती व्यवस्थेतील कामाची विभागणी उच्चनीचतेच्या तत्त्वावर म्हणजेच वरचा आणि खालचा अशा श्रेष्ठ कनिष्ठतेच्या तत्त्वावर केलेली आहे. अशा प्रकारची उच्चनीचतेच्या तत्त्वावर आधारलेली कायमस्वरूपी कामगारात केलेली विभागणी इतर कुठल्याही सुसंस्कृत देशात सापडणार नाही,व दिसणारही नाही.

अस्पृश्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याच्या कार्यावरही त्यांनी भर दिला. कारण शिक्षण घेतल्यानेच अस्पृश्यांची उन्नती होईल हे त्यांना उमजले होते. म्हणून त्यांनी तरुण तसेच प्रौढ दलित व्यक्तींसाठी रात्र शाळा चालवणे, वाचनालय सुरू करणे असे उपक्रम राबविले. सण 1946 मध्ये त्यांनी "पीपल्स एज्युकेशन सोसायटी" ही संस्था स्थापन केली. या संस्थेने मुंबई येथे "सिद्धार्थ कॉलेज" व छत्रपती संभाजीनगर येथे "मिलिंद कॉलेज" ही महाविद्यालय व इतर शैक्षणिक संस्था सुरू केल्या. त्यांचा आज वटवृक्ष झालेला संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आपणास दिसून येत आहे. दलित विद्यार्थ्यांसाठी अनेक वस्तीगृह चालवली. त्या वस्तीगृहातून दलितांच्या शिक्षणाला एक दिशा त्यांनी देण्याचा प्रयत्न संपूर्ण भारतभर या ठिकाणी केला. जुन्या रूढी परंपरा तोडून दलितांना राष्ट्रीय प्रवाहाशी जोडून देण्याचे महान कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. ते मात्र ऐतिहासिक ठरले. अस्पृश्यतेच्या रुढीचे चटके बसलेल्या स्वतः डॉ. आंबेडकरांच्या व्यापक सामाजिक राजकीय व शैक्षणिक कार्यमागे अस्पृश्यांचे हितरक्षण व अस्पृश्यद्धार या प्रखर प्रेरणा होत्या. आपल्या "दलितमुक्ती संग्रामातून" त्यांनी दलितांच्या दुःखाला वाचा फोडली. त्यांची अस्मिता जागृत केली. त्यांना सामाजिक व राजकीय समता व प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. नव्या सुधारणा व उन्नतीचा मार्ग दाखवून दिला. दलित समाजास सन्मान स्वाभिमान आणि तत्व प्रणालींची पक्की बैठक दिली.सामाजिक अन्याय धार्मिक ग्लानी राजकीय अवनती आणि आर्थिक गुलामगिरी यामुळे राष्ट्राचा कसा नैनात होतो याचे संपूर्ण ऐतिहासिक उदाहरण बाबासाहेब त्यांचे विचारातून देत असत.

**स्त्रियांचे उद्धारक:**

केवळ अस्पृश्यांसाठीच नव्हे तर रुढीमध्ये भरडल्या जाणाऱ्या कोणतेच प्रतिष्ठेचे सामाजिक स्थान व स्वातंत्र्य नसणाऱ्या सर्वच भारतीय स्त्रियांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रगतिशील विचार मांडले. त्यानुसार कृतीही केली. स्त्री स्वातंत्र्याचा हीरीरीने पुरस्कार केला. त्यांनी भारतीय स्त्रीच्या स्वत्वाची, स्वतंत्र्याची, अस्मितेची मंगलमय पहाट जागवली. तिला तिच्या अर्थपूर्ण अस्तित्वाची जाणीव करून दिली. स्त्रीच्या अंधारमय जीवनात उन्नतीचा नवा प्रकाश आणणारे डॉ. आंबेडकर हे दैदिप्यमान सूर्य ठरले. त्यांनी

हिंदू कोड बिलाच्या रूपाने स्त्री चे जीवनव्यापी गौणत्व नाहीसे करून, तिला कायद्याने समानता मिळून दिली. त्यांच्या अथक प्रयत्नामुळे व दयाळू प्रज्ञामुळे भारतीय स्त्री आज मुक्तीचा सुटकेचा श्वास टाकू शकली. स्त्रियांची आज जी नवी पिढी उदयास येत आहे, त्याचे सारे श्रेय या कायदे पंडिताला आहे.आपल्या दैदीप्यमान व खंबीर आचार, विचारांनी दलितांच्या व स्त्रियांच्या जीवनात नवी पहाट, नवा प्रकाश घेऊन आले.

**महापरिनिर्वाण**:

हे “क्रांतीसुर्य” दिनांक 6 डिसेंबर 1956 रोजी अस्तंगत झाले वयाच्या 65 व्या वर्षी त्यांचे महानिर्वाण झाले.असे चतुरश्र व्यक्तिमत्व असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 14 एप्रिल 1990 रोजी त्यांच्या जन्मशताब्दीचे अवचित्य साधून “भारतरत्न" हा सर्वोच्च मानाचा पुरस्कार भारत सरकारने देऊन गौरविण्यात आले.त्यायोगे या महापुरुषाच्या कार्याचा गौरव करून या सन्मानाची सर्वोच्चता सिद्ध झाली.

**संदर्भ**:

1. यशवंत खडसे (2020) भारताचे जॉन्सन डॉ. बाबासाहेब आंबेडकर,रमाई प्रकाशन, औरंगाबाद-431006
2. शंकरराव खरात (2009) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार, प्रकाशन इंद्रायणी साहित्य, शनिवार पेठ, पुणे-411030
3. सौ शारदा स. जोशी “ डॉ. बाबासाहेब आंबेडकर संक्षिप्त चरित्र व विचारधन”, प्रकाशन विद्याभारती प्रकाशन, लातूर-413512
4. विजय कुशिवर्ताई शेळके (2023) “भरलेल्या आभाळाच्या मोकळ्या वाटा” (कविता संग्रह), ऋषी प्रकाशन, छत्रपती नगर, 431008

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संसदीय लोकशाही विषयक विचारांचे अध्ययन

**प्रा. डॉ . अनिल काशिनाथ साळुंके**
सोनामाई शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महिला महाविद्यालय शहादा जि. नंदुरबार (महाराष्ट्र) , ४२५४०९

**सारांश :**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वसामान्य आपले नजरेसमोर ठेवून त्यांच्या विकासासाठी संसदीय लोकशाही या शासन पद्धतीच्या स्वीकार केला आहे. संसदीय लोकशाहीची अनेक वैशिष्ट्ये असून तिची अंमलबजावणी करताना अनेक आव्हाने उभी राहिली आहेत त्या दृष्टिकोनातून त्यावर उपाययोजना करणे गरजेचे असून त्या दृष्टिकोनातून सदर लघुशोधनिबंधाचे संशोधनातून अध्ययन करण्यात आले आहे.

**शोध संज्ञा** : लोकशाही, संसदीय, राजकीय पक्ष, कायदा, लोकमत आदी.

**प्रस्तावना** :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, इंग्लंड प्रमाणे भारतात संसदीय लोकशाही इतकी प्रभावी ठरणार नाही, कारण "भारतातील समाज व्यवस्थेत प्रचंड आर्थिक, सामाजिक विषमता आहे. एक वर्ग दारिद्र्याच्या खाईत पडला आहे. तर एक वर्ग अस्पृश्यतेच्या गुलामगिरीच्या बेड्यात अडकून पडला आहे. शोषक आणि शोषित यांच्यात प्रचंड मोठी विषमतेची दरी आहे. अशावेळी संसदेमध्ये तेच उमेदवार निवडून जातील. जे सत्तेच्या ताटाखालचे मांजर आहे व आर्थिक परिस्थितीने वरचढ आहे. असे लोकप्रतिनिधी विषमतेच्या विरोधात लढतील कसे. संसदीय लोकशाही शासनातून सामाजिक न्याय प्रस्थापित करतील कसे.

शांततामय मार्गाने भारतीय समाजातील विषमता निपटून काढायला वेळ लागेल पण त्यासाठी कुणीतरी पुढाकार निश्चित घेतला पाहिजे. तसे झाले तरच संसदीय लोकशाही शासनाकडे आपण वाटचाल करू शकतो."[१] या दृष्टिकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संसदीय लोकशाही विषयक विचारांचे अध्ययन सदर लघु शोधनिबंधाच्या संशोधनासाठी करण्यात आला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :-**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संसदीय लोकशाहीविषयी विचारांचा अभ्यास करणे .

२. लोकशाही शासन व्यवस्थेच्या अर्थ समजून घेणे

३. संसदीय लोकशाही समोरील आव्हाने जाणून घेणे.

४. संसदीय लोकशाहीसाठी आवश्यक उपाय योजनांचा आढावा घेणे.

**गृहितके :**

1. भारताला प्रगतीपथावर नेण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संसदीय लोकशाही विषयक विचार फार महत्त्वाचे आहेत.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संसदीय लोकशाही विषयक कार्य फार मोलाचे आहे.

3. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक क्षेत्रात परिवर्तन करण्यासाठी डॉ. आंबेडकरांचे विचारांची प्रासंगिकता आज देखील आहे.

**व्याप्ती व मर्यादा:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संसदीय लोकशाही विषयक विचारांचे अध्ययन हीच व्याप्ती व मर्यादा असून त्याचा अभ्यास सदर लघु शोधनिबंधाच्या संशोधनासाठी करण्यात आला असून

**माहितीचे संकलन :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संसदीय लोकशाहीविषयी विचार या लघुशोध निबंधासाठी संदर्भग्रंथ मासिके, साप्ताहिके, इंटरनेट, त्या काळातील ऐतिहासिक नोंदी, त्यांच्याविषयी इतरांनी नोंदविलेली मते, घडलेल्या घडामोडी आदी माहिती संकलनासाठी दुय्यम साधनांचा अवलंब करण्यात आला आहे .

**संशोधन पद्धती व माहितीचे विश्लेषण:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याच संसदीय लोकशाही विषयक विचारांची प्रासंगिकता ही वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, तुलनात्मक, संख्यात्मक पद्धतीने संशोधन पद्धतींचा अवलंब करून व आशय विश्लेषणांचे तंत्र वापरून मुद्देसूद मांडणी करण्यात आली आहे.

**मर्यादा :-**

हा शोधनिबंध केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संसदीय लोकशाही विषयक विचार व योगदान यासंबंधित मर्यादित आहेत.

**संशोधन विषयाचे महत्त्व :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय राज्यघटनेची निर्मिती, स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, संसदीय लोकशाहीचे पुरस्कर्ते, सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे एक प्रमुख प्रणेते, मानवी स्वातंत्र्याचे कैवारी म्हणून त्यांचे जीवनकार्य हे अखिल मानव जातीसाठी फार महत्त्वपूर्ण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीवर विश्वास असून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी संसदीय लोकशाही अस्तित्वात येणे हे व्यक्तीच्या व समाजाच्या हिताचे आहे. सर्व शासन प्रकारात लोकशाही शासन हा शासनाचा उत्तम प्रकार आहे असे ते मानत असत. त्यांना संसदीय लोकशाहीबद्दल आदर होता. परंतु भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीचा विचार करता भारतात संसदीय लोकशाहीच्या आड येणारे अनेक घटक आहेत याची त्यांना जाणीव असल्याने सामाजिक प्रतिष्ठापनेसाठी त्यांनी संसदीय लोकशाहीचा ध्यास घेतला होता. म्हणून त्यांच्या संसदीय लोकशाही विषयक विचार अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

**आशय विश्लेषण:**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २२जून १९५३ रोजी बीबीसी न्यूजचे ज्येष्ठ पत्रकार एडन क्रॉली यांना दिलेल्या मुलाखतीत भारतातील लोकशाही व संसदीय लोकशाही संदर्भातले आपले विचार मांडलेले आहेत.

**लोकशाहीचा अर्थ :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकशाहीची व्याख्या करताना म्हणतात की, "लोकांच्या राजकीय व सामाजिक जीवनात क्रांतिकारक बदल रक्ताचा एकही थेंब न सांडता घडवून आणणे म्हणजे लोकशाही होय.' [२] डॉ. आंबेडकरांना शांततापूर्ण सनदशीर मार्गाने राजकीय लोकशाहीच्या संक्रमणित कार्यपद्धतीतून सामाजिक

व आर्थिक समता अभिप्रेत होती. लोकशाही हा केव्हा शासनाचा प्रकार नसून ती जीवन जगण्याचा मार्ग असून सामाजिकता व नीतिमत्ता ही दोन प्रमुख तत्वे आहेत, ते असे मनात असे.

**संसदीय लोकशाहीचे वैशिष्ट्ये :**

**१. शांततामय सनदशीर मार्गाने परिवर्तन :-**

संसदीय शासन व्यवस्थेत प्रत्यक्ष जनतेने निवडलेल्या प्रतिनिधी मार्फत शांततामय सनदशीर मार्गाने परिवर्तन करता येते.

**२. जनमताला महत्त्व :**

संसदीय लोकशाहीत जनमतावर सरकार अवलंबून असते.

**३. जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक :**

संसदीय लोकशाही शासन पद्धतीत जनतेचे प्रश्न अडचणी तक्रारी समस्या व दुःखांना वाचा फोडण्याचे काम जनतेचे प्रतिनिधी हे चर्चेच्या माध्यमातून सभागृहात करीत असतात.

**४. एक व्यक्ती -एक मत - एक मूल्य :**

प्रौढ मतदाराला समानपणे मतदानाच्या हक्क मिळाल्याने एक व्यक्ती एक मत एक मूल्य या तत्त्वाचे पालन होऊन व्यक्तीची प्रतिष्ठा राखली जाते.

**५. व्यक्तिमत्व विकासाची संधी :**

संसदीय शासन पद्धतीत प्रत्येक नागरिकाला आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या विकास करण्याची पुरेशी संधी मिळते.

**६. राजकीय पक्षांना महत्त्व :**

जनहिताच्या दृष्टीने सत्ताधारी व विरोधी राजकीय पक्षांची भूमिका ही महत्त्वपूर्ण असते.

**संसदीय लोकशाही समोरील आव्हाने :**

**१. व्यक्ती पूजा :**

लोकशाहीत जनतेकडून व्यक्ती पूजा ही संसदीय लोकशाही समोरील प्रमुख आव्हान आहे.

**२. सामाजिक आर्थिक विषमता :**

भारतीय समाजात असलेली सामाजिक व आर्थिक विषमतेमुळे संसदीय लोकशाही समोरील मोठे आव्हान उभे राहिले आहे.

**३. जातीयता :**

भारतीय राजकारणात व समाज व्यवस्थेवर जातीय व्यवस्थेचा प्रभाव असल्याकारणाने ते एक आव्हान ठरले आहे.

**४. निरक्षरता :**

भारतात निरक्षर लोकांचे प्रमाण अधिक असल्याकारणाने त्यांना चांगले वाईट योग्य यातील फरक समजू शकत नसल्याने ती योग्य निर्णय घेऊ शकत नाही.

**५. भ्रष्टाचार :**

भारतीय राज्यकारणात भ्रष्टाचाराच्या अवस्था माजलेला असून ते संसदे लोकशाही समोरील एक आव्हान आहे.

**६. प्रादेशिकता :**

भारतात विविध राज्यातील प्रादेशिकता ही उकडून येत असल्याकारणाने संसदे लोकशाहीला आव्हान ठरले आहे.

याशिवाय अंधश्रद्धा, असहिष्णुता, जागरूकतेचा अभाव, जातीयता, प्रभावी विरोधी पक्षाच्या अभाव आधी भारतीय संसदी लोकशाही समय आव्हाने उभी राहिली आहे.

**उपाय योजना :**

**१. राष्ट्रहिताला प्राधान्य :**

पक्ष व प्रादेशिक हितापेक्षा राष्ट्रहिताला प्राधान्य दिले पाहिजे.

**२. प्रभावी विरोधी पक्षाची आवश्यकता :**

सत्ताधारी पक्षावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी विरोधी पक्षाची आवश्यकता आहे.

**३. संविधानाचे पालन :**

भारतीय संविधानात दिलेल्या तत्त्वांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.

**४. जागरूक जनता :**

जनहित व शासकीय ध्येय धोरण लक्षात घेता आपल्या अडचणी, समस्या सोडविण्याबाबत, नियंत्रण ठेवा जनतेत जागृती असणे आवश्यक आहे.

याशिवाय स्वार्थी प्रवृत्ती, जनतेचा वाढता राजकीय सहभाग, सहिष्णुता, हक्क व कर्तव्यांचे पालन, अल्पसंख्याक गटाचे संरक्षण, नैतिकतेचे पालन आदी घटक संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक आहे.

**संशोधन विषयाची उपायुक्तता :-**

संसदीय लोकशाही शासन पद्धती विषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, संसदीय लोकशाहीची वैशिष्ट्ये, संसदीय लोकशाही समोरील निर्माण होणारे अडथळे, त्यावरील उपाय योजना व निष्कर्षांच्या अभ्यास करता भारतीय संसदीय लोकशाही ही प्रबळ करण्यासाठी सदर लघु शोधनिबंध हा शासन, सत्ताधारी पक्ष, विरोधी पक्ष व नागरिकांना संसदीय लोकशाहीच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी उपयुक्त ठरणार आहे.

**निष्कर्ष :**

१. जनतेच्या राजकीय सहभाग वाढवला पाहिजे.

२. अक्षय राष्ट्रविताला प्राधान्य असावे.

३. प्रभावी विरोधी पक्षाची आवश्यकता

४. आर्थिक व सामाजिक समता असावी.

५. प्रादेशिकता व जातीयवाद या ऐवजी राष्ट्रप्रेमाची भावना असावी.

६. नागरिकांनी हक्क व कर्तव्यांचे तंतोतंत पालन करावे.

७. आरती व सामाजिक समतेवर भर असावा.

**समारोप** :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संसदीय लोकशाहीचे पुरस्कर्ते पुरस्कार ते होते. शांततामय सणाची मार्गाने राजकीय परिवर्तन घडविण्याची क्षमता संसदीय लोकशाहीत आहे. संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून

व्यक्तीच्या सर्वांगीण विकास राष्ट्राची प्रगती जन्मताला महत्त्व हे निर्माण होते. त्या दृष्टीने संसदीय लोकशाहीवर अधिक भर होता.

**संदर्भ :**


1. निकम दिलीपसिंग, निकम राजू, महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रमुख संकल्पना ,प्रशांत पब्लिकेशन जळगाव, प्रथम आवृत्ती जानेवारी २०२०, पृष्ठ क्र. १३९.
2. चां.भ. खैरमोडे, 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर', खंड ११, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९०, पृष्ठ क्र. २१.
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रायटिंग्ज अॅण्ड स्पिचेस, खंड १३, पृ. १२१६-१७.
4. भा.ल. भोळे, 'डॉ. आंबेडकर आणि उदारमतवादी लोकशाही' (लेख), डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९३, पृ. २०६.
5. सुहास पळशीकर, 'स्वातंत्र्य, समता, बंधुभाव' (लेख), तत्रैव, पृ.९२.
6. एम.डी. देशपांडे, 'डॉ. आंबेडकर यांचे राजकीय विचार', लोकवाङ्मय गृह, मुंबई, (तृतीय आवृत्ती), २०००, पृ.८
7. https://oldhistoricity.lbp.world/Administrator/UploadedArticle/88.pdf

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक परिवर्तन विषयक विचार व कार्य

**प्रतिमा नारायण आसले**
सहाय्यक प्राध्यापक (मराठी विभाग) हु. बहिर्जी स्मारक महाविद्यालय,वसमत.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महू या गावी (मध्य प्रदेश) झाला. लाखो वर्षापासून अंधकारात खितपत पडलेल्यांसाठी एक तेजस्वी हिऱ्याचा जन्म झाला. माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार त्यांनी प्राप्त करून दिला व भारतामध्ये पुन्हा बौद्ध धम्माचे बीज पेरले. ते भारतीय संविधानाचे शिल्पकार आणि स्वतंत्र भारताचे पहिले न्याय मंत्री,अर्थशास्त्रज्ञ,समाज सुधारक सुद्धा होते. त्यांनी दलितांच्या उत्थाना करीता आणि भारतातील मागासलेल्या वर्गाच्या प्रगती करिता आपल्या संपूर्ण जीवनाचा त्याग केला.

**समाज म्हणजे नेमकं काय ?**

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे तसेच अन्न-वस्त्र-निवारा यासोबतच समाज स्वतःच्या गरजा त्याच्या पद्धतीने पूर्ण करतो. समाजाशिवाय मानव नाही आणि मानव शिवाय समाज पूर्ण होऊ शकत नाही. समाजाशिवाय जगले जाणारे जीवन हे रानटी प्राण्यासारखे समजले जाते म्हणून समाजामध्ये मनुष्याचे स्थान अमूल्य आहे. मानवी लोकांचा समूह म्हणजे समाज.

**डॉ. आंबेडकरांनी समाजाबद्दल केलेल्या व्याख्या**

1. "जातीव्यवस्था ज्या धार्मिक श्रद्धावर उभारलेली आहे त्या श्रद्धा उध्वस्त केल्याशिवाय जाती संस्था नष्ट होणे अशक्य आहे."
2. "एका राजाला दुसऱ्या राज्यावर राज्य करण्याचा अधिकार नाही तसेच एका वर्गात दुसऱ्या वर्गावर सत्ता गाजविण्याचा मुळीच अधिकार नाही."

**समाजाची स्थिती**

त्या काळामध्ये समाजामध्ये उच्च निचता फार मोठ्या प्रमाणात पाळली जात होती. उच्च जातीतील लोक खालच्या जातीतील लोकांवर फार अन्याय अत्याचार करत होते व इथे अस्पृश्य जातीतील माणसाला जनावराच्या पलीकडची वागणूक दिली जात असे.

**अस्पृश्यावर करण्यात येणारा अत्याचार**

फार घृणास्पद अस्पृश्यता पाळण्यात येत असे. महाराष्ट्रात पेशव्यांच्या राज्यवटीत सार्वजनिक रस्त्याने स्पृश्य हिंदू जात असताना अस्पृश्यांच्या सावलीने तो विटाळला जाऊ नये म्हणून अस्पृश्यास त्या रस्त्याने जाण्याची मनाई होती. चुकून देखील अस्पृश्यांना स्पर्श होऊन कोणी विटाळले जाऊ नये म्हणून अस्पृश्यांना त्याच्या मनगटावर अथवा गळ्यात त्याच्या ओळखीसाठी काळा दोरा बांधणे बंधनकारक होते. अस्पृश्यांच्या पावलाखालील धुळी वर पाय पडून इतर हिंदू विटाळू नयेत म्हणून पेशव्यांची राजधानी पुणे येथे अस्पृश्यांच्या कमरेस झाडू बांधण्यात येत असे आणि मानेला मडके बांधावे लागे या मडक्यातच थुंकले पाहिजे. अशा प्रकारच्या अनेक परिस्थिती मधून त्या काळातील अस्पृश्य जात होते त्यांनी फक्त अन्याय,अत्याचार सहन करणे

जर त्या विरोधात कोणी आवाज उचलला तर त्यांना फार वाईट प्रकारे शिक्षा दिली जात असे तसेच अनेक नियम व अटी जबरदस्ती अस्पृश्यांवर लादलेल्या होत्या.

**आंबेडकरांनी सामाजिक क्षेत्रातील केलेला अभ्यास**

डॉ. आंबेडकर यांचा समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन जगभर प्रसिद्ध आहे. राज्यसत्ता ही सामाजिक बदलाचे एक प्रभावी साधन असते पण राज्य सत्तेला जातीय व वर्गीय चरित्र सुद्धा प्राप्त झालेले असते. सामाजिक सत्ता प्राप्त झालेले उच्च जातीवर्ग व भांडवलशाहीने निर्माण केलेली अर्थसत्ता काबीज केलेले भांडवलदार वर्ग राज्य सत्ता हस्तगत करतात व तिच्यावर प्रचंड प्रभाव गाजवीत असतात. जातिव्यवस्थेतील सामाजिक सत्ता ही राज्यसत्तेला हास्यास्पद बनविते. कायद्याने व्यक्तीला स्वातंत्र्य हक्क बहाल केले असले तरी जातीचा सामाजिक व्यवहार हा त्या स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यास येणे प्रतिबंध करीत राहतो. जातीच्या सामाजिक व्यवहारामागे धर्मावरील विश्वास आहे. माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार द्यावा. गुलामाला गुलामीची जाणीव जोपर्यंत होत नाही तोपर्यंत तो बंड करून उठू शकत नाही माणसाच्या अंगी चांगले आचरण असावे.

**सामाजिक सुधारणे विषयक कार्य**

दलितांचा उद्धारकर्ता, 'युग प्रवर्तक' म्हणून देखील ते प्रसिद्ध आहेत तसेच आजच्या काळामध्ये समाजात दलितांना जे स्थान आहे त्याचे संपूर्ण श्रेय त्यांनाच जाते. जे फार कौतुकास्पद आहे तसेच सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या निराशेला दूर केले आणि त्यांना समानतेचा अधिकार मिळवून दिला. आंबेडकरांनी सतत जातीपातीच्या भेदभावाला संपवण्याकरता कठोर परिश्रम केले. जातीपातीच्या भेदभावांनी भारतीय समाजाला संपूर्णतः विस्कळीत आणि अपंग बनविले होते आणि त्याला पाहता आंबेडकरांनी दलितांच्या हक्काची लढाई लढली आणि देशातील सामाजिक स्थितीत बऱ्याच प्रमाणात बदल केला. जातिपातीचा भेदभाव संपवण्याकरता लोकांपर्यंत आपला आवाज पोहोचवण्याकरता समाजात पसरलेली कीड मनोवृत्ती समजण्याकरता आंबेडकरांनी शोध सुरू केला. जातिगत भेदभावाला संपविण्याकरिता अस्पृश्यतेला मिटविण्या करिता त्यांनी बहिष्कृताच्या हिताकरिता सभा हा पर्याय शोधला. या संघटनेचा मुख्य उद्देश मागासलेल्या वर्गात शिक्षणाचा आणि सामाजिक आर्थिक सुधारणा करण्याचा होता. भारतीय समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, न्यायिक व सर्व प्रकारच्या प्रगतीमध्ये समान संधीचा अधिकार प्राप्त करून देत डॉ. आंबेडकर खऱ्या अर्थाने महान समाज सुधारक ठरले. जातीयता नष्ट करण्याचा आंतरजातीय विवाहास सह भोजन हा खरा मार्ग नसून धर्मश्रद्धावर जातीयता आधारलेली आहे त्यात नष्ट करायला हव्या जात नष्ट करणे हाच त्यांनी आपल्या डोळ्यापुढे एक ध्येय ठेवले सवर्ण हिंदू सुधारक सनातनी लोकांना दूर सारू इच्छित नाहीत आणि अस्पृश्यांना सुधारणा घडवून आणण्यास अत्यंत नाही.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या संघटना**

1. बहिष्कृत हितकारणी सभा,१९२४ २) समाज समता संघ, १९२७ ३) शेड्युल्ड कास्ट फेडरेशन,१९४२ ४) दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, १९५४ ५) बौद्ध धम्माची स्थापना, १९५६

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक सुधारणे साठी दिलेले योगदान**

त्या काळातल्या फार वाईट परिस्थिती मधून त्यांनी हा मार्ग शोधला. महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक अधिकारांची वकिली केली आणि अनुसूचित जाती आणि जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी नागरी सेवा रोजगार, शाळा आणि विद्यापीठे यांच्या न्याय्य तरतुदीसाठी विधानसभेचे समर्थन मिळवले, ही एक सकारात्मक कृती आहे. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा

दिली आणि अस्पृश्यांविरुद्ध (दलित) सामाजिक भेदभावाविरुद्ध मोहीम चालवली. प्रत्येकाला समान वागणूक दिली पाहिजे आणि वर्ग, जात, लिंग, वंश इत्यादी आधारावर भेदभाव केला जाऊ नये. त्यांनी घटनात्मक नैतिकतेचा विचार मांडला. त्याच्यासाठी राज्यघटना हा केवळ कायदेशीर सांगाडा आहे, पण माणसाला तो घटनात्मक नैतिकता म्हणतो. एक महान व्यक्तिमत्व असण्यासोबतच ते एक महान समाजसुधारक देखील होते. प्रत्येकाने त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन देशाच्या आणि समाजाच्या नव्या विकासात योगदान दिले पाहिजे. बाबासाहेबांनी बौद्ध धर्माची निवड केली कारण त्यांचा असा विश्वास होता की हा धर्म ज्ञान आणि करुणा प्रदान करतो . समतेचा संदेशही देते. त्यांच्यामुळेच व्यक्ती चांगले आणि सन्माननीय जीवन जगू शकते.

**समारोप**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांने समाज सुधारणेसाठी फार मोठे मोलाचे कार्य केलेले आहे आणि वर्णव्यवस्थेचा विरोध, जाती पातीचा विरोध, अस्पृश्यतेचा विरोध, आंतरजातीय विवाह बद्दल समर्थन , दलितांचे शिक्षण संघर्ष आणि एकत्रित ते वर बळ, व्यवस्थापने मध्ये दलित वर्गाबद्दल पर्याय प्रतिनिधित्व व समर्थन समान हक्क, एकत्रितता, जातीयअंत, कार्य ,सेवा, महिलांची, सुरक्षितता, भारतीय संविधान निर्मिती साठी केलेली कार्य , गोरगरिबांसाठी केलेले कार्य, रिझर्व बँक ऑफ इंडिया एक रुपया याबद्दल लिहिलेला प्रबंध, हजारो वर्षापासून चालत आलेली रूढी, प्रथा, परंपरा त्या प्रवाहाच्या विरुद्ध टाकलेला पाऊल व यशस्वी वाटचाल ही फार मोलाची कामगिरी त्यांनी केली. आज भारत देश नव्हे तर पूर्ण जग त्याचे ऋणी आहेत .

**संदर्भ ग्रंथ**


2. डॉ. भी.रा.आंबेडकर _'जाती संस्थेचे उच्चाटन', आनंद प्रकाशन, जयसिंगपुरा,औरंगाबाद. आवृत्ती: दिनांक २६ नोव्हेंबर २०१३, प. क्र. २५
3. दिलीप चव्हाण _ 'समकालीन भारत: जातीयंताची दिशा', क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी आणि हरिती पब्लिकेशन्स, लातूर. पहिली आवृत्ती: २८ नोव्हेंबर २०१९, पृ. क्र.१५
4. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन चरित्र _ अशोक पॉकेट बुक्स अप्पा बळवंत चौक, पुणे. पृ. क्र.५
5. डॉ. कीर्तीकुमार मोरे_ युगकर्ता _ अनुराधा पब्लिकेशन सिडको नांदेड. पृ. क्र. ५०

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य

**प्रा. डॉ. युवराज देवबा भामरे**
मु. पो. पोहाणे ता. मालेगाव जि. नाशिक

**प्रास्ताविक:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर (१४ एप्रिल, १८९१ – ६ डिसेंबर, १९५६), हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. ते ब्रिटिश भारताचे मजूरमंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक होते. त्यांनी केलेल्या कार्याचा साधक बाधक आढावा घेण्याचा प्रयत्न सदर शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**राजकीय कार्ये -** १९३० पासूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय वाटचालीला सुरुवात झाली होती. अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी म्हणून देश त्यांना ओळखू लागला होता. मुंबई विधिमंडळाचे सदस्य म्हणून सरकारने त्यांची नियुक्ती केली होती. या माध्यमातून त्यांनी अनेक प्रश्न विधिमंडळात मांडले होते. उपेक्षितांचे, स्त्रियांचे, गिरणी कामगारांचे व शेतकऱ्यांचे प्रश्न त्यांनी ऐरणीवर आणले होते. महार वतनाच्या कायद्यात बदल करण्यासाठी दुरुस्ती विधेयक देखील मांडले होते. १९३६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली, १९३७ मध्ये त्यांनी विधानसभेच्या निवडणुकीत १३ जागा जिंकल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबई विधानसभेचे आमदार म्हणून निवडून आले. १९४२ पर्यंत ते विधानसभेचे सदस्य होते आणि या काळात त्यांनी मुंबई विधानसभेत विरोधी पक्षनेते म्हणूनही काम केले.

ऑल इंडिया शेड्यूल्ड कास्ट्स फेडरेशन ही एक सामाजिक-राजकीय संघटना होती, ज्याची स्थापना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४२ मध्ये दलित समाजाच्या हक्कांसाठी, मोहिमेसाठी केली होती. १९४२ ते १९४६ पर्यंत, आंबेडकरांनी संरक्षण सल्लागार समिती आणि व्हाईसरॉयच्या कार्यकारी परिषदेवर कामगार मंत्री म्हणून काम केले.

**गोलमेज परिषद मधील सहभाग-** साधारणपणे १९३० ते १९३२ या काळात इंग्लंडमध्ये पार पडलेल्या तीन गोलमेज परिषदांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आर. श्रीनिवासन यांच्या समवेत ब्रिटीश भारतीय डिप्रेस्ड क्लासेसचे प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. सायमन कमिशन ने अस्पृश्यांच्या राजकीय हितांना फारसे महत्व दिले नाही. भारताच्या भावी राज्यघटनेत अस्पृश्यांच्या हिताचे संरक्षण करणारे राजकीय हक्क असावेत असे बाबासाहेबांना वाटत होते. अस्पृश्यांच्या ठिकठिकाणी सभा व अधिवेशन भरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांना त्यांच्या राजकीय हक्काचे महत्व पटवून देऊन त्यांच्या स्वतःच्या अधिकाराविषयी जागृती करू लागले.

**खोती पद्धतीवर बंदी-** खोती पध्दतीमुळे कोकणातील शेतकरी पिढ्यानपिढ्या गांजले होते. कुळांनी जमीन कसायची आणि ७५ टक्के वाटा सावकारांना ध्यायचा, अशी ही अन्यायकारक पद्दत होती. डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचा पहिला संप घडवून आला होता. हा संप इसवी सन १९२८ या कालावधीत जरी रायगड जिल्हा या गावात झाला होता. सदर संप सात वर्षे सुरू होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खोतीपद्धत नष्ट करण्यासाठी संघर्ष केला होता. १४ एप्रिल १९२९ रोजी रत्नागिरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा शेतकरी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत त्यांनी कोकणातील खोतीदारी विरुद्ध शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू केले होते. बाबासाहेबांच्या स्वतंत्र मजू पक्षाचे १४ आमदार मुंबई विधीमान्द्लात निवडून गेले, या १४ आमदारांच्या बळावर बाबासाहेबांनी १७ सप्टेबर १९३९ रोजी खोती पद्धत नष्ट करणाऱ्या कायद्याचे विधेयक बाबासाहेबांनी मुंबई विधिमंडळात मांडले होते. त्यानंतर कुळांच्या काही मागण्या मान्य झाल्या आणि आणि खोतशाही नष्ट झाली.

**स्वतंत्र मजूर पक्ष-** सन १९४२ मध्ये व्हाईसरॉय लीन लीत गो सरकारच्या केंद्रीय मंत्रिमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मजूर मंत्री म्हणून घेण्यात आले होते. मजूर मंत्री म्हणून त्यांनी कायद्यात अनेक दुरुस्त्या सुचविल्या होत्या. कामगार कल्याणच्या अनेकविध योजना त्यांनी बनवल्या होत्या. विकासासाठी वीज आवश्यक असून जलसिंचना बरोबर वीज निर्मितीचा प्रश्नही त्यांना सोडवयाचा होता. सन १९४६ साली देशात कॉंग्रेसचे काळजीवाहू सरकार आले होते. या सरकारमध्ये बाबासाहेबांना कायदामंत्री म्हणून स्थान मिळाले होते. याच काळात घटना समिती गठीत करण्यात आली असल्याने बंगाल प्रांतातून ते घटना समितीवर निवडून आले होते. योगायोगाने ते मसुदा समितीचे अध्यक्ष देखील बनले होते. भारतीय राज्यघटनेचे ते शिल्पकार मानले जातात.

**स्त्रियांसाठी कार्य-** १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायदेमंत्री झाले होते, भारतीय राज्यघटनेचे महत्त्वाचे काम मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी कामकाज पाहिले होते. घटनेची बांधणी समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुता या चार मूलतत्त्वांवर झालेली आहे. पहिले तत्त्व समता जी भारतीय जीवनात कधीच नव्हती. हजारो वर्षे विषमतेचीच परंपरा चालत आलेली होती व भारतीयांच्या रक्त मांसात आत्मसात झालेली होती. त्यामुळे समतेवर आधारित स्वातंत्र्याची आशा करणे व्यर्थ होते. धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान इत्यादीमुळे व्यक्तींचे होणारे मूल्यमापन अधिकाधिक जाचक होत होते. त्यामुळे जात ही कायद्यानेच नष्ट करण्याची गरज होती. आणि हा कायदा सर्वांना सारखाच लागू होईल हेही सांगणे आवश्यक होते. म्हणून संविधानाच्या चौदाव्या कलमात हे सांगून टाकले आहे की कोणत्याही भारतीय व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता किंवा कायद्याचे समान संरक्षण नाकारण्यात येणार नाही. कलम १५-१ राज्य केवळ धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल असा भेदभाव करणार नाही. कलम १५-२ सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता न पाळणे, १५-३ कलमात स्त्रिया व बालके यांच्याकरिता विशेष तरतुदीचा उल्लेख आलेला आहे. कलम १६-१ व २ सेवायोजना, पदनियुक्ती, नोकरी इत्यादी धर्म, जात, वंश, लिंग, कुळ, निवास, जन्मस्थान इत्यादी कारणावरून भेदभाव केला जाणार नाही, व सर्व नागरिकास समान संधी मिळेल या कलमांचा स्त्री जीवनावर काय परिणाम झाला हे पाहणे देखील जरुरी आहे. लिंगभेदामुळे स्त्रियांवर घोर अत्याचार झालेले होते आणि आजही वास्तवात होत आहेत. कारण आत्तापर्यंत रूढी, परंपरेचा कायदा आजही प्रभावी आहे. पण आज स्त्री मुक्ती संघटना या अत्याचाराविरुद्ध लढत आहे. विशेषतः स्त्रियांनी ही बाजू कणखरपणे

सांभाळल्यामुळे काही प्रमाणात का होईना चित्र बरेच पालटलेले दिसते. स्त्री मुक्ती बरोबर स्त्री वादाचा आग्रह स्त्री संघटनांनी धरलेला दिसतो, त्यामुळे स्त्री हक्काची भूमिका अर्थातच आग्रही ठरते.

शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो.समाजामध्ये परिवर्तन फक्त शिक्षण घेतल्याने होत असते हे बाबासाहेब जाणून होते. म्हणूनच बाबासाहेब यांनी स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला होता. स्त्री आणि पुरुष यांना एकाच प्रकारचे आणि एकाच शाळेत एकत्रित शिक्षण द्यावे असे बाबासाहेब यांना वाटत होते. बाबासाहेब यांनी मांडलेल्या हिंदू कोड बिलामुळे स्त्रियांना त्यांचे हक्क मिळालेले दिसून येतात. या कोड बिलामुळे स्त्रियांना स्वताहून घटस्फोट घेण्याचा अधिकार मिळाला. एखाद्या नवर्याने जरी आपल्या बायकोला घटस्फोट दिला तरी तिला या कायद्याने पोटगी मिळण्याचा अधिकार मिळवून दिला. मुलीला वडिलांच्या संपत्तीवर मुलाप्रमाणेच वारसा हक्क या कायद्याने मिळाला. स्रियांनी स्वतः कमविलेल्या संपत्तीवर स्वतःचा मालकी हक्क प्रस्थापित झाला. स्त्रियांना मुल दत्तक घेण्याचा अधिकार तसेच मुला प्रमाणे मुलीला देखील दत्तक जाण्याचा अधिकार मिळाला. स्त्रीला स्वताचा वारसदार ठरविण्याचा अधिकार मिळाला. आंतरजातीय विवाह करण्यास मान्यता या कायद्याने मिळाली. एक पत्नी असतांना दुसरा विवाह करण्यास या कायद्याने मनाई आली.

एकंदरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले कार्य हे अतुलनीय स्वरूपाचे असे आहे. ते स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार तसेच प्रख्यात कायदेपंडित डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्य समाजाची अस्मिता जागविणारे पहिले महामानव होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही विषयक विचार

**प्रा. डॉ. गुरुनाथ मावंजी घुटे**
शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय शिवळे
ता. मुरबाड जि. ठाणे

**गोषवारा**:-

समतेसाठी अखंड आयुष्यभर झटणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा लोकशाही विषयक दृष्टिकोन कसा होता त्यामध्ये कोणत्या गोष्टींना महत्त्वाचे स्थान दिले आहे याचा अभ्यास संबंधित लेखात करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या विचारप्रणालीतील महत्त्वाचे मुद्दे किती दूरदर्शक होते याचा अंदाज आपल्याला खालील लेखांमध्ये येतो तसेच यावरून त्यांचा सर्वसमावेशक अभ्यास किती विस्तृत होता भविष्यातील लोकशाही विकसित होऊन हुकूमशाही, घराणेशाही किंवा इतर राजकीय व्यवस्था कशा दूर राहतील आणि समाजाचा सर्वांगीण विकास कसा होईल याविषयीचे विचार त्यांच्या लोकशाही विषयक विचारांमध्ये दिसून येतात त्यांच्या विचाराचा आवाका खूप मोठा आहे त्यातील ठळक मुद्द्यांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न खालील लेखात करण्यात आला आहे.

**प्रस्ताविक:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनातील सगळ्यात महत्त्वाचे उद्दिष्ट ठेवले होते ते म्हणजे विषमताधिष्ठित भारतीय समाज रचना नष्ट करून समताधिष्ठित समाज रचना उभी करणे हे होते. आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता या गोष्टींना महत्त्वाचे मानले आहे. मात्र अनिर्बंध स्वातंत्र्याला ते मान्यता देत नाही तसेच अमर्याद समता देखील स्वातंत्र्याला मारक ठरते. त्यामुळे स्वातंत्र्य, समता यांच्यावर अतिक्रमण होऊ नये म्हणून कायद्याचे संरक्षण ते मान्य करतात आणि त्यापुढेही जाऊन ते बंधूभावाला सर्वोच्च स्थान देतात कारण स्वातंत्र्य आणि समता नाकारली जाण्याप्रसंगी बंधूभाव हाच खरा रक्षक ठरतो समभाव हे बंधूभावाचे दुसरे नाव आहे.

आंबेडकरांच्या समोर सुखववस्तू समाज नसून विषमता आधारित समाज आहे. त्यामुळे स्वातंत्र्याच्या नावाखाली संपत्ती बाळगण्याचा अधिकार किंवा संपत्ती जमा करण्याचे स्वातंत्र्य यासारखे स्वातंत्र्य हे समाजा मध्ये समता कधीच आणू शकत नाही आणि त्यामुळे अशा स्वातंत्र्याला ते मान्यता देत नाही. त्याचबरोबर समता म्हणजे फक्त एक व्यक्ती एक मत या पद्धतीची समता त्यांना मान्य नाही आणि ह्या सगळ्या गोष्टी कायद्याने कमी करता येऊ शकतात मात्र त्याहीपेक्षा मोठा भाव म्हणजे बंधुभाव आहे असे त्यांचे मत आहे कारण जे समाजामध्ये सुखवस्तू कुटुंबात जीवन जगत आहेत किंवा सामाजिक दृष्ट्या पुढारलेले आहेत अशा व्यक्तींनी स्वतःहून बंधू भावाच्या भावनेने मागासवर्गाला पुढे येण्याचे मार्ग खुले केले तरच हा मागासलेला विषमतेवर आधारित समाज पुढे येऊ शकतो अन्यथा कायदा सुद्धा अपुरा पडू शकतो. त्यामुळेच त्यांनी स्वातंत्र्य समता आणि बंधुता याविषयी आपले विचार प्रगट केले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील सगळ्यात महान ध्येय म्हणजे समताधारित समाज रचना उभी करणे हे असल्याने त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय समाज रचना समताधिष्ठित उभी राहावी

यासाठी आपले राजकीय विचार मांडले आहेत. प्रस्तुत लेखात आंबेडकरांच्या लोकशाही विषयक आशावाद व्यक्त करणाऱ्या तसेच भारतीय लोकशाहीतील त्रुटी दाखवणाऱ्या विचारांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**विषमतेचा अभाव:-**

विसाव्या शतकात जगातील हुकूमशाहीचे दुष्परिणाम दिसून आल्यानंतर संपूर्ण जग लोकशाहीकडे वळाले भारतामध्ये सुद्धा स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकशाही निर्माण व्हावी अशी विचारसरणी तयार झाली. या लोकशाही निर्मितीसाठी आणि ती टिकून राहण्यासाठी भक्कम अशा घटनेची निर्मिती होणे आवश्यक होते हे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या खांद्यावर घेतले आणि त्यासाठी त्यांनी जगात अस्तित्वात असलेल्या लोकशाहीचा बारकाईने अभ्यास केला त्यानंतर ते अशा निष्कर्षापर्यंत आले की जगातील लोकशाही नष्ट होऊन वेगळ्याच सत्तेची निर्मिती होण्यामागे सगळ्यात महत्त्वाचे कारण आहे ते म्हणजे विषमतेवर आधारित समाज रचना.

विषमता आधारित समाज रचनेमध्ये दोन गट असतात एका गटाकडे सर्व हक्क आणि सत्ता केंद्र असतात तर दुसऱ्या गटाकडे सर्व प्रकारची भार वाहण्याची, काम करण्याचे कार्य असते आणि त्यामुळे समाज रचना विषमतेवर आधारित असते यामध्ये पीडित दलित वर्गाकडून त्यांचे हक्क आणि सत्ता संपत्ती ही सबलगटाने हिसकावून घेतलेली असते. समाजामध्ये संख्येने सबल गट, वर्ग कमी असतो किंवा छोटा असतो मात्र पीडित, दलित वर्ग हा मोठा असतो आणि त्यामुळे या दोघांमध्ये हिंसात्मक क्रांती घडण्याचे प्रमाण जास्त असते परिणामी हे लोकशाहीला मारक ठरू शकते. लोकशाहीची निकोप वाढ होण्यासाठी विषमता विरहित समाजरचना आवश्यक आहे.

**प्रबळ विरोधी पक्षाचे अस्तित्व:-**

लोकशाही शासन व्यवस्था विकसित आणि प्रबळ करण्यासाठी विरोधी पक्षाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. लोकशाहीचा उगम इंग्लंडमध्ये झाला त्या ठिकाणी या विरोधी पक्षाच्या नेत्याला सत्ताधारी पक्षाप्रमाणेच वेतन आणि कार्यालय तसेच कार्यालयीन स्टाफ पुरवला जातो जेणेकरून सत्ताधारी पक्ष चुकीच्या पद्धतीने कार्य करणार नाही याची काळजी हा नेता घेत असतो.

सत्ताधारी पक्षाला लोकशाहीमध्ये पाच वर्षानंतर जनतेला सामोरे जावे लागते त्यांनी केलेल्या कामकाजावर जनता खुश असल्यास त्यांना पुन्हा सत्तेवर बसवते अन्यथा सत्तेवरून दूर लोटते. प्रत्यक्ष जनतेचे नियंत्रण लोकशाहीमध्ये असते मात्र निवडणुकीनंतर पाच वर्षांमध्ये सत्ताधाऱ्यांच्या कामकाजावर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्याचे काम विरोधी पक्ष करत असतो आणि त्यामुळे कुठल्याही लोकशाही देशांमध्ये प्रबळ विरोधी पक्ष असणे आंबेडकरांच्या मते खूप महत्वाचे आहे. सत्ताधारी पक्षांचे धोरणे विरोधी पक्ष ठोकून सरळ करतो तसेच अनावश्यक भाग वगळून ती जनतेच्या कल्याणासाठी राबवली जातात. त्यामुळेच प्रबळ विरोधी पक्ष असणाऱ्या देशातच जनतेच्या कल्याणकारी राज्याची रुजवणूक लोकशाहीच्या माध्यमातून केली जाते.

**वैधानिक व प्रशासकीय समता:-**

आदर्श लोकशाहीमध्ये वैधानिक व प्रशासकीय समता असणे आवश्यक आहे डॉ.बाबासाहेब आंबेडकनारांनी यासाठी अनेक देशांची उदाहरणे दिली आहेत त्यांनी अमेरिकेतील "स्पॉइल्स सिस्टम"

याचे उदाहरण देता म्हटले आहे की या सिस्टमनुसार अमेरिकेत ज्या पक्षाची सत्ता येईल तो पक्ष जुना नोकर वर्ग दूर करून त्या ठिकाणी आपल्या मर्जीतील नवीन नोकरवर्ग भरती करत असे त्यामुळे प्रशासकीय व्यवस्था डळमळीत झाली. याउलट इंग्लंडने प्रशासकीय वर्ग कायमस्वरूपी भरती केली असल्याने त्या ठिकाणी लोकशाहीची उत्तम वाढ झाली. आंबेडकरांच्या मते लोकशाही ही धोरणे ठरवण्यासाठी असते प्रशासकीय कामकाजात हस्तक्षेप करण्यासाठी किंवा पक्षपात करण्यासाठी नसते मात्र सध्याच्या लोकशाहीमध्ये आपल्याला शासनाचा प्रशासकीय यंत्रणेमध्ये हस्तक्षेप झाल्याचे दिसते हे लोकशाहीला मारक आहे.

**संविधानिक नैतिकतेचे पालन:-**

लोकशाही शासन व्यवस्था यशस्वी होण्याकरता केवळ घटनात्मक शासन किंवा संविधानाचे अस्तित्व पुरेशी नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते भारतीय संविधान हा केवळ सांगाडा असून संविधानाचा आशय सजीव करण्यासाठी संविधानिक नैतिकतेची नितांत गरज आहे. असे त्यांचे मत आहे आपली आजची राज्यघटना ही कायदेशीर तरतुदींचा नुसता सांगाडा असून त्याला आवश्यक असणाऱ्या रक्त - मांस हे संविधानात्मक नैतिकतेत लपलेले आहे.

आपले मत पटवून देताना आंबेडकरांनी अमेरिकेचे उदाहरण दिले आहे अमेरिकेतील 13 वसाहातीनी वॉशिंग्टन यांच्या नेतृत्वाखाली इंग्लंड विरुद्ध लढा दिला आणि त्यानंतर वॉशिंग्टन हे अमेरिकेतील लोकांसाठी देवता बनले होते. त्यांनी वॉशिंग्टनला स्वातंत्र्य अमेरिकेचे अध्यक्ष पद दिले पाच वर्षानंतर अमेरिकन जनतेने वाशिंग्टनला पुन्हा अध्यक्षपद देऊ केले मात्र वॉशिंग्टन ने त्याला विरोध केला त्यांच्या मते आपण इंग्लंड मधील राजेशाही विरुद्ध बंड करून स्वातंत्र्य मिळवले आहे म्हणजेच परंपरागत राजेशाही विरुद्ध किंवा घराणेशाही विरुद्ध युद्ध पुकारले होते आणि मीच पदावर राहिलो तर त्याची पुनरावृत्ती होऊ शकते मात्र लोक आग्रहास्तव ते दुसऱ्यांदा अध्यक्ष झाले. त्यांची लोकप्रियता एवढी होती की ते सलग दहा वेळेस सुद्धा बिनविरोधअध्यक्ष होऊ शकले असते. लोकांनी तेवढ्याच आनंदाने त्यांना स्वीकारले असते मात्र वॉशिंगटनने तिसऱ्यांदा अध्यक्ष होण्यास स्पष्ट नकार दिला, किंबहुना अमेरिकन लोकांना त्यांच्या लोकशाही विषयक ध्येयाची आठवण करून दिली आणि अध्यक्ष पदावरून दूर झाले. म्हणजेच लोकशाहीमध्ये नैतिकतेच्या माध्यमातून आपण घटनात्मक तरतुदी आणि लोकशाहीचा आदर करणे आवश्यक आहे सत्ता लोभापोटी या घटनात्मक तरतुदी पायदळी तुडवू नयेत.

**बहुमताची हुकूमशाही नसावी अल्पसंख्यांक मतांचा आदर:-**

आदर्श लोकशाहीमध्ये अल्पसंख्यांक असणाऱ्या उमेदवारांना सुरक्षितता वाटेल आणि त्याच्या मतांचा सन्मान केला जाईल याची काळजी घेणे आवश्यक आहे. अल्पसंख्यांक मतांचा आदर केला नाही किंवा त्यांना आपले मत मांडण्याचा किंवा आक्षेप घेण्याचा अधिकार दिला नाही तर हे लोक आपल्यावरील अन्याय दूर करण्यासाठी हिंसक मार्गाचा अवलंब करू शकतात आणि परिणामी ते क्रांतिकारक हिंसक मार्गक्रमण करतात त्यामुळे लोकशाही टिकवण्यासाठी अल्पसंख्यांक मतांचा आदर करणे त्यांना सुरक्षितता प्रदान करणे ही गोष्ट खूप महत्त्वाची आहे. आंबेडकरांनी आदर्श लोकशाहीसाठी वरील मत अधोरेखित केले आहे.

**नीतिमान समाजाचे आवश्यकता:-**

सामाजिक नीतीच्या अभावी लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही ती छिन्हविछीन्ह होईल असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे मत आहे आणि याचा अनुभव आपल्याला आलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते लोकशाहीमध्ये लोकांच्या जीवनामध्ये कमीत कमी कायद्याचा हस्तक्षेप व्हावा अशी अपेक्षा असते. जर कायदा करण्याची गरज भासली तर तो कायदा पाळण्याची नीतिमत्ता समाजामध्ये असायला हवी. भारतामध्ये लोकशाही रुजावी एवढी नीतीमत्ता भारतीय समाजामध्ये नाही किंबहुना हिंदू धर्मामध्ये ही नीतिमत्ता बघायला मिळत नाही. आंबेडकरांच्या मते बौद्ध धर्मातील शिकवणुकीमध्ये ती बघायला मिळते तीच लोकशाहीला पोषक आहे.

आंबेडकरांच्या मते लोकशाही राज्य व्यवस्थेसाठी नीतिमान समाज व्यवस्थेची अत्यावश्यकता आहे. राजकारणाचा अभ्यास करणाऱ्या व्यक्तीला नीतीशास्त्राचा गंध नसला तरी चालेल अशी समाजव्यवस्था आपल्या भारतीय समाजाची आहे परिणामी भारतीय समाजाने लोकशाहीसाठी स्वतः नीतिमत्ता सुधारणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष:-**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची संविधान निर्मितीमध्ये अत्यंत मोलाची भूमिका होती आणि या भूमिकेला सामोरे जाताना त्यांनी लोकशाही विषयक अत्यंत महत्त्वाचे विचार मांडले आहेत. त्यांनी भारतातील लोकशाही भविष्यात कुठल्या मार्गाने जाऊ शकते याचे मार्गदर्शन व त्याचे धोके सांगितलेले आहेत. विषमता हा मुद्दा टाकलेला आहे की भारतामध्ये लोकशाहीची रुजवणूक करायची असेल तर भारतातील गरीब श्रीमंत आणि सवर्ण दलित हा जो भेद आहे तर दूर करणे गरजेचे आहे अन्यथा लोकशाही विकसित होणार नाही. मागासवर्ग किंवा जो शोषित वर्ग आहे तो हिंसक मार्गाकडे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही मात्र आत्ताच्या राज्यकर्त्यांनी या विषमतेवर आधारितच पक्षांची रचना केली आहे आणि आपला स्वार्थ साधण्यासाठी विषमतेला भांडवल बनवून राजकारण करीत आहेत.

आंबेडकरांनी लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी प्रबळ विरोधी पक्षाची गरज आहे असे सांगितले आहे मात्र भारत स्वातंत्र्यानंतर लोकशाही टिकवण्याऐवजी सत्ताधारींनी आपले सत्ता टिकवण्यावरच भर दिला आहे त्यामुळे विरोधी पक्ष कमकुवत असावा किंवा नष्ट कसा होईल यावर भर दिला आहे. भविष्यामध्ये याच पद्धतीने मार्गक्रमण होत राहिल्यास भारतातील लोकशाही संपुष्टात येण्यास वेळ लागणार नाही.

आंबेडकरांच्या मते लोकशाहीतील वैधानिक प्रशासकीय समता ही खूप महत्त्वाची बाब आहे मात्र सध्याच्या भारतीय व्यवस्थेतील प्रशासन यंत्रणा ही भ्रष्टाचाराने पोखरली आहे. स्वार्थी राज्यकर्त्यांनी त्यांचा वापर आपल्या स्वार्थासाठी वाटेल त्या पद्धतीने करण्याचा निर्णय घेतला आहे जे अधिकारी किंवा कर्मचारी राज्यकर्त्यांची मर्जी राहतात त्यांनाच प्रमोशन किंवा इतर सुविधांचा लाभ दिला जातो जे अधिकारी नियमानुसार काम करण्याचा प्रयत्न करतात त्यांच्या मार्गात अनेक अडथळे निर्माण केले जातात हे लोकशाहीला मारक आहे.

लोकशाहीमध्ये नीतिमत्ता खूप महत्त्वाची आहे. आंबेडकरांनी आपल्या देश बांधवांना संदेश दिला आहे. की स्वतःला विकू नको मात्र आजकालच्या निवडणुकांमध्ये सर्व जनता हे स्वतःला विकण्यातच सुख मानतो आहे. जे उमेदवार आहेत ते वेगवेगळी आमीष देऊन मतदारांना खरेदी करतात तसेच एका पक्षातून निवडून

आलेला उमेदवार लगेचच दुसऱ्या पक्षात स्वतःच्या स्वार्थासाठी निघून जातो. आपली सत्ता कायम टिकावी किंवा आपल्या घराण्यातच सत्ता राहावी यावर भर दिला जातो ही बाब नीतिमत्तेच्या दृष्टीने अत्यंत वाईट आहे त्यामुळे लोकशाही अधोगतीला जात आहे.

आंबेडकरांच्या विचारसरणीनुसार सध्याच्या भारतीय लोक शाहीचा विचार केल्यास भारतामध्ये लोकशाहीच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या मूल्यांचा विकास किंवा रुजवणूक झालेली नाही. नीतिमत्तेचा ऱ्हास झाल्यामुळे निवडणुका म्हणजे पैसा कमाविण्याची संधी असे सर्व सामान्य जनतेचे मत बनले आहे. वेगवेगळ्या निवडणुकांमध्ये मतदारांची वेगवेगळी किंमत ठरवून त्यानुसार मतदारांना पैसे वाटले जातात आणि मतदार सुद्धा मोठ्या आनंद ते स्वीकारतात त्यानुसार मतदान सुद्धा करतात उमेदवाराची योग्यता किंवा पात्रता याकडे ती दुर्लक्ष करताना दिसतात तसेच निवडून आलेले उमेदवार आपल्या स्वार्थासाठी पक्ष बदलताना दिसतात किंवा पुढच्या निवडणुकीमध्ये तिकीट न मिळाल्यास ते पक्षांतर करतात यावरून भारतीय लोकशाहीची वाटचाल किती अधोगतीकडे चांगली आहे हे लक्षात येईल.

आदर्श लोकशाही निर्माण करायचे झाल्यास आंबेडकरांनी सांगितलेल्या तत्वांचा स्वीकार करण्याशिवाय पर्याय नाही त्यासाठी त्यांच्या तत्वांचा प्रसार करणे आणि त्यांच्या विचारांचा स्वीकार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे अन्यथा जो शोषित वर्ग, मागासवर्ग आहे तो पुढील काही दिवसात हिंसक मार्गाचा अवलंब करताना दिसेल आणि एका नव्या शासन पद्धतीचा उदय भारतामध्ये होऊ शकतो.

**संदर्भ ग्रथ सूची :-**


1. पानतावणे गंगाधर, 'विचार युगाचे प्रणेते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर' मूल्यवेध अस्मिता, औरंगाबाद,1956
2. निकुंभे सी.एच. 'समाज प्रबोधनकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर' सुगावा प्रकाशन,2005
3. नरवडे एस. एस. 'डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे समाजचिंतन' मॅजेस्टिक प्रकाशन,1989
4. खरात शंकरराव, 'डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार, इंद्रायणी साहिकत्य, पुणे,2008
5. कुरुंदकर नरहर, 'डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर: एक मूल्यांकन' सविता प्रकाशन, औरंगाबाद.
6. कुबेर वा.ना. 'डॉ.आंबेडकर विचारमंथन' सुगावा प्रकाशन1997
7. आगलावे प्रदीप, 'समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर' सुगावा प्रकाशन, पुणे,2001
8. खरात विलास, 'इतिहासकार आंबेडकर', मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, पुणे, चौथी आवृत्ती, 2015
9. वाघमारे जनार्दन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर: संवैधानिक विचार आणि धर्मचिंतन', सुगावा प्रकाशन, पुणे 2018
10. चौसाळकर अशोक, 'आधुनिक भारतीय राजकीय विचार: प्रवाह आणि अंत: प्रवाह', प्रतिभा प्रकाशन,पुणे 2014
11. कीर धनंजय, 'बाबासाहेब आंबेडकर', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई 1991
12. सरदेसाई एस. जी. 'भारतीय तत्वज्ञान: वैचारिक आणि सामाजिक संघर्ष' लोकवाङमय मुंबई 1977
13. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड -20 महाराष्ट्र शासन मुंबई 2005
14. राजवंश- गायकवाड ज्ञानराज,'दलितांचे व राष्ट्राचे हितकर्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर', डॉ.बाबासाहेब आंबेडकर नॉलेज मिशन, औरंगाबाद 2016
15. खरे विजय, 'अंतर्गत सुरक्षा तज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर', डॉ.बाबासाहेब आंबेडकर नॉलेज मिशन, औरंगाबाद 2016

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चिंतनातील, राष्ट्रवाद संकल्पना.

**डॉ. सीमा काळे**

ग्रंथपाल,

कला महाविद्यालय मलकापूर, अकोला

**प्रस्तावना:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, आपल्याला जर भावी काळात धर्म, धर्माचे आचार नि धर्मावर आधारित समाज निर्माण करावयाचा असेल तर जेथे धर्मात सुधारणा करणे आवश्यक ठरते. तिथे ती आवर्जून करणे इष्ट ठरते. धर्माच्या बाबतीत आज आपण आपला मार्ग चुकलो आहोत. 'आपल्या धर्मात आता देव आणि नीतिही राहिली नाही. आजची अवस्था म्हणजे मानवी मनाचा संपूर्ण अधःपात आहे. म्हणूनच खऱ्या आणि श्रेष्ठ धर्माची पुनः स्थापना करण्याचे बिकट कार्य भावी पिढीवर येऊनच पडले आहे. देश आणि धर्म दोन्ही नाशाच्या मार्गावर चाललेत म्हणूनच मी राजकारणात येण्याचा निर्णय घेतला. त्यामुळेच त्यांना जीवनात राष्ट्रवाद, हा धर्मांध राष्ट्रवाद नको होता. त्यांच्या राष्ट्रवादासंबंधीच्या चिंतनाचा अभ्यास पुढीलप्रमाणे करता येईल.

**उद्देश :-**

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील राष्ट्रवाद संकल्पना अभ्यासणे.

2) डॉ. आंबेडकर यांनी सांगितलेला धर्मांध राष्ट्रवाद कसा घातक आहे आणि त्याची भूमिका यांचा आढावा घेणे.

3) डॉ. आंबेडकर यांनी राष्ट्रवादासंबंधी मांडलेला आशावाद आणि त्यांचे मूल्यांकन कोणत्या दिशेने मानवीयुगास उपयोगी पडते,याचा अभ्यास करणे.

**गृहीतके** :-

1) डॉ आंबेडकर यांनी सांगितलेला राष्ट्रवाद आणि धर्मांध राष्ट्रवाद यातील आशावाद व त्याचे केलेले मूल्यांकन, यांचा अभ्यास करणे .

**विश्लेषण :-**

डॉ. आंबेडकरांची 'राष्ट्रवाद' ही भावना सामाजिक भावनेने प्रेरित दिसून येते. देशातील स्वातंत्र्याबद्दल जेवढा तळमळा नि प्रेम समाजामध्ये आहे तेवढाच देशातील सामान्य दिनदुबळ्या लोकांप्रतिदेखील तो दिसून आला पाहिजे. त्यामुळे देशाच्या स्वातंत्र्याबरोबरच येथील जनतेला देखील स्वातंत्र्याची गरज निर्माण होते. आपल्यामध्ये जेव्हा निपजत बंधुभाव नि ऐक्य निर्माण होईल तेव्हाच राष्ट्र नि राष्ट्रवादाचे बिज रुजले जाईल असे त्यांना वाटत होते. 'आंबेडकरांच्या खऱ्या राष्ट्रवादाचा उगम गोरगरिबाबाबत व दलित अस्पृश्याबद्दल त्यांना असलेल्या कळवळ्यात दिसून येतो. समान संधी व मानवी हक्क अनेक शतकांपासून नाकारले गेल्यामुळे मानवी अस्तित्वालाही पारखे झालेले हे वर्ग दास्यातून व दारिद्र्यातून मुक्त झाल्याखेरीज राष्ट्र-जीवनाशी समरस होऊ शकणार नाहीत अशी आंबेडकरांना खात्री होती.' राष्ट्राला जर खरे स्वरूप आणून देणे आवश्यक असेल तर बहिष्कृत असलेल्या,मागासलेल्या समाजाला विशिष्ट वर्गवर्चस्वातून मुक्त करणे गरजेचे ठरते. त्यांचे शोषण

पिळवणुक थांबवून त्यांना न्याय, हक्क नि स्वातंत्र्याची गरज प्राप्त करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी राष्ट्रीय ऐक्याची भावना जनमानसात रुजली पाहिजे. परंतु 'आंबेडकरांना अभिप्रेत असलेले राष्ट्रीय ऐक्य हे केवळ राजकीय ऐक्य नव्हते. तर आत्मिक व सांस्कृतिक स्वरुपाचे ऐक्य त्यांना हवे होते. मनाच्या युतीतून आकारास येणारे सामाजिक ऐक्य हवे होते. भ्रातृभावाच्या प्रखर भावनेने परस्परबध्द झालेला लोकसमुदाय अशी त्यांनी राष्ट्राची व्याख्याच केली आहे. जगातील राष्ट्राचे ऐक्य हेच राष्ट्राच्या उभारणीला पोषक ठरत असते. समाजामध्ये प्रचलित असणारी वर्गविशेषाची भावना, सामाजिक विषमता, जातीयतेचीभावना, धर्मांधता, यातून जमातवाद, जातीयवाद, धर्मवाद निर्माण होऊन राष्ट्रवादाला बाधा निर्माण झालेली दिसून येते. विशेषतः जातीयतेने हा देश सामाजिक व राष्ट्रीयदृष्टया दुर्बल झाला आहे असे डॉ. आंबेडकरांचे निदान होते. अशी ही जातीयता राष्ट्रवादाच्या विकासाआड येते याबद्दल त्यांच्या मते राष्ट्रीयत्व म्हणजे राष्ट्रीय भावनेचा अभाव..... जात, वर्ण आणि सांप्रदाय यांच्याविना सामाजिक बंधुता प्रत्यक्षात आणणे आणि समाजात सुसंवाद निर्माण करणे म्हणजेच राष्ट्रवाद असते. तत्कालीन परिस्थिती लक्षात घेता राष्ट्रवादासाठी ऐक्याच्या निर्मितीकरीता वैचारिक सामंजस्य नि परस्पर विश्वास देखील त्यांना आवश्यक वाटतो. केवळ एखाद्याला राष्ट्रीय भावना नाही, राष्ट्रप्रेम नाही असे म्हणून स्वतः मध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण होत नसते. राष्ट्रवाद निर्माण होण्यासाठी स्वआचरण देखील महत्वाचे तरते. केवळ राष्ट्रवादाचा प्रचार महत्वाचा नसून तो कृतीने देखील दिसला पाहिजे. त्यांच्यामते, 'या देशातील प्रत्येक मनुष्य तोंडाने राष्ट्रवादाचा उदोउदो करीत असतो परंतु कृतीने जात्यंधता, पक्षाधता यांच्याच आहारी गेलेला आढळतो. धर्मांधता ठेऊन पवित्र जपणाऱ्याने, जातीयवाचकतेचा, पक्षांधतेचा, पक्षपातीवृत्तीचा इतरांवर ठपका ठेवून राष्ट्रवादाची भावना जपणे योग्य नाही, असे डॉ. आंबेडकरांना वाटते.

डॉ. आंबेडकरांच्या राष्ट्रवादाचे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे त्यांचा राष्ट्रवादभाव धर्मापासून अलिप्त होतो. ते धर्मांधता बाळगणारा नव्हता. त्यांचा 'राष्ट्रवाद हा अत्यंत धर्मनिरपेक्ष, पुरोगामी व बुध्दीप्रामाण्यवादी होता. परकिय राजवटीइतकेच भारतीय सनातनी कट्टरपनाला त्यांनी धारेवर त्याबाबत धरले आहे. प्राचीन भारतीय परंपरांचे पुररुज्जीवन राष्ट्रवादाच्या नावाने करणे त्यांना नामंजूर होते. कारण असा राष्ट्रवाद सहजासहजी अविवेकीय ठरून असहिष्णुतेस जन्म देतो. शिवाय राष्ट्रवादाने धर्माच्या सरहद्दीवर थांबू नये' असेही त्यांना वाटते. राष्ट्रवादाला धर्माच्या आड उभा करणे, धर्मावरून हिंदी-राष्ट्रवाद, मुस्लिम राष्ट्रवाद या संज्ञा देणे त्यांना योग्य वाटत नाही. कारण त्यामुळे अहिष्णुता नि वेगळेपणाची भावना निर्माण होऊन ती राष्ट्रीय ऐक्यात बाधा ठरते. शिवाय धार्मिक प्रश्न जरी महत्वाचा असेल तरी तो राष्ट्रीय भावनेत आड येता कामा नये. ते म्हणतात, 'आम्ही सर्व हिंदी बंधु आहोत. हिंदी राष्ट्रजण कोणत्याही वर्णाचे असोत. कोणत्याही धर्माचे असोत. ते सर्व हिंदी आहेत. व्यक्तिच्या दृष्टीने धर्माची बाब महत्वाची असेल, पण राष्ट्रीय बाबतीत तो केव्हाही आड येता कामा नये कारण राष्ट्रवादाच्या निमित्ताने धर्म ही बाब फार महत्वाची म्हणता येणार नाही. प्रत्येक देशात राष्ट्रीयत्वाच्या भावनेत धर्माची हीच स्थिती राहते. "दया धरम का मूल है, नरक मूल अभिमान" यावरून असे लक्ष्यात घेण्यासारखे आहेकी देशाची नि देशातील आपल्या बंधुची सेवा करणे, जणी जनार्दन शोधणे व पाहणे, हाच खरा धर्म आहे. त्यामुळे राष्ट्रवादासाठी देखील केवल धार्मिक

ऐक्य योग्य ठरते. त्यात धर्मभेदाची भावना येता कामा नये. आपली भिन्न-भिन्न धर्मतत्वे आमच्या बंधुप्रेमाच्या आड येता कामा नये, असे डॉ. आंबेडकर म्हणतात.

'तत्कालीन ऐक्याच्या हेतूने एखाद्या गटासंबंधी अनुनयांचे धोरण स्विकारणेही आंबेडकरांना पसंत नव्हते. कारण अनुनय संबंधित गटाचे समाधान करू शकत नाहीत उलट त्यांच्या अपेक्षा वाढतच् असतात.' असा आंबेडकरांचा मानस होता. त्यामुळे तडजोडीपेक्षा स्वतंत्र पाकिस्तानच्या मागणीचाही त्यांच्या धार्मिक आणि राष्ट्रीय भावना लक्ष्यात घेऊन स्विकार केला जावा अशी त्यांची अपेक्षा होती. परंतु हिंदु राष्ट्रवाद, नि मुस्लिम राष्ट्रवाद जोडता अगर उभा करता येणे शक्य नाही, अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती. राष्ट्रवाद ही संज्ञाच मूळी धर्मनिरपेक्ष अशी असून ती धार्मिक स्वातंत्र्याचे रुप दर्शविते. ती सहिष्णुतेची भावना असते. त्यांनी स्वतंत्र पाकिस्तानची मागणी केली परंतु देशातील मुस्लीम बांधवास ते म्हणतात, 'मुसलमानांनी आपण सर्व जन हिंदी आहोत ही गोष्ट विसरता कामा नये. या देशात आपला जन्म झाला नि या देशातच आपण मरणार आहोत, हे निश्चित त्यामुळे आपल्या देश स्वातंत्र्याच्या आड येईल असे कोणतेच धोरण आपण ठेवायला नको. अशाप्रकारे डॉ. आंबेडकरांच्या राष्ट्रवादात उदारमतवादी विचार प्रवाह दिसून येतो. त्यांच्या राष्ट्रवादाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची राष्ट्रप्रेमाची भावना होय. ब्रिटीश शासणाने भारतात सुधारणा केल्यातरी ब्रिटीश हेच भारतीय दारिद्रअवस्थेला कारणीभूत आहेत. असे परखडपणे आपले मत त्यांनी मांडले होते. त्यामुळे भारतराष्ट्राला इंग्रजी राजवटीतून स्वातंत्र्य प्राप्त व्हावे अशी त्यांची भूमिका होती. या संदर्भात ते म्हणतात, 'मी राष्ट्रीय सरकारचा शत्रू नाही. माझा स्वराजाला विरोध नाही. अगर स्वातंत्र्याचाही मी विरुध्द नाही देशाला ज्याचे आश्वासन देण्यात येत आहे. ते स्वातंत्र्य, शिक्षण आणि सुबत्ता माझ्याही वाट्याला येणार, अशी माझी खात्री पटल्यास त्या स्वातंत्र्यासाठी, त्या राष्ट्रीय वृत्तीसाठी मी केव्हाही लढावयाला तयार आहे.

**निष्कर्ष:-**

डॉ. आंबेडकर म्हणतात, 'राष्ट्र हा एक सजीव आत्मा असतो, एक आध्यात्मिक तत्व असते. शिवाय दोन गोष्टींनी त्याची घडण होते. पहिली भूतकाळातील गौरवशाली व समृध्द स्मृतींचे सामाईक भांडवल, आणि दुसरी एकत्र राहण्याची भावना व आकांक्षा या दोन्ही गोष्टी सोबत असल्यास बाकी वेगळेपण जरी असेल तरी राष्ट्राचे अस्तित्व टिकून राहते. म्हणून धर्मांध राष्ट्रवाद ही भावना कधीही राष्ट्रासाठी घातक ठरत असते.

**संदर्भ ग्रंथ :-**


1. सं. नरके हरी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे खंड 18 - भाग- 3 (डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन )वर्ष 2002
2. कसबे,रावसाहेब,'आंबेडकरवाद तत्व आणि व्यवहार 'सुगावा प्रकाशन,पुणे प्रथम आवृत्ती, 1989
3. भोळे, भा. ल., डॉ.आंबेडकरांचा वैचारिक वारसा, सुगावा प्रकाशन, पुणे वर्ष 2006
4. सं. गायकवाड, प्रदीप' बहिष्कृत भारत व मूकनायक अग्रलेख 'क्षितिज प्रकाशन, भुसावळ (वर्ष उपलब्ध नाही)
5. आंबेडकर, बी. आर. 'रानडे गांधी अँड जिना: थिकर अँड कंपनी पब्लिकेशन,बॉम्बे 1943.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचे मूल्यमापन

**विकास रामदास साबळे**

संशोधक विद्यार्थी अर्थशास्त्र विभाग, जे. ई. एस. महाविद्यालय जालना.

**गोषवारा -**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि दलितोद्धारक ही डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे रूपे सर्वपरिचित आहेतच परंतु त्याचबरोबर ते एक सखोल या संघ असणारे उत्तम अर्थशास्त्रज्ञ देखील होते. डॉ. आंबेडकरांनी आपल्या आर्थिक विचार शेती उद्योग व्यापार या तिन्ही क्षेत्रात मांडले. त्यांच्या आर्थिक विचारावरच आपल्याला भारताच्या मध्यवर्ती बँकेची स्थापना झालेली दिसून येते त्याचबरोबर शेती क्षेत्रामध्ये सामूहिक शेती करावी व तुकडीकरण थांबवावे या विचारांना अनुसरूनच आज सामूहिक शेती योजना कूळ कायदे, कामगार कायदे तसेच विविध कायद्यांमध्ये आपल्याला बाबा साहेबांच्या विचारांचे प्रतिबिंब दिसून येते. त्यामुळे बाबा साहेबांचे आर्थिक विचार हे शाश्वत आहेत असं म्हणल्यास वावगे ठरणार नाही.

मानवाच्या उत्क्रांती मधून विविध शास्त्रे उदयास आलेले आहेत. अर्थशास्त्र हे त्यापैकीच एक शास्त्र आहे. मानवाच्या उत्क्रांती बरोबरच आर्थिक प्रश्न निर्माण झाले. अगदी रानटी अवस्थेत राहणाऱ्या मानवापासूनच आजच्या प्रगत अवस्थेत राहत असलेल्या माणसापर्यंत आर्थिक प्रश्नाची सुरुवात झाली आणि ते प्रश्न सोडविण्यासाठी आर्थिक संस्था निर्माण होत गेल्या व यातूनच आर्थिक विचार मांडण्याची आवश्यकता भासली. मानवी उत्क्रांती बरोबरच मानवाच्या गरजा वाढत गेल्या. अशा गरजांची पूर्तता करणे, यातूनच आर्थिक प्रश्नांची निर्मिती झाली. गरज ही शोधाची जननी आहे, या मुक्तीचा मानवाला पावलोपावली प्रत्यय आला. मानवाला त्याच्या परिस्थितीनुसार वेळोवेळी जाणवणाऱ्या आर्थिक समस्यांची उकल करण्यासाठी काही उपाय शोधणे आवश्यक बनले. यामधूनच आर्थिक विचार मांडण्यास सुरुवात झाली. मानवाला भेडसावणाऱ्या आर्थिक समस्यांची उकल करण्यासाठी अर्थशास्त्रज्ञाने वेळोवेळी जे उपाय सुचविले, ज्या कल्पना मांडल्या त्यामधूनच आर्थिक विचारांचा उगम झालेला आपल्याला दिसून येतो. काळाच्या ओघात परिस्थिती बदलत गेली. वेगवेगळ्या परिस्थितीनुसार आर्थिक प्रश्नांचे स्वरूप बदलत गेले. त्यामुळे बदलत्या परिस्थितीचा आढावा घेऊन नवीन पद्धतीने आर्थिक प्रश्नांची सोडवणूक कशी करावी, यासाठी निरनिराळ्या आर्थिक विचारवंतांनी वेळोवेळी जे विचार मांडले आणि त्यांच्या विचारांमध्ये परिस्थितीनुसार जे बदल होत गेले त्यालाच अर्थशास्त्रीय विचारांचा विकास असे म्हटले जाते.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात म्हणजेच १८५० नंतर भारताच्या आर्थिक व सामाजिक रचनेत मोठ्या प्रमाणात बदल होऊ लागले. त्यास भारतातील ब्रिटिश राजवट कारणीभूत ठरली. ब्रिटिश सरकारच्या जुलमी सत्तेच्या विरोधात देशात असंतोषाचे लाट निर्माण झाली. याचा परिणाम भारतात नवीन पद्धतीच्या आर्थिक व सामाजिक विचारांचा विकास घडवून आला. भारतात नव्या विचारसरणीच्या आर्थिक विचारवंतांचा उदय या काळात झाला. या विचारवंतांमध्ये प्रामुख्याने दादाभाई नौरोजी, डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज व महात्मा गांधी यांचा अग्रक्रमाने उल्लेख करता येईल. (प्रा.डॉ.अनिलकुमार वावरे, ऑगष्ट २०२२)

**संशोधनाची उद्दिष्टे –**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन परिचय थोडक्यात अभ्यासाने

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचे मूल्यमापन करणे

**संशोधन पद्धती –**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने दुय्यम साधन सामग्रीचा वापर केला आहे. यामध्ये प्रामुख्याने विविध संशोधन लेख, वर्तमानपत्रे , पुस्तके, व संकेतस्थळ यांचा वापर केला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन परिचय –**

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर हे स्वकर्तुत्वावर, स्वयंप्रेरणेने स्वत:ची प्रगती करून आपल्या असंख्य दलित बांधवांना विकासाचा मार्ग दाखवणारा एक प्रभावी नेता म्हणून ओळखले जाते. त्यांना 'दलितांचा कैवारी' तसेच 'दलितांचा पुढारी' म्हणून ओळखले जाते. भारत सरकारने त्यांना अलौकिक कार्याबद्दल 'भारत रत्न' या पुरस्काराने गौरविल आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी कोकणात झाला. १९०७ साली ते दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतर एलफिस्टन महाविद्यालयात त्यांनी पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेतला व बीएची पदवी संपादन केल्यावर काही काळ त्यांनी बडोदे संस्थानात सेवा केली. पुढे सयाजीराव महाराजांच्या पाठिंब्याने ते उच्च शिक्षणासाठी कोलंबिया विद्यापीठात गेले. एम ए च्या पदवीसाठी त्यांनी एक प्रबंध सादर केला तो 'प्राचीन भारतीय व्यापार' यासंबंधी होता. काही काळ त्यांनी मुंबईच्या सिंडह्याम महाविद्यालयात अर्थशास्त्राच्या अध्यापनाचे कार्य केले. पुढे 1920 मध्ये त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या ठिकाणी त्यांनी अर्थशास्त्राचे अधिक सखोल अध्ययन केले आणि एम एस सी व डी एस सी अशा अत्युच्च पदव्या संपादन केल्या. त्या काळात त्यांनी ब्रिटिश म्युझियम मध्ये बसून अध्ययन व लेखन केले. याच ठिकाणी कार्ल मार्क्स देखील वाचन, लेखन व चिंतन करीत असत. हा एक चांगला योगायोग आहे. लंडन मध्ये त्यांनी अध्ययन करीत असताना 'the problem of' rupee या विषयावर संशोधनात्मक प्रबंध लिहिला. त्यांच्या या कार्याचा त्यांचे मार्गदर्शक सर एडविन कॅनन यांनी गौरव केला आहे. काही काळ त्यांनी कायद्याचा अभ्यास करून बॅरिस्टर ही पदवी प्राप्त केली. मुंबईच्या शासकीय विधी महाविद्यालयात त्यांनी काही काळ अध्यापनाचे कार्य केले. त्या महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून देखील त्यांची नियुक्ती झाली होती. इसवी सन 1956 साली त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. सहा डिसेंबर 1956 रोजी ते बुद्ध वासी झाले.

आंबेडकर वाद, आंबेडकरांचे तत्वज्ञान हे शब्दप्रयोग आता परिचित झाले आहेत. त्यांच्या सामाजिक, राजकीय विचारांचा त्यांच्या आर्थिक विचारसरणीवर प्रभाव दिसतो. बाबा साहेबांनी गांधी वादाला, गांधीच्या अर्थशास्त्रीय विचारसरणीला विरोध दर्शवला. कारण महात्माजींचा औद्योगिकरणाला, यांत्रिकी करणाला जो विरोध होता तो बाबा साहेबांना मान्य नव्हता. तसेच ग्राम स्वराज्याची गांधीजींची कल्पना त्यांनी अमान्य केली तसेच त्यांचा मार्क्स वादालाही विरोध होता. एकंदरीतच बाबा साहेबांना लोकशाही समाज वाद अपेक्षित होता. बाबा साहेबांचे आर्थिक विचार त्यांच्या अर्थशास्त्रावरील पुस्तकांमधून, त्यांनी वेळोवेळी केलेल्या भाषणांमधून तसेच त्यांच्या इतर लेखनातून व्यक्त झालेले दिसतात. तसेच स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनामा त्यांनी आर्थिक बाबतीत ज्या घोषणा केल्या त्यावरूनही त्यांच्या आर्थिक विचारांचे दर्शन घडते.

त्यांनी भारतीय कृषी व्यवस्था, तिची समस्या, तिची अवस्था यासंबंधी मौलिक विचार मांडलेले आहेत. भारताच्या एकंदर अर्थव्यवस्थेमध्ये शेती विकास झाल्याशिवाय सुधारणा होणार नाही याची त्यांना जाणीव होती. यासंबंधी त्यांनी जमिनीचे राष्ट्रीयीकरण करून जाती व धर्म असा कोणताही भेद न करता भूमिहीनांना शेतमजुरांना जमीन करण्यासाठी द्यावी त्याबरोबर बी बियाणे अवजारे आणि भांडवल देखील पुरवले पाहिजे असे सांगीतले. (पटवर्धन, जून १९९२ )

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार –**

१) **- भारतीय रुपयाचा प्रश्न -** डॉक्टर आंबेडकर यांनी डॉक्टर ऑफ सायन्सच्या पदवीसाठी रुपयाचा प्रश्न हा प्रबंध लिहिला. भारताचा रुपया आणि इंग्लंडचा पौंड यांच्या संबंधांचा महत्त्वपूर्ण प्रश्न या अभ्यासात समाविष्ट होता. रुपयाचा प्रश्न या ग्रंथामध्ये आंबेडकरांनी भारताच्या रुपयाची उत्क्रांतिची ऐतिहासिक मीमांसा सादर केली आहे. त्या वेळी अर्थतज्ञांमध्ये भारतीय रुपयाची जडण घडण ही सुवर्ण परिमाणात (gold standard) असावी की सुवर्ण विनिमय परिमाणात (gold exchange standard) असावी याबाबत वाद निर्माण झाला होता. सामान्यपणे सुवर्ण परिमाणात सोन्याच्या नाण्यांचा देवाणघेवाणासाठी वापर करण्यात येतो. तर सुवर्ण विनिमय परिमाणात कागदी चलनाचा वापर होतो. एवढेच नव्हे तर कागदी चलन देऊन सरकारकडून सोने विकत घेता येऊ शकते.

या दोन परिमाणांपैकी कोणते परिमाण भारतासाठी योग्य आहे याबाबत अर्थ शास्त्रज्ञात वाद चालला होता. प्राध्यापक केन्स यांनी सुवर्ण विनिमय परिमाणाचा पुरस्कार केला. त्यांच्या मते सुवर्ण विनिमय परिमाण हे लवचिक असल्याने भविष्य कालीन अर्थव्यवस्थेसाठी उपयुक्त ठरेल. डॉ. आंबेडकरांनी केन्स च्या विचाराला विरोध केला. त्यांनी असा विचार मांडला की सुवर्ण विनिमय परिमाणात स्थैर्य राहू शकत नाही. या पद्धतीत लवचिकता हा गुण धर्म जरूर असेल परंतु यात चलन निर्मितीवर कोणत्याही मर्यादा राहणार नाहीत. चलनात वाजवीपेक्षा जास्त वाढ झाली तर त्यामुळे भाव वाढ होईल व परिणामी रुपयाची किंमत कमी होईल आणि त्यातून विनिमयाचे साधन म्हणून रुपयाची स्थान ही अस्थिर होऊ शकेल हे त्यांनी दाखवून दिले. आपले मत कसे योग्य आहे हे दाखवून देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी काही ऐतिहासिक पुरावे दिले आहेत. या पुराव्यां द्वारे त्यांनी असे स्पष्ट केले आहे की सुवर्ण परिमाणांमध्ये भारतातील वस्तूंच्या किमती कशा स्थिर होत्या याउलट सुवर्ण विनिमय परिमाण स्वीकारल्यानंतर किमती कशा वाढल्याचे साधा विवेचन त्यांनी केले.

२) **- भारतीय राजस्वा संबंधीचे विचार -** डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या पीएच डी साठी लिहिलेला प्रबंध त्यांच्या राजश्री विषयक अर्थशास्त्रीय कामगिरीचा उत्कृष्ट नमुना आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी 1833 ते 1921 या काळात ब्रिटिश सरकारने घटक राज्य यांच्यातील आर्थिक संबंध कसे विकसित झाले त्याचा उहापोह केला आहे. 833 ते 1921 या काळात राजस्वाचे संपूर्ण केंद्री करण झाले होते. कायद्याने राज्य केंद्र सरकारचे मात्र कार्यकारी शासन घटक राज्यांचे असे सर्वसाधारण स्वरूप होते. डॉ. आंबेडकरांनी या व्यवस्थेतील दोष दाखवून दिले आहेत. या व्यवस्थेत खर्चाचा अर्थसंकल्प करण्याचा अधिकार घटक राज्यांचा आणि त्यासाठी लागणारा पैसा उभारण्याची जबाबदारी मात्र केंद्र सरकारची त्यामुळे घटक राज्यांच्या मागण्या वाढतच गेल्या. त्यांच्या मागण्या योग्य आहेत किंवा नाहीत हे तपासणारी यंत्रणा नसल्याने केंद्र सरकारला राज्यांच्या गैरवाजवी मागण्या देखील मान्य कराव्या लागल्या. याचा परिणाम म्हणून केंद्र सरकारचे अर्थसंकल्पातील

तूट प्रचंड प्रमाणात वाढत गेली. म्हणूनच 1871 पासून केंद्र सरकार आणि घटक राज्य यांच्यासाठी वेगवेगळे अर्थसंकल्प करण्याची पद्धती प्रथमच अस्तित्वात आली. डॉ. आंबेडकरांचा " the evolution of provisional finance in British India" हा ग्रंथ ऐतिहासिक संदर्भ ग्रंथ म्हणून अतिशय मोलाचा आहे. प्रा. सेलिंगमन सर जे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मार्गदर्शक होते त्यांच्या मते भारतातील प्रादेशिक वित्ताबाबतच्या वस्तुस्थितीचे चित्र आणि त्यातील बदलाचे तटस्थ विश्लेषण हे आंबेडकरांचे विशेष योगदान आहे. यातील निष्कर्ष इतर देशांनाही लागू होऊ शकतात. पित्ताच्या प्रश्नाशी संबंधित तत्वाचे एवढे तपशीलवार अध्ययन माझ्या पाहण्यात नाही अशा शब्दात त्यांनी डॉ. आंबेडकरांचे कौतुक केले आहे.

३) **- भारतीय शेतीसंबंधीचे विचार -** डॉ. आंबेडकरांनी भारतीय शेती व्यवस्था, तिच्या समस्या तिची अवस्था यासंबंधीचे विचार मांडले आहेत. 1998 मध्ये the journal of Indian economic society च्या अंकात " mobile holding in India and their remedies" हा लेख प्रसिद्ध झाला. या लेखात डॉ. आंबेडकरांनी भारताच्या दृष्टीने शेती हा एक महान राष्ट्रीय उद्योग आहे, सर्व प्राथमिक व्यवसायांमध्ये शेतीचे महत्व सर्वाधिक आहे असे विशद केले आहे. डॉ. आंबेडकर यांच्या मते भारताचे एकंदर अर्थव्यवस्थेमध्ये शेती विकास झाल्याशिवाय सुधारणा होणार नाही याची त्यांना जाणीव होती. भारतीय शेतीचे अर्थव्यवस्थेत महत्त्व जरी असले तरी भारतीय उत्पादकता कमी आहे अशी त्यांचे मत होते. डॉ. आंबेडकर यांच्या मते शेतीच्या उत्पादक त्यावर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक म्हणजे शेतीच्या धारण क्षेत्राचा आकार होय. डॉ. आंबेडकर यांच्या मते शेत जमिनीचा आकार लहान असल्याने शेतीच्या उत्पादकतेत वाढ होत नाही. भारतात शेत जमिनीचा आकार लहान आहेस परंतु ती वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेली आहे याचाच अर्थ भारतात शेतजमिनीचे विभाजन व विखुरीकरण मोठ्या प्रमाणात झाले असून त्यामुळे शेतीचे उत्पादक किंवा त्याचा प्रतिकूल परिणाम झालेला आहे. या समस्येवर उपाय म्हणून काही तज्ञांनी असा विचार मांडला की लहान धारणा क्षेत्र असल्याचे जमिनीचे एकत्रीकरण करावे त्यामुळे शेत जमिनीचा आकार वाढेल व परिणामी उत्पादकतेत वाढ करता येऊ शकेल. परंतु सखोल विचार असणाऱ्या आंबेडकरांनी असे मत व्यक्त केले की जमिनीचे एकत्रीकरण करणे पुरेशे नाही तर त्यांचा आकार वाढवून त्यांना हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. जमिनीचे विखुरीकरणामुळे विखुरलेल्या धारण क्षेत्राचा प्रश्न सुटेल परंतु लहान धारण क्षेत्राचे समस्या मात्र सुटणार नाहीत. डॉ आंबेडकरांच्या मते आज एकत्रीकरण केलेल्या जमिनीचे भविष्यात विखुरीकरण किंवा विभाजन होऊ नये म्हणून कायद्यात सुधारणा करावी अशी त्यांनी सुचवले होते.

४) **- उद्योगासंबंधी विचार -** डॉ. आंबेडकरांनी औद्योगिक करणारा विरोध न करता आधुनिक औद्योगिकरणाचा पुरस्कार केला. परंतु अशा औद्योगिकरणातून विषमता, संपत्तीचे केंद्री करण, मक्तेदारी यांची वाढ होऊ नये असे त्यांना वाटत होते. त्यांचा सरकारच्या मालकीच्या उद्योगाला विरोध नव्हता. काही मूलभूत स्वरुपाचे उद्योग सरकार चालवेल, असे उद्योग सुरू करण्यात चालविण्यात सरकारने पुढाकार घ्यावा. सरकारने उद्योग सुरू करून चालवण्यासाठी महामंडळ निर्माण करावेत त्याचबरोबर विमा उद्योगाचे राष्ट्रीयीकरण व्हावे असे त्यांना वाटत होते. (ए.आर, जून १९९९ )

५) **- मालमत्तेची मालकी -** स्वत: च्या मालकीची मालमत्ता जवळ बाळगण्याच्या हक्काला डॉ. आंबेडकरांनी कधीच मूलभूत अधिकार मानले नाही. तर याला त्यांनी विरुद्ध दर्शविला आहे. त्यांच्या मते मालमत्तेच्या अधिकारामुळे व्यक्ती स्वतंत्र व नि: पक्षपाती विचार करू शकत नाही. तसेच स्वतंत्र विचार मांडू शकत नाही.

खाजगी मालमत्तेच्या अधिकारामुळे शोषण वाढते. म्हणून डॉ. आंबेडकर हे खाजगी मालमत्तेच्या उच्चाटनाशी सहमत होते.

६) **- कर -** 1936 मध्ये करविषयक विचार मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात डॉ. आंबेडकरांनी मांडले. त्यांच्या मते उत्पन्नापेक्षा कर पात्रतेवर कर आकारण्यात यावा तसेच उत्पन्नाच्या काही मर्यादेपर्यंत कर आकारण्यात येऊ नये. करामुळे रहाणीमानावर परिणाम होणार नाही याची काळजी कर आकारताना घेण्यात यावी. कर मालमत्तेवर बसवावा असे त्यांनी सुचविले. कर स्थूल उत्पन्नावर नसावेत. कर प्रगतीशील असावेत म्हणजेच श्रीमंतांनी अधिक कर द्यावा व गरीबांनी कमी कर द्यावा. शेतीवरील जमीन महसुलीचे दर दृढ नसावेत ते लवचिक व बदलणारे असावेत.

अ ) **- सीमा शुल्क -** ब्रिटिश काळात देशी उद्योग व व्यापारावर अंतर्गत आणि बहिर्गत करामुळे किंवा सीमा शुल्कामुळे कसा विपरीत परिणाम व्यापार व उद्योग धंद्यावर झाला याचे विश्लेषण करणारे डॉ. आंबेडकर हे पहिले अर्थ तज्ञ होते. अंतर्गत व बहिर्गत सीमा शुल्कामुळे केवळ उद्योग धंदे व व्यापाराचेच नुकसान झाले नाही तर शेती करामुळे शेतीचेही नुकसान झाले. अनेक प्रकारच्या जकातीच्या स्वरुपात अंतर्गत शुल्क वसूल केले जात होते याला डॉ. आंबेडकरांनी विरोध केला होता.

ब)- **शेतीवरील कर -** ब्रिटिश काळात जमिनीवर जबरदस्त कर लादण्यात आले होते. भारतात शेतकऱ्यांना राज्याला खंड स्वरुपात कर द्यावा लागत असे. परंपरागत पद्धतीने शेती राज्याची मालकी मानली गेली. शेतकरी शेत जमिनीचा मालक नव्हता तर शेतीवर जमीनदारांचे मालकी होती. त्यामुळे या जमिनीतून मिळणाऱ्या खंडावर राज्याचा अधिकार होता. डॉ. आंबेडकरांनी असे दाखवून दिले की ब्रिटिश काळात जमिनीवर आकारलेल्या करामुळे शेती उत्पादनावर विपरीत परिणाम झाला म्हणून शेतीवरील कर अन्याय कारक आहेत. त्यांचा परिणाम शेतीवर प्रतीक आम्ही स्वरुपाचा झाला म्हणून ही पद्धत शेतीला उत्साहवर्धक नाही यामुळे शेतीचा विकास घडून येऊ शकत नाही असा विचार त्यांनी मांडला. (कुमानाचे, जून १९९९ )

७)- **महार वतन –**

ब्रिटिश राजवटीत वतन कायद्यानुसार पाटील, कुळकर्णी यांच्याबरोबर महारांना देखील व तन मिळत असे; मात्र महार वतनात अनेक दोष होते. महारांचे कामाचे तास आणि त्यांना देण्यात येणारी कामे अनिश्चित होती. त्यांनी 24 तास कामावर हजर राहिले पाहिजे अशी त्यांच्यावर सक्ती होती. कामाबद्दल महारांना जमिनीचा एखादा तुकडा किंवा थोडेसे धान्य व दर महिन्याला दोन आणि ते रुपया व दीड रुपया असा मुशाहिरा दिला जात असे. त्यामुळे महार वतन खालसा करावे असे बाबा साहेबांचे मत होते. कारण वतनामुळे महार स्वाभिमान शून्य झाले आहेत आणि महारांचे महत्त्व कांक्षा मारली गेली आहे; म्हणून आंबेडकरांनी सन 1939 मध्ये महारांच्या व तानी जमिनी रयत वारी जमिनी कराव्यात तसेच महारांना सरकारचे कनिष्ठ नोकर समजून मासिक वेतन द्यावे अशा मागण्या केल्या.

८) - **खोती पद्धती -**

ब्रिटिश राजवटीमध्ये रत्नागिरी, कुलाबा इत्यादी ठिकाणी जमीन करण्यासाठी ची खोती पद्धती अस्तित्वात होती. या खोती पद्धतीत खोत म्हणून गावातील सुलतान असे. या कृती पद्धतीत सरकार व जमीन कसणाऱ्यांचा प्रत्यक्ष संबंध येत नसे. त्यामुळे खोती पद्धतीत जमीन महसूल गोळा करण्याचे काम होत करत व त्यातून सरकारकडे शेतसारा भरत. हा खोत विविध प्रकारे शेतकऱ्यांची पिळवणूक करत असे.

तसेच खोताची अनेक कामे शेतकऱ्यांना करण्यास भाग पाडले जात असे. बाबा साहेबांनी या कृती पद्धती विरुद्ध आवाज उठविला. जमीन कसणाऱ्यांना कूळ वहिवाटीचे हक्क मिळावेत व त्या जागी रयत वारी पद्धती आणावी यासाठी त्यांनी मुंबई विधिमंडळात 1937 मध्ये कृती पद्धती रद्द करण्यासंबंधी विधेयक मांडले. (प्रा.डॉ.अनिलकुमार वावरे, ऑगष्ट २०२२)

९) **- आंतरराष्ट्रीय व्यापार -** हिंदुस्तानच्या दारिद्र्याच्या मुळाशी अनियंत्रित व्यापार आहे या व्यापाराचे नियंत्रण ब्रिटिशांच्या हाती आहे. तेव्हा ही व्यापार पद्धत नियंत्रित झाली तर हिंदुस्थानातील दारिद्र्य नष्ट होईल असा स्वातंत्र्य वाद्यांचा कयास होता. डॉ आंबेडकरांनी याचे विश्लेषण करताना असे सांगितले की जे लोक अनियंत्रित व्यापार पद्धती म्हणतात त्यांना नियंत्रित व्यापार पद्धतीची जाण नाही. परदेशी वस्तूंची आयात केला जातो तेव्हा त्याची किंमत कमी असते. तशाच प्रकारचा माल देशात उत्पादन होत नाही कारण त्याला अधिक भाव पडत असतो त्याचे कारण म्हणजे हिंदुस्थानातील उत्पादन व खर्च अधिक असतो. दुसरे म्हणजे व्यापाराच्या दृष्टीने देशी माल परदेशी माला पुढे टिकत नाही. म्हणजेच बाबा साहेबांनी मुक्त व्यापाराला प्रोत्साहन दिल्याचे दिसून येते. (कुमानाचे, जून १९९९ ) सध्या स्वदेशीची लाट पुन्हा तेजीत असताना त्यावर बाबा साहेबांचे मत काय होते, ते समजून घेणे सूचक ठरेल. आपल्या 'मूक नायक' या नियतकालिकात २८ फेब्रुवारी १९२० या दिवशी- म्हणजे वयाची तिशीही गाठायच्या आधी बाबासाहेब लिहितात- 'स्वदेशी माल उत्पन्न करून हा दरिद्री देश सधन होईल अशी प्रवचने सांगणाऱ्या तारवटलेल्या स्वदेशी अर्थ शास्त्रज्ञांनी लक्षात घ्यायला हवे की, परदेशी माल आयात होतो याचे कारण तो कमी किमतीत मिळतो. तसाच माल स्वदेशात उत्पन्न होत नाही. याचे कारण तो अधिक भावाचा पडल्यामुळे व्यापारात परदेशी मालापुढे त्याचा टिकाव लागत नाही. त्याचा टिकाव लागावा म्हणून परदेशी मालास अटकाव करा, या महा मंत्राचा जप चालला आहे. पण परदेशी मालास अटकाव झाल्यास लोकांस अधिक भावाचा स्वदेशी माल विकत घेणे भाग पडेल याचा विचार करावा कोणी? असे केल्याने देशाचे कल्याण होईल, असे म्हणण्याऐवजी देशातील भांडवलवाल्यांचे कल्याण होईल. कारण अनियंत्रित व्यापार पद्धतीत मिळत असलेला स्वल्प भावाचा माल नियंत्रित व्यापार पद्धतीत गोरगरीबांना अधिक दाम देऊन विकत घ्यावा लागणार आहे. यात त्यांची होणारी नागवण 'स्वदेशी' या लाडक्या शब्दाने भरून निघेल असे मानून ते समाधान पावतील असे संभवत नाही. सुसंपन्नतेचा हा स्वदेशी मार्ग त्यांना भोवेल.' (कुबेर, २०१६ )

**मूल्यमापन –**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला लक्षात येईल की डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे एक महान चतुरस्र अर्थतज्ञ होते. बाबा साहेबांच्या आर्थिक विचार शेती उद्योग व्यापार या सर्व क्षेत्रांशी निगडित होते. बाबा साहेबांच्या 'the problem of the Indian rupee' या ग्रंथाच्या आधारावर भारतामध्ये रिझर्व बँक ऑफ इंडिया या मध्यवर्ती बँकेची स्थापना झाल्याचे आपल्याला दिसून येते. त्या वेळी भारताने सुवर्ण विनिमय प्रमाण पद्धती स्वीकारू नये कारण त्यामुळे भारतामध्ये अतिरिक्त चलन निर्मिती होऊन महागाई वाढेल अशी भीती बाबा साहेबांना होती. आज स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतर देखील भारतीय रिझर्व बँकेने आपले प्रमुख उद्दिष्ट महागाई नियंत्रण ठेवलेले आहे यावरून आपल्याला बाबा साहेबांच्या आर्थिक विचारांची प्रगल्भता दिसून येईल. बाबा साहेबांनी शेतीच्या बाबतीत देखील अनेक आर्थिक विचार मांडले आहेत. भारतातील शेतीची कमी उत्पादकता शेतीचे विभाजन व विखुरिकरण या समस्या व त्यावरील उपाय बाबा साहेबांनी सुचवले आहेत. आज देखील बाबा साहेबांच्या विचारांना अनुसरूनच शेतीमध्ये सामूहिक शेती योजना हा कार्यक्रम सरकारने राबवल्याचे दिसून येते त्याचबरोबर शेती किफायतशीर होण्यासाठी आधुनिक तसेच नव तंत्रज्ञानाचा अवलंब शेतीमध्ये करण्याला शासनाने प्रोत्साहन दिले व जमिनीचे तुकडी करण थांबवण्यासाठी सरकारने कूळ कायद्यांमध्ये सुधारणा व

कसेल त्याला शेत जमीन यांसारख्या सुधारणा राबवल्याचे दिसून येते. बाबा साहेबांनी जसे स्थानिक व राष्ट्रीय पातळीवर विचार मांडले तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील आपल्या आर्थिक विचार मांडले होते. बाबा साहेबांनी व्यापार हा खुला असावा असे मत मांडले. त्याचबरोबर स्वदेशी विषयी विचार मांडताना त्यांचे विचार आपल्याला अगदी महात्मा गांधी यांच्या आर्थिक विचारांच्या पूर्णपणे विरुद्ध बाजूला असलेले दिसून येतात.


1. ए.आर, प. र. (जून १९९९ ). आर्थिक विचारांचा इतिहास . In प. र. ए.आर, *आर्थिक विचारांचा इतिहास* (pp. २११-२१६). औरंगाबाद : विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा औरंगाबाद .
2. कुबेर, ग. (२०१६, एप्रिल १०). *www.loksatta.com*. Retrieved from www.loksatta.com: https://www.loksatta.com/lokrang/lekha/dr-dr-babasaheb-ambedkar-as-an-economist-1225190/lite/?ieAmpSSOAccessTkn=eyJ0eXAiOiJKV1QiLCJhbGciOiJIUzI1NiJ9.eyJpYXQiOjE3MzAyNzgxMTEsImp0aSI6IkRrOG1OQnc0Sk1cLzR2ZlpvSmlEZmJnNE1wRlJzUDdObkZvNld2bG0wZWMwPSIsImlzcyI6Im
3. कुमानाचे, प. प. (जून १९९९). आर्थिक विचारांचा इतिहास. In प. प. कुमानाचे, *आर्थिक विचारांचा इतिहास* (pp. १५०-१५९). औरंगाबाद : कैलाश पब्लिकेशन औरंगपुरा औरंगाबाद.
4. पटवर्धन, प. म. ( जून १९९२). आर्थिक विचारांचा इतिहास. In प. म. पटवर्धन, *आर्थिक विचारांचा इतिहास* (pp. १४५-१४८). नागपूर : पिंपळापुरे एंड कं. पब्लिशर्स नागपूर.
5. प्रा. डॉ. अनिलकुमार वावरे, श. स. (ऑगष्ट २०२२). *आर्थिक विचारांचा इतिहास.* औरंगाबाद: एज्यूकेशनल पब्लिशर्स औरंगाबाद

# "डॉ. बाबासाहेबआंबेडकर यांच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता"

**डॉ. संते लालचंद्र रामचंद्र**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
शांतारामभाऊ घोलप कला,विज्ञान आणि गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय शिवळे तालुका मुरबाड,जिल्हा ठाणे. महा. ४२१४०१

**गोषवारा:**

भारतात अनेक लोकांनी आपले आर्थिक व सामाजिक विचार मांडलेले आहेत. या विचारांपैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे बऱ्याच प्रमाणात वेगळे स्वरूपाचे आणि सर्व समावेशक असल्याचे आपल्याला दिसून येतात. आंबेडकर हे स्वतः एका दलित, वंचित समाजातून येत असल्याने व त्यांचा अर्थशास्त्राचा गाढा अभ्यास गाळा असल्यामुळे त्यांच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता आपल्याला भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात दिसते. त्यांनी मांडलेला रुपयाची समस्या हा आर्थिक विचार आजही सरकारला चलन निर्मितीची संख्या निश्चित करताना मार्गदर्शन करतो. त्यांच्या भारतीय शेतीविषयक विचार आजही कृषी धोरण ठरवताना उपयुक्त दिसून येतो. भारतातील शेती क्षेत्रातील छुप्या बेकारी विषयी त्यांचे आर्थिक विचार आजही भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीमध्ये जशास तसे लागू होते. त्यांनी मांडलेल्या आर्थिक विषमता याविषयी त्यांचे मत आजही जशास तसे लागू होते. किंबहुना आज आर्थिक विषमता बऱ्याच प्रमाणात वाढलेली दिसून येते. एकंदरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आर्थिक विचारांची प्रसंगिकता खूप मोठी असून भारतीय अर्थव्यवस्थेत आजही धोरण व योजना आखताना हे विचार मार्गदर्शकाची भूमिका बजावतात.

**महत्वाचे शब्द : प्रासंगिकता, आर्थिक विषमता, छुपी बेकारी, धोरण, योजना.**

**प्रस्तावना :**

भारताला आर्थिक विचारांचा वारसा फार पूर्वीपासून आहे. कौटिल्यापासून दादाभाई नौरोजी ते अमर्तसेन आणि अभिजीत बॅनर्जी इथपर्यंत भारतीय विचारवंतांनी त्यांचे आर्थिक विचार हे जगभर प्रसिद्ध झालेत. त्या विचारवंतांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार हे सुद्धा महत्त्वपूर्ण ठरतात. खऱ्या अर्थाने १९ व्या शतकापासून भारतातील आर्थिक विचार पद्धतशीर मांडले गेले. या विचारांचा सखोल अभ्यास करताना आपल्याला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार दिशा दाखवतात. आंबेडकर हे स्वतः एका गरीब दलित कुटुंबातून येत असल्याने त्यांनी आपले आर्थिक विचार मांडताना सामान्य माणूस डोळ्यासमोर धरून मांडलेले आहेत. आंबेडकरांच्या विचारांना बराच काळ लोटला असला तरी भारतीय अर्थव्यवस्थेत त्यांचे विचार प्रसंगीक दिसतात. त्याचबरोबर पाश्चिमात्य अर्थतज्ञ पेक्षा कमी तांत्रिक स्वरूपात सर्व साध्या भाषेत त्यांनी विचार मांडल्याने सामान्य जनतेपर्यंत ते पोहोचण्यात सहज शक्य झाले. आंबेडकरांचे आर्थिक विचार हे फक्त तत्कालीन प्रश्नांची सोडवणूक करण्यापर्यंत मर्यादित नव्हते तर भविष्याची दिशा दाखवणारे होते. त्यांचे आर्थिक विचार हे प्रगल्भ आणि सर्व समाजाला सामावून घेणारे होते. योजना काळापासून आजही कोणतेही धोरण ठरवताना आंबेडकरांच्या विचारांचा विचार करावा लागतो. प्रस्तुत

शोधनिबंधात डॉ. आंबेडकरांच्या काही प्रमुख आर्थिक विचार व या विचारांची प्रासंगिकता यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये:**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता समजावून घेणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता" या शोधनबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अभ्यास पद्धती वापरण्यात आली आहे. संशोधन तथ्य संकलन करण्यासाठी प्रामुख्याने दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये विविध प्रकारचे संदर्भ ग्रंथ,क्रमिक पुस्तके, नियतकालिके,मासिके व इंटरनेट यांचा वापर करण्यात आला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार :**

तत्कालीन परिस्थिती ,समाजजीवन व आर्थिक परिस्थिती याला अनुसरून डॉ. आंबेडकर यांनी आपले आर्थिक विचार मांडलेले आहेत. त्यांचे प्रमुख आर्थिक विचार आपल्याला खालील प्रमाणे सांगता येतात.

**रुपयाची समस्या :**

स्वतः अर्थशास्त्राचे अभ्यासक असल्याने डॉ. आंबेडकर यांनी रुपयाची समस्या याविषयी मांडलेले मत हे आपल्याला मार्गदर्शक ठरते. डॉ. आंबेडकर यांच्या काळात चलनाचे मूल्य ठरवितांना दोन पद्धती होत्या सुवर्ण परिणाम पद्धत आणि सुवर्ण विनिमय पद्धत. चलनाचे मूल्य ठरविण्यामध्ये लॉर्ड केन्स व डॉ. आंबेडकर यांच्या मध्ये मतभेद होते. लॉर्ड केन्स यांनी सुवर्ण परिणाम पद्धतीचा पुरस्कार केला तर आंबेडकर यांच्या मते जर ही पद्धत आपण स्वीकारली तर अर्थव्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात भाववाढ होईल. त्यातून अर्थव्यवस्थेत समस्या निर्माण होते. त्यामुळे आपण सुवर्ण विनिमय पद्धत स्वीकारावी असे मत नोंदवले. "जॉन केन्स यांच्या मते, भारताला ही सुवर्ण प्रमाण पद्धती उपयुक्त आहे तर बाबासाहेबांच्या मते भारतासाठी सुवर्णप्रमाण ऐवजी सुवर्ण मानक पद्धती आवश्यक आहे."१ म्हणजेच आंबेडकर आणि केन्स यांच्यामध्ये चलनाचे मूल्य ठरविण्यामध्ये मतभेद होते. केन्स यांनी पुरस्कृत केलेली पद्धत जर आपण स्वीकारली तर आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात भाववाढ होईल असे मत आंबेडकर यांनी नमूद केले. रुपयाच्या समस्येविषयी आंबेडकरांच्या मताविषयी प्राचार्य इंद्रजीत आल्टे म्हणतात की "रुपयाचा प्रश्न या प्रबंधाचे काळजीपूर्वक चिंतन केल्यास असे दिसून येते की, या प्रबंधात रुपयाची मूल्य विषयक स्थिरता किंवा रुपयाच्या मूल्यात होणारे चढ-उतार, जे सर्व साधारणपणे विविध वस्तूंच्या किमतीशी व्यस्त प्रमाणात जोडलेले असतात."२ म्हणजेच आंबेडकरांच्या मते आपण बेहिशोबी चलन निर्मिती केली तर अर्थव्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात भाववाढ होईल त्यामुळे चांगल्या परिणाम ऐवजी वाईट परिणाम वाढतील असे मत आंबेडकरांनी नोंदवले. "१९२६ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थे संबंधी रॉयल कमिशन पुढे डॉ. आंबेडकरांची साक्ष झाली त्यावेळी रुपयाचा प्रश्न म्हणजे रुपयाची किंमत स्थिर राहिली तर वस्तूच्या किमती स्थिर राहतील व महागाई वाढणार नाही असे मत नोंदवले."३ म्हणजेच

महागाई वाढू नये म्हणून आपण सुवर्ण विनिमय पद्धती स्वीकारणे स्वीकारावी असे मत आंबेडकरांनी मांडले.

**भारतीय शेती विषयक मत :**

भारतीय शेती विषयक विचार स्पष्ट करताना आंबेडकरांनी शेतीत काय पिकवावे, शेतीसाठी लागणारे साधनांचे उत्पादन कसे करावे, शेतीच्या गटाचे क्षेत्र कसे असावे व शेतजमीन धारणेचे प्रमाण कोणते असावे या चार गोष्टींचा विचार केला आहे. "शेतीचा आर्थिक उपक्रम म्हणून वापर केल्यास ती मोठी धारणक्षेत्रे आहेत की, लहान धारण क्षेत्राची आहे हा विचार महत्त्वाचा ठरत नाही. मोठी धारण क्षेत्र किफायतशीर व लहान धारण क्षेत्र अकिफायतशीर हा युक्तिवादही चुकीचा ठरू शकतो असे त्यांनी स्पष्ट केले."४ त्यांच्या मते धारण क्षेत्र हा प्रश्न महत्त्वाचा नसून आपल्याकडे उपलब्ध असलेल्या धारण क्षेत्राला अनुसरून तंत्रज्ञान विकसित करावे हा विषय महत्त्वाचा आहे. "विखुरलेली जमीन ही शेतीसाठी मोठी अडचण आहेच व म्हणून जमीन एकत्रिकरण व्हावयास हवे, हे जरी खरे असले, तरी त्यामुळे जर मोठा समाज घटक भूमी विरहित होत असेल, तर हा मार्ग धोक्याचा ठरतो. त्यामुळे विखुरलेल्या शेतीच्या समस्येवर योग्य तोडगा म्हणून एकत्रित करण्यापेक्षा सहकार शेतीचा प्रयोग अधिक उपयुक्त ठरेल."५ थोडक्यात भारतीय शेतीचा लहान आकार विचारात घेऊन आपण सामुदायिक व सहकारी शेतीकडे वळायला हवे असे मत आंबेडकरांनी व्यक्त केले.

**शेतीमधील छुपी बेकारी :**

आपल्या आर्थिक विचारांमध्ये डॉ. आंबेडकरांनी मांडलेली छुपी बेकारी ही समस्या फार गंभीर स्वरूपाची आहे. प्रा. लेविस यांनी ज्याप्रमाणे छुप्या बेकारीच बेकारीच्या समस्या कडे जगाचे लक्ष वेधले त्याचप्रमाणे आंबेडकरांनी भारतातील शेतीमधील छुपी बेकारी याविषयी भाष्य केले. शेतीच्या छुप्या बेकारी विषयी त्यांनी निरर्थक रोजगार व आवश्यक रोजगार या दोन संकल्पना मांडल्या. त्यांच्या मते शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची शेतजमीच्या तुलनेत संख्या जास्त असल्याने त्याचा शेती उत्पादनावर वाईट परिणाम होतो. "डॉ. आंबेडकर यांनी निष्क्रिय भांडवल आणि निष्क्रिय श्रम यातील फरक सांगितला. ज्या भांडवलामुळे उत्पन्न मिळत नाही किंवा भांडवलाचा उपयोग खर्च शून्य असतो त्याला निष्क्रिय भांडवल म्हणतात. पण निष्क्रिय क्षेत्रात उत्पादनासाठी खर्च नसला तरी श्रमिक जिवंत राहण्यासाठी उपयोग खर्च करावा लागतो. असे निष्क्रिय श्रम राष्ट्रीय उत्पन्नात भर घालत नाहीत."६ याचाच अर्थ आंबेडकर यांच्या मते श्रमाला जिवंत राहण्यासाठी खर्च करावा लागतो. त्यामुळे छुपी बेकारी आपल्याला परवडण्यासारखी नाही. त्याचे अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होतात. ही छुपी बेरोजगारी कमी करण्यासाठी त्यांनी उद्योगधंदे म्हणजेच भांडवली क्षेत्राचा विकास करून हे अतिरिक्त श्रमिक या भांडवली क्षेत्राकडे स्थलांतरित करावे असे मत मांडले. त्यासाठी त्यांनी औद्योगीकरणाचा पुरस्कार केला.

**आर्थिक विषमता:**

स्वतः एक अत्यंत गरीब कुटुंबातून येत असल्याने आंबेडकरांना भारतातील आर्थिक विषमतेची समज मोठी होती. भारतात पूर्वीपासून आर्थिक विषमता दिसून येते. भारतात थोड्या लोकसंख्येकडे मोठ्या प्रमाणात आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण झाले आहे. तर फार मोठ्या लोकसंख्येकडे तुटपुंजी संपत्ती

दिसून येते. या आर्थिक विषमतेमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक समस्या निर्माण होतात असे मत डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केले. ही आर्थिक विषमता सोडवण्यासाठी आंबेडकरांनी सार्वजनिक क्षेत्र विकसित करावे आणि भूमीहीन लोकांना शेतजमिनी द्याव्या तसेच जमिनीचे राष्ट्रीयकरण करावे असे मत मांडले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता :**

डॉ. आंबेडकरांच्या विचारांना आज बराच काळ गेला असला तरी त्याची प्रासंगिकता आणि उपयुक्तता आजही दिसते. आजही कोणतेही धोरण आणि योजना ठरविताना ते विचार मार्गदर्शक ठरतात. त्यांच्या रुपयाच्या समस्या हा विचार विचारात घेतला असता, त्याची उपयोगिता आजही अर्थव्यवस्थेस मार्गदर्शक ठरतात. “आज डॉ. आंबेडकर आणि प्रा. केन्स यांचा वाद इतिहासजमा झाला आहे. कारण विनिमय परिमाण वाद ज्या स्थितीत निर्माण झाला होता ती परिस्थीती बदललेली आहे. मात्र चलंनिर्मितीमुळे भाववाढ होते हे आंबेडकरांचे मात आजही नाकारता येत नाही.”७ आजही देशातील मध्यवर्ती बँकेला चलन निर्मिती करताना देशाचा भाववाढीचा विचार करावा लागतो. जर प्रमाणापेक्षा जास्त चलनवाढ केली तर भाववाढ होते हे आंबेडकरांचे मत आजही आपल्या अर्थव्यवस्थेला लागू होते. आजवर ज्या दिशेने चलन निर्मिती करून म्हणजेच नवीन चलन छापून विकास करण्याचा प्रयत्न केला त्या देशात भयंकर भावना निर्माण झाली आहे.

भारतीय शेती विषयक आंबेडकरांनी जे मत मांडले ते सुद्धा बऱ्याच अंशी आपल्याला अर्थव्यवस्थेला लागू करता येते. आजही पूर्वीपेक्षा भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचा आकार दिवसेंदिवस कमी होत चांगला आहे. त्यामुळे विकसित देशाचे तंत्रज्ञान या ठिकाणी जसेच्या तसे वापरता येत नाही. त्याचप्रमाणे आपल्या शेतीचा विचार करून आपण योग्य ते तंत्रज्ञान विकसित करायला हवे तसेच सर्वांनी सामूहिक व सहकार शेतीकडे जायला हवी हा विचार सुद्धा आजही संयुक्त ठरतो.

भारतातील शेतीमधील छुप्या बेकारीचा विचार करता आंबेडकरांचे हे मत आज पूर्णपणे लागू होताना दिसते. आज सुद्धा भारतात शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात छुपे बेकार दिसून येतात. कोरोना नंतर शेती क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्यांची संख्या वाढत असल्याने छुप्या बेकारीत वाढ झाली आहे का? हा संशोधनाचा विषय ठरतो. डॉ. आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे या छुपे बेकार आहे या शेतीमधून काढून भांडवली क्षेत्राकडे स्थलांतरित करण्याचे आवश्यकता आहे. त्यासाठी औद्योगिक व भांडवली क्षेत्र यामध्ये वाढ करायला हवी हे मत सुद्धा प्रासंगिक आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेमधील आर्थिक विषमता या विचाराचा विचार करता आजही आपल्या अर्थव्यवस्थेत आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात दिसून येते. दिवसेंदिवस ही आर्थिक विषमता वाढत असलेली दिसते. या आर्थिक विषमतेत गरीब वंचित समाजाचा हिस्सा फार कमी असल्याचे दिसते. त्यामुळे आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे या मागासलेला समाजाला आरक्षण व जमिनी द्यावे हा विचार हा सुद्धा संयुक्तिक ठरतो. आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे आज सुद्धा यावर विचार करून सरकारने योग्य ते पाऊले उचलावीत.

**समारोप:**

वरील सर्व गोष्टींचा उलगडा केल्यानंतर आपल्या असे लक्षात येते की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचारांची प्रासंगिकता किती जास्त आहे. आजही कोणत्याही सरकारला कोणतेही धोरण ठरवताना हे आर्थिक विचार मार्गदर्शक म्हणून भूमिका बजावतात. त्याचप्रमाणे सामान्य भाषेत आपले विचार त्यांनी मांडले असल्याने सामान्य जनतेलाही त्यांचे आकलन होऊन ते प्रत्यक्ष जीवनात डॉ. आंबेडकर यांचे विचार अमलात आणू शकतात. रुपयाची समस्या, शेती विषयक विचार, शेतीतील छुपी बेकारी आणि आर्थिक विषमता इत्यादी विषयी त्यांचे विचार आजच्या अर्थव्यवस्थेत बऱ्याच अंशी दिसतात. भविष्यातही डॉ. आंबेडकर यांच्या आर्थिक विचार हे समाजाला आणि देशाला मार्गदर्शक ठरतील यामध्ये तीळ मात्र शंका नाही.

**संदर्भग्रंथ सूची :**

1. डॉ. भगवान लोखंडे, 'संशोधक डॉ. बाबासाहेब आंबेडकर'दूर्वा एजन्सीस, पुणे, पृ.क्र. ३२९.
2. डॉ. भगवान लोखंडे, 'संशोधक डॉ. बाबासाहेब आंबेडकर'दूर्वा एजन्सीस, पुणे, पृ.क्र. ३३१.
3. कुलकर्णी आणि ढमढेरे, 'आर्थिक विचार आणि विचारवंत'डायमंड पब्लिकेशन, पुणे पृ.क्र. २५०.
4. कुलकर्णी आणि ढमढेरे, 'आर्थिक विचार आणि विचारवंत'डायमंड पब्लिकेशन, पुणे पृ.क्र. २५०.
5. डॉ. भगवान लोखंडे, 'संशोधक डॉ. बाबासाहेब आंबेडकर'दूर्वा एजन्सीस, पुणे, पृ.क्र. ३४३.
6. कुलकर्णी आणि ढमढेरे, 'आर्थिक विचार आणि विचारवंत'डायमंड पब्लिकेशन, पुणे पृ.क्र. २५१-२५२
7. कुलकर्णी आणि ढमढेरे, 'आर्थिक विचार आणि विचारवंत'डायमंड पब्लिकेशन, पुणे पृ.क्र. २४९-२५०
8. आल्टे इंद्रजीत, 'अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर', डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॉलेज मिशन, औरंगाबाद २०१६
9. कसबे रावसाहेब, 'आंबेडकरवाद तत्व आणि व्यवहार', सुगाव प्रकाशन, पुणे. दुसरी आवृत्ती २००४
10. खरे विजय, 'आर्थिक सामाजिक न्याय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर' सुगवा प्रकाशन, पुणे. २०१६
11. आगलावे प्रदीप, 'समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर', सुगाव प्रकाशन, पुणे. २००१
12. कुबेर वा. ना., ' डॉ. आंबेडकर विचार मंथन' सुगावा प्रकाशन ,पुणे. २००७
13. नरवडे एस. एस. ' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाजचिंतन', मॅजेस्टिक प्रकाशन, १९८९.
14. फडके भालचंद्र, डॉ, बाबासाहेब आंबेडकर', श्री विद्या प्रकाशन, १९८५.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विकासातील योगदान

**प्रा. मनिषा भिमराव शेळके**

अर्थशास्त्र विभाग कॉमर्स विभाग यशवंतराव चव्हाण महाविद्यालय इस्लामपूर पिन- ४१५४०९

**प्रा. उल्का मानसिंग घार्गे**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, इस्लामपूर पिन- ४१५४०९ ता. वाळवा जि. सांगली ता. वाळवा जि. सांगली

**प्रस्तावना:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील श्रेष्ठ अर्थतज्ञ म्हणून मोठे व व्यापक योगदान दिलेले आहे. उच्च विद्याविभूषित असलेले थोर राजकीय विचारवंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्थशास्त्राचे गाढे अभ्यासक होते. उच्च पदव्या संपादित करताना त्यांचा प्रमुख विषय अर्थशास्त्र हा होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक यासारख्या सर्व क्षेत्रांमध्ये अमुलाग्र बदल घडवून आणण्याचे ना केवळ प्रयत्नच केले तर प्रत्यक्षात ते बदल घडवून आणले. आज भारतीय अर्थव्यवस्थेत जे अमुलाग्र बदल दिसत आहेत. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या यांचे खूप मोठे श्रेय होते. त्यांच्या मते, भारतीय शेती हे केवळ पोट भरण्याचे साधन नाही तर, ते राष्ट्रीय उत्पन्न प्राप्तीचे एक मोठे साधन आहे. त्यांनी भारतीय शेतीच्या समस्या सोडवण्यासाठी सामूहिक व सहकारी शेती पद्धती हा मार्ग सुचवला होता. औद्योगीकरण शिवाय भारताचा विकास अशक्य आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भारतातील आर्थिक विचारांचे योगदान याविषयी मागवा या लेखात घेतला आहे.

**संशोधनाचे उद्दिष्टे:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या आर्थिक विचारांचे अध्ययन करणे.

**संशोधनाची गृहीतके:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील आर्थिक समस्या सोडवण्यासाठीचे जे विचार मांडलेले आहेत. ते देशासाठी अत्यंत उपयुक्त आहेत.

**संशोधनाची अभ्यास पद्धती:**

सदर शोध निबंधासाठी माहितीच्या दुय्यम स्त्रोताचा आधार घेतला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, लेख, इंटरनेट या साधनांचा समावेश केला आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थविषयक विचार:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले आर्थिक विचार पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेले आहेत.

**चलनविषयक विचार:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी **1925** मध्ये "द प्रॉब्लेम ऑफ द रुपी" आणि **1947** मध्ये "हिस्ट्री ऑफ इंडियन करन्सी अँड बँकिंग "या ग्रंथांमधून भारतासाठी आदर्श चलन पद्धती कोणती यावर विचार मांडले आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते चलन निर्मिती करणाऱ्या (रिझव्ह बँक सारख्या) संस्थेच्या चलन निर्मितीच्या क्षमतेवर परिणामकारक अंकुश असण्याची गरज आहे.हा अंकुश नसेल तर अनिर्बंध चलन पुरवठा आणि त्यातून भरमसाठ भाव वाढ होऊन आर्थिक स्थैर्य धोक्यात येऊ शकते. देशांतर्गत किमती स्थिर ठेवण्यासाठी सुवर्ण परिमाणच योग्य आहे. सुवर्णविनिमय परिमाणाने सर्व प्रश्न सुटत नाहीत. या पद्धतीत

चलन हवे तेवढे वाढू शकते, कमी होऊ शकत नाही. रुपयाची किंमत स्थिर तर बाजारभावाच्या किंमती स्थिर, रुपयाची किंमत स्थिर नसेल तर महागाई वाढणार. रुपयाचा प्रश्न हा या विषयातून ब्रिटिशांच्या चलन विषय धोरणामुळे सर्व भारताची कशी पळवणूक होत गेली हे दाखवले आहे.भारताचा रुपया स्थिर झाल्याशिवाय महागाई रोखली जाणार नाही. शिवाय महागाई व गरिबांची पिळवणूक ही थांबणार नाही असे त्यांचे मत होते. दुर्दैवाने आज स्वातंत्र्य मिळून बरीच वर्षे लोटली तरी रुपयाच्या स्थैर्यावर प्रश्न अजूनही तसाच लोंबकळत पडलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी सुवर्ण परिमाण पद्धती भारतासाठी योग्य असल्याचे ऐतिहासिक पुरावे देऊन पटवून दिले.

**भारतातील लहान धारण क्षेत्रे आणि त्यावरील उपाय:**

भारतीय शेती ही देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मात्र देशात शेतीचे लहान धारण क्षेत्रे ही समस्या नसून भांडवल व इतर साधन सामग्रीचा तुटवडा ही खरी समस्या आहे. शेतीमधून अतिरिक्त उत्पादन न झाल्यामुळे भांडवलाचा तुटवडा निर्माण होणे ही शेतीची खरी समस्या आहे. त्यांच्या मते पारंपारिक शेती करण्याच्या पद्धतीपेक्षा भांडवली शेती पद्धतीत कमी श्रमाची गरज असते. औद्योगिकीकरणाचा मार्ग अवलंबून यावर मात करता येते.शेती क्षेत्रातील अतिरिक्त मनुष्यबळ औद्योगिक क्षेत्रात सामावून घेता येईल. जमीन महसूल काही विशिष्ट रकमेपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांना कोणताही कर आकारला जाऊ नये. त्यांना जमीन महसुलात माफी मिळाली पाहिजे. तसेच जमीन महसूल प्राप्ती कराच्या कक्षेत आणले पाहिजे असे त्यांचे मत होते. जमिनीच्या लहान तुकड्यावर उदरनिर्वाह करण्यापेक्षा पडीक जमिनी लागवडीखाली आणाव्यात असे त्यांनी सुचवले.

**सामुदायिक शेती:**

भारतातील लहान धारण क्षेत्र व विखुरलेल्या शेतजमिनी या समस्यांवर डॉ. आंबेडकरांनी सहकारी शेतीचा उपाय सुचवला. सहकारी शेतीमुळे शेतकऱ्यांचा जमिनीवरील मालकी हक्क अबाधित राहील. आर्थिक लोकशाहीचे स्वप्न साकार करण्यासाठी आंबेडकरांनी उद्योग व शेती क्षेत्रात शासन संस्थेच्या हस्तक्षेपाचे समर्थन केले. त्यांच्या मते शेती हा शासकीय उद्योग असावा. मूलभूत उद्योग आणि विमा याप्रमाणे सर्व जमीन शासनाने स्वतःच्या ताब्यात घ्यावी अशी त्यांची शिफारस होती. डॉ. आंबेडकरांच्या व्यवहारी शहाणपणाचा परिणाम म्हणून त्यांच्या मार्गदर्शनान शेती व उद्योग या दोन्ही महत्त्वाच्या आर्थिक क्षेत्रांच्या विकासासाठी अत्यावश्य असणारे सिंचन व ऊर्जा ही दोन महत्त्वाचे पायाभूत क्षेत्र विकसित करण्याचा पाया घातला गेला. ऊर्जा वाटपासाठी ग्रीड पद्धतीचा विचार त्यांनीच मांडला. सततच्या दुष्काळामुळे पाण्याचे विशेषत: उन्हाळ्यात भोगावे लागते ते दूर करावयाचे असेल तर नदीजोड, पाणलोट क्षेत्राचा वापर आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. सामुदायिक शेती या प्रकारच्या शेतीत जमीनदार आणि शेतमजूर यांच्या जातपात असा भेदभाव न करता सर्वांना सामावून घेऊन शेती उत्पादनाचा योग्य हिस्सा सरकारला देऊन उरलेले उत्पन्न सर्वांना वाटून घ्यावे. सहकारी शेतीमुळे लहान शेतकऱ्यांना मदत होऊन त्यांच्या अडचणी दूर होतील. शेतकऱ्यांचा जमिनीवर मालकी हक्क कायम राहील. सहकार्य शेतीमुळे मोठ्या आकारमानाची आणि एक संघ शेती अस्तित्वात येईल.

**श्रमविभाजन आणि अर्थशास्त्र:**

जाती व्यवस्था आणि अस्पृश्यतेसारख्या सामाजिक आजारांचे आर्थिक पैलू उलगडून दाखविणे हे डॉ. आंबेडकरांचे आणखी एक विद्वत्तापूर्ण कार्य होय. त्या वेळच्या जातीव्यवस्थेमुळे केवळ श्रमाची विभागणी

केली नसून श्रमिकांची विभागणी केली गेली आहे, हे त्यांनी निदर्शनास आणून दिले.डॉ.आंबेडकराचा जाती व्यवस्थेवर हल्ला हे केवळ उच्चवर्णीयांच्या वर्चस्वादाला दिलेले आव्हान नव्हते,तर आर्थिक विकासाशी त्याच्या मांडणीचा जवळचा संबंध होता. जातीव्यवस्थमुळे श्रमाची आणि भांडवलाची गतिशीलता कमी झाली असून, त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि विकासावर प्रतिकूल परिणाम झाला आहे असे त्यांचे मत होते. श्रमाच्या विभागणी मध्ये काही गैर नाही परंतु श्रमिकांची जन्मदिष्टित विभागणी ही अमानवी आहे. जगात इतरत्र अशी विभागणी झालेली नाही. भारतात ती जातीव्यवस्थेवर आधारित असल्यामुळे भारताचे अतोनात नुकसान झाले असा विचार त्यांनी मांडला. कामगार मंत्री असताना कामगारांना जो काही महागाई भत्ता मिळत होता तो अपुरा आहे. भडकत्या महागाईला कामगार तोंड देऊ शकणार नाहीत. म्हणून वाढत्या महागाईच्या निर्देशांकाच्या आधारावर महागाई भत्त्याची पूर्तता करावी असे प्रतिपादन त्यांनी त्यावेळी केले. आजही कामगारांना निर्देशांकावर आधारित महागाई भत्ता मिळण्याची पद्धत रूढ आहे. कामगार वर्गाला दिलासा देणारे 'कामगार विमा आय बी' ही महत्त्वाची तरतूद वाखाण्याजोगी आहे. डॉ. बाबासाहेबांचे अर्थ विचार आणि अर्थनीती आजच्या काळात ही किती योग्य आणि संयुक्तिक आहे. देशातील सर्व संसाधनावर देशातील सर्व लोकांना समान अधिकार मिळेल अशा प्रकारची समाजवादी अर्थव्यवस्था बाबासाहेबांना अभिप्रेत होती.

**आर्थिक विकासासाठी आरक्षण:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना जाणीव होती की जोपर्यंत दलित समाज शैक्षणिक, तांत्रिक, आर्थिक व भौतिकदृष्ट्या प्रगती करीत नाही. तोपर्यंत त्यांनी धर्मांतर केले तरी किंवा त्यांना मताचा समान अधिकार दिला. तरी हिंदू मानसिकता त्यांना बरोबरीच्या पातळीवर सह प्रवासी म्हणून स्वीकारणार नाही. म्हणून त्यांनी दलितांची संपत्तीक स्थिती सुधारण्यासाठी त्यांना उच्च शिक्षण, नोकऱ्या इ. मिळण्याची व्यवस्था राजघटनेतील आरक्षणाच्या माध्यमातून करून ठेवली आहे. परंतु त्याचा लाभ फार थोड्या दलितांना मिळणार होता. याची जाणीव त्यांना होती. म्हणून त्यांनी ग्रामीण भागातील दलितांच्या आर्थिक उन्नतीचा मार्ग प्रशस्त व्हावा, यासाठी राज्य समाजवादाचा मार्ग सुचवला होता. पण तो अमलात आला नाही. हे भारतातील दलितांचे दुर्दैव म्हणावे लागेल. शेती भारतातील जी लागवडीखाली योग्य जमीन असेल त्या शेत जमिनीचे राष्ट्रीयकरण करावे. उत्पादन व वितरण या दोन्ही भागावर राज्याचे नियंत्रण असावे. जीवनावश्यक वस्तू रास्त भावात मिळाव्यात. सर्व नागरिकांचा विमा सक्तीने उतरविला जावा. उद्योगधंद्याचे राष्ट्रीयकरण करावे. सरकारी संस्था लोक कल्याणाच्या हेतूने प्रेरित असाव्यात. कामगारांना योग्य वेतन मिळेल. नागरिकांना आर्थिक व सामाजिक सुरक्षितता प्राप्त होईल. आंबेडकरांनी स्वातंत्र्यपूर्व काळातील सरकारच्या वित्ताची उत्क्रांती या विषयासंबंधी आपले विचार तपशीलवार मांडलेले आहे.त्यामुळे बदलत्या परिस्थितीत त्यांच्या विचाराचे योगदान काय**?.**त्यांनी जे निष्कर्ष काढलेले आहेत, ते उपयुक्त आहेत..त्यांनी काढलेले निष्कर्ष पुढील प्रमाणे

**निष्कर्ष**:

1. तुटीचा अर्थसंकल्प ही एक पुरातन समस्या आहे. तूट भरून काढण्यासाठी सार्वजनिक कर्जाचे उभारणी केली जात असे. स्वातंत्र्यापासून आजतागायत समस्या कायम आहे. परंतु अलीकडच्या काळात दिवसेंदिवस खर्चात काटकसर करण्याऐवजी योजनाबाह्य खर्च सातत्याने वाढताना दिसतो. त्यामुळे योजना खर्चाला कात्री लागून विकासावर मर्यादा पडतात.
2. राष्ट्रीय एकात्मतेसाठी केंद्रीय सत्ता प्रबळ असावी.

3. देशात सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. जास्तीत जास्त लोकांना सहभागी होण्यासाठी संघराज्य पद्धतीचा अवलंब केला.
4. राज्यांना स्वायत्तता द्यावी असा विचार सर्वत्र व्यक्त होत असला तरी मूळ घटनेत बदल करण्याऐवजी काही तरतुदी कार्यवाही करताना अलिखित संकेतांचा समावेश करणे आवश्यक आहे.
5. अल्पसंख्यांकावर, दलितावर झालेले अन्याय हे राज्य पातळीपेक्षाही खेडे पातळीवर जास्त असल्याचा अनुभव असल्याने ते केंद्र सत्तेबाबत जास्त आशावादी होते. असे संघराज्य की आणीबाणीच्या काळात एकदम शासनामध्ये सहजपणे परावर्तित होऊ शकेल.
6. सध्या 16 वे वित्त आयोगाचे कामकाज सुरू आहे.या पृत्तकरणात्मक बाबीचा पाया डॉ. आंबेडकरांच्या लिखाणातून घातला गेलेला आहे. म्हणून सार्वजनिक वित्त या अर्थशास्त्राच्या ज्ञान शाखेत त्यांनी घातलेली भर त्याकाळी जेवढी महत्त्वपूर्ण होती तेवढी आजही महत्वपूर्ण आहे.
7. योजना तयार करताना केंद्राच्या मदतीवर अवलंबून न राहता वास्तववादी नियोजनावर भर दिलेला आहे. हा विचार आजही उपयुक्त आहे.
8. एखाद्या राज्यातील कायदा सुव्यवस्था याबाबतची परिस्थिती हाताळण्यास एखादे घटक राज्य अपुरे ठरत असल्यास त्या कलमान्वये केंद्र सरकार हस्तक्षेप करून त्या राज्यापूरती आणीबाणी जाहीर करते. म्हणजेच राष्ट्रपतीच्या हातात राज्याची सत्ता येते.

**सारांश**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सखोल आर्थिक अध्ययन व त्याची आर्थिक मांडणी अर्थव्यवस्थेला बळकटी आणण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. समाजात अनेक आर्थिक प्रश्न आहेत. ज्यामुळे विकासाला अडथळा निर्माण होतो. त्या गंभीर प्रश्नाचे स्वरूप मोठ्या प्रमाणात कमी करण्यास डॉ. आंबेडकरांचे विचार महत्त्वपूर्ण ठरतात. त्यांच्या विचारांचे अनुसरण केल्यास व प्रत्यक्षात याची अंमलबजावणी केल्यास समाजात सामाजिक न्याय, आर्थिक न्याय प्रस्थापित होऊन एक मजबूत भारतीय अर्थव्यवस्थेची निर्मिती होण्यास मदत होईल. भारतीय अर्थशास्त्राच्या इतिहासात डॉ. आंबेडकरांच्या योगदानाची दखल त्यावेळी घेतली गेली नाही. त्यांच्या वाट्याला नेहमीच उपेक्षा आली. त्यांच्या आर्थिक विचारावर नियोजनाची रुपरेषा ठरली असती तर, आज भारतीय अर्थव्यवस्थेच्या आणि समाजाच्या आर्थिक विकासाचे स्वरूप फार वेगळे असते आणि गरिबातल्या गरीब कुटुंबाचे आर्थिक जीवनमान सुधारले असते. परंतु देशाचे दुर्दैव त्यांच्या अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा वापर करून घेता आला नाही.

**संदर्भ सूची -**


1. काळे प्राचार्य बी. एस.(२०१३), ‘डॉ.बाबासाहेब आंबेडकर’, मनोकामना प्रकाशन, इस्लामपूर. पान नंबर ३१ ते ६०
2. कीर धनंजय (२००७), ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर’, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
3. पाटील प्रा. डॉ. जे. एफ., मोहपरे प्रा. डॉ. आर. एस., वाईंगडे प्रा. डॉ. आर. ए. वाय व यादव प्रा. डॉ. एस. बी.(२०२२), ’आर्थिक विचारांचा इतिहास’ फडके प्रकाशन, कोल्हापूर. पान नंबर ५० ते ५८
4. बाबासाहेब आंबेडकरांचे अर्थशास्त्र विषयक विचार – विकिपीडिया

# ''भारतीय समाजातील अस्पृश्यता निवारणासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली क्रांती''

**प्रा. डॉ. तेजराव गोपीनाथ साबळे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, प्रगती कला व विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना**

भारत देशाच्या इतिहासात १९ वे शतक धार्मिक, सामाजिक आणि राष्ट्रीय जागृतीचे शतक मानले जाते. या शतकात भारतीयांना इंग्रजाशी जवळचा संबध आल्यामुळे त्यांना पाश्चत्य संस्कृती, ज्ञानविज्ञान आणि स्वातंत्र्याच्या उदार विस्तारांची माहिती झाली. भारतीय समाजात शेकडो वर्षापासून चालत आलेल्या खुळचट रूढी, परंपरा, भ्रामक समजुती, धर्मभोळेपणा, अज्ञान इत्यादी दुर्गुन नवशिक्षीत भारतीयांच्या लक्षात येऊ लागली. ते दोष दूर करून भारतीय समाजात सुधारणा करण्याचा निश्चिय भारतीयांनी केला. या प्रचलीत रूढीमुळे आपली प्रगती होणार नाही ब्रिटिशांची गुलामगीरी झुगारून दयायची असेल तर धार्मीक व सामाजिक सुधारणा होणे आवश्यक आहे हि जाणीव भारतीय विचारवंतांच्या मनात निर्मान झाली. यातुनच धर्मसुधारणेच्या चळवळी निर्माण झाल्या व त्यातून नव्या वैचारीक क्रांतीचे वारे वाहु लगले.

म.फुले हे अधुनिक महाराष्ट्राच्या इतीहासातील श्रेष्ठ समाजसुधारक होते. समाजपरिवर्तनाच्या चळवळीचे ते आद्य प्रवर्तक होते. १९ व्या शतकाल महाराष्ट्रात बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी राणडे, आगरकर, विष्णुशास्त्री पंडित, इत्यादी समाजसुधारक होऊन गेले. परंतु त्या सर्वांच्या कार्याची दिशा, व्याप्ती उच्चवर्णीयांच्या कौटुंबीक सुधारणा या पलीकडे गेली नाही. म. फुले यांचे विचार व कार्य मात्र वरिल सुधारकांच्या तुलनेत वेगळे आहेत. म. फुले हे कृतीशील समाजसुधारक होते. त्यांनी जे विचार मांडले ते त्यांनी प्रत्यक्षात आनले. फुलेंचा वारसा हा राजर्षी शाहु महाराजांनी पूढे चालविला. नंतर पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध, कबीर, म. फुले यांना आपले गुरू मानले आणि त्यांनी सुरू केलेल्या कार्याला मूर्त रूप दीले.

अस्पृश्यांच्या प्रगतीसाठी अनेक संस्था आंबेडकर पूर्व काळात तसेच १९२४ च्या दरम्यान अस्तीत्वात आस्तांना 'बहिष्कृत हितकारिनीसभा, हि संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी का सुरू केली. याचा विचार करावा लागेल. न्या. रानडे यांचे समाज सुधारणेचे कार्य हे. वरिष्ठ वर्गापुरतेच सिमीत होते. ब्राह्मो समाज व प्रार्थना समाज यांनी काहीसे कार्य केले होते. म. फुले, राजर्षी शाहु, वि. रा. शिंदे, यांनी अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी कार्य केले. हिंन्दू महासभेनेही त्या संदर्भात कार्य केले परंतू त्या कार्यामुळे अस्पृश्यांमध्ये स्वाभिमान व स्वालंबन निर्मान झाले नाही. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते अस्पृश्य समाजाला ज्या हाल अपेष्ट दुःखे, दारिद्र्ये, दास्य भोगावे लागले त्याचा अनुभव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतला होता. अस्पृश्यांना सामाजिक व धार्मीक गुलामगीरीतून मुक्त करणे, त्यांना त्यांचे हक्क मिळवून देणे यावर आंबेडकरांनी सुरवातीपासूनच भर दिला होता. व त्या दृष्टिने ते प्रयत्नशिल होते. या प्रयत्नांचा एक भाग म्हणजे 'बहिष्कृत हित कारिणी सभेची स्थापना' पददलितांच्या चळवळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी पुढील मार्गानी अस्पृश्यांच्या उद्धारांचे कार्य केले. १९२४ साली

"बहिष्कृत हित कारिणी सभा स्थापन केली" शिका, संघटीत व्हा व लढा द्या' हे या संघटनेचे ब्रीद वाक्य होते. या संस्थेचे उददेश व कार्य या प्रमाणे.

1) बहिष्कृत वर्गाच्या चालु परिस्थितीची माहिती गोळा करणे, व हि सर्व माहिती लोकांच्या निदर्शनास आणुन त्यावर लोकमत तयार करणे.
2) त्याचप्रमाणे सरकारकडून त्यांच्या हकांचे संरक्षण व्हावे व त्यांच्या उन्नतीस जरूर त्या सवलती मिळाव्यात म्हणुन प्रयत्न करणे.
3) बहिष्कृत वर्गात जागृती करणे व त्यासाठी प्रचारक नेमने.
4) बहिष्कृत वर्गात त्यांच्या हक्काची जाणीव निर्माण करणे.
5) शिक्षण प्रसार करणे, वाचनालय स्थापण करणे.
6) विद्यार्थी वस्तीगृह काढणे,

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अगदी सुरवाती पासुनच अस्पृश्यांची स्थीती सुधारण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार केला होता त्यांचा जन्मच अस्पृश्य जातीत झालयाने त्यांना अनेक कटु अनुभव आले होते. मानुसकीला काळीमा लावणा-या अस्पृश्यतेच्या अनिष्ठ प्रथेचे उच्चाटन करण्याच्या कार्याला त्यांनी स्वता:ला वाहुन घेतले व ही प्रथा मोडून काढणे हे त्यांनी आपले कर्तव्य मानले.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता निर्मुलनासाठी केलेले कार्य**

अस्पृश्यांना अन्यायाचा प्रतीकार करण्यास आणि न्याय हकासाठी संघर्ष करण्यास शिकविले. त्याच्यात स्वाभीमान जागृत केला. आपन हि या देशांचे नागरीक आहोत. त्यामुळे इतरांच्या मेहरबानीवर जगण्याचे कारण नाही असे सांगुन त्यांच्यातील आत्मविश्वास जागृत करण्याचा प्रयत्न केला.

**१. महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह.**

पाणी भरण्यासदेखील मनाई होती. ज्या ठिकाणी जनावरे पाणी पिण्यासाठी जात होती त्या ठिकानीही अस्पृश्यांना बंदी होती. इ.स. १९२६ मध्ये ब्रिटिश सरकारणे कायदा करुण सार्वजनीक पाणवठ्याच्या जागा सर्वांसाठी खुल्या केल्या, मात्र हा कायदा फक्त कागदोपत्रीच राहीला. कारण त्यांचा हा हक्क मान्य करण्याची वरिष्ठ जातीची तयारी नव्हती. त्यामुळे सार्वजनीक पाणवठ्यावर पानी भरण्याची हिम्मत अस्पृश्यांनी केली नाही. आपल्या हक्कासाठी इ.स. १९२७ मध्ये महाड येथे बहिकृत हितकारिणी सभेची पहिली परिषद बोलवली. या वेळी महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले व्हावे यासाठी डॉ. आंबेडकरांनी विशाल मोर्चा काढला तसेच या तळ्यावर सत्यागृह केला.

**२. मनुस्मृतीचे दहन**

जातीसंस्थेला बळकटी आणणाऱ्या मनुस्मृतीचे जाहीररीत्या दहन करण्याचे दलीत चळवळीने ठरविले. २५ डिसेंबर १९२७ रोजी महाडच्या चवदार तळ्याच्या परिसरात मनुस्मृती या ग्रंथाचे दहन केले.

**३. मंदिर प्रवेशासाठी सत्यागृह**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह करून अस्पृश्यांना आपल्या हक्काची जाणीव करून दिली. त्यासाठी आंबेडकरांनी नाशिकला प्रख्यात काळाराम मंदिराची निवड केली. त्यांनी सत्याग्रहाची हाक देताच संपूर्ण महाराष्ट्रातून त्यांचे हजारो अनुयायी नाशीक मध्ये आले. ०२ मार्च १९३० रोजी मंदिर

प्रवेशांचा सत्याग्रह झाला. या सत्याग्रहाद्वारे निरक्षर अस्पृश्य बांधवाना संघटीत करण्याचे कार्य या चळवळीने केले. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी असे सत्याग्रह झाले.

**४. धर्मांतराचा निर्णय**

हिन्दू धर्माने अस्पृश्यांना न्याय देऊन आपल्या धर्मात सुधारणा घडवून आणावी या साठी डॉ. बाबासाहेबांनी हिंन्दू धर्मात राहुनच सुधारणा करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी त्यांनी सर्व प्रकारचे प्रयत्न केले होते हिंदूच्या वृत्तीत बदल न झाल्याने शेवटी त्यांनी धर्मांतराचा निर्णय घेतला इ.स. १९३५ मध्ये येवले येथे भरलेल्या अस्पृश्य परिषदेच्या अध्यक्ष पदावरून बोलतांना धर्मांतराची घोषणा केली. या वेळी त्यांनी असे उदगार काढले की, दुर्दैवाने हिंन्दू म्हणुन अस्पृश्य जातीत जन्माला आलो असलो तरी मरतांना मात्र मी हिंन्दू म्हणून मरणार नाही. पूर्ण विचारांती बाबासाहेबांनी १४ ऑक्टों. १९५६ रोजी नागपूर येथे आपल्या हजारो अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली.

**५. राजकीय कार्य**

स. १९३० ते १९३२ च्या दरम्यान ब्रिटिश सरकारने भारताच्या घटनात्मक प्रश्नावर विचार करून त्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी इंग्लंडमध्ये ज्या तीन गोलमेज परिषदांचे आयोजन केले होते. त्यामध्ये अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित राहिले होते.

**समारोप**

पददलीत समाजाच्याच चळवळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान आत्यांत महत्वाचे आहे. त्यांनी 'मुकनायक', जनता, व प्रबुद्ध भारत, या वृत्तपत्राच्या माध्यमातून अस्पृश्य समाजामध्ये जागृती निर्माण केली. १९२४ साली बहिष्कृत हितकारिणी सभा स्थापन केली 'शिका संघटित व्हा, लढा दया' हे या संघटनेचे ब्रिदवाक्य होते. इ.स. १९२६ साली भरलेल्या महार परिषदेत महारांना गावकीचे, वतनदारीचे हक्क सोडून देण्याचा आदेश दिला. त्यानुसार शेकडो महारांनी गावकीच्या व वतनदारीच्या गुलाम- गिरीच्या बेडया तोडून मुक्त झाले.

राजकारणालाही त्यांनी आपल्या पददलीत बांधवांचा विचार केला होता. त्यांच्या उन्नतीसाठी अविरत कष्ट घेतले. अस्पृश्यांना राजकीय हक्क मिळावे या साठी त्यांनी सुखातीपासून प्रयत्न केले. अस्पृश्यांना राजकीय न्याय मिळवून देण्यासाठी स्वतंत्र मतदार संघांची तरतूद नव्या राज्यघटनेत करण्यात यावी असा आग्रह धरल्याने डॉ. आंबेडकर व म. गांधी यांच्यात वाद झाला. तरिही ते थांबले नाही अस्पृथ्यांना न्याय देण्यासाठी कार्य केल अस्पृश्यांना आपल्या हक्काची जाणीव होण्यासाठी त्यांना शिक्षण देण्याची आवश्यकता आंबेडकरांनी व्यक्त केली. त्यानुसार बहिष्कृत दिसकारिणी सभेची सभेचे शिक्षण प्रंतर करण्याचे कार्य हाती घेतले आणि नंतर त्यांनी इ.स. 1946 मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटी या संस्थेची स्थापना केली.

ब्रिटिश सरकारकडून स्वतंत्र मतदार संघाची मागणी मान्य करून घेतली परंतू पूढे म. गांधीजींच्या आग्रहामुळे ती मागणी त्यांना पुणे कराराने सोडून दयावी लागली. १९४२ साली All India scheduled caste federation नावांचा राजकिय पक्ष त्यांनी स्थापन केला. त्यांच बरोबर त्यांनी शिक्षण क्षेत्रात अस्वथ्यांना उच्चशिक्षण मिळावे म्हणून मुंबई येथे १९४६ मध्ये 'peoples Education society, स्थापना केली. मुंबईस आर्टस, सायन्स, कॉमर सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबादला मिलिंद महाविद्यालय अशी स्थापन केली.

या सर्व मार्गानी डॉ बाबासाहेब आंबेडकर भारतीय अस्पृश्य समाजामधील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी फार मोठे योगदान दिले आहे. त्यामुळे सदैव ते अस्पृश्य दलिद समजाचे सुधारक म्हणुन सदैव स्मरणात राहील

**संदर्भ ग्रंथ -**


1) डॉ. गाठाळ एस एस - महाराष्ट्रातील समाजसुधारक विचार- धारा व कार्य कैलास पब्लिकेशन औरंगपूरा आरंगाबाद प्रकाशक के एस.अतकरे प्रथमावृत्ती जुलै -२०१४.
2) डॉ दीपा दिनेश सावने- आधुनिक भारत- प्रकाशक के.एस. अतकरे कैलास पब्लिकेश औरंगपुरा, औरंगाबाद .
3) डॉ.बी.आर.आंबेडकर- डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषने जातीव्यवस्था निर्मुलन डॉ. बा.आ.चरित्र साधने प्रकाशन समीती उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन.
4) डॉ. शुभांगी दिनेश राठी - महाराष्ट्रातील चळवळ सामाजीक,राजकीय,चळवळ व प्रशासन अर्थवे पब्लिकेशन, धुळे. प्रथमावृत्ती २२ जुलै २०१४

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकिय विचार : एक आढावा

**डॉ. रामदास बाबाजी निहाळ**
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बदनापूर, जि. जालना.

**प्रस्तावना**

मानवी तत्वज्ञान जन्माला आणि साकारायला येते ते मनुष्य जीवनातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ज्या विशिष्ट प्रतिकूल परिस्थितीतून संघर्ष करीत जावे लागले. त्यातील वाद-प्रतिवाद-अडथळ्यांनीच त्यांच्यामध्ये पुढे जाण्याची कमालीची जिद्द आणि संघर्षाची प्रचंड ताकद निर्माण केली. परिस्थितीच्या आत्यंतिक संघर्षाने त्यांच्यात विद्रोहाची अफाट शक्ती निर्माण झाली. ब्रिटिश राजवटीत सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि भौतिक सुधारणांमुळे इथल्या सुशिक्षितांना आपल्या समाजाच्या दोष लक्षात आले. पाश्चात्य विद्या व ज्ञानाने दिपून गेलेल्या पहिल्या शिक्षित पिढीने धर्म व समाज सुधारणे बरोबरच प्रबोधनाला चालना दिली. परंतु त्यांनी परंपरेची विरोधी विद्रोह न करता अस्पृश्यता, जातीभेद निवारण्याचे प्रयत्न केले. त्यातही त्यांना मर्यादा पडल्या सामाजिक विषमतेची झळ मुळापासून उघडण्याचे क्रांतिकार्य महात्मा फुले आणि छत्रपती शाहू महाराज यांनी केले. ब्राह्मणी कपट कारस्थान आणि जाती विषमतेला खतपाणी घालणारे ग्रंथ कर्मकांड, अंधश्रद्धा यावर महात्मा फुले यांनी हल्ला चढवला आणि मानवतावादी विचारांचा प्रसार केला. पुढे हेच विचार आत्मसात करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज परिवर्तनाची चळवळ उभारली. परदेशात शिक्षण घेत असतानाच सामाजिक रचनेतील तुलना भारतीय समाज व्यवस्थेची केली. त्यांना भारतातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक विषमता फार गुंतागुंतीची दिसून आली. अशी अन्याय, शोषणावर आधारित भारतीय जातीव्यवस्था शोषण करणारी असून माणसांना अज्ञान व अंधश्रद्धेत ढकलणारी चातुर्वणावर उभी असलेली ब्राह्मणी सत्तेला पोषक आणि बहुजनांच्या हिताला बाधक असलेली समाजव्यवस्था आहे, याची जाणीव त्यांना झालेली होती. ही व्यवस्था मुळापासून उखडून टाकण्यासाठी त्यांनी मानव वंश शास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, धर्मशास्त्र व अर्थशास्त्र यासारख्या विविध शाखांचा साक्षेपी अभ्यास केला. त्यातून निर्माण झालेले प्रचंड पांडित्य, अभ्यासू कृतिशील आणि बुद्धिवादी व्यक्तिमत्व तयार होऊन भारतीय समाजात झंजावातासारखे कार्यशील बनले. मानव मुक्ती सल्ला उभारून शोषण विरहित समाजवादी समाज स्थापनेसाठी आणि राष्ट्रीय ऐक्य साधण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. व्यक्ती समाज, धर्म, राजकारण, शिक्षण, अर्थकारण आणि संस्कृती याविषयी त्यांनी माणुसकीच्या पातळीवर जगण्यासाठी भारतीय समाजाला अनेक कृतिशील विचार दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारताच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रामध्ये अनन्यसाधारण योगदान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या एकंदरीत विचारांमध्ये असणारी प्रगल्भता ही अभ्यास पोक्त स्वरूपाचे होते. त्यांच्या विचारांना एक प्रकारे शास्त्रीय आधार होता. त्याच धर्तीवर आंबेडकरांनी मांडलेल्या राजकीय विचारांचा आढावा प्रस्तुत लेखात घेण्यात येणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन परिचय भारतात जन्मलेल्या थोर समाज सुधारकांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी मध्य प्रदेशातील महू या गावी झाला. त्यांचे वडील हे सुभेदार म्हणून लष्करी सेवेत कार्यरत होते. ते आपली पत्नी भिमाबाई यांच्या समावेत लषरी तळावरच राहत होते. महाराष्ट्राच्या रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यात दापोली जवळ असलेले अंबावडे नावाचे एक खेडे

आहे. हे सुभेदार रामजी यांचे मूळ गाव होते. पुढे रामजी यांनी आपल्या अंबावडे या गावाच्या नावावरून अंबावडेकर असे नवीन आडनाव धारण केले. यापूर्वी त्यांचे आडनाव सपकाळ होते. त्यामुळे अंबावडेकर याच नावाने लोक त्यांना ओळखत असत. या अंबावडेकर आडनावाचे आंबेडकर हे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिकविण्यास आंबेडकर नावाचे ब्राह्मण शिक्षक होते. कृष्णाजी केशव अंबेडकर या शिक्षकाने अंबावडेकर हे आडनाव खूपच आडनीड आहे म्हणून ते बदलून आपले स्वतःचे आंबेडकर हे नाव तेव्हापासून त्यांनी शाळेच्या दप्तरांमध्ये तशी नोंदणी करून टाकली. आंबेडकरांच्या कुटुंबात सुभेदार रामजी आणि त्यांचे पुढारलेल्या सुशिक्षित कुटुंबाच्या थाटात राहत होते. कुटुंबातील मुलांमध्ये विद्येचे अभिरुची उत्पन्न व्हावी, त्यांचे चारित्र्य सोज्वळ बनावे यासाठी सुभेदार रामजी दक्ष असत. अशा सुसंपन्न वातावरणात आंबेडकरांचे आयुष्य घडले व ते विकसित झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक व शैक्षणिक जीवन अतिशय हालाखीच्या स्वरूपाचे होते. अस्पृश्य समाजात जन्मले असल्यामुळे आंबेडकरांना विविध सामाजिक व शैक्षणिक समस्यांना सामोरे जावे लागले. परंतु अशा हलाखीच्या परिस्थितीमध्येही आंबेडकरांनी आपले पदवी, पदुव्यूत्तर व विद्या वाचस्पतीचे शिक्षण पूर्ण केले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार** :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्रज्ञ होते. परंतु सामाजिक स्थिती सुधारणाच्या आव्हानामुळे ते समाजशास्त्रज्ञ ही झाले. यशाच्या पायऱ्या चढत चढत ते कायदे पंडित झाले. राजनिती तज्ञही बनले. समाजक्रांती शिवाय देशाला पर्याय नाही यातच स्वहीत व राष्ट्रहित आहे अशी भूमिका अविरहितपणे मांडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आधुनिक भारताच्या शिल्पकार होते. नवभारत घडवायचा असेल तर अमुलाग्र परिवर्तनाची गरज होती नवे परिवर्तन, विचार दृष्टी आणि जीवन दृष्टी यांना सामोरे जाणारे असायला हवे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या दोन्हीचा अवलंब केला. समग्र समाजाची उन्नती व्यक्ती आणि समाज यांच्या मुक्त व्यवहारावर अवलंबून असते. स्वाभाविकतेला हितसंबंधासाठी जखडबंद केले की रुढी, परंपरा, पवित्रता, अपवित्रता, धर्म, अधर्म यांच्या व्याख्या बदलतात आणि स्वामीत्व सेवकत्व, अधिकार, अनाधिकार, उच्चतानिचता, साधनयुक्तता, साधन वंचितता युद्ध अस्तित्वात येते. सामाज व्यवस्थेतील शोषणाचा अतिरेक विग्रहवादाला जन्म देतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ अस्पृश्यांच्या समस्यांचा विचार करीत होते असे नाही तर समग्र राष्ट्र, राष्ट्रांतर्गत असणारे प्रवाह, लोकशाही, अल्पसंख्यांक शिक्षण अशा अनेक प्रश्न संबंधित त्यांनी केलेले चिंतन बहुमलाचे आहे. एक संघ व एकत्रित भारत त्यांना हवा होता. ज्या काळात ते हा विचार प्रभावीपणे मांडत होते तो स्वराज्याच्या चळवळीचा काळ होता. त्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्वराज्यासंबंधी आस्था नव्हती असे म्हणणारे काही मंडळी त्या काळात होते. त्यांना उत्तर देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, स्वराज्य कोणाला नको आहे स्वराज्य पासून कोणालाही अलिप्त राहता येणार नाही परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना स्वराज्याचा अर्थ केवळ राजकीय मुक्ती एवढाच अपेक्षित नव्हता.

भारतात राजकीय स्वातंत्र्याबरोबरच आर्थिक व सामाजिक लोकशाही जोपर्यंत प्राप्त होत नाही तोपर्यंत स्वराज्याची कल्पना पूर्ण नाही अपूर्ण आहे अशी त्यांची धारणा होती. म्हणजेच स्वराज्याचे व्यापक रूप त्यांच्या डोळ्यापुढे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीचे कडवे पुरस्कर्ते होते. हुकूमशाही ही भारताची परंपरा नव्हे तर लोकशाहीच भारतीय अस्मितेचे खरे प्रतीक आहे ही त्यांची विचारसरणी सूर्यप्रकाशासारखी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाही विषयी जी व्यवस्था केली आहे ती म्हणजे

ज्या शासन पद्धतीत लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारक स्थित्यंतर रक्तपाता शिवाय घडवून आणण्यात येतात ती लोकशाही. यावरून रक्तपात घडून लोकशाही प्रस्थापित करणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मान्य नाही. मुख्य म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पद दलित समाजामध्ये जन्मलेले पहिले महान क्रांतिकारक नेते होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या घटनात्मक राजकीय आणि सामाजिक विचारात टाकलेली भर ही नि:संशय मोलाची आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, केवळ आर्थिक हेतूनेच माणूस प्रेरित होतो असे नाही तर आर्थिक सत्ता हेच जगातील एकमेव सत्ता आहे हे त्यांना मान्य नाही. धर्म हेही एक शक्तीचे उत्पत्तीचे स्थान आहे. हे या देशातील इतिहासाने असंधिक्तपणे सिद्ध केले आहे. वरील योजना वरून असे निदर्शनास येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतामध्ये लोकशाही का उपयोगी आहे हे सिद्ध करण्यासाठी विविध प्रकारचे दाखले दिले आहे. वरील विवेचनावरून भारतात राजेशाही हुकूमशाही उपयोगी पडणार नाही कारण भारतीय समाज व्यवस्थेला राजकीय विचार प्रणालीमध्ये लोकशाही ही फार जवळची वाटते.

**संदर्भ :-**


1. कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई.
2. प्रा.जोंधळे अनिल, प्रखर देशभक्त आणि राष्ट्र निर्माते डॉ. आंबेडकर, प्रबुध्द भारत पुस्तकालय आणि प्रकाशन व्यवसाय, नागपूर.
3. प्रा.देशपांडे म.द., डॉ. आंबेडकर यांचे राजकिय विचार, लोकङ्मय गृह, मुंबई.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ
5. डॉ. आगलावे प्रदीप, समाजशास्त्रज्ञ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, प्रथमावृत्ती, मार्च 2001.
6. Omveti Gail, Dalits and the Democratic in Colonial India, Sage Publication, New Delhi.
7. Kavlekar K.K. and Chousalkar A.S., Political Ideas and Leadership of Dr. B.R. Ambedkar, Vishwanil Publication, Pune.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्वांगीण कार्याचा आढावा."

**प्रा. सतीश रामकिशन सोनकांबळे**
संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट जि. लातूर.

**प्रस्तावना:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारतातील एक तेजस्वी व्यक्तिमत्व होते. त्यांच्या कार्य-कर्तुत्वाचा आढावा घेतल्यानंतर त्याच्यातील महानत्वाची प्रचिती येते. डॉ.आंबेडकरांच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक अशा अनेक क्षेत्रातील कार्य अभ्यासल्यानंतर ते एक व्यक्ती नसून एक विचारपीठ होते असे दिसून येते.

भारतीय समाजात जी विषमता होती त्या विषमतेने अनेकांचे जीवन उध्वस्त केले होते. अशावेळी निर्जीव असलेल्या व्यक्तींच्या मनात आत्मविश्वास निर्माण करून माणुसकीचे जीवन जगण्याचा मार्ग दाखवून त्यांच्यात नवचैतन्य निर्माण करण्याचे महान कार्य डॉ. आंबेडकरांनी केले आहे. आपल्या अस्पृश्य बांधवांना अत्याचार व गुलामगिरीतून मुक्त करण्याबरोबरच भारतीय घटनेनुसार त्यांना आर्थिक विकासाची संधी उपलब्ध करून देण्याचे अलौकिक कार्य आंबेडकरांनी केले आहे. स्वतः उच्च विद्याविभूषित झाल्यावरही वैयक्तिक स्वार्थाच्या भूमिकेतून आर्थिक प्रलोभनाचा स्वीकार न करता त्यांनी आपले संपूर्ण जीवन बहुजनांच्या उन्नतीसाठी समर्पित केलेले दिसून येते.

सुप्रसिद्ध चरित्रकार धनंजय कीर त्यांच्या कार्याविषयी म्हणतात, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उदय हे आधुनिक भारताच्या इतिहासातील तेजस्वी आणि शाश्वत मूल्याचे दर्शन घडविणारे एक महान पर्व आहे ."भारतीय घटनेचे शिल्पकार व कोट्यावधी दलितांच्या जीवनाचे उद्धारक म्हणून त्यांचे कार्य वेगळे व असामान्य आहे.

डॉ.आंबेडकरांनी प्रत्येक क्षेत्रात मोलाचे कार्य केले आहे. त्यांचे कार्य कोणत्याही एका विशिष्ट क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते. आंबेडकरांना जवळपास ६५ वर्ष ७ महिने २१ दिवसाचे आयुष्य लाभले. या अल्पायुष्यामध्ये त्यांनी भारतातील कोठ्यावधी लोकांसाठी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रात कार्य केले. स्वतःची ओळख हरवून बसलेल्या व्यक्तींना त्यांचे माणूसपण प्राप्त करून दिले. मानव मुक्तीसाठी निशस्त्रपणे लढा लढला. लोकांना त्यांचे न्याय, हक्क व अधिकार मिळवून दिले म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकातील महामानव ठरतात.

**उद्दिष्टे:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक ,शैक्षणिक, राजकीय ,धार्मिक व कार्याचा अभ्यास करणे.

**गृहीतक:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य विविध क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणारे आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी सामाजिक क्षेत्रातील विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**संकलन आणि विश्लेषण**

सदर संकल्पनेचे संकलन आणि विश्लेषण करत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः लिहिलेल्या ग्रंथांचा व त्यांच्यावर इतरांनी केलेल्या लेखनाचा म्हणजेच दुय्यम स्त्रोतांचा आधार घेऊन "डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्वांगीण कार्याचा आढावा" मांडण्याचा प्रयत्न विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पद्धतीने केलेला आहे.

**१) सामाजिक कार्य:**

**अस्पृश्यतेला विरोध:**

अस्पृश्य हेच या देशाचे प्रथम नागरिक असून त्यांना या देशात समानतेचे हक्क व दर्जा मिळात नव्हता तो त्यांना मिळाला पाहिजे यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. त्यांनी अस्पृश्यता नाहीसे करण्याला प्राधान्य दिले. पददलितांची अस्मिता जागवण्याचे महान कार्य केले दलितांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करणे, आत्मविश्वास जागृत करणे आणि त्यांना संघटित करून न्यायासाठी संघर्ष करण्यास तयार करण्याचे कार्यही डॉ. आंबेडकरांनी केले आहे.

**बहिष्कृत हितकारणी सभा:**

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाचे सामाजिक व राजकीय प्रश्न मांडण्यासाठी, उपेक्षितांचे संघटन करण्यासाठी २० जुलै १९२४ रोजी "बहिष्कृत हितकारणी सभा" या संस्थेची स्थापना केली होती. बहिष्कृत समाजाच्या हितासाठी झगडणारी ही भारतातील पहिलीच संघटना होती.

**चवदार तळे सत्याग्रह:**

महाड येथील तळ्याचे पाणी पिण्यास अस्पृश्यना बंदी घातली होती .या घटनेला विरोध करण्यासाठी चवदार तळ्याचा सत्याग्रह १९ व २० मार्च १९२७ रोजी डॉ. आंबेडकरांनी केला. त्यामध्ये पुरुषाबरोबर महिलांना सुद्धा सहभागी करून घेतले होते.

**मनुस्मृति ग्रंथाचे दहन:**

मनुस्मृती ग्रंथातील निरनिराळ्या वचनांनी जातीव्यवस्था व अस्पृश्यतेचे समर्थन केले होते. सामाजिक व्यवस्थेला जबाबदार असलेला हा मनुस्मृती धर्मग्रंथ २५ डिसेंबर १९२७ रोजी आंबेडकरांनी दहन केला आहे. या कृतीमुळे अस्पृश्य समाजाचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली.

**काळाराम मंदिर सत्याग्रह:**

नाशिक येथील काळाराम मंदिर दलितांना प्रवेशासाठी खुले नव्हते. हे काळा रामाचे मंदिर सर्वांना खुले करण्यासाठीच्या सत्याग्रहाचे नेतृत्व डॉ .आंबेडकर यांनी केले होते.

**२) शैक्षणिक कार्य:**

अंधारातून प्रकाशाकडे जायचे असेल तर शिक्षण हा मार्ग आहे. त्यासाठी डॉ.आंबेडकर यांनी शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली.

**बहिष्कृत हितकारणी सभा:**

अस्पृश्याच्या शैक्षणिक प्रगतीसाठी २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना करून आंबेडकरांनी संस्थात्मक कार्यास सुरुवात केली. या संस्थेच्या वतीने वाचनालय, प्रोढासाठी रात्री शाळा सुरू करण्यात आल्या. विद्यार्थ्यांकडे मानवतेच्या भूमिकेतून पाहणाऱ्या शिक्षकाचीच त्यांनी नियुक्ती केली होती.

**भारतीय बहिष्कृत शिक्षण प्रसारक मंडळ:**

डॉ.आंबेडकर यांनी १९२४ मध्ये स्थापन केलेल्या बहिष्कृत हितकारणी सभेचे १९२८ मध्ये विसर्जन करून "भारतीय बहिष्कृत शिक्षण प्रसारक मंडळाची" १९२८ मध्ये स्थापना केली. त्यामध्ये अस्पृश्यना शैक्षणिक जाणीव निर्माण झाली पाहिजे असा त्यांचा हेतू होता. या मंडळाच्या वतीने दोन विद्यार्थी वस्तीग्रह सुरू केली. तसेच छात्रालय उभारण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी वसतिगृहाची स्थापना करून अस्पृश्य विद्यार्थ्यांना राहण्या जेवणाची सोय करावी असा सल्ला आंबेडकरांनी दिला होता. त्याचबरोबर सोलापूर, ठाणे, पनवेल इत्यादी ठिकाणी अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहाची स्थापना केली.

**पीपल्स एज्युकेशन सोसायटी:**

डॉ.आंबेडकरांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी ८ जुलै १९४५ मध्ये "पीपल्स एज्युकेशन सोसायटी "या संस्थेची स्थापना केली .शिक्षणाचा प्रसार करणे हे या संस्थेचे ध्येय व उद्दिष्ट ठेवले होते. तसेच याच संस्थेच्या वतीने मुंबई येथे २० जून १९४६ मध्ये सिद्धार्थ कॉलेज सुरू केले .यासाठी सरकारकडून तीन लाख रुपयाचे कर्ज काढले होते .त्यानंतर मराठवाड्यातील जनतेला शिक्षण सहज उपलब्ध व्हावे म्हणून १९ जून १९५० मध्ये औरंगाबाद येथे पीईएस संस्थेमार्फत कॉलेज सुरू केले. पुढे १९५५ मध्ये याच औरंगाबादच्या कॉलेजचे नामांतर मिलिंद महाविद्यालय असे केले .महाराष्ट्रासह गुजरात, कर्नाटक येथे या संस्थेच्या काही शाखा आहेत. डॉ.आंबेडकर यांनी आयुष्याच्या अखेरच्या काळात पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या कार्याला वाहून घेतले होते.

**३) राजकीय कार्य:**

डॉ. आंबेडकर १९२६ ते १९३६ या काळात विधिमंडळावर सदस्य असताना सरकारकडे अनेक मागण्या केल्या होत्या.

**सायमन कमिशन:**

३ फेब्रुवारी १९२८ रोजी सायमन कमिशन भारतात आले. डॉ.आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारणी सभेच्या वतीने मुंबई येथे सायमन कमिशनला निवेदन दिले होते. २३ ऑक्टोबर १९२८ रोजी आंबेडकरांनी सायमन कमिशन पुढे साक्षी दिली. त्या निवेदनामध्ये अस्पृश्यांचे शिक्षण, संयुक्त मतदारसंघ, राखीव जागा, अस्पृश्यांचे हक्क इत्यादी बाबीच्या प्रश्नाकडे आंबेडकरांनी सरकारचे लक्ष वेधले होते.

**गोलमेज परिषद:**

१२ नोव्हेंबर १९३० रोजी लंडन येथे पहिली गोलमेज परिषद भरली होती .गोलमेज परिषदेमध्ये सर्व जातीच्या व पक्षाच्या प्रतिनिधींना बोलावण्यात आले होते. अस्पर्शाचे अस्पृश्याचे प्रतिनिधी म्हणून आंबेडकर गोलमेज परिषदेला उपस्थित राहिले. यावेळी आंबेडकरांनी अस्पृश्यासाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली .सात सप्टेंबर १९३१ रोजी दुसरी गोलमेज परिषद लंडनमध्ये भरली .या परिषदेत अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदारसंघावरून डॉ. आंबेडकर व गांधी यांच्यात मतभेद झाले होते.

**पुणे करार:**

जातीय निवडायास विरोध म्हणून गांधींनी पुणे येथील येरवडा तुरुंगात उपोषण सुरू केले. गांधीजींच्या प्राणांतिक उपोषणामुळे सर्वत्र चिंतेचे वातावरण निर्माण झाले. कस्तुरबा गांधी आणि इतर नेत्यांनी गांधीजींच्या प्राणाची भीक मागितल्याने बाबासाहेबांनी शेवटी तडजोड केली. यातूनच २४ सप्टेंबर १९३२ रोजी

आंबेडकर व गांधीजी यांच्यात येरवडा येथील तुरुंगात पुणे करार घडून आला. या करारातून आंबेडकरांनी स्वतंत्र मतदार संघाचा आग्रह सोडला व अस्पृश्यासाठी राखीव जागा असाव्यात असे उभय पक्षांनी मान्य करण्यात आले .डॉ.आंबेडकरांनी राष्ट्रहितासाठी स्वतंत्र मतदारसंघाचा त्याग केला होता.

**स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना:**

डॉ.आंबेडकरांनी १६ ऑगस्ट १९३६ रोजी "स्वतंत्र मजूर पक्ष" स्थापना अस्पृश्यांचा लढा अधिक गतिमान करण्यासाठी केली. स्वातंत्र्य मजूर पक्षाने १९३७ ते १९४२ या काळात बिडी कामगारांना न्याय मिळवून देणे, खोती पद्धती व महारवता नष्ट करणे, अस्पृश्यांना शिक्षणात सवलती, शेतकरी व कामगारांचे प्रश्न इत्यादी विरोधात आवाज उठवला होता. एकूणच शेतकरी, कष्टकरी जनतेच्या कल्याणासाठी आंबेडकरांनी या पक्षाच्या माध्यमातून कार्य केले होते.

**अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन:**

अखिल भारतीय दलित परिषदेने अखिल भारतीय पातळीवर अस्पृश्याचा एक स्वतंत्र पक्ष असावा या हेतूने "अखिल भारतीय शेडूल्ड कास्ट फेडरेशनची "स्थापना १९४२ मध्ये करण्यात आली. या पक्षांची ३१ कलमी घटना आंबेडकरांनी तयार केली होती. भारतातील निरनिराळ्या अस्पृश्य वर्गाच्या संघटनांना या फेडरेशन मध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. या पक्षाच्या माध्यमातून अस्पृश्यांच्या अनेक मागण्या सरकारला सादर केल्या. कालांतराने पक्षातील कार्यकर्त्यांचे मतभेद वाढू लागल्याने डॉ.आंबेडकरांनी या पक्षांचे विसर्जन करून नवीन रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्याचे ठरविले होते.

**४) धार्मिक कार्य:**

अस्पृश्यता ही भारतीय समाजाला लागलेली कीड आहे. हिंदू धर्माने अस्पृश्यांना न्याय द्यावा यासाठी आंबेडकरांनी अविरत प्रयत्न केले होते. परंतु हिंदू धर्माचा त्याग केल्याशिवाय गत्यंतर नाही असे त्यांना वाटू लागले. येवला परिषदेतून आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली यासाठी त्यांनी विविध धर्माचा अभ्यास केला. शेवटी त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करण्याचा निश्चय केला. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी विजयादशमीच्या दिवशी डॉ. आंबेडकर यांनी असंख्य अनुयायासह बौद्ध धर्माचा स्वीकार केला. बौद्ध धर्म स्वीकारून मी या देशाचे जास्तीत जास्त हित साधत आहे. कारण बौद्ध धर्म हा भारतीय संस्कृतीचाच एक भाग आहे. धर्म व्यवस्थेने नाकारलेले दलितांचे अधिकार आणि माणूसपण मिळवून देण्यासाठी डॉ.आंबेडकरांनी हे ऐतिहासिक कार्य केले होते.

**५) हिंदू संहिता विधेयक सादर केले:**

स्त्रियांच्या न्याय हक्कासाठी डॉ. आंबेडकरांनी संघर्ष केला .हिंदू संहिता विधेयकाच्या मार्फत स्त्रियांना गुलामगिरीतून सुटका करण्याचे विधेयक विधिमंडळासमोर मांडले होते. त्यामध्ये स्त्रियांना मालमत्तेचा समान अधिकार घटस्फोटाचा अधिकार पोटगीचा अधिकार, एक पत्नीत्व, आंतरजातीय विवाह, घटस्फोटानंतर पालकत्वाचा अधिकार हे सर्व अधिकार मिळणार होते. हे विधेयक लोकसभेत मंजूर झाले नाही त्यामुळे डॉ.आंबेडकरांनी केंद्रीय मंत्री पदाचा राजीनामा दिला. स्त्रियांच्या न्याय हक्कासाठी त्यांनी मंत्री पदाचा त्याग केला होता.

**६) डॉ. आंबेडकरांची वृत्तपत्रे व ग्रंथसंपदा:** अस्पृश्य समाजाला जागृत करण्यासाठी समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी डॉ. आंबेडकर यांनी वर्तमानपत्राच्या माध्यमातून कार्य केले. यासाठी

त्यांनी वेळोवेळी वर्तमानपत्रातून लिखाण केले होते. त्यामध्ये मूकनायक (१९२०)बहिष्कृत भारत (१९२७) समता(१९२८) जनता (१९३०)प्रबुद्ध भारत (१९५६)इत्यादीचा समावेश होतो.

आंबेडकरांनी ग्रंथ लेखनही केली आहे ग्रंथासाठी त्यांनी खास राजगृह बांधले होते त्यापैकी काही ग्रंथ खालील प्रमाणे आहेत. द प्रॉब्लेम ऑफ रुपी, द अनहिलेशन ऑफ कास्ट, हू आर द शूद्र, थॉट्स अँड पाकिस्तान, द बुद्धा अँड हिज धम्मा, बुद्ध अँड कार्ल मार्क्स, द रिडल्स ऑफ हिंदुजन, इत्यादी.

**७) भारतीय घटनेचे शिल्पकार:**

घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून आंबेडकरांची निवड झाली होती. सतत २ वर्ष ११ महिने १७ दिवस कठोर परिश्रम घेऊन आरोग्याची परवा न करता त्यांनी विस्तृत अशी घटना तयार केली. जगातील सर्वात मोठे व सर्वोत्तम संविधान २९ नोव्हेंबर १९४९ ला देशाला अर्पण केले. भारतीय राज्यघटना तयार करण्यात डॉ. आंबेडकर यांनी महत्त्वपूर्ण वाटा उचलला असल्यामुळे भारतीय घटनेचे प्रमुख शिल्पकार म्हणून त्यांना ओळखले जाते. भारतीय संविधानाच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल अमेरिकेने आंबेडकरांना एल. एल. डी. ही कायद्यातील सर्वोच्च पदवी दिली होती.

**८) आंबेडकरांचे जलविषयक कार्य:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी श्रम मंत्री पदाच्या काळात जलसिंचनाच्या बाबतीत दोन बहुउद्देशीय प्रकल्प कार्यान्वित केले होते.

**दामोदर खोरे प्रकल्प:**

अमेरिकेतील टेनेसी व्हॅली ॲथॉरिटीच्या धर्तीवर दामोदर प्रकल्प खोरे हा बहुउद्देशीय प्रकल्प कार्यान्वित केले. डॉ. आंबेडकरांनी केवळ पूर नियंत्रणासाठी नदीवर धरणे बांधले जाऊ नयेत. खोरे प्रकल्प निर्माण करीत असताना पूर यंत्रणा बरोबरच जलसिंचन, विद्युत निर्मिती, नौकानयन, उद्योग धंद्यासाठी पाणीपुरवठा आणि पिण्याच्या पाण्याचा साठा करणे असे अनेक उद्देश डोळ्यासमोर ठेवून कार्य केले होते.

**हिराकुंड प्रकल्प:**

ओरिसा सरकारने हीराकुंड प्रकल्पाची केलेली मागणी डॉ.आंबेडकरांनी मान्य केली. ओरिसातील महानदीवर हिराकुंड प्रकल्पाची पायाभरणी झाली. श्री एच .के .मेहताब यांनी हिराकुंड प्रकल्पाचे गतिमान पद्धतीने कार्य केल्याबद्दल डॉक्टर आंबेडकरांचे जाहीर आभार मानले होते.

भारतातील अतिरिक्त पाण्याचे भीषण संकट दूर करण्यासाठी दामोदर आणि हीराकुंड प्रकल्प राबविले यामुळे अतिरिक्त पाण्याच्या आपत्तीचे रूपांतर संपत्ती मध्ये करण्याचे यशस्वी कार्य डॉ.आंबेडकरांनी केले होते.

**९) डॉ. आंबेडकरांचे विद्युत विषयक कार्य:**

डॉ.आंबेडकर श्रम मंत्री असताना विद्युत विकासासाठीच्या धोरण समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी विद्युत प्रश्नाशी निगडित असलेल्या अडचणींचा अभ्यास केला आणि त्या अडचणी सोडवण्याचे मार्ग शोधण्याला प्राधान्य दिले. वीज उत्पादन, वीज व्यवस्थापन आणि वीज वितरण या प्रश्नावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. विद्युत निर्मिती, व्यवस्थापन आणि वितरणाच्या धोरणाचा विस्तृत आराखडा अतिशय अभ्यासपूर्वक पद्धतीने तयार केला होता .या आराखड्यावरच आपल्या देशाचे वीज विषयक धोरण ठरविले जाते आहे.

**निष्कर्ष :**

डॉ. आंबेडकरांनी समाज सुधारकांचे कार्य केले होते. भारतीय समाजातील विषमता दूर केली. समाजातील प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा बरोबरच अपेक्षित लोकांच्या हक्क आणि सन्मानासाठी अविरत संघर्ष केला. सामाजिक न्याय आणि समतेचा पुरस्कार करण्यासाठी आणि समाजातील सांस्कृतिक, सामाजिक विचार प्रवाहांना सुयोग्य वळण देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली. त्यांच्या प्रत्येक कार्यातून भारतीय समाजाला एक नवी प्रेरणा नवा संदेश मिळतो.

डॉ. आंबेडकरांची शिक्षणाकडे बघण्याची दृष्टी व्यापक व देशहिताची होती. त्याचे शिक्षण विषयक कार्य दूरदृष्टी व प्रगल्भता सिद्ध करणारे आहेत. हजारो वर्ष अज्ञानाच्या गर्दीत पडलेली जनता आपला आत्मसन्मान गमावून बसली होती. ती गुलाम म्हणून जगत होती .शिक्षणासारख्या प्रभावी माध्यमामुळेच त्यांची गुलामगिरी नष्ट करण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले .सर्वच प्रकारच्या समस्या दूर करण्यासाठी शिक्षण हाच एक राजमार्ग आहे अशी त्यांची शैक्षणिक कार्याची भूमिका होती. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया असल्यामुळे हे शिक्षण दर्जेदार व गुणवत्तेचे सर्वांना मिळाले पाहिजे यासाठी त्यांनी कार्य केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय क्षेत्रातही अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले होते. एका बाजूला ब्रिटिशांची आणि दुसऱ्या बाजूला बहुजन समाजावर लादलेली सामाजिक गुलामगिरी होती. अशावेळी राजकीय लढ्याचा मार्ग त्यांनी निवडला होता.

आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता. डॉ.आंबेडकरांनी अनेक वर्तमानपत्रातून लिखाण केले होते तसेच अनेक ग्रंथाचे लिखाण केले .त्यांचे ग्रंथ म्हणजे एक एक शोध आहे. भारतीय घटनेचे प्रमुख शिल्पकार म्हणून ते ओळखले जातात. त्यानी जलविषयक, विद्युत क्षेत्रात पायाभूत कार्य केले होते.

एक थोर समाजसेवक, राजकारण धुरंदर ,कायदे पंडित ,निष्ठावंत तत्ववेता, अर्थतज्ञ, भारतीय घटनेचे शिल्पकार, प्रज्ञावंत लेखक, प्रभावी वक्ता म्हणून डॉ. आंबेडकर यांची ओळख आहे .विसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाज सुधारण्याच्या क्षेत्रात त्यांचे कार्य श्रेष्ठ मानले जाते. अस्पृश्य समाजाला हजारो वर्षापासून वर काडण्याचे कार्य त्यांच्या इतके प्रभावी दुसऱ्या कोणत्याही समाजसुधारकांनी केले नाही. बहुजनांच्या सामाजिक व राजकीय न्याय हक्कासाठी त्यांनी केलेल्या कार्याला भारताच्या इतिहासात तोड नाही .बहिष्कृत वर्गास' शिका ,संघटित व्हा संघर्ष' करा असा मूलमंत्र देऊन या वर्गाच्या शैक्षणिक उन्नतीसाठी त्यांनी शैक्षणिक संस्थाची स्थापना केली .पुरुषप्रधान संस्कृतीच्या गुलामगिरीत अडकलेल्या स्त्री वर्गाला मुक्त करण्यासाठी त्यांनी हिंदू कोड बिल संसदेत मांडले. भारतीय संविधानाच्या मौलिक कामगिरीबद्दल डॉ.आंबेडकर यांना उस्मनिया विद्यापीठाने डि .लीट ही सर्वोच्च पदवी देऊन सन्मान केला. भारत सरकारने सुद्धा १४ एप्रिल १९९१ मध्ये भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार दिला होता.

डॉ. राजेंद्र प्रसाद डॉ.आंबेडकरांच्या कार्याविषयी म्हणतात, 'आंबेडकर आमच्या घटनेचे शिल्पकार आहेत आणि त्यांची अनेक क्षेत्रात सेवा आणि विशेषता दलितांच्या उद्धाराकरिता केलेली सेवा फार महनीय आहे.'

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध क्षेत्रात केलेले कार्य अतुलनीय, अविस्मरणीय आणि भावी पिढीसाठी प्रेरणा देणारे आहे .डॉ.आंबेडकरांचे विविध क्षेत्रातील कार्य इतके व्यापक आहे की त्याला गवसणी घालण्यास माझे लेखनी असमर्थ आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1) कीर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र ,पापुलर प्रकाशन, मुंबई 1966
2) प्रा. डॉ. किशोर कुमार गव्हाणे- प्रा. डॉ. एस पी शिंदे- प्रा.डॉ.जयश्री शिंदे( देशमुख) _आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास अरुणा प्रकाशन ,लातूर 2014
3) डॉ. अनिल शिंगारे- डॉ.विठ्ठल घुले -महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास -अरुणा प्रकाशन, लातूर-2009.
4) लोकराज्य मासिक _धम्मचक्र प्रवर्तन सुवर्ण महोत्सव विशेषांक _ऑक्टोबर 2006. महाराष्ट्र राज्य

# ''बाबा साहेब अम्बेडकर एवं भारतीय लोकतंत्र''

## डॉ. रामसिया चर्मकार

सहायक प्राध्यापक, मानविकी एवं उदार कला संकाय रबीन्द्रनाथ टैगोर विश्वविद्यालय, रायसेन, म0प्र0

**प्रस्तावना**

देश को आजादी मिलने के बाद संविधान निर्माण का दायित्व बााबा साहेब को सौपा गया। बाबा साहेब एक दार्शनिक व्यक्ति होने के साथ उन्हें देश की सामाजिक, आर्थिक और राजनीतिक आदि परिस्थितियों से वे भलिभांति परिचित थें। भारतीय संविधान निर्माताओं में, खासकर डां भीम राव अंम्बेडर तीनों स्तरों की असमनता को खत्म करने के उद्देश्य से भारतीय संविधान की प्रस्तावना, मौलिक अधिकार, मौलिक कर्तव्यों तथा निर्देशक तत्वों के रूप में समाहित किये ताकि देश में एक सकारात्मक विकास के पथ पर अगे बढ़े। वर्तमान, भारत की विश्व भर में सबसे अधिक आर्थिक असमनता व धार्मिक उन्माद वाला देश की पहचान बना दी गई है। 2021 में, देश के एक प्रतिशत अमीरों के पास कुल राष्ट्रीय आय का 22 प्रतिशत हिस्सा व 10 प्रतिशत लोग, राष्ट्रीय आय के 57 प्रतिशत हिस्सें में काबिज है वही आधे से अधिक आबादी के पास महज 13.1 प्रतिशत है। मौजूदा आर्थिक असमनता वही है जो 300 वर्ष पूर्व थी। देश के शासक भारत को एक समृद्ध अभिजात्य वर्ग के साथ एक गरीब तथा बहुत असमान वाला देश के रूप में पहचान दे दिये। वर्तमान सरकार जिस तरह से एक धर्म एक भाषा की समर्थक है उससे देश और अधिक गरीब व अस्थिर रहेगा। सरकार की प्राथमिकताएं व नीतियां देश की सामाजिक ताने–माने को खण्डित कर रही है जो कि संविधान की प्रस्तावना के बिलकुल विपरीत है। वर्ष 2004 से 2016 के मध्य लोकसभा सदस्यों की औसत कुल संपत्ति 116 प्रतिशत बढ़ी है। राज्यसभा के लगभग 90 प्रतिशत माननीय करोड़पति हैं। भारतीय लोकतंत्र में सांसदों व विधायकों की खरीद परोख्त भी बढ़ी है। 2014 में हुए लोकसभा चुनाव में 543 सांसदों में से 442 करोडपति रहे। आपराधिक प्रवृत्ति वाले सांसदों की संख्या में भी वृद्धि की गई है। 2004 में जहां इनकी संख्या 128 रही तो 2009 में 162 तथा 2014 में 185 से बढ़कर 2019 के चुनाव में 233 हो गई। 2009 से लेकर 2019 के मध्य ऐसे सांसदों की संख्या में 109 प्रतिशत की वृद्धि हुई। मीडिया की स्वतंत्रता की दृष्टि से देश निरंतर खराब स्थिति की ओर जा रहा है। 2022 में 180 देशों में 150वां स्थान मिला जबकि 2016 में 133वां स्थान पर रहा। न्याय व अधिकर शुन्येतर कर दिया गया। वर्तमान देश की लोकतांत्रिक व्यवस्था बाबा साहेब के विचारों की प्रासंगिकता के परे है।

**मुख्य शब्द–** संविधान, लोकतंत्र, डॉ अंबेडकर, आर्थिक असमानता, धनिक व आपराधिक प्रतिनिधि, धार्मिक राजनीति।

**उद्देश्य–**

1. डॉ भीमराव अंबेडकर के विचारों को जानना।
2. सरकार की नीतियों को समझना।
3. देश की राजनीतिक विचारधारा को समझना।

**शोध प्रविधिः–** शोध पत्र **''बाबा साहेब अम्बेडकर एवं भारतीय लोकतंत्र''** में द्वितीयक सामग्री का संकलन है। जिसमें द्वितीयक सामग्री का विश्लेषणात्मक तथ्यों के आधार पर शोध का निर्माण किया गया है। इन्हीं तथ्यों से शोध पद्धति के अध्ययन का आधार तय किया गया है। इसके साथ शोध पत्र का निर्माण कर शोध प्रविधि के माध्यम से पत्रिकाओं का भी अध्ययन किया गया है। समाचार पत्र और इन्टरनेट में उपलब्ध तथ्यों के आधार पर शोध विषय को समझने का प्रयास किया गया है। इन माध्यमों से शोध पत्र पूर्ण करने में सहायता प्राप्त हुई है।

**विवेचनात्मक विश्लेषण–**

**भारतीय लोकतंत्र में आर्थिक असमानता–**

भारत एक संसदीय प्रणाली वाला एक संवैधानिक लोकतांत्रिक देश होने के नाते सभी नागरिकों को समान रूप से आर्थिक, सामाजिक एवं राजनैतिक अधिकार प्रदान करता है। किन्तु भारत की व्यवहारिक लोकतांत्रिक व्यवस्था को संविधान की प्रस्तावना के प्रतिकूल व्यवहारिक दर्शन का निर्माण

किया गया है। ग्लोबल डेमोक्रेसी इंडेस्क रिपोर्ट 2022 जारी की गई। इस रिपोर्ट में 167 देशों की लोंकतांत्रिक स्थिति को दर्शया गया है। इस रिपोर्ट का मुख्या आधार चुनावी प्रक्रिया, सरकार की फंक्शनिंग, राजनीतिक भागेदारी और नागरिक स्वतंत्रता आदि आधार बनाकर रिपोर्ट जारी किया गया है। रिपोर्ट में इस बात की जिक्र किया गया है कि दुनिया की आधी आबादी (45.3प्रतिशत) लोकतांत्रिक व्यवस्था में रह रही है जबकि एक तिहाई से अधिक की आबादी (36.9प्रतिशत) तानाशाही में जी रही है। लोकतांत्रिक व्यवस्था में भारत को 46वां स्थान प्रदान किया गया है। लोकतांत्रिक प्रक्रिया के आधार पर नार्वे पहले स्थान पर लम्बे समय से यह स्थिति को हासिल करता आ रहा है। इस बार भी उसी को पहला स्थान दिया गया है। भारत में आर्थिक क्षेत्र में असमानता के मामले में बहुत आगे बढ़ गया है। समूचे विश्व में भारत सबसे ज्यादा आर्थिक असमानता रखने वाले देशों में से एक है। 2014 के बाद जिस तरह से सरकारी सम्पत्ति को बेचा गया और बडे व्यवसायों और निजीकरण पर निर्भरता बढ़ाई गई, उसी का परिणाम है कि देश में आर्थिक असमानता और भी बढ़ गई। रिपोर्ट में यह भी बताया गया है कि भारत कि सरकार एक अभिजात्य वर्ग के साथ, एक गरीब और बहुत ही आर्थिक असमान देश के रूप में खड़ा है। 2014 में सरकार बनने के बाद नरेन्द्र मोदी के नेतृत्त वाली सरकार ने जिस तरह से सरकारी उपक्रमों को कौड़ियों के भाव दो लोगों को बेचा है, और साथ अन्य क्षेत्रों का निजीकरण किया है उससे देश में और भी अधिक आर्थिक असमानता को बढा दिया गया है। नरेन्द्र मोदी ने पहले मुकेश अंबानी और फिर बाद में अडानी को इतनी सरकारी संपंत्ति दी कि वह पिछले तीन वर्षों में 8 लाख करोड़ रूपये का इजाफा हुआ। हिंडनबर्ग रिसर्च ने अपनी रिपोर्ट में कहा है कि अडानी ग्रुप की कई कंपनियां कई वर्षों से शेयरों में गड़बड़ी, अकाउटिंग फ्रॉड और मनी लॉन्ड्रिग में शामिल रहा है। हिंडनबर्ग ने ग्रुप की सभी कंपनियों के शेयरों को 85 प्रतिशत से ज्यादा ओवरवैल्यूड भी बताया। अडानी ग्रुप ने 413 पन्नों का जबाव दिया जिस पर हिंडनबर्ग ने कहा कि राष्ट्रवाद की आड़ में धोखाधड़ी ना छिपाएं। क्योकि अड़ानी भारत नही है। भारत सरकार ने अडानी को अपने संरक्षण में रखकर भारतीय इतिहास का सबसे बड़ा घोटाला करवाया है वह भारत वाटरगेट कांड बन गया है। हिंडनबर्ग के खुलासे के बाद भी एलआईसी ने अडानी को 300 करोड़ दिये। सरकारी संस्थाओं का राजनीतिकरण किया जा चुका है।

विश्व असमानता रिपोर्ट 2022 के आंकड़े बताते है कि भारत में 1 प्रतिशत सर्वाधिक अमीर लोगों के पास 2021 में कुल राष्ट्रीय आय का 22 प्रतिशत हिस्सा है। एक फिसदी अमीर लोगों के पास देश कि कुल संपत्ति का 50 प्रतिशत से भी ज्यादा हिस्सा है। वही दूसरी ओर 50 प्रतिशत आबादी के पास कुल संपंत्ति का सिर्फ 3 प्रतिशत है। अच्छा अभी भी इन लोगों के पास 3 प्रतिशत की संपंत्ति है। विश्व आर्थिक मंच की एक बैठक में ऑक्सफैम इंटरनेशनल ने अपनी असमानता रिपोर्ट में यह जानकारी दी। यह भी सुझाया कि भारत के सबसे धनी लोगों पर 5 प्रतिशत कर लगा दे तो ड्रॉपआउट बच्चों को स्कूलों में वापस बुलाकर उन्हें पुनः शिक्षा दी जा सकती है। भारत के अरबपतियों की संपंत्ति पर केवल 2 प्रतिशत की दर से एकमुश्त कर लगाने से देश में 3 साल तक कुपोषित लोगों के पोषण के लिए 40,423 की जरूरत पूरी की जा सकती है। रिपोर्ट में विशेष रूप से इस बात का भी उल्लेख किया गया है कि भारत में महिला श्रमिकों को एक पुरूष कर्मचारी की ओर से कमाए गए हरेक रूपये के मुकाबले सिर्फ 63 पैसे ही मिलते हैं। इसी तरह से अनुसुचित जाति और ग्रामीण श्रमिको को मिलने वाले पारिश्रमिक में भी अंतर है। अगड़े सामाजिक वर्ग को मिलने वाले पारिश्रमिक के मुकाबले अनुसुचित जाति को 55 प्रतिशत और ग्रामीण श्रमिक को 50 प्रतिशत वेतन मिलता है।

मौजूदा सरकार जिस नीति के सहारे एक जाति, धर्म–भाषा के लोगों से निर्मित एक आकार के राष्ट्र की तरफ बढ़ रही है उससे देश को गंभीर परिणाम भुगतने पड़ेगे। देश में बढ़ती आर्थिक असमानता उनके लक्ष्य की पूर्ति भी कर रही है। वर्तमान सरकार की प्राथमिकताएं तथा नीतियां, सामाजिक ताने–बाने को तोड़ रही है। ट्रांसपेरेंसी इंटरनेशनल ने भ्रष्टाचार धारणा सूवकांक 2022 में बताया है कि दुनिया के 180 देशों में 95 प्रतिशत देश भ्रष्टाचार से लड़ने में विफल रहे है। भ्रष्टाचार के क्षेत्र में भारत ने 85वां स्थान हासिल किया है। देश में आर्थिक असमानता को बढाने में देश के कर्णधारों का महत्वपूर्ण योगदान रहता है। क्योंकि देश का रिक्शा चलाने व मजदूरी करने वाला तो इतने भारी

भरकम भ्रष्टाचार कैसे कर सकते हैं? उनकी जिंदगी तो इसी में व्यतित हो जाती है कि कल क्या खायेगे ? जी.डी. एच. कोल ने कहा था कि आर्थिक समानता के बिना राजनीतिक स्वतंत्रता एक मिथक। लोगों के संवैधानिक अधिकार छीनना हो तो देश में आर्थिक असमानता निर्मित करे दो, सारे अधिकार स्वतः ही समाप्त हो जाएगे क्योंकि तब लोगों के पास एक ही विकल्प रह जाएगा, अज्ञानता में किसी तरह जीवन यापन कर ले।

सन् 1949 में डॉ भीम राव अम्बेडकर ने चेतावनी देते हुए कहा था कि यदि हम लंबे समय तक सामाजिक और आर्थिक असमानता से मुँह मोडते रहे तो जनता राजनीतिक लोकतंत्र के ढ़ाचे को खत्म कर देगी। यह स्थिति तब निर्मित होगी जब देश का नागरिक शिक्षित रहेगा और अपने अधिकारों को जानता होगा। शिक्षा को कई स्तरों में विभाजित कर दुषित कर दिया जाए और साथ ही जनता को धर्म में उलझा दिया जाए। इस स्थिति को जनता बेहतर समझने की भूल कर सकती है। शासक वर्ग देश के संविधान निर्माता की इस बात को इस कदर नजर अंदाज कर देगा कि उसे सिर्फ असमानता की स्थिति ही सर्वश्रेष्ठ लगेगी। यह स्थिति उसके लिए सही हो सकती है। शायद यही वजह है कि वह उस खतरे को बुला रहा है, किन्तु देश और देश की जनता के लिए कदापित सही नही है।

कोरोना काल के बाद सरकारी विद्यालयों में रजिस्ट्रेशन बढ़ा है जिसका सबसे बड़ा कारण अर्थ ही रहा है। क्योंकि लोगों के पास उतना भी धन नही कि वे अपने रोज मर्रा की जरूरतों को भी पूरा कर सके। इसलिए सरकारी स्कूलों में छात्रों की संख्या बढ़ रही है जिसे सरकार एक उपलब्धि के रूप में बया करती है। पढ़ने वाले छात्रों की संख्या तो बढ़ी किन्तु कर्नाटक सरकार उन छात्रों को एक यूनीफार्म तक नही दे सकी जिस पर कर्नाटक हाई कोर्ट ने राज्य सरकार को सख्त शब्दों का उपयोग करते हुए कहा कि राज्य सरकार करे। इसके साथ ही कोर्ट ने निजी स्कूलों में जाने का खर्च की तुलना सरकारी स्कूल के छात्रों के साथ किये जाने वाले सौतेले पर नाराजगी जताते हुए कहा कि अगर कुर्सियों में बैठे लोगों में मानवता नही है तो यह एक बड़ी समस्या है। सरकारी स्कूलों में पढ़ने वाले बच्चों के साथ आखिर कब तक ऐसा सौतेला व्यवहार करते रहोगे ? उच्च पदों में बैठे लोगों में मानवता होनी चाहिए। उनके बच्चों कभी सरकारी स्कूलों में नही जाते, जबकि ये सभी सरकारी पदों पर पर होते हैं। सरकारी पदों पर बैठा व्यक्ति सरकारी स्कूलों से इतनी दूरी बनाकर क्यों रहता है ? सरकारी क्षेत्र में आने वाला व्यक्ति सरकारी क्षेत्र को ही खत्म कर रहा है। ऐसा क्यों है ? यह जानने व समझने का विषय है।

**सरकारी क्षेत्रों में प्रतिनिधित्व–**

आजाद के पूर्व जिस तरह से सामाजिक व्यवस्था का निर्माण कर देश के अधिकतम लोगों को अधिकार विहीन कर रखा गया था, वही स्थिति आजाद भारत में उन लोगों के साथ ऐसा न हो, इस उद्देश्य की पूर्ति हेतु डॉ भीमराव अंबेडकर ने भारतीय संविधान में सामाजिक रूप से बहिष्कृत अनुसूचित जाति व अनुसूचित जनजाति के समुदायों के लिए अनुच्छेंद 341, 342 के अंतर्गत आरक्षण का प्रावधान किया। ताकि इन समाज के लोगों का भी सरकारी क्षेत्रों में अपने समाज का प्रतिनिधित्व कर सके। सुप्रीम कोर्ट ने आर्थिक रूप से कमजोर सवर्ग तबके के आरक्षण को स्थिर रखने का फैसला देते हुए 50 प्रतिशत की सीमा को पार करने को सही ठहरा दिया। जबकि ओबीसी वर्ग को 27 प्रतिशत का आरक्षण देने से यह कह कर मना कर दिया था कि 50 प्रतिशत से अधिक नही दिया जा सकता। सुप्रीम कोर्ट ने सवर्ण तबके को सरकारी क्षेत्रों में प्रतिनिधित्व देने के चक्कर में 1993 के अपने ही एस फैसले को गलत ठहरा दिया। क्योंकि अब आरक्षण 59.5 फीसदी पर पहुंच गया है। देश के उच्च न्यायालयों में वर्ष 2018 से 2022 तक के इन 4 वर्षो में 79 प्रतिशत जज उच्च जातियों से नियुक्त किये गये। देश के 25 उच्च न्यायालयों में नियुक्त जज उच्च जातियों से हैं। वही देश में ओबीसी आज भी भेदभाव का शिकार हो रहा है। पिछड़े वर्ग से मात्र 11 प्रतिशत ही जज हैं।2018 में हाई कोर्टों में नियुक्त कुल 537 जजों में से अल्पसंख्यक समुदाय के सिर्फ 2.6 प्रतिशत हैं। इसी तरह अनुसुचित जाति से 2.8 और अनुसूचित जनजाति 1.3 प्रतिशत हैं।

डॉ भीमराव अंबेडकर ने संविधान में अनुच्छेद 340 के अंतर्गत ओबीसी के उत्थान के लिए प्रावधान किये थे। संविधान लागू होने के एक साल बाद जब सरकार ने ओबीसी आयोग का गठन व

1951 में ओबीसी की जाति आधारित जनगणना न कराने के कारण दुखी होकर डॉ अंबेडकर ने 10 अक्टूबर 1951 को कानून मंत्री पद से स्तीफा दे दिये। ओबीसी के 27 प्रतिशत आऱक्षण को लेकर आज भी खेल जारी है। केन्द्रीय मंत्रालयों में अपर सचिव से लेकर सचिव व निदेशक स्तर के 747 अफसरों मुें महज 60 अफसर एससी, 24 अफसर एसटी व 17 अफसर ओबीसी समुदाय के हैं। मतलब कि ऊचें सरकारी पदों पर एसटी–एससी का प्रतिनिधित्व महज 15 प्रतिशत हैं। वही सामान्य वर्ग के तकरीबन 85 प्रतिशत अफसर इन पदों पर पदस्थ हैं। जबकि ओबीसी समुदाय तो कही नजर ही नही आता है। डॉ भीमराव अंबेडकर ने संविधान सभा में कहा था कि किसी भी देश के संविधान की सफलता उस देश के नागरिकों तथा संविधान को चलाने वालों के चरित्र और उनकी नीयत पर निर्भर है। आज जिस तहर से देश के हालात हैं डॉ अंबेडकर के विचारों की प्रासंगिकता से बिल्कुल विपरीत है।

केन्द्र सरकार में सचिव स्तर के 81 अधिकारी हैं जिसमें महज 2 अनुसूचित जाति के और 3 अनुसूचित जनजाति के हैं तथा ओबीसी जीरो है। 70 अपर सचिवों में केवल 4 अनुसूचित जाति के और 2 अनुसूचित जनजाति के हैं। ओबीसी के केवल 3 ही हैं। सयुक्त सचिवों की संख्या 293 है जिसमें से 21 अनुसूचित जाति, 7 अनुसूचित जनजाति और ओबीसी के 11 हैं। शेष 254 पदों पर सामान्य वर्ग के हैं। निदेशक स्तर पर 299 अफसरों में 33 अनुसूचित जाति, 13 अनुसूचित जनजाति और ओबीसी के 22 अधिकारी हैं। केन्द्र सरकार की ग्रुप ए की नौकरियों में एससी की भागेदारी का 12.06 फिसदी है। ओबीसी की भागेदारी 8.37 फीसदी है जबकि सामान्य वर्ग की हिस्सेदारी 74.48 फीसदी हैं। ग्रुप बी नौकरियों में एससी की भागेदारी का 15.73 फिसदी है। ओबीसी की भागेदारी 10.01 फीसदी है वही सामान्य वर्ग की हिस्सेदारी 68.25 फीसदी हैं। ग्रुप सी एससी की भागेदारी का 17.30 फिसदी है। ओबीसी की भागेदारी 17.31 फीसदी है वही सामान्य वर्ग की हिस्सेदारी 6857.79 फीसदी हैं। इसके अलावा केन्द्र सरकार की उपक्रमों की नौकरियों में अनुसूचित जाति की भागीदारी का फीसदी 18.14 है। अन्य पिछड़ा वर्ग की भागीदारी 28.53 फीसदी है। सामान्य वर्ग की हिस्सेदारी 53.33 फीसदी है। इसके अलावा देश भर में कुल 496 कुलपति हैं, इन 496 कुलपतियों में से सिर्फ 6 एससी, 6 एसटी और 36 अन्य पिछड़ा वर्ग से हैं। इसके अलावा बचे सभी 448 कुलपति सामान्य वर्ग से हैं। स्पष्ट है कि देश की 85 फीसदी आबादी से महज 48 कुलपति और 11 फीसदी आबादी (सामान्य वर्ग) से 448 कुलपति हैं। प्रधानमंत्री कार्यालय जहां से देश समूचे देश के लिए नीति निर्माण के फैसले होते हैं वहां ओबीसी का एक भी अधिकारी नही है। वहां पर देश की 65 फीसदी आबादी का कोई प्रतिनिधित्व ही नही है।

**लोकतंत्र में बढ़ती जेलों और कैदियों की संख्या–**

ऐसे दौर में जब देश का शासक 75वां आजादी का अमृत महोत्सव मना रहा होता है। ऐसे वक्त में देश की राष्ट्रपति द्रोपदी मुर्मू ने 26 नवंबर 2022 के अवसर पर अपने संबोधन में कहा कि भारत दुनिया का सबसे बड़ा लोकतांत्रिक देश होने के बावजूद यहां और अधिक जेलें बनाये जाए की जरूरत क्यों है ? देश कि जेलों से तो इनकी संख्या कम हो जानी चाहिए थी ? पर ऐसा क्यों नही हो पा रहा है ? ऐसे सवालों से एक बात तो स्पष्ट हो गई है कि राष्ट्रपति द्रोपदी मुर्मू ने अन्य राष्ट्रपतियों की भांति लिखित भाषण के अलावा देश की वास्तविक बात कही हैं। यह देश की लोकतंत्र के लिए एक मिसाल है। 26 नवंबर के उद्‌बोधन में उठाए गए सवाल पर केन्द्र सरकार, गृह मंत्रालय, सभी राज्य सरकारों, देश के सभी कोर्ट, और पूरी पुलिस व्यवस्था को एक बार पुनः सोचने और विचार करने की जरूरत है। कहने को कहा जा सकता है कि जेलों में कई कारणों से कैदियों की संख्या में इजाफा हो रहा है। पर देखा गया है कि 2014 के सरकार से असहमति रखने वाले लोगों को भारी संख्या में जेलों में डाला गया है। कुछ की तो बिना सुनवायी के ही जेल में मृत्यु हो गई।

राष्ट्रपति अपने अभिभाषण में आगे कहती हैं कि जेलों में बंद गरीब लोगों के लिए अब कुछ करने की जरूरत है, जिंदगी खत्म करने वाले तो बाहर घूम रहे है किन्तु आम आदमी मामूली जुर्म में सालों जेल में पड़ा रहता है। ये लोग कौन इनकी जानकारी समय रहते क्यों नही एकत्र की जाती, ताकि इनके जीवन को बचाया जा सके। देश के ये ऐसे लोग हैं जिन्हें न तो अपने अधिकार पता होते और नही ही संविधान की प्रस्तावना, न ही मौलिक अधिकार या मौलिक कर्तव्य की जानकारी है। इनके बारने में कोई नही सोच रहा है। देश के शासक ये किस प्रकार का राष्ट्र निर्माण कर रहें हैं जिसमें आम

नागरिकों के लिए सोचने का वक्त तक नही है। इनकी शुध लीजिए ताकि देश की लोकतांत्रिक व्यवस्था और न्यायपालिका जनता का भरोसा बना रहे। ऐसे प्रक्रिया को अमली जामा क्यो नही पहनाया जा रहा है ? नेशनल क्राइम रिकौड्र्स ब्यूरो की जेलों की स्थिति पर रिपोर्ट कहती है कि 31 दिसंबर 2021 तक देश की कुल 1,319 जेलों में जितनी जगह नही है उससे कही अधिक कैदी कैद हैं। उक्त वर्ष तक भारतीय जेलों में कुल 5,54,034 कैदी थे। इनमें केवल 22 प्रतिशत ही ऐसे कैदी थे जिन पर दोष साबित हुआ। बाकी 77.1 प्रतिशत कैदी (4,27,165) विचाराधीन कैदी थे। यह भी प्रकाश में आया है कि पिछले कुछ वर्षों से भारतीय जेलों में विचाराधीन कैदियों की संख्या लगातार बढ़ रही है। 2020 की तुलना में वर्ष 2021 में भारतीय जेलों में विचाराधीन कैदियों की संख्या तकरीबन 15 फीसदी तक बढ़ गई है। नेशनल क्राइम रिकौड्र्स ब्यूरो कहती है कि 2016 से 2021 के मध्य भारतीय जेलों में कुल कैदियों की संख्या में 28 प्रतिशत की वृद्धि हुई है। इसके साथ ही विचाराधीन कैदियों की संख्या में 45.8 प्रतिशत की वृद्धि दर्ज की गई है।

**संसद और विधानसभाओं में धनिक प्रतिनिधियों की अधिकता–**

हिन्दूस्तान टाइम्स में कुछ समय पहले एक रिपोर्ट छपी थी जिसमें बताया गया था कि 2004 से लेकर 2014 तक लोकसभा सदस्यों की औसत कुल संपत्ति 166 प्रतिशत बढ़ी है। आजाद देश के इतिहास में 16वीं लोकसभा सबसे अमीर रही है। इस लोकसभा में 543 सांसद में से 442 करोड़पति है। एसोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स की भी रिपोर्ट कहती है कि लोकसभा में 82 प्रतिशत करोड़पति सासंद हैं। मध्य प्रदेश के 5 सांसद ऐसे हैं जिनकी संपत्ति में बेतहासा वृद्धि हुई है। नर्मदापुरम सांसद राव उदय प्रताप–288 प्रतिशत, सतना सांसद गणेश सिंह–466 प्रतिशत, जबलपुर सांसद राकेश सिंह–367 प्रतिशत, मुरैना सांसद नरेन्द्र सिंह तोमर 58 प्रतिशत और टीकमगढ़ सांसद वीरेंद्र कुमार 743 प्रतिशत। जनता के प्रतिनिधि जितना अपने आप को अमीर कर रहें हैं उतना ही जनता को गरीब। और यह सब लोकतंत्र के नाम पर राजनीतिक दलों का दलीय खेल है, जो संविधान की प्रस्तावना के बिल्कुल विपरीत है। भाजपा के 301 सांसदो में 265 सांसद करोड़पति है। कांग्रेस के 51 में से 43 सांसद करोड़पति हैं। डीएमके के 23 में से 22, तृणमूल कांग्रेस के 22 में से 20 यही हाल कमोवेश सभी राजनीतिक दलों का है। यही स्थिति राज्यों की भी है। सांसदों और विधायकों को देश व जनता की प्रतिनिधि के रूप में जाना जात है किन्तु राजनीति दल पहले ही इन्हें धनपति के रूप में अपना उम्मीदवार बना लेती हैं। राज्यसभा के सदस्यों का चुनाव भी इन्हीं के द्वारा किया जाता है, तो स्वाभाविक है कि अपने जैसे को ही महत्व देगें। राज्यसभा में भी ऐसी कोई कमी न दिखे इसलिए राज्यसभा में भी लगभग 90 प्रतिशत सदस्य करोड़पति हैं। जिसे क्रॅानी कैपिटल के नाम से भी जाना जाने लगा। कांग्रेस राज्यसभा में विजय माल्या की इंट्री कराते समय कहा था, 'किंग ऑफ गुड टाइम्स', जिसे भाजपा ने अच्छे दिन आएगें के नारे के साथ दूसरी पारी के लिए विजय माल्या का समर्थन किया था। इस समय मध्य प्रदेश में विधायकों के वेतन भत्ते में बढोत्तरी की चर्चाएं चल रही है तो वही दूसरी ओर बिजली कंपनी के कर्मचारियों द्वारा इस बात को लेकर हड़ताल किया जा रहा है कि उनका वेतन भत्ता क्यो नही बढ़ाया जा रहा है ? इन हड़ताली कर्मचारियों के बीच मध्य प्रदेश से दमोह की पथरिया विधायक रामबाई सिंह परिहार पहुची, और इस दौरान उन्होंने कहा कि सांसद, विधायक और मंत्री रहते हुए ये लोग इतना धन कमा लेते हैं कि इन्हें वेतन की जरूरत नही होती है।

देश में यदि किसी राज्य में विपक्षी दलों की सरकार है तो उसे गिराने व अपने दल की सरकार का गठन करने के लिए विधायकों की खरीद परोख की घटना भारत जैसे लोकतंत्र में और अधिक बढ़ गया है। मध्य प्रदेश, असम और महाराष्ट्र जैसे राज्यों में सरकार बदलने में विधायकों को करोड़ों रूपये दिये जाते हैं। राज्यों में यह खेल थोड़ा और भी आसान हो जाता है।

**आपराधिक प्रतिनिधित्व–**

एडीआर रिपोर्ट बताती है कि 17वीं लोकसभा के लिए चुनकर पहुचने वाले 542 सांसदों में से 233 (43 फीसदी) सांसद दागी छवि वाले हैं। 2009, 2014 और 2019 के आमचुनाव में जीते आपराधिक मामलों में शामिल सांसदों की संख्या में 44 प्रतिशत की वृद्धि हुई है। 542 में से 159 सांसदों के खिलाफ हत्या, बलात्कार और अपहरण जैसे गंभीर मामले लंबित पड़े हैं। भाजपा के 303 में से 116

सांसदों के खिलाफ आपराधिक मामले चल रहे हैं। इसी प्रकार से कांग्रेस के 52 में से 29 सांसद आपराधिक मामलों में घिरे हैं। राजद के 6, बसपा के 5, जदयू के 13, तृणमूल कांग्रेस के 9, माकपा के 2 और बीजद के 1 सांसद पर आपराधिक मामला है। इस तरह देखा जाए तो राजनीतिक दलों आपराधिक प्रवृत्ति वाले लोग अधिक पसंद हैं, साफ सुधरी छवि वाले उम्मीदवारों की तुलना में।

**भारतीय लोकतंत्र में मीडिया की आजादी के मायने–**

किसी देश की लोकतांत्रिक व्यवस्था को समझने का एक आसान तरीका यह है कि यह जान लिया जाए कि उस देश की मीडिया की क्या स्थिति है। मीडिया स्वतंत्र और निष्पक्ष है तो उस की स्वतंत्रता को कोई खतरा नही है। क्योंकि मीडिया को लोकतंत्र का चौथा स्तंभ कहा गया है। किन्तु आधुनिक युग में लोकतांत्रिक देशों में जिस तरह से मीडिया की आजादी को खत्म किया जा रहा है या फिर मीडिया ही सरकारों के अधीनस्थ हो जाए तो लोकतंत्र खतरे में पड़ जाता है। विदाउट बार्डर्स की रिपोर्ट बताती है कि दुनिया में मीडिया पर प्रतिबंध लगाये जा रहे हैं। भारत को विश्व का सबसे बड़ा लोकतंत्र के नाम से जाना जाता है उस देश में मीडिया की रैंकिंग कम होती जा रही है। वर्ष 2022 में 180 देशों की लिस्ट में भारत को 150वां स्थान पर रखा गया। 2021 में यह 142वां, तथा 2016 में 133वां स्थान पर रहा। भारत जैसे लोकतांत्रिक देश के लिए यह चिंता का विषय है।

बाबा साहेब डॉ भीमराव अम्बेडकर भारत को विश्व का सबसे बेहतर और समृद्ध लोकतंत्र के निर्माण के पक्षधर थे। यही वजह रही है कि भारत का संविधान लिखने के पूर्व उन्होंने विश्व विकसित और समृद्ध देशों के संविधानों का गहन अध्ययन कर उन संविधानों से उन प्रावधानों को भारतीय संविधान में जोड़ने का कार्य किये जो भारत देश को भी उन्ही देशों के समकक्ष लोकतांत्रिक व्यवस्थाओं के मापदण्डों के आधार पर भारत भी एक लोकतांत्रिक देश के रूप में विश्व में जगमगाए। सामाजिक प्रकृति के आधार पर देश की राजनीति का भी निर्माण किया, आर्थिक असमानता को इतना ज्यादा बढ़ा दिया गया कि राजनीतिक स्वतंत्रता के मायने ही बदल दिये। जनसंख्या के आधार पर तो देश को विश्व का सबसे बड़ा लोकतंत्र कहा जाता किन्तु वास्तविक लोकतंत्र से दूर किया जा रहा है।

**निष्कर्ष–**

संविधान में कर्तव्यों के रूप में वैज्ञानिक दृष्टिकोण, मानवतावाद, ज्ञानार्जन और सुधान की बात कही गई है। यह भारतीय लोकतंत्र की सच्चाई है कि विश्व का सबसे बड़ा लोकतंत्र कहा जाने वाला भारत, लोकतांत्रिक व्यवस्थाओं से ही दूर होता जा रहा है। दलीय नेताओं को यह यकीन हो गया है कि देश की जनता को गरीब कर इन्हें धार्मिक उम्माद में उलझा कर सांसद और विधानसभाओं में धनिक और आपराधिक प्रवृत्ति वाले लोगों को प्रतिनिधि बनाकर इन्हीं से शासित रहे। आर्थिक असमानता नागरिकों के संवैधानिक अधिकारों को स्वतः ही समाप्त कर देती है। दक्षिणपंथी विचारधारा वाले राजनीतिक दल इस दिशा में बहुत अधिक अग्रसर है। ये तो यह स्वीकार कर चुके हैं कि जनता उन्हीं मुद्दों को सुने और चर्चाएं करे जो इनके द्वारा निर्धारित किया जाए, और ऐसा हो भी रहा है जो कि देश और जनमानस के लिए दर्गम है। हथकडिया सांसद और विधानसभाओं में पहुचकर खुल गई और वही हथकडिया देश, जनता और मीडिया आदि की समर्थक बना दी गई। देश की लोंकतांत्रिक प्रक्रिया से दूर होने का स्पष्ट संदेश है कि देश में लोकतांत्रिक तानाशाही की प्रकृति को स्वीकार किया जा रहा है। मीडिया ने अपनी जो स्थिति बना ली है वह लोंकतंत्र का चौथा स्तम्भ को खंडित कर स्वतंत्र हो गया है। ऐसे हालातों में डॉ भीमराव अंबेडकर के विचारों की प्रांसगिकता और भी बढ़ जाती है।

**संदर्भ सूची–**

**अर्द्ध मासिक पत्रिकाएं व समाचार पत्र–**

1. सरल सलिल – जनवरी (प्रथम) 2023 पृं सं. 4, 6, 8।
2. सरिता – जनवरी (प्रथम) 2023 पृ. सं. 35, 36, 37, 41।
3. पत्रिका –17, 25/01/2023, पृं सं. 01, 04।
4. नवभारत (नागपुर) 10/01/2023 पृं सं. 12।
5. दैनिक भास्कर – 2, 4/2/2023 पृ. सं. 17, 18, 15।
6. कालवाड़ टाइम्स – 26, 31/01/2023 पृ. सं. 01, 02।
7. एक्सप्रेस न्यूज – 31/01/2023 पृ. सं. 01।

Internet-

1. https://afeias.com/knowledge-centre/current content/bharat_mai_badhti_aay_ki_asamanta/
2. https://www.downtoearth.org.in/hindistory/development/sustainable-development/legacy-of-inequality-80968
3. https://www.ichowk.in/politics/rich-candidates-mp-are-feather-in-indias-democratic-structure-cap/story/1/11883.html
4. https://navbharattimes.indiatimes.com/business/business-news/how-rich-are-your-mps-see-full-list/articleshow/93688375.cms
5. https://hindi.news18.com/news/nation/new-lok-sabha-has-475-crorepati-mps-adr-2042254.html
6. https://www.amarujala.com/india-news/lok-sabha-chunav-result-2019-72-percent-mp-has-criminal-cases-says-adr-report?pageId=1
7. https://hindi.newsclick.in/Growing-economic-inequality-in-India-caste-and-gender-discrimination
8. https://www.drishtiias.com/hindi/printpdf/crime-and-politics
9. https://www.amarujala.com/columns/blog/world-press-freedom-and-challenges-for-new-era-of-media-analysis?pageId=1

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाज सुधारणे विषयक कार्य

**प्रा. वर्षा शिवलाल घोडे**
समाजशास्त्र विभाग,के.टी.एच.एम.महाविदयालय नाशिक

**प्रस्तावना :—**

देशामध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सामाजीक सुधारण्याची चळवळ सुरू केली.त्यावर कळस चढवण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे रत्नागीरी जिल्हयातील रहीवाशी होते.१४ एप्रील १८९१ मध्ये त्यांचा जन्म महु येथे एका गरीब कुटुंबात झाला.त्यांचे वडील लष्करी शाळेत शिक्षक होते. लहानपणीच त्यांची आई वारली.त्यामुळे विशेष असे मातृप्रेम लाभले नाही.त्यांचे शिक्षण दापोली व सातारा येथे झाले.मुंबई येथे शिक्षण घेत असतांना त्यांना अपमानास्पद वागणुक मिळाली त्यामुळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अस्पृश्यतेच्या कलंकाची तीव्र जाणीव होवु लागली.

एक प्रसिध्द कायदे पंडीत,घटनातज्ञ,राजकारण,धुरंदर,उध्दारकर्ते,एक कृतीशिल सुधारक म्हणुन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा लौकीक आहे.त्यांना भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार मानले जाते.मानवी हक्क मिळवण्यासाठी व दलित समाज्याच्या उत्कृर्षासाठी झगडणारे ते एक झुंजार नेते होते.

भारतीय समाजात अतिशुद्र समजल्या जाणा—या युगानयुगे खितपत पडलेल्या समाजात, आत्मतेज, आत्मविश्वास आणी न चैतन्य निर्माण करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले.दलितांचे कैवारी, दलितांचा पुढारी, कष्टकरणारा पंडीत आदी उपादी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दिल्या जातात.कारण दलितांसाठी मागासवर्गीय समाजासाठी स्त्रिया आणी समाजातील वंचित घटकांसाठी त्यांनी उल्लेखनीय कार्य केले.आणी म्हणुनच भारत सरकारने त्यांना भारतरत्न या उपादीने गैरविले आहे.

**संशोधन पदधती :—**

प्रस्तुत शोध निबंध हा दुय्यम सामुग्रीवर आधारीत असुन त्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजसुधारणे विषयी कार्य त्याच प्रमाणे आंबेडकरांच्या जिवन विचाराने त्यांचे कार्यावर शास्त्रीय पदधतीने मांडणी करणा—या लेखीत सामुग्रीचे विषेश आस्पृश्यांचे व स्त्रीयांचे वर्णन व विश्लेषन करण्याचा प्रयत्न केला आहे.त्या अनुशंगाने प्रस्तुत शोध निबंधात त्या आधारावर निष्कृष मांडण्यात आले आहे.

**ग्रहीतके :—**

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील वंचित घटकांना आपला स्वाभीमान व हक्काकरीता लढा देण्यासाठी प्रेरीत केले. तसेच ते कोणत्याही प्रकारच्या भेदभावाला थारा देत नव्हते.
2) डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे स्त्री — पुरूष समानतेचे पुस्करर्ते होते.आणि दलितांचे उदधार करते होते.
3) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कायदा व संविधान हे समाजसुधारणेचे शक्तीशाली माध्यम बनवले.

**उदिष्टे :—**

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे दलितांचे, वंचितांचे, स्त्री—पुरूष समानतेचे पुरस्करर्ते कसे होते याबाबत जाणुन घेणे.
२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजसुधारणा मुख्यता जातीव्यवस्थेचा नायनाट, समानता, स्वातंत्र आणी बंधुता यातत्वावर आधारीत होत्या.त्यांच्या समाजसुधारणा कार्याचा आभ्यास आढावा घेणे.
३) समाजातील प्रत्येक व्यक्तीला जात धर्म लिंग किंवा सामाजीक स्थिती या भेदांपासुन मुक्त करून सर्वांना सन्मानाने, समानतेने आणी न्यायाने जगण्याचा आधिकार कसा प्राप्त करून दिला याचा आभ्यासणे.
४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री सक्षमीकरण बाबत विचारांचा आभ्यास करणे.

५) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाचा प्रसार अस्पृश्यता निर्मुलन, स्त्रीयांचा सन्मान आणी सामाजीक न्यायासाठी अनेक प्रयत्न केले.याचां आभ्यास करणे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजसुधारणेसाठीचे कार्य :—**

**१.अस्पृश्यता निर्मुलन :—**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यता,जातीभेद आणी सामाजीक विषमतेच्या विरोधात लढा दिला.त्यांनी दलितांना हक्क व समानता मिळुन देण्यासाठी चळवळ उभारल्या.

**२.महाडच्या चवदार तळयाचा सत्याग्रह (२० मार्च १९२७) :—**

**महाडचा सत्याग्रह म्हणजे अस्पृश्यांच्या उद्धाराच्या चळवळीची सुरावात होय.त्यांच्यात जनजागृती करून संघटीत करण्याचे कार्य** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.त्यांनी महाड येथील चवदार तळयाचा प्रश्न हाती घेतला.त्याकाळी सार्वजनीक पाणवठयावर अस्पृश्यांना पाणी भरू दिले जात नव्हते.हीच परीस्थिती सातारा जिल्हयातील महाड येथील चवदार तळयाची होती.तेथे अस्पृश्यांना पाणी भरण्यास मज्जाव होता.या तळयावर हरीजनांना पाणी भरू दिले पाहीजे, अशी मागणी त्यांनी केली.बाबासाहेबांनी आपल्या बहुसंख्य अनुयायांसह चवदार तळयाचे पाणी प्राशान केले.महाडच्या तळयावरील सत्याग्रहाने अस्पृश्यांचा आत्मश्विास वाढला.

**३.मंदिर प्रवेशासाठी चळवळ :—**

महाराष्ट्रातील अनेक मंदिरे अशी होती की,ज्यात हरीजनांना दर्शनाकरीता प्रवेश नव्हता.म्हणुन बाबासाहेबांनी पुणे व नाशिक येथे मंदीर प्रवेशासाठी सत्याग्रह करण्याचे ठरविले.मार्च १९३० मध्ये नाशिक च्या काळा राम मंदिरात प्रवेशा साठी सत्याग्रह केला.शेवटी १९३५ मध्ये नाशिकचे काळा राम मंदिर अस्पृश्यांना दर्शनाकरीता खुले केले.

**४.मनुस्मृतीचे दहन :—**

महाड येथील सत्याग्रह परिषदेतच हिंन्दु समाज्याचा असलेला धर्म ग्रंथ मनुस्मृतीचे दहन करण्याचा निर्णय घेतला.या ग्रंथातील वचनांनी जाती व्यवस्था व अस्पृश्यतेच्या निर्बधांचे समर्थन होते.शुद्रांचे आत्मबल नष्ट करून त्यांची राजकीय,सामाजीक व आर्थिक गुलामगीरी कायम करणारी वचने यात होती.म्हणुन २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे दहन करण्यात आले.

**५.गोलमेज परिशदेत सहभाग :—**

१९३० मध्ये लंडन मध्ये भरलेल्या पहील्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचे प्रतिनीधी म्हणुन बाबासाहेब आंबेडकर हजन होते.परिषदेत अस्पृश्यांवर होणारे अन्याय,अत्याचार व त्यांची दु:खे प्रभाविपणे मांडली.अस्पृश्यांचे हीता संबंधीच्या रक्षणासाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली.सप्टेंबर १९३१ च्या दुस—या परिषदेत अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ दयावा की नाही या वर महात्मा गांधी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचेत मतभेद झाल्याने निर्णय होवु शकला नाही.सन १९३२ मध्ये इग्लंडचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनॉल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर करून बाबासाहेबांची वरील मागणी मान्य केली.

**६.पुणे करार :—**

लंडन मध्ये झालेल्या गोलमेज परिषदेत एकमत न झाल्याने इग्लंडचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनॉल्ड यांनी सन १९३२ च्या जातीय निवाडा प्रसिध्द केला.यातुन अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ दिल्याने अस्पृशांना हिंन्दुन पासुन वेगळे केले.असा आरोप महात्मा गांधीनी केला.म्हणुन त्यांनी प्राणांतिक उपोषन सुरू केले.याकाळात महात्मा गांधींची प्रकृतीची चिंता निर्माण झाल्याने कॉग्रेसच्या जेष्ठ नेत्यांनी एक योजना तयार केली त्यानुसार महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेत एक करार झाला.त्यास पुणे करार असे म्हणतात.त्यानुसार स्वतंत्र मतदार संघाचे कलम रदद करून अस्पृश्यांना राखीव मतदार संघ दिले.पुणे करारानंतर गांधीजींनी हरिजन सेवक संघ ही देश व्यापी संस्था उभी केली.

**७.राजकीय पक्ष संघटना :—**

देशाच्या राजकारणात प्रत्यक्ष भाग घेवुन दलितांचे दु:ख दुर करण्यासाठी स्वतंत्र मजुर पक्षाची स्थापना केली. त्यांनंतर अखिल भारतीय शेडयुल्ड कास्टस फेडरेशनची स्थापना केली.स्वतंत्र भारताच्या मंत्रीमंडळात कायदा मंत्री झाले.तर घटना समीतीतील मसुदा समितीत अध्यक्ष होते.२० जुलै १९२४ मध्ये बहिष्कृत हितकारणी सभा स्थापन

केली.१९४६ मध्ये पीपल एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली.अशा पक्ष व संघटनांची स्थापना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केली.

**८.वृत्तपत्रे व ग्रंथ संपदा :—**

सन १९२० मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी **मुकनायक** नावाचे वृत्तपत्र सुरू केले.सन १९२७ मध्ये बहिष्कृत भारत हे पाक्षिक सुरू केले.१९२८ मध्ये समता संघा तर्फे समता सुरू केले.या शिवाय जनता,प्रभुत्व भारत ही वृत्तपत्र चालविली.ह्या वेअर शुद्राज?,द अनटचेबल्स,बुध्द ॲण्ड हिज धम्म,द प्रोब्लम ऑफ रूपी,थॉटस ऑन पाकिस्तान इ.ग्रथांचे लेखन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.

**९.षिक्षणासाठी प्रयत्न :—**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचीत समाजातील लोकांना शिक्षणाचे महत्व पटवुन दिले.त्यांनी शिका,संघटीत व्हा आणी संघर्ष करा हा संदेश दिला.दलित विदयार्थ्यांना शैक्षणीक संधी मिळवुन देण्यासाठी त्यांनी अनेक संस्था स्थापन केल्या.

**१०.स्त्रियांच्या हक्कासाठी कार्य :—**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रि स्वातंत्र्यांचे प्रबल समर्थक होते.त्यांनी हिंन्दु कोट बिल तयार केले.त्यामुळे स्त्रियांना वारसा हक्क,संपत्तीचा अधिकार आणी समतोल नातेसंबंध यांचे संरक्षण मिळाले.

**११.धर्मान्तर :—**

हिंन्दु धर्माने अस्पृश्यांना न्याय दयावा याकरीता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व प्रकारचे प्रयत्न केले.तरी तेथील सवर्ण हिंन्दुच्या वृत्तीत फारसा फरक पडला नाही.या अनुभवावरून त्यांची अशी खात्री पटली की,सवर्ण हिंन्दु कडुन अस्पृश्यांना कधीच न्याय मिळणार नाही.त्यातुनच त्यांनी धर्मान्तिर करण्याचा निर्णय घेतला.त्यातुन १४ ऑक्टोंबर १९५६ रोजी नागपुर येथे आपले हजारो अनुयांयासह बौध्द धर्माची दिक्षा घेतली.धर्मान्तिरासाठी बौध्द धर्माची निवड करण्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे दुरदर्शित्व व राष्ट्र हीताची तळमळ यांचे दर्शन होते.अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त होण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संपुर्ण जिवन समर्पित केले.हा त्यांचा जिवनाचा उददेश होता.

**१२.सामाजिक आणी आर्थिक सुधारणा :—**

**अ.** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थीक विषमता कमी करण्यासाठी विविध योजना सुचवल्या.

**ब.** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या धोरणामुळे श्रमीकांना हक्क मिळाले.

**क.** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांनी कामगारांसाठी आठ तासांचा कामाचा दिवस लागु करण्यात आला.

**निश्कर्श :—**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य फक्त दलित आणी मागासवर्गीयांपुरते मर्यादीत नसुन त्यांनी समताधिष्ठीत समाज निर्माण करण्यासाठी सर्व समावेशक प्रयत्न केले.त्यांच्या कार्यामुळे आजच्या भारतात सामाजीक न्याय आणी लोकशाही मुल्यांचे महत्व आधोरेखीत झालेले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजसुधारणा विषयक कार्य हे भारतीय इतिहासातील मोलाचा दगड आहे.त्यांच्या प्रयत्नांनी भारतीय समता,बंधुता आणी स्वातंत्र यांसारख्या मुलभुत तत्वांना मुर्त स्वरूप दिले.त्यांच्या प्रयत्नांमुळे सामाजीक समतेचा पाया रचला गेला.वंचीत समाजाला सशक्त करण्याचे काम केले. राजकीय आणी सामाजीक हक्कांचे संवर्धन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजात मुलभुत बदल घडुन आण्यासाठी सामाजीक,आर्थिक आणी राजकीय मुदयांवर व्यापक विचार केला.त्यांचे जिवन आणी विचार आधुनिक समाजासाठी नेहमीच प्रेरणादायी राहतील.येवढेच खरे.

**संदर्भ ग्रंथ सुची :—**


१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजीक विचार :— शंकरराव खरात
२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवन व कार्य :— लक्ष्मण गायकवाड
३) फुले—आंबेडकर आणी स्त्री मुक्ती चळवळ —ज्योती लांजेवार
४) जातीचे निर्मुलन :— डॉ.भिमराव रामजी आंबेडकर
५) आंबेडकरी चळवळ :— य.दि.फडके
६) डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचारमंथन :— डॉ.बा.ना.कुबेर
७) मनोहर यशवंत तत्वज्ञानी :— डॉ.बाबासाहेब आंबेडकर पदधगंधा प्रकाशन पुणे
८) अधुनिक भारताचा इतिहास :— श्री.साईनाथ प्रकाशन नागपुर वैध सुमन कोठेकर शांता

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राष्ट्रवादाची संकल्पना

**प्रा. डॉ. दत्तात्रय मुकुंदराव ढवारे**

सहयोगी प्राध्यापक तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री तुळशीरामजी जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, वाशिम.

**प्रस्तावना :—**

सामान्यत: १९ व्या शतकापासून 'राष्ट्रवाद' या संकल्पनेचा प्रभाव जगभर जाणवु लागला आहे. 'राष्ट्रवाद' ही केवळ एक मानसिक संकल्पना असल्याचे पाश्चात्य अभ्यासक प्रो. झिरमन यांनी म्हटले आहे. अनेक देशामधील विचारवंतांना धर्म, शिक्षण, कला, साहित्य, संस्कृती व इतिहासाच्या पुनर्माडणीसाठी 'राष्ट्रवाद' हे प्रभावी साधन वाटत आहे.'राष्ट्रवाद' या संकल्पनेला देशकाल परिस्थितीनुसार अनेक अर्थछटा लाभल्या आहेत. भारतीय समाजात मूलभूत परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विशेष प्रयत्न केलेले आहेत. त्यांच्या लोकशाही समाजात नवी समताधिष्ठित समाजरचना आहे. लोकशाहीच्या विकासामध्ये शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण असु नये, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या तत्वावर आधारित लोकशाही असावी. समाजातील विविध घटकांच्या सामाजिक गरजांची पूर्तता करणे हेच कायद्याचे कार्य असावे, इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारत स्वतंत्र व्हावा असे त्यांना वाटत होते. पण त्याहीपेक्षा शेकडो वर्षापासून सांस्कृतिक, सामाजिक आणि धार्मिक गुलामगिरीमध्ये खितपत पडलेला दलित, शोषित समाजसुध्दा स्वतंत्र झाला पाहिजे ही त्यांची इच्छा होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय समाजव्यवस्थेच्या असमतोलाची आणि गुण मर्यादांची प्रगल्भ जाण होती. त्यांच्या मते केवळ भौगोलिक आकार असलेला 'देश' म्हणजे 'राष्ट्र' नव्हे, समान भाषा, वंश, जात, श्रध्दा व अस्मिता म्हणजे 'राष्ट्र' नव्हे. उलट 'राष्ट्र' ही एक वस्तुनिष्ठ समूहभावना आहे. ती सद्सद्विवेक शक्तीची भावना आहे. वंश, भाषा, भुगोल व संस्कृती या गोष्टी निखळ राष्ट्रीयत्वाच्या प्राथमिक गरजा नव्हेतच. मानवी समूहजीवनातील एकत्वाची व आपलेपणाची भावना हाच राष्ट्रवादाचा मूलाधार आहे असे ते मानत.

**राष्ट्रवाद आणि डॉ. आंबेडकर :—**

कोणतेही राष्ट्र जोपर्यंत सामाजिक दृष्टया एकत्र येत नाही तोपर्यंत ते मजबूत होऊ शकत नाही. धर्म आणि राष्ट्र यांच्यातील सुरेख संतुलन आंबेडकरांना चांगलेच ठावुक होते. त्यांना माहित होते की, धर्माच्या उदयामुळे एक प्रकारची वांशिक ओळख बळकट झाली. त्यामुळे धर्माला राष्ट्रीय जाणीवेशी जोडण्याचा पुरस्कार आंबेडकर करतात. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले असले तरी, डॉ. बाबासाहेब हे त्या भारताच्या ख—या सुपुत्रापैकी एक आहेत ज्यांनी स्वातंत्र्याच्या अनेक वर्षापूर्वी मजबूत भारताचा पाया रचला, एकीकडे संपूर्ण स्वातंत्र्य चळवळ राजकीय स्वातंत्र्याच्या मागणीकडे झुकलेली असतांना त्याचवेळी डॉ. बाबासाहेबांचे ध्येय भारताला केवळ राजकीयदृष्टया स्वतंत्र करणेच नव्हे तर, सामाजिक आणि आर्थिकदृष्टया बळकट राष्ट्र म्हणून शतकानुशतके उभे राहणे हे होते. डॉ. बाबासाहेबांनी आपला संपुर्ण जीवनप्रवास हेच ध्येय डोळयासमोर ठेवुन करण्याचे ठरविले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय समाजातील अशा बौध्दिक नेत्यापैकी एक आहेत. ज्यांना स्वातंत्र्य लढयात हे समजले होते की, एक मजबुत राष्ट्र निर्माण करण्यासाठी जातीवाद, हुकुमशाही आणि जातीयवादापासुन मुक्तता आवश्यक आहे. सामाजिक — आर्थिक विषमतेने भारतीय समाजाला अशा प्रकारे ग्रासले होते की, भारत राजकीयदृष्टया स्वतंत्र झाला तरी जातीवाद, हुकुमशाही आणि जातीयवादाची कीड त्याला दुस—या फाळणीकडे घेवुन जाईल. खरे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद भौगोलिक सीमापेक्षा समानतेवर आधारित आहे. त्यांनी वर्तमान यशावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी भविष्याबद्दलची भीती दुर करण्यासाठी कठोर परिश्रम केले. भारतीय समाजात पसरलेला तीवृ असंतोष त्यांना चांगलाच समजला होता. त्यामुळेच राष्ट्र टिकवण्यासाठी आणि असंतोष संपवण्यासाठी त्यांनी आवाज उठवला. यासाठी एकीकडे ते त्यांच्या काळातील सर्वात लोकप्रिय नेते गांधीशी भिडत असतांना, दुसरीकडे स्वातंत्र्यांनंतरच्या संविधान सभेला संबोधित करतांना ते स्वत:ला अस्पृश्यांचे नेते म्हणून अभिमानाने घोषित करतात.

थॉटस् ऑन पाकिस्तान, स्टेटस् ॲन्ड मायनॉरिटीज, अनहिलेशन ऑफ कास्ट, रानडे, गांधी ॲन्ड जिना इत्यादी आपल्या ग्रंथामधून आणि प्रसंगोपात्त केलेल्या भाषणामधुन आंबेडकरांचे राष्ट्रवादासंबंधीचे विचार व्यक्त झाले आहेत. राष्ट्रवाद ही एक व्यक्तिनिष्ठ भावना असून तिचा संबंध मानवी मनाशी आहे. तिचे सामर्थ्य अगाध असुन तिची मुळे बळकट आहेत. मोठ – मोठाली साम्राज्येही उलथुन पाडु शकते आणि कितीही प्रयत्न केला तरी तिचे उच्चाटन होणे अशक्यप्राय आहे. कुणी तिला विवेकशुन्य प्रवृत्ती म्हणो वा शुध्द भ्रामक कल्पना म्हणो एक सत्य उरतेच ते म्हणजे ती एक अतिप्रबल शक्ती आहे.

डॉ. आंबेडकरांच्या राष्ट्रवादाचा उगम गोरगरिबाबद्दल व दलित अस्पृश्याबद्दल त्यांना असलेल्या कळवळयात दिसुन येतो. समान संधी व मानवी हक्क अनेक शतकापासून नाकारले गेल्यामुळे मानवी अस्तित्वालाही पारखे झालेले हे वर्ग दास्यातून व दारिद्र्यातून मुक्त झाल्याखेरीज राष्ट्र– जीवनाशी समरस होवु शकणार नाहीत अशी आंबेडकरांना खात्री होती. तिन्ही गोलमेज परिषदामध्ये या उपेक्षितांचे अंतरंग आंबेडकरांनी उघड केले. त्यांची स्थिती केवळ स्वातंत्र्य मिळुन सुधारणार नाही हे डॉ. बाबासाहेबांना ठावुक होते. म्हणूनच स्वातंत्र्याची एकतर्फी मागणी करणा–या कॉंग्रेसच्या प्रयत्नांशी ते सहयोग देवु शकले नाहीत. परकीय वर्चस्वाबरोबरच अंतर्गत छळाच्याही विरूध्द डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आवाज उठवला.

राष्ट्राचे स्वातंत्र्य हे जर खरेखुरे स्वातंत्र्य व्हायचे असेल तर त्या राष्ट्रातील सर्व वर्गांना विशेषकरून दास्यात खितपत पडलेल्या निम्न वर्गांना प्राप्त झाले पाहिजेत. गरजा, भय, छळ आणि शोषण या सर्वापासून स्वतंत्र असलेली जनताच स्वातंत्र्याला खरा अर्थ निर्माण करून देत असते. न्याय तत्वाच्या आधारे सामाजिक व आर्थिक नियमनांना समाजसापेक्ष बदलण्याची धमक असलेले शासन जनतेला स्वातंत्र्याचा प्रत्यय देवु शकते.

राष्ट्राचे राकीय व सामाजिक ऐक्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अत्यंत मोलाचे वाटत होते. या राष्ट्राची सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक परिस्थिती फारशी समाधानकारक नव्हती. हा समाज या सर्वच क्षेत्रात गटोपगटात विदीर्ण झाला होता. तरीपण योग्य त्या काळानंतर व उचित प्रयत्नानंतर ही परिस्थिती पालटू शकेल अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खात्री होती. राष्ट्रैक्याच्या या वाटचालीत पहिला अडथळा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते जातीयता हा होता. राष्ट्रैक्य व सहजीवनातील आनंद या दोहोनां जातीयता मारक ठरते. संकुचितपणा व समाज विघातक वृत्ती यांची जोपासना ती करते. एखाद्या गटाचे संरक्षण बेकायदेशीर व बळजबरीच्या मार्गाने करणे एवढेच तिचे प्रयोजन असते. सामाजिक प्रगती व राजकीय स्थैर्य या दोन्ही गोष्टी जातीयतेमुळे व जमातवादामुळे धोक्यात येवु शकतात. फुटीरतावाद, प्रांतवाद, भाषावाद, जातीयवाद या सर्वांच्या विरूध्द आंबेडकरांनी युध्द पुकारले होते. जातीयतेने हा देश सामाजिक व राष्ट्रीयदृष्टया दुर्बल झाला आहे असे त्यांचे निदान होते. ते म्हणतात, "सार्वजनिक वृत्तीने, जातीयतेने ठार मारले आहे. सार्वजनिक सह्रदयता तिने नष्ट केली आहे. लोकमत तिने अशक्य करून सोडले आहे. सद्गुण आज जातीला चिकटला असून नीतिमत्ताही जातीभावनेने जखडुन टाकली आहे. सत्पात्राबद्दल सहानुभूती नाही. गुणवंताचे कौतुक नाही, गरजवंतासाठी औदार्य नाही. औदार्य आहे पण त्याचा प्रारंभ आणि शेवटही जातीतच होतो. सहानुभूती आहे पण ती अन्य जातीयांसाठी नाही, अशी ही जातीयता राष्ट्रवादाच्या विकासाआड येते याबद्दल त्यांच्या मते राष्ट्रीयत्व म्हणजे जातीय भावनेचा अभाव ... जात, वर्ण आणि संप्रदाय यांच्याविना सामाजिक बंधुता प्रत्यक्षात आणणे आणि समाजात सुसंवाद निर्माण करणे म्हणजेच राष्ट्रवाद ! "

डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेले राष्ट्रैक्य हे केवळ राजकीय ऐक्य नव्हते तर आत्मिक व सांस्कृतिक स्वरूपाचे ऐक्य त्यांना हवे होते. मनाच्या युतीतून आकारास येणारे सामाजिक ऐक्य हवे होते. भातृभावाच्या प्रखर भावनेने परस्परबध्द झालेला लोकसमुदाय अशी त्यांनी राष्ट्राची व्याख्याच केली आहे.

डॉ. बाबासाहेबांचा राष्ट्रवाद हा अत्यंत धर्मनिरपेक्ष, पुरोगामी व बुध्दीप्रामान्यवादी होता. परकीय राजवटीइतकेच भारतीय सनातनी कटट्रपणाला त्यांनी धारेवर धरले आहे. प्राचीन भारतीय परंपराचे पुनरूज्जीवन राष्ट्रवादाच्या नावाने करणे त्यांना नामंजूर होते. स्वदेशाच्या भुतकाळाबद्दल योग्य तो अभिमान बाळगूनही इथल्या सर्वच जुन्या गोष्टींना सोन्याचे मूल्य देण्याइतपत अतीतगौरवाने त्यांना झपाटले नव्हते. अतिरेकी राष्ट्रवादास ते प्रतिकुल होते. कारण असा राष्ट्रवाद सहजासहजी अविवेकी होऊन असहिष्णुतेस जन्म देतो. परिणामी ते मानवी

कल्याणाचे साधन होऊ शकत नाही. अशी डॉ. आंबेडकरांची विचारसरणी होती. पूर्वगृहदुषित अमानुष, आक्रमक आणि असहिष्णु असा राष्ट्रवाद त्यांना नको होता. राष्ट्रवादाने धर्म वा प्रादेशिक देशभक्तीच्या सरहद्दीवर थांबु नये असे ते म्हणतात.

हिंदु राष्ट्रवाद वा मुस्लिम राष्ट्रवाद या संज्ञाच त्यांना विपर्यस्त वाटतात. बहुसंख्य असणा—यांच्या धर्माशी राष्ट्रवादाची निरगाठ घालणे आंबेडकरांना मान्य नव्हते. अल्पसंख्याकांनी सत्तेत भागीदारी मागितली की त्याला जमातवाद म्हणायचे आणि बहुसंख्याकांनी सत्तेचा एकाधिकार चालविला की त्याला मात्र राष्ट्रवाद म्हणायचे हे आंबेडकरांना मंजूर नव्हते. याला ते “राष्ट्रवादी पिसाटपणा” संबोधतात. त्यांच्या मते कोणत्याच धर्माला या राष्ट्राचे राष्ट्रवादी व धर्मनिरपेक्ष स्वरूप हिरावुन घेण्याचा हक्क नाही. सर्व धर्मांना येथे समान स्थान आहे. राष्ट्रभक्तीच्या व राष्ट्रवादाच्या नावाने दहशतवादी हालचाली करणे, व्यक्तीपुजेचे देव्हारे माजवणे, गुलामगिरीला या ना त्या प्रकारे टिकवुन ठेवणे याही गोष्टींना डॉ. बाबासोबांनी विरोध केला होता.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद सामाजिक ऐक्याशी जोडलेला आहे :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद प्रत्यक्षात सामाजिक एकात्मतेच्या भावनेने गुंफलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा असा विश्वास बाहे की कोणतेही राष्ट्र सामाजिकरित्या एकत्र आल्याशिवाय ते मजबुत होऊ शकत नाही. येथे हे अधिक स्पस्ट होते की, आंबेडकर राष्ट्रवाद आणि सामाजिक ऐक्य यांना एकमेकांना पूरक मानतात. राष्ट्रवादासाठी सामाजिक ऐक्य आवश्यक आहे आणि सामाजिक ऐक्यासाठी राष्ट्रवादी विचारधारा ही महत्वाची गरज आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लोकांनी उपासनेच्या भावनेच्या पलीकडे गुणांची उपासना करावी अशी अपेक्षा होती. वीर निर्माण करण्यापेक्षा वीरता निर्माण करणा—या गुणांची उपासणा करणे त्यांनी चांगले मानले. आंबेडकरांचा राष्ट्रवाद हा व्यक्तीपुजेवर आधारित राष्ट्रवाद नाही. खरे तर व्यक्तीपूजेवर आधारलेला राष्ट्रवाद म्हणजे राष्ट्रवाद नसुन व्यक्तिवाद आहे हे आंबेडकरांनी वास्तव चांगलेच समजून घेतले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद हा विवेकशील, मानवतावादी, इहवादी स्वभावाचा होता. त्यांनी अध्यात्मा ऐवजी सामाजिक नितीला, धर्म निष्ठेपेक्षा विवेकनिष्ठेला, वंश, जन्म, भाषा, अस्मिता या खुज्या घटकाऐवजी उदात्त मानवनिष्ठेला महत्व देणारा इहवादी राष्ट्रवाद, वंशश्रेष्ठत्वाला, भाषिक अहंकाराला समुळ नकार देत समाजातील सकळांच्या कल्याणाला गती देणारा उदात्त राष्ट्रवाद मांडला. समकालीन काळात वैचारिक, सांस्कृतिक अराजकाच्या काळात त्यांचे राष्ट्रवादी चिंतन सर्वासाठीच मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरले आहेत.

**संदर्भ :—**

१) राव. बी. एस., भारतीय सविधनाची शेती., खंड ४, १९६८, पृ. ९४४.
२) भोळे. भा. ल., भारतीय राजकीय विचारवंत., पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर. जाने—२००८
३) निंबाळकर. वामन., बाबासाहेबांचे राज्यघटनेतील योगदान.,. दुसरी आवृत्ती— २०१३.
४) चक्रवर्ती, विद्या/पांडे,राजेंद्र कुमार.,आधुनिक भारतीय राजकीय विचार., डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. प्रथम आवृत्ती—२०१३.
५) भोळे. भा. ल., आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
६) चंद, रमेश., डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जीवन आणि ध्येय, योजना., मे १९९१. पृ.क्र. २८
७) नितनवरे, अनिल., बाबासाहेबांचा विवेकनिष्ठ राष्ट्रवाद., दै. सकाळ. दि. ६ डिसेंबर २०२७
८) मुणगेकर, भालचंद., डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राष्ट्रवाद., दै. लोकमत दि. १४ एप्रिल २०२०
९) कसबे, रावसाहेब., आंबेडकरवाद: तत्व आणि व्यवहार., सुगावा प्रकाशन., पुणे.२००४.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे स्त्रियांच्या शिक्षणाविषयीचे योगदान

**प्रा डॉ. साधना डी. वाघाडे**
सहाय्यक प्राध्यापक
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान पदवी महाविद्यालय, पेट्रोल पंप (जवाहरनगर) ता.जि. भंडारा

**प्रास्ताविक**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचा स्त्रीवादी विचारांवर पडलेला प्रभाव व त्यातून निर्माण झालेली समाजपरिवर्तनाची चळवळ ही विसाव्या शतकात अतिशय महत्वपूर्ण अशी चळवळ होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शोषीत स्त्रीयांबरोबरच भारतीय बहुजन स्त्रीयांविषयी आपली भूमिका स्पष्ट केली होती. त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून चळवळ उभारून स्त्रीयांना मानसन्मानाचे स्थान मिळवून देण्यांत सर्वात महत्वपूर्ण भुमिका बजावली होती. परंपरागत समाजव्यवस्था व हिंदूधर्मशास्त्राने स्त्रीयांना ज्ञान संपादनाचा अधिकार नाकारला होता. हिंदुधर्मव्यवस्थेने स्त्रीला विश्वासास अपात्र, दुष्ट, चंचंल, अविचारी आणि गौण मानले होते. स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे समाजाच्या दृष्टीने भ्रष्टाचार मानला जात होता. एवढेच नव्हे तर स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे अकाली वैधव्य समजले जात होते. अगदी स्त्रीयांनी पायात चपला घालने सुध्दा अधर्म मानला जात होता. वयाने मोठया असलेल्या व्यक्तीसमोर पतीशी वा अन्य पुरूषाशी बोलणे देखील असभ्यपणा समजला जात होता. स्त्री च्या बुध्दीने वागणे म्हणजे सर्वनाश असाच समज होता. स्त्रीला ज्ञान देणे म्हणजे वेडयाच्या हाती कोलती देण्यासारखेच आहे असा त्याकाळी समज होता. भारतीय समाज व्यवस्थेत धर्म आणि परंपरा यांनी स्त्रीयांना पूर्णपणे गुलाम बनविले होते. तेव्हा मानवतेला अपमानीत करणारी आणि संपूर्ण देशालाच दुबळी करणारी अन्यायकारक समाजव्यवस्था जर उलथवून पाडायची असेल तर शिक्षण हे क्रांतीचे पहिले पाऊल आहे असे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. म्हणून त्यांनी स्त्रीयांच्या शिक्षणविषयक विचारांना चालना देऊन भारतीय स्त्रीयांना शैक्षणिक प्रवाहात आणण्याचे महान कार्य केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक मोठे, महान व्यक्ती होते. अखिल भारतीयांच्या आणि विशेषतः दलित वर्गातील तसेच वर्गीकृत जातीतील पुरूषांच्या आणि समस्त वर्गातील स्त्री जातीच्या सुधारणे विषयी आणि उत्थानाविषयी त्यांचे ध्येयवादी मत सतत जागरूक होते.

स्त्री स्वातंत्र्याचे कैवारी असणाऱ्या या प्रकांड पंडिताला कळून चुकले की, कोणत्याही समाजाची उन्नती करावयाची असेल तर, त्या समाजात शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होणे आवश्यक आहे. कोणत्याही समाजातील स्त्रीचा दर्जा हा त्या समाजाच्या सुधारणेचा मापदंड असतो. म्हणूनच दलित समाज परिवर्तनाचे वेध लागलेल्या बाबासाहेबांनी स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करतांना अनेक सभा– संमेलनातून, परिषदातून विशेषतः महिला परिसंवादातून, तसेच आपल्या लिखाणातून ,हिंदू कोड्बिलाच्या माध्यमातून, राज्यघटनेतून स्त्रीपुरूष समानतेचा पुरस्कार करून, स्त्री शिक्षणावर प्रत्यक्ष– अप्रत्यक्ष भर दिला. असणि मुंबई, औरंगाबाद, पंढरपूर येथे तर शिक्षणसंस्था व वसतिगृहाची स्थापना करून आपले स्त्री शिक्षण विषयक स्वप्न साध्य करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या उक्तीतून आणि कृतीतून दलित समाजाच्या उन्नतीचा आणि स्त्री शिक्षणाचा अन्योन्य संबंध त्यांना अभिप्रेत होता..

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्त्री शिक्षणविषयक कार्याचा विचार करतांना स्त्रीच्या सर्वकष शोषणाविरूध्द, धार्मिक पातळीवरचा पहिला विरोध दर्शवून समाजक्रांती करणारा, स्त्री स्वातंत्र्याचा पहिला उद्‌गाता भगवानबुध्द आणि स्त्री स्वातंत्र्याचा महान प्रचारक व खंबीर पुरस्कर्ता महात्मा ज्योतिबा फुले यांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. कारण आपल्या या दोन गुरूंचा आदर्श डॉ. बाबासाहेबांनी त्यांच्या स्त्री शिक्षणविषयक कार्यात निश्चितच प्रेरक ठरला असावा.

**शिक्षणातून समाजक्रांती**:– महात्मा ज्योतिबा फुले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या गुरूस्थानी मानीत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्योतिबांचा शिक्षण संदेश गिरवित कायम ठेवला आणि शिका, संघटित व्हा, संघर्ष करा असा संदेश दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रचंड प्रमाणांत वाचन, मनन,

चिंतन केले. आपले विचार आपल्या ओजस्वी वाणीतून लोकांसमोर ठेवले व त्यांचे विचार लोकांना पटत होते. स्वाभाविकच त्यांना प्रचंड अनुयायी वर्ग लाभला. स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाची निर्मिती करीत असतांना त्यांनी स्त्रीया व शुद्रातीशूद्रांच्या शिक्षणासंबंधी, विकासासंबंधी अनेक तरतूदी करून ठेवल्या. डॉ. बाबासाहेबांच्या मते ''स्त्रीया व शुद्रातीशूद्र हे शिक्षण घेतल्यानंतर वाचू लागतील, वाचल्यामुळे त्यांना हिंदू धर्मातील अनेक बाबींचा उलगडा होईल हिंदू धर्माने स्त्रीया व शूद्रातिशूद्रांना, शिक्षण घेण्याचा अधिकार का नाकारला होता त्याचा शोध लागेल आणि तो शोध लागल्यामुळे स्त्रीया व शूद्रातिशूद्रांना शिक्षण घेण्याचा अधिकार नाकारला दैव, धर्म या संकल्पनेतून स्वतःची मुक्तता करून घेत विज्ञानवादी, बुध्दीप्रामाण्यवादी होत स्वतःच्या व समाजाच्या विकासाचा मार्ग सुकर करतील.'' शिक्षणाच्या बाबतीत त्यांचे सूत्र हे 'शिक्षणातून समाजक्रांती' असे होते. व अज्ञान दूर करून विकासाचा मार्ग वृध्दींगत करणारे ठरले आहे.

**स्त्रीयांवरील अत्याचाराला पायबंद घालण्यासाठी शिक्षण आवश्यक** :–

महाड संग्राम परिषदेच्या वेळी त्यांनी पांच हजार स्त्रीयांची सभा घेतली या सभेत त्यांनी महिलांना उद्देशून जो उपदेश केला तो अतिशय सोपा, साधा, परंतू सारगर्भ अशा प्रकारचा होता. एक महान पंडित आणि विद्वान सोपे बोलू शकत नाही हा समज त्यांनी खोटा ठरविला होता. महिलांच्या शिक्षणाबाबत ते म्हणतात ''कोणतीही अंमगल गोष्ट होऊ देऊ नका. मेलेल्या जनावरांचे मांस खाणे बंद करा. दारूबाज नवऱ्यांना, भावांना अथवा मुलांना जेवायला घालू नका. मुलींना शिक्षण दया. ज्ञान व विद्या या गोष्टी स्त्री यांनाही आवश्यक आहेत. ''पुत्र व्हावा ऐसा गुंडा ज्याचा तिन्ही लोकी झेंडा अशी महत्वकांक्षा ठेवून जगा'' अशा प्रकारचे मौलिक विचार त्यांनी पेरले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे दलित परिषदेचे आयोजन केले होते.

बाबासाहेबांनी स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला. 'शिका संघटित व्हा, संघर्ष करा' या संदेशात स्त्रियांचा संदर्भ महत्वाचा होता. त्यांनी अनेक महिला परिषदांमधून स्त्री शिक्षणाविषयीचं महत्व समजावून सांगितलं 1927 च्या अखिल भारतीय बहिष्कृत परिषदेत स्त्री शिक्षणविषयक ठराव मांडला. त्यात त्यांनी ज्या ठिकाणी शाळा असतील, तेथील लोकांनी मुला–मुलींना शिक्षण दिलंच पाहिजे अशी पंचांनी ताकीद द्यावी, व शाळा सोडल्यांस दोषांस पात्र व्हावं लागेल असा नियम करावा. व्यक्तीच शिक्षण, उच्च शिक्षण आणि शिक्षणाच्या विविध पैलूंवर मार्गदर्शनपर लिखाणं केलं. स्त्रीवादी भूमिकेतून स्त्रियंाच नवे शास्त्र मांडले. लेखणरूपी नवं शस्त्र स्त्रियांच्या हाती दिलं. बाबासाहेबांनी स्त्रियांमधला स्त्री म्हणून जगण्याचा स्वाभिमान जागृत केला. कारण एक स्वाभिमान जर सोडला, तर माणूस आणि जनावरं यांत कोणताही फरक उरत नाही. माणसासारख जगायच असेल, तर स्त्रीला स्वाभिमानी असणं गरजेच होतं. स्त्री–पुरूष हे दोघंही समान आहेत. किंबहूना स्त्री ही पुरूषापेक्षा श्रेष्ठचं आहे. हे बाबासाहेबांनी वारंवार भाषणाव्दारे पटवूनं दिलं. नंतर जेव्हा महिला आंबेडकरी चळवळीच्या सभेला उपस्थित राहू लागल्या, तेव्हा खरं बाबासाहेबांच कार्य सुरू झालं. महिलांनी त्यांच्या भाषणानं स्वतःला तयार केलं. मनोबल वाढविलं. समाजाला आपली गरज आहे, याची त्यांना जाणिव होऊ लागली, म्हणून स्त्रीयां समाजकार्यांत बाबासाहेबाबरोबर सामील होऊ लागल्या व आपोआपचं स्त्रीची स्वतःची प्रगती होऊ लागली. आजची स्त्री आपण बघतो आहे ती कशी धैर्यवान, हिम्मतवान, कर्तृत्ववान आहे, ते बाबासाहेबांच्या मेहनतीच फळ आहे.पंतप्रधान, राष्ट्रपतीपदापर्यंत महिलांनी मजल मारली, हे बाबासाहेबांच कर्तृत्व आहे.

पूर्वी स्त्रियांना कसलेही अधिकार, सवलती नव्हत्या, त्या मिळवून देण्यांत बाबासाहेबांचा सिंहाचा वाटा आहे. कारण त्यांना माहिती होतं की, जी लढाई आपण लढत आहोत त्यांत मनुष्यबळ महत्वाचे आहे. फक्त पुरूषांनी किंवा फक्त महिलांनी समोर येऊन चालणार नाही. हया स्पृश्य–अस्पृश्यांच्या लढाईमध्ये स्त्री–पुरूष यांनी एकत्र आलं, तरच आपण यशस्वी होऊ. हे बाबासाहेबाच मत होतं. मग ते मागासवर्गीय असो अथवा ओबीसी, बाबासाहेबांनी महिलांना धैर्यवानं बनविलं. त्यांच राहणीमान, आचार–विचार सुधारले व त्यामागचं महत्वही पटवून दिलं. बाबासाहेबांच्या विचारांचा महिलांवर एवढा प्रभाव पडला की, जेथे एक किंवा दोन महिला सभेला यायच्या तेथे पन्नास साठ येऊ लागल्या. बाबासाहेब म्हणायचे ,'प्रपंचातील अडचणी स्त्री व पुरूष मिळून सोडवितात ना, त्याचप्रमाणं समाजातील, संसारातील अडचणी मिळून सोडविल्या पाहिजेत.' बाबासाहेबांनी समता, स्वातंत्र्य आणि सामाजिक न्यायावंर आधारलेल्या संविधानाच्या माध्यमानं स्त्रियांना सर्वांगिण विकासाची सुवर्णसंधी प्राप्त करून देऊन उत्तुंग आकाशात मुक्त भरारी

घेण्याचं मनोबल दिलं आहे. परिणामी आज स्त्री प्रत्येक क्षेत्रात दैदिप्यमान असं यश संपादन करून आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवित आहे.

**डॉ. आंबेडकरांचे स्त्री विषयीचे वैचारिक भाष्य :–**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मतानुसार स्त्री ही पुरूषा इतकीच आकलनशक्ती व बुध्दी सामर्थ्य असलेली पुरूषांची सहधर्मचारिणी आहे. पुरूषांच्या प्रत्येक कामात तिला भाग घेण्याचा अधिकार आहे. स्त्री ही जशी भाग्यशाली गृहलक्ष्मी आहे तशीच समाजाला सुसंस्कार देणारी समाजधारिणीही आहे. पुरूषांच्या बरोबरीने स्त्रीला सुध्दा राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक हक्क अधिकार मिळावयांस पाहिजेत असे ते नेहमीच म्हणत. स्त्रीला कोणतेही कार्य कठीण नाही.कोणत्याही चांगल्या गोष्टी ती करू शकते. तिने ठरविले तर ती अनिष्ट रूढी, वाईट परंपरा दुर सारू शकेल. या करिता तिने शिक्षण घेऊन अज्ञान, अंधश्रध्दा दुर साराव्यात. यामुळे तिच्या मुलाबाळाची येणाऱ्या पिढीची दुरावस्था दुर होईल.पर्यायाने समाज प्रगती पथावर सरसावेल असे ते म्हणत.

सुधारलेल्या जातीतील स्त्रीयांप्रमाणेच इतर मागासवर्गीय समाजातील स्त्रीयांनी शिक्षण घ्यावे,स्वच्छता राखावी, पती दारू पित असेल, व्यसनी असेल, तर त्याला विरोध करावा. घरात जुगारी, दारूडया पतीला प्रवेश देवू नये.राष्ट्र कार्यात स्त्रीयांनी सहभाग घ्यावा असे डॉ. आंबेडकर नेहमी म्हणत.

**स्त्री स्वातंत्र्याकरिता राज्यघटनेत केलेली तरतुद**

भारतीय स्त्रीयांना समान हक्क व व्यक्ती स्वातंत्र्य दिल्याशिवाय त्यांची उन्नती होणे अशक्य आहे. हे ओळखून डॉ. आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत सर्व महिलांना पुरूषांच्या बरोबरीने हक्क व अधिकार मिळवून दिले. राष्ट्राची सार्वभौम सत्ता पुरूषाप्रमाणेच स्त्रीयांच्याही हातात असावी हे गृहीत घेवून स्त्रीयांनाही मतदानाचा अधिकार मिळवून दिला. राज्यघटनेव्दारे स्त्री पुरूष समानता, नोंदवून राजकारणांत सर्वांना समान संधी दिल्यामुळे भारतीय स्त्रीया सरपंच, सभापती, आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री, राज्यपाल, पंतप्रधान, राष्ट्रपती अशी सन्मानाची पदे भूषवू शकतात. राज्यघटनेतील 16 व्या कलमान्वये डॉ. आंबेडकरांनी अशपृष्यता निर्मूलनाचा कायदा करून मागासवर्गीय समाजातील स्त्रीयांना सन्मान प्राप्त करुन दिला. 29 व्या कलमानुसार भारतीय स्त्रीयांना कोणत्याही शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेवून शिक्षण घेता येते. तर 30 व्या कलमानुसार पुरूषाप्रमाणेच शैक्षणिक संस्था उघडून शिक्षण प्रसार करू शकतात. डॉ. आंबेडकरांनी लिहिलेल्या राज्यघटनेमुळे हे शक्य झाले.

**स्त्रीयांच्या शिक्षणाकरिता डॉ. आंबेडकरांनी केलेले कार्य–**

डॉ. आंबेडकरांनी 8 जूलै 1945 रोजी पिपल्स एज्युकेशन सोसायटींची स्थापना केली. व त्याव्दारे मुंबईला सिध्दार्थ महाविद्यालय उघडले. 1 सप्टेंबर 1951 ला औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची कोनशिला बसविली. हया महाविद्यालयाव्दारे भारतीय विद्यार्थिनींना मुक्त वातावरणांत अध्ययन व संचार करू देण्याचा हा क्रांतीकारक उपक्रम होता. डॉ. आंबेडकरांनी तत्कालिन जनतेमध्ये प्रचार करून वैयक्तीक भेटी घेवून पालकांना आपल्या मुलींना हया महाविद्यालयांत पाठविण्यांस प्रवृत्त केले. मूलींसाठी महाविद्यालयातर्फे स्वतंत्र बसचीही व्यवस्था करण्यांत आली. विद्यार्थीनींना राहण्याकरिता वसतीगृह उभारले. डॉ. आंबेडकरांमुळे भारतात सहशिक्षणाला प्राधान्य मिळाले.

**निष्कर्ष** – महिलांनी शिक्षित व्हावे, स्त्री पुरूष समानता यावी, स्त्रियांना समान न्याय व समतेची वागणूक मिळावी, तिला स्वाभिमानाने व सन्मानाने जगता यावे, यासाठी डॉ. आंबेडकरांनी घटनेत स्त्रियांना अनेक अधिकार बहाल केले आहेत. हिंदू संस्कृतीत स्त्रियांना हिन वागणूक दिली जायची, त्याचा विरोध करण्यासाठी त्यांनी हिंदू कोड बिल लिहिले होते. बाईला माणूस म्हणून वागणूक दिली जावी, हाच मतितार्थ त्या बिलात होता. हे बिल एकवादळ निर्माण करून गेले. अज्ञानामुळे महिलांनीच त्याचा विरोध केला, हा इतिहास आहे. बाबासाहेबांना यासाठी खुप मानसिक यातनातून जावेलागले. समाजव्यवस्थेत बदल घडवून आणण्याचे तसेच पुरूषीवृत्तीच्या पुरूषांना सरळ करण्याचे सामर्थ्य व अन्याय निवारण याकरिता 'आज महिला हिंसाचारविरोधी कायदा 2005', ''राष्ट्रीय व राज्य महिला आयोग'' उद्यांस आलेले आहे. स्त्रियांना वारसा हक्क, पोटगी, घटस्फोट, दत्तक, पालकत्व हे सर्व फक्त हिंदू कोड बिलातून घटनेत आलेले आहे.नवे पंचायत राज, 73 वे संशोधन हे हीदू कोड बिलाचे व घटनेत स्त्रियांना दिलेल्या अधिकाराचे वास्तव रूप आहे. महात्मा फुले व बाबासाहेबांच्याच विचार कार्यामुळे आज कितीतरी

महिलांचे आर्थिक, सामाजिक, वैचारिक, राजकिय परिवर्तन झाले. भारतीय महिला अंतराळात गेली, वैमानिक, मंत्री, वकील, डॉक्टर झाली. दलित, आदिवासी, ओबिसी या सर्व स्त्रियांना त्यांनी घटनेत अधिकार दिलेत, म्हणूनच आज त्या प्रत्येक पदावरं विराजमान आहेत. त्यांना आज मान आहे. स्वाभिमान आहे, पण दुर्दैवी बाब हि आहे की, अनेक हिंदू स्त्रियांना च माहित नाही की, हे सर्व कोणामुळे आहे? आज कोणतेही काम स्त्रियांच्या सहभागाशिवाय होत नाही. प्रत्येक कामांत स्त्रियांचा वाटा लाखमोलाचा असतो, नव्हे कायद्यात तशी तरतूद आहे. हे केवळ हिंदू कोड बिलामुळेच. हा तर बाबासाहेबांच्या विचारांचा विजय आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उद्योग, कृषी, व्यापार, प्रवास, मनोरंजन, इमारत बांधकाम, शिक्षण संस्थामधून हल्की कींमे करणाऱ्या स्त्रियांच्या हीन अवस्थेचा अंदाज घेतला. आजच्या बदलत्या परिस्थितीत स्त्री स्वातंत्र्याचीचर्चा आणि विज्ञान, तंत्रज्ञान, पोलिस, शिक्षण, इ. क्षेत्रात स्त्रियांचा जो सहभाग आहे, त्या मागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची तपश्चर्या आहे. स्त्रियांना, दुर्बल घटकांना जी स्वातंत्र्य सुविधा व सूान संधि प्राप्त झाली, ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या अहिंसात्मक युध्दाची फलश्रुती होय. यातूनच स्त्री स्वावलंबनाचा मार्ग प्रशस्त झाला आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1. डॉ. यशवंत मनोहर :– निबंधकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर
2. प्रा. आ.बी. खंडारे, प्रा. व्ही.एन. रामटेके, प्रा. एस.पी. उमरीवाड :– डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्र उभारणीत योगदान
3. प्रा. गवळी :– निबंधकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर
4. शंकरराव खरात :– निबंधकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार
5- www.Google. com

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार: समानता आणि न्यायासाठी

**श्रीमती रतन अंबादास कराड**
एम. ए. बी. एड.
जिल्हा परिषद हायस्कूल हदगाव, ता. हदगाव जि. नांदेड

बाबासाहेब म्हणून ओळखले जाणारे डॉ. भीमराव रामजी आंबेडकर हे भारतीय इतिहासातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व होते. भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार, एक उत्कृष्ट अभ्यासक आणि समाजसुधारक म्हणून, त्यांचे राजकीय विचार न्याय, समानता आणि मानवी प्रतिष्ठेचा त्यांचा अथक प्रयत्न दर्शवतात. शोषित दलित समाजाचा सदस्य म्हणून त्यांच्या अनुभवांमध्ये आणि भारतातील पद्धतशीर भेदभाव दूर करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेमध्ये त्यांची राजकीय विचारधारा खोलवर रुजलेली होती.समाज मन चिंतनशील बनवण्याचे कार्य त्यांच्या लेखणीने केले आहे.

**सामाजिक लोकशाहीसाठी एक दृष्टी**

सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीशिवाय राजकीय लोकशाही टिकू शकत नाही, असे डॉ.आंबेडकरांचे मत होते. त्यांच्या मते, खरी लोकशाही ही केवळ मतदानाचा हक्क देण्याच्या पलीकडे आहे; त्यासाठी सामाजिक पदानुक्रम आणि आर्थिक शोषण नष्ट करणे आवश्यक होते. त्यांनी असा युक्तिवाद केला की जाती-आधारित भेदभाव हा सामाजिक न्याय मिळविण्यासाठी एक मोठा अडथळा आहे आणि उपेक्षित समुदायांचे सक्षमीकरण सुनिश्चित करण्यासाठी धोरणांच्या गरजेवर भर दिला. यांचा विचार खोलवर समाजात रूजला.

आपल्या भाषणात आणि लेखनात डॉ. आंबेडकरांनी खोलवर असमान समाजात राजकीय लोकशाही टिकवून ठेवण्याच्या धोक्यांविरुद्ध इशारा दिला. "सामाजिक लोकशाहीचा पाया असल्याशिवाय राजकीय लोकशाही टिकू शकत नाही" असे त्यांनी प्रसिद्धपणे सांगितले.विविध लेखातून आणि वर्तमान पत्राच्या मथळ्यातून त्यांनी हीच विचारधारा प्रसिद्ध केली. याद्वारे, त्याला स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वावर आधारित समाज अभिप्रेत होता - तत्वे एकसंध आणि प्रगतीशील राष्ट्र निर्माण करण्यासाठी त्यांनी आवश्यक मानले.

**ब्राह्मणी वर्चस्व आणि जातिव्यवस्थेची टीका**

भारतातील सामाजिक आणि आर्थिक विषमतेचे मूळ कारण म्हणून डॉ. आंबेडकरांच्या जातिव्यवस्थेवरील टीकाकाराचा त्यांच्या राजकीय विचारांवर खूप प्रभाव पडला. त्यांनी जात ही दैवी व्यवस्था म्हणून नाकारली आणि तिला सामाजिक शोषण कायम ठेवण्यासाठी तयार केलेली मानवनिर्मित संस्था म्हणून पाहिले. आंबेडकरांचे मुख्य कार्य, जातीचे उच्चाटन, याने जातीचे जाचक स्वरूप उघड केले आणि तिचे संपूर्ण उच्चाटन केले.

त्यांचा असा विश्वास होता की जातिव्यवस्था लोकशाही आणि आधुनिकतेशी सुसंगत नाही. त्यांच्या राजकीय वकिलीने जाती-आधारित भेदभावाचे समर्थन करणाऱ्या संरचना नष्ट करण्याचा आणि असा समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला जिथे व्यक्तींना त्यांच्या जन्मापेक्षा त्यांच्या क्षमतांनुसार न्याय दिला जातो.

**आर्थिक लोकशाही आणि राज्य हस्तक्षेप**

डॉ. आंबेडकरांची आर्थिक दृष्टी पुरोगामी होती आणि भारतीय समाजात त्रस्त असलेल्या संरचनात्मक असमानता दूर करण्याचा उद्देश होता. त्यांनी मजूर, भूमिहीन शेतकरी आणि औद्योगिक कामगार यांच्या हक्कांचे समर्थन केले. अर्थव्यवस्थेत राज्याच्या हस्तक्षेपाची त्यांची वकिली मुख्य उद्योग आणि सार्वजनिक सुविधांचे

राष्ट्रीयीकरण करण्याच्या त्यांच्या आवाहनातून स्पष्ट होते. संपत्तीचे केंद्रीकरण रोखण्यासाठी आणि संसाधनांचे न्याय्य वितरण सुनिश्चित करण्याचा एक मार्ग म्हणून त्यांनी याकडे पाहिले.

डॉ. आंबेडकरांनी ग्रामीण समुदायांच्या उन्नतीसाठी शेतजमिनीचे भूमिहीनांना पुनर्वितरण करण्यासह जमीन सुधारणांचाही प्रस्ताव दिला. त्याच्या आर्थिक तत्वज्ञानात समाजवाद आणि व्यावहारिकता या घटकांचा समावेश आहे, ज्या धोरणांवर लक्ष केंद्रित करून वंचितांना सशक्त करेल आणि आर्थिक विषमता कमी करेल.

**उपेक्षित समुदायांसाठी राजकीय प्रतिनिधित्व**

डॉ. आंबेडकर हे उपेक्षित समाजाच्या राजकीय प्रतिनिधित्वाचे कट्टर पुरस्कर्ते होते. पुरेशा प्रतिनिधित्वाशिवाय सत्तेच्या गल्लीत शोषितांचा आवाज ऐकू येत नाही, असा त्यांचा विश्वास होता. या विश्वासामुळे त्यांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदारांची मागणी करण्यास प्रवृत्त केले, या प्रस्तावाला विरोध झाला परंतु अखेरीस 1932 मध्ये महात्मा गांधींसोबत पूणे  करार झाला.

त्यांनी स्वतंत्र मतदारांशी तडजोड केली असली तरी, डॉ. आंबेडकर दलितांचा राजकीय आणि सामाजिक समावेश सुनिश्चित करण्यासाठी संरक्षणासाठी लढा देत राहिले. त्यांच्या प्रयत्नांमुळे भारतीय राज्यघटनेनुसार अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी विधानसभा आणि सार्वजनिक नोकऱ्यांमध्ये जागा राखून ठेवण्यात आल्या.

**धर्मनिरपेक्षता आणि समानता**

डॉ. आंबेडकरांची राजकीय विचारसरणी धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावर ठाम होती. त्यांचा असा विश्वास होता की धर्माने सार्वजनिक धोरण आणि शासन ठरवू नये. असमानता कायम ठेवणारा धर्म म्हणून त्यांनी हिंदू धर्मावर केलेल्या टीकेमुळे त्यांनी 1956 मध्ये बौद्ध धर्म स्वीकारला, हा विश्वास त्यांच्या समानता आणि करुणेच्या आदर्शांना अनुसरून होता.

एक कायदानिर्माता या नात्याने, डॉ. आंबेडकरांनी धर्मनिरपेक्ष राज्याच्या गरजेवर भर दिला जिथे व्यक्ती भेदभाव न करता धार्मिक स्वातंत्र्याचा आनंद घेऊ शकतील. त्यांनी महिलांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी अथक परिश्रम घेतले, मालमत्ता कायदे आणि सामाजिक नियमांमध्ये लैंगिक समानतेचा पुरस्कार केला.

**न्याय आणि सुधारणांचा वारसा**

डॉ. आंबेडकरांचे राजकीय विचार क्रांतिकारी आणि पुढारलेले विचार होते, त्यांच्या काळातील सामाजिक आणि आर्थिक अन्यायाला आव्हान देणारे होते. न्याय्य समाजाची त्यांची दृष्टी भारतात आणि त्यापलीकडे लाखो लोकांना प्रेरणा देत आहे. तो दडपशाहीविरुद्धच्या प्रतिकाराचे प्रतीक आणि समानता आणि सन्मानासाठी झटणाऱ्यांसाठी आशेचा किरण आहे.

शेवटी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय विचारांना त्यांची न्यायप्रती अटल बांधिलकी, पद्धतशीर असमानतेबद्दलची त्यांची समज आणि लोकशाहीच्या परिवर्तनकारी शक्तीवरचा त्यांचा विश्वास यामुळे आकार आला. समानतेचा लढा चालू आहे आणि न्याय्य आणि न्याय्य समाजासाठी राजकीय आणि सामाजिक सुधारणा आवश्यक आहेत याची आठवण करून देणारा त्यांचा वारसा आहे.

**संदर्भ**

1. आंबेडकर, बीआर (1936). जातीचे उच्चाटन.
2. धनंजय कीर. (1971). डॉ. आंबेडकर: जीवन आणि ध्येय.
3. लोकशाही, सामाजिक न्याय आणि समता यावर भर देणारी आंबेडकरांची भारतीय राज्यघटना तयार करताना केलेली भाषणे डॉ. जाफ्रेलॉट, क्रिस्टोफ. (2005). डॉ. आंबेडकर आणि अस्पृश्यता: भारतीय जातिव्यवस्थेशी लढा.
4. आंबेडकर, बीआर (1944). राज्ये आणि अल्पसंख्याक.
5. ओमवेद, गेल. (1994). दलित आणि लोकशाही क्रांती.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक चळवळ

संशोधक विद्यार्थी

**सिध्देश्वर काशिनाथ थोरात**

डिपार्टमेंट ऑफ परफॉरमींग आर्ट

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर.

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनि केलेली चळवळ ही खऱ्या अर्थाने आपल्या भारताच्या माथ्यावर लागलेला कलंक मुळापासून पुसण्याची चळवळ होती. बाबासाहेबांच जीवन ज्या लक्ष्यासाठी त्यांनि अर्पण केलं तो लढा फक्त दलितांसाठीचा नव्हता तर संपूर्ण बहुजनांच्या हितासाठीचा तो लढा होता. आज जो भारत आपण बघत आहोत या भारताच्या जडणघडणीमध्ये बाबासाहेबांचा मोलाचा वाटा आहे. कारण ज्या जातिय उतरंडीने भारताला, भारतातील माणसाला भारतीयांचेच गुलाम बनविले होते ती उतरंडी संविधानाच्या माध्यामातून तोडून भारताला एक संघ करण्याच महत्वाच काम बाबासाहेबांनी केले.

**डॉ. बाबासाहेब यांचे बालपण आणि शिक्षण**

14 एप्रिल 1891 साली मध्यप्रदेशमधील महू या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म झाला. 'माझी आत्मकथा'या आपल्या आत्मचरित्रात बाबासाहेब म्हणतातकि, 'मी केव्हा जन्मलो हे मला महिती नाही. माझ्या आई-बापांना त्याचे काही महत्व वाटले नाही. पोरगा जन्मला, त्यात मोठेसे काय आहे? आणि त्याची तारीख कसली लक्षात ठेवायची? असे माझ्या वडीलांना वाटले असावे. माझी पत्रिका केलेली नाही. परंतु माझ्या वडिलांना वाटले असावे. माझी पत्रिका केलेली नाही. परंतु माझ्या वडिलांना जोतिषशास्त्र अवगत होते. ते माझ्या भवितव्याविषयी फार अशादायक बोलत असत. त्यांच्या एकंदर व्यवस्थित नि नियमबध्द जीवनामुळे असे म्हणता येईल की त्यांनी शाळेत जी जन्मतारिख दिली आहे ती खरी असली पाहिजे."

बाबासाहेबांचा जन्म झाला त्यावेळी त्यांचे वडिल रामजी सकपाळ हे महू येथिल सातव्या पायोनिर पलटनित सुभेदार या पदावर होते. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी सरकाचा तेव्हा एक फार चांगला नियम होता. तो नियम म्हणजे कंपनी सरकारच्या सैन्यातील दराबस्त सैनिकाला सक्तिचे शिक्षण दिले जात असे व सैनिकांच्या मुलामुलिंसाठी दिवसाच्या शाळा असून प्रौढ लोकांसाठी रात्रीच्या शाळा असत. प्रत्येक पलटणीसाठी स्वतंत्र शाळा अशाच एका शाळेमध्ये सुभेदार रामजी सपकाळ हे 14 वर्षे मुख्याध्यापक होते. सैनिकांसाठी चांगले शिक्षण मिळावे यासाठी पुण्यात एक 'नॉर्मल शाळा' होती त्या नॉर्मल शाळेत शिकून सुभेदार सकपाळांनी मास्तरचा डिप्लोमा मिळविला होता. त्यांची शिकविण्याची पध्दत फार वाखाणण्यासारखी होती. त्यांच्या मनात शिक्षणाविषयी आवड निर्माण झाली होती. याच महत्वकांक्षेतून पुढे त्यांनी बाबासाहेबांना आणि आपल्या बाकी लेकारांना शिक्षणासाठी शाळेत घातले.

शाळेत जाण्याआधीचं बाबासाहेबांच बालपण हे पलटणीतच गेलेल असल्यामुळे बाहेरच्या जगाचा बाबासहोबांना अजुन स्पर्श झालेला नव्हता पण जेव्हा बाबासाहेबांनी शाळेत प्रवेश केला तेव्हा मात्र बाबासाहेबांना बाहेरच्या दुनियेचा अनुभव यायला सुरूवात झाली बाबासाहेब सांगतात कि, "मि शाळेत

गेल्यावर वर्गातील शिक्षक त्यांना इतर मुलांसारखी वागणुक देत नसत. परिणामी बाबासाहोबांना वर्गात सर्वात मागे बसून नाहीतर वर्गाबाहेर बसून शिक्षण घेणे भाग पडले. शाळेतील शिक्षक आपल्याशी असे का वागतात? शिक्षक आणि शाळेतील मुल आपल्याला शिकुन घ्यायला का तयार होत नाहीत? ते आपला बाट का धरतात? मुळात बाटणे हा काय प्रकार असतो या आणि अशा असंख्य प्रश्नांनी बाबासाहेबांच बालपन अस्वस्थ होत होतं पण जसजसे दिवस पुढे जात होते तसतसे अजून तिव्र अनुभव त्यांच्या वाट्याला येवू लागले.

रामजी सकपाळांनी जेव्हा पेन्शन हातात घेतली तेव्हा, सुभेदार रामजी आपला परिवार घेवून सातार्‍यास राहू लागले. सुभेदार रामजिंची पत्नी आणि बाबासाहेबांची आई भिमाबाई यांच बाबासाहेब अवध्या पाच वर्षांचे असतानाच निधन झाले होते. सातार्‍या जिल्ह्यातील ‘गोरेगावी’ दुष्काळ पडला होता म्हणुन इंग्रज सरकारने दुष्काळी कामे काढली यावेळी एक पाण्याचा तलाव सुरू करण्यात आला होता या तलावाचे काम करणार्‍या मजुरांना पगार वाटण्याच्या कामावर रामजिंची नियुक्ती करण्यात आली होती. सातार्‍यास आल्यापासून बाबासाहेबांना अनेक अनुभव येवू लागले. प्रथम त्यांचे केस कापण्यास कोणी न्हावी तयार होत नव्हता म्हणून मग त्यांची मोठी बहिण सर्व भावंडांची केस कापूण द्यायची एके दिवशी रामजी सकपाळांनी आपल्या मुलांना ‘गोरेगावला या’ असे पत्र पाठविले वडिलांनी पाठविलेल्या पैशातून चांगले कपडे करून बाबासाहेब व त्यांचे भावंडे गोरेगावला जायला आगगाडीने निघाले वडिल आपल्याला घ्यायला कुणाला तरी पाठवलीत अशी सर्व भावंडांनी अशा केली होती. परंतु त्यांची निराशा झाली. रेल्वेस्थानकावर तासभर वाट पाहूनही त्यांना घ्यायला कोणीच आल नाही. शेवटी स्टेशन मास्तर त्या मुलांजवळ आला आणि त्यांच्या सर्व पेहराव्यावरून ही कोण्यातरी उच्चवर्णीयाची मुल असावित असे त्यास वाटले असावे पण त्यांनी तुम्ही कोण? असा मुलांना प्रश्न केल्यावर स्टेशन मास्तरला कळलं की ही ‘महाराची’ मुलं आहेत. परंतु मुलांचा पेहराव पाहून ही कोण्यातरी श्रीमंत महाराची लेकर असावी असा त्याने विचार केला आणि मुलांना गाडी करून द्यावयाचे त्याने ठरवले पण कोणीच गाडीवान ही महारांची लेकरं असल्यान त्याना गाडीत बसवायला तयार होत नव्हता. शेवटी एक गाडीवान तयार झाला पण त्याने एक अट ठेवली कि मी गाडी हाकणार नाही. मुल पलटणीत लहानाची मोठी झाली असल्याने त्यांना गाडी हाकण्यात काही अडचण आली नाही. मुले गाडीत बसून गोरगावला निघाली गावाच्या थोड्या अंतरावर गेल्यावर गाडीवानाने ‘पोरांनो इथच भाकरी खावून घ्या पुढ प्यायला पाणी मिळणार नाही’ अस सांगुन बाबासाहेबांना आणि त्यांच्या भावंडांना एका नाल्याशेजारी भाकरी खायला बसवले अन स्वत: दुर कुठेतरी जावून भाकरी खावून आला. ज्या नाल्याशेजारी बसून बाबासाहेबांनी आपल्या भावंडांसोबत भाकरी खाल्ली त्यातील पाणी खुपच अस्वच्छ होतं. पाण्यात सरळ शेणकुट मिसळलेल दिसत होत पण नाविलाजाने बाबासाहेबांनी तेच पाणी पिवून आपली तहान भागविली.

हे आणि असे अनेक अनुभव घेत बाबासाहेब आपले शिक्षण घेत होते. बाबासाहेबाचं मुळ नाव हे भिमराव रामजी सकपाळ होय पण ते मुळचे अंबावडे गावचे असल्याने सर्वजण त्यांना अंबावडेकर असे म्हणत तेव्हा त्यांच्याच एका ब्राम्हण शिक्षकाने त्यांना स्वत:चे अडनाव दिले आणि आजपासून तू आंबेडकर हेच नाव वापर असे सांगितले, तेव्हाच त्या शिक्षकांनी शाळेतील कॅटलॉगमध्ये तशी नोंदही केली.

पुढे जेव्हा बाबासाहेबांनी मॅट्रिकची परिक्षा उत्तीर्ण केली तेव्हा त्यंच्या समाजबांधवांनी आपल्या महार समाजात पहिल्यांदाच कोणीतरी मुलगा मॅट्रिकची परिक्षा उत्तीर्ण झाला या आनंदात बाबासाहेबांच्या

सत्काराचा कार्यक्रम ठेवला. या कार्यक्रमात केळुसकर गुरूजी उपस्थित होते, केळुस्कर गुरूजिनी बाबासाहेबांना तेव्हा भगवान गौतम बुध्दाचे चरित्र भेट म्हणून दिले होते. बाबासाहेब म्हणतात की, “या पुस्तकाने माझ्यामध्ये बराच बदल घडवून आणला,” भगवान बुध्दाच्या चरित्राचा अभ्यास केल्यानंतर त्यांच्या विचारांना वेगळे वळण मिळाले याच काळात बाबासाहेबांचा रमाबाईंशी विवाह झाला. पुढे बाबासाहेब यांनी एल्फिन्स्टन महाविद्यालयात आपल्या उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. पण रामजी सुभेदारांना आता भिमरावांच्या शिक्षणाचा भार झेपवत नव्हता ते पाहून गुरूवर्य केळूसकर यांनी 'सर नारायण चंदावरकर यांच्या मध्यस्थिने बडोदा नरेशांशी त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. 'अस्पृश्यांना उत्तेजनार्थ आपण सहाय्य करू' अशी जी घोषणा मुंबई नगरभवनातील सभेत बडोदा नरेशांनी केली होती. तीची आठवण देवून गुरूवर्य केळूसकरांनी भिमरावांना त्यांच्यासमोर हजर केले. 'बोले तैसे चाले' या म्हणीचे प्रतिक असलेल्या बडोदा नरेशांनी आपल्या सरकारची दरमहा 25 रूपयेची शिष्यवृत्ती देण्याचे मान्य केले. एल्फिन्स्टन महाविद्यालयात प्राचार्य कॉव्हर्नटन, प्रा. मुल्लर, प्रा. ॲण्डर्सन असे नामांकित प्राध्यापक होते. पण त्यांची शिकविण्याची पध्दत भिमरावांच्या मनाची पकड धरू शकले नाही. महाविद्यालयात असतांना भिमरावांस तिथेही पाणी पिण्यास मिळत नसे, या आजुबाजूच्या वातावरणामध्ये ते खुप कष्टी होत दलितांची दैन्यावस्था पाहून आणि त्यांच्या केविलवाण्या किंकाळ्या ऐकून त्यांचे मन अस्वस्थ होत होते. 'जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे, हे संतवचन किती यथार्थ आहे.

1912 साली झालेल्या बी.ए.च्या परिक्षेत ते पास झाले पण योगायोग असा बाबासाहेबांनी पुढे स्थापन केलेल्या सिद्धार्थ महाविद्यायाचे प्राचार्य पद भुषविणारे अ.बा. गजेंद्रगडकर याच परिक्षेत पहिले आले होते. पदवीधर झाल्यावर बडोद संस्थानात भिमरावांनी नोकरी धरली. परंतु भिमराव बडोद्यास जावून आठ-पंधरा दिवस झाले नाहीत तोच वडिल अस्वस्थ आहेत अशी तार भिमरावांना मिळाली. भिमरावांनी तडक गाडी पकडली. वाटेत सुरत स्थानकावर वडिलांसाठी सुरतेची मिठाई घेण्यासाठी ते उतरले परंतु त्या गडबडित आगगाडी मुंबईस निघुन गेली. दुसरी गाडी मिळावयाला दुसरा दिवस उगवावा लागला. भिमराव दुपारी फार उशीरा मुंबईस पोहचले घरी येवून पहातात तर वडील मृत्यूशय्यवर पडलेले. मुलाच्या वाटेकडे पाहून त्या मानधन पुरूषाने कंठी प्राण धरला होता. त्यांनी भिमरावांच्या अंगावरून आपला थरथरता हात फिरवला आपल्या लेकराला डोळे पाहिले आणि काही क्षणातच कायमचे डोळे मिटले. भिमराव धाय मोकलून रडू लागले.

वडिलांच्या मृत्युमुळे भिमरावांचा होता नव्हता तो आधार तुटला. परंतु भिमरावांच्या मनात रामजीबाबांनी शिक्षणाविषयी वेगळ प्रेम आणि निष्ठा तयार केली होती. त्या सुमारास बडोदे सरकाने उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देवून चार विद्यार्थी अमेरिकेस पाठविण्याचा विचार केला होता. महाराजांनी शिष्यवृत्तीसाठी भिमरावांना अर्ज करण्यास सांगितला त्याप्रमाणे भिमराव बडोद्याला गेले. तेथे उपशिक्षणमंत्रयासमोर 4 जुन 1913 रोजी करारावर सही केली. त्या करारान्वये भिमरावांनी संकल्पित विषयाचा अभ्यास अमेरिकेत करावा, व नंतर 10 वर्षे बडोदे सरकारची नोकरी करावी असे ठरले. भारतातील एका य:कश्चित अस्पृश्याने अब्राहम लिंकनच्या आणि बुकर वॉशिंग्टनच्या मायभुमीला जावे, तेथील उदात्त, स्फुर्तिदायक नि अद्ययावत जीवन अनुभवून आपले सामर्थ्य वाढवावे, ही एक अभुतपूर्व घटना होती. 1913 सालच्या जुलै महिन्यातील तिसऱ्या आठवड्यात भिमराव आंबेडकर न्युयॉर्कला पोहचले. न्युयॉर्कमधील

जीवन हा भिमरावांसाठी अभुतपुर्व अनुभव होता.तेथील विद्यार्थ्यांसंगे ते बरोबरीने बोलत चालत, जेवत, फिरत सर्वच ठिकाणी समतेचे वातावरण त्या नविन जगाने त्यांच्या मनाचे क्षितीज वाढविले. त्या सुमारास त्यांनी आपल्या वडिलांच्या एका मित्राला लिहिलेल्या एका पत्रात पददलितांच्या दैन्यावर एक रामबाण उपाय सुचविला तो उपाय म्हणजे पददलितांमध्ये शिक्षणाचा प्रसार शिक्षणच अपल्या सगळ्या समस्यांवरचा उपाय ठरू शकते असा त्यांनी त्या पत्रात विचार मांडला.

बाबासाहेबांच्या मनावर येथील एका प्राध्यापकांच्या व्यक्तिमत्वाची चांगलीच पकड बसली. त्याचे नाव आर. ए. सेलिग्मन हे प्राध्यापक महाशय हातामधील पुस्तकाचे कोपरे दुमडता दुमडता अशा काही आकर्षक पध्दतीने आपल्या विद्यार्थ्यांना ज्ञान देत कि, त्यांच्या गाढा अभ्यासाचा आणि ओघवत्या भाषेचा परिमल त्यांचा शिष्यांच्या जीवनावर चिरकाल टिकून राही. संशोधनाची कोणती पध्दती आपण अनुसरावी असे जेव्हा बाबासाहेबांनी त्यांना विचारले त्यावर त्या गुरूवर्यांनी बाबासहोबांना असा हितोपदेश केला कि, 'तुम्ही आपले काम कळकळीने करीत जा म्हणजे त्यातुनच तुमची स्वत:ची पध्दती आपोआप निर्माण होईल' आणि येथून खऱ्या अर्थाने बाबासाहेबांच्या ज्ञानयज्ञास प्रारंभ झाला. दररोज अठरा अठरा तास अभ्यास चालू झाला. सरतेशेवटी दोन वर्षांच्या अखंड तपश्चर्येनंतर यशने त्यांच्या गळ्यात माळ घातली, 'प्राचीन भारतातील व्यापार' या विषयावर त्यांनी 1915 साली प्रबंध लिहून एम.ए. पदवी संपादन केली. 1916 सालच्या मे महिन्यात डॉ. गोल्डनवेझर त्यांच्या वादकथसभेत 'भारतातील जातीसंख्या, तिची यंत्राणा, उत्पत्ती आणि विकास' *(Castes in India: their Mechanism, Genesis and Development)* या विषयावर त्यांनी एक निबंध वाचला. 'आपल्याच जातीत विवाह करणे हा जातीसंस्थेचा प्राण होय.जातिसंस्था अनेकवचनातच शक्य असते. एक वचनात ती अशक्यच मनुच्या पूर्वी जाती अस्तित्वात होत्या. ह्या वेळच्या प्रचलित नियमांचे मनुने केवळ संहितीकरण केले. इसकेच काय ते असे विचार बाबासाहेबांनी त्या निबंधात मांडले आहेत.

अशा रितीने पहिली पायरी गाठल्यानंतर बाबासाहेबांना दुसरी पायरी गाठायला वेळ लागला नाही. 'भारताच्या राष्ट्रीय नफ्याचा वाटा: एक ऐतिहासिक पृथक्करणात्मक परिशीलन नामक प्रबंधासंबंधी त्यांचा अभ्यास नि विचार विनियम उपरोक्त प्रबंधाच्या सोबतच चालला होता. पुष्कळ दिवसाच्या परिश्रमानंतर तो प्रबंध त्यांनी पुर्ण केला. 1916 जून मध्ये तो कोलंबिया विश्वविद्यालयाने स्वीकारला. त्यांनी लिंकनचा निर्धार नि जिवितोद्देश आणि बुकर टी. वॉशिंग्टनची उद्योगशिलता आपल्या नसानसात भरली पुढे आठ वर्षांनी पी.एस. किंग्स अॅण्ड सन्स या प्रकाशन संस्थेने हा प्रबंध विस्तृत स्वरूपात 'ब्रिटिश भारतातील प्रांतिक वैक्तिक उत्कांती'*(The Evolution of Provincial Finance in British India: A Study in the Provincial Decentralization of imperial finance)* या नावाने प्रसिध्द केला. बाबासाहेबांनी या ग्रंथाच्या छापील प्रति कोलंबिया विश्वविद्यालयात सादर करताच त्यांना नियमाप्रमाणे रितसर 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी ही अत्युच्च पदवी दिली. बाबासाहेबांनी हा ग्रंथ श्रीमंत सयाजीराव गायकवाड ह्यांना त्यांचविषयीच्या आपल्या कृतज्ञतेचे द्योतक म्हणून अर्पण केला. बाबासाहेबांना अर्थशास्त्राचा पहिला पाठ देणारे गुरूवर्य सेलिग्मन ह्यांनी या ग्रंथाला प्रस्तावना लिहीली आहे. बाबासाहेबांनी हाताळलेला प्रश्न हा जगातील विचारवंताच्या चर्चेतील एक महत्वाचा विषय आहे. असे सूंन सेलिग्मन म्हणतात. या विषयाचा

इतका सखोल आणि सांगोपांग अभ्यास अन्य कोणी केल्याचे आपणास माहिती नाही. यावरून त्यांच्या ग्रंथाची मौलीकता लक्षात येते.

अमेरिकेतील वास्तव्यात बाबासाहेबांच्या मनावर दोन घटनांनी विषेश परिणाम झाला असावा. एक म्हणजे अमेरिकेतील राज्यघटनेतील गुलामगिरी नष्ट करणारी 14 वी घटना दुरुस्ती, दुसरी म्हणजे अमेरिकेतील निग्रो लोकांचा उद्धारकर्ता बुकर टी. वॉशिग्टन यांचा मृत्यू अमेरिकेतील आपला विद्याभ्यास पुर्ण होताच बाबासहोबांनी 1916 च्या जुलै महिन्यात अमेरिका सोडली.

लंडनमध्ये कायद्याचा आणि अर्थशास्त्राचा अभ्यास करण्याची परवानगी बडोदा नरेशांकडून बाबासाहेबांनी मिळविली. बाबासाहेबांनी कायद्याचा अभ्यास करण्यासाठी ‘ग्रेज इन’ मध्ये ऑक्टोबरात नाव दाखल केले त्याच वेळी ‘लंडन स्कुल ऑफ इकोनॉमिक्स आणि पॉलिटिकल सायन्स’ या संस्थेतही अर्थशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी प्रवेश मिळविला. अर्थशास्त्र विषयातील त्याची प्रगती पाहून तेथील प्राध्यपकांनी त्यांना एका परिक्षेसह न बसण्याची सवलत दिली. पण मध्यंतरी बडोद्यांच्या दिवानांकडून तुमच्या शिष्यवृत्तीचा काळ संपला त्यामुळे तुम्ही भारतात परत या असे कळवण्यात आले त्यामुळे ४ वर्षाच्या आत पुन्हा अभ्यासक्रम सुरू करण्याची अनुमती लंडन विश्वविद्यालयाकडून मिळवून बाबासाहेब भारतात परत आले. परतुन बडोदा सरकारशी ठरलेल्या कराराप्रमाणे बाबासाहेब सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात बडोद्यास गेले. बाबासाहेबांना स्थानकावर भेटुन त्यांची सर्व व्यवस्था करावी अशी आज्ञा महाराजांनी केली हाती. पण अस्पृश्याच्या स्वागतास कोण जाणार ? त्यामुळे राहण्याखाण्याची सोय बाबासाहेबांना स्वत:च करावी लागली. एक महार तरुण बडोद्याच्या सचिवालयात नोरकीस राहणार आहे. अशी वार्ता आधीच बडोदा शहरात पसरली होती. कुठच्याही हिंदु खानावळीमध्ये वसतीगृहामध्ये बाबासाहेबांना थारा मिळत नव्हता शेवटी त्यांना एका पारशी वसतीगृहामध्ये जागा मिळाली तिथे ते आपले नाव बदलून राहू लागले सचिवालयामध्ये काम करत असतांना कोणीही त्यांच्याशी सहकार्य करेना कागद आणि फायली बाबासाहेबांकडे दुरूनच फेकल्या जात. बाबासाहेब जायला उठले तर इतर नोकरलोक चटई गुंडाळून ठेवत. त्यांना कार्यालयात कारकुनांच्या पाण्याच्या साठ्यापैकी पाणीसुध्दा प्यापला मिळत नसे. ही अपमानकारक परिस्थिती कमी झाली होती म्हणून कि काय त्यांच्यावर एक प्राण संकटही ओढवले. ज्या पारशी वसतीगृहात बाबासाहेब राहत होते त्या वसतीगृहात एक पारशांची रागाने लालबुंद झालेली झुंड हातात काठ्या घेवून आली. खवळलेल्या झुंडितील एकाने ‘तुम्ही कोण’ असे विचारताच ‘मी हिंदु आहे.’ असे बाबासाहेबांनी उत्तर दिले. त्यावर ते म्हणाले तु कोण आहेस हे आम्हाला माहित आहे. तु समाजाचे वसतीगृह बाटवलेस तु लवकर इथून चालता हो महारा बाबासाहेबांनी आपले सर्व धैर्य एकवटुन त्यांना तिथून निघण्यासाठी थोडीशी महुलत मागितली. बडोद्याच्या दिवाणांनी यात मन घातले नाही. शेवटी बाबासाहेबांना तिथुन निघुन जाव लागलं. शहरात कोणीच हिंदु वा मुसलमान बाबासाहेबांना थारा देईना शेवटी भुकेने आणि तहानेने व्याकुळ झालेले बाबासाहेब एका झाडाखाली बसुन ढसाढसा रडले वर आकाश आणि खाली जमीन हाच त्यांचा आसरा शेवटी त्याच उद्वीग्न मनस्थितीत ते मुंबईस पोहचले.

**भिमा कोरेगावास शहिद स्तंभाला मानवंदना :**

सन एकोणिशसे सत्ताविस उजाडले. बाबासाहेबांनी या वर्षाची सुरूवातच कोरेगावातील युध्दस्मारका समोर भरलेल्या सभेने केला. त्या सभेत भाषण करतांना कृतघ्न ब्रिटिश सरकारचा त्यांनी जळजळीत शब्दांत निषेध केला. ज्या महार जातिच्या शुर सैनिकांनी ब्रिटिशांना कित्येक लढाया जिंकूण दिल्या त्या महार जातिच्या तरुणांना सैन्यात प्रवेश नाकारून सरकारने त्यांचा विश्वासघात केला आहे. असे त्यांनी आपले मत उघडपणे बोलूण दाखवले. ब्रिटिशांच्या बाजुने महार सैनिक सवर्ण लढावे ही काही अभिमानाची बाब नाही हे

खरे पण ते ब्रिटिशांच्या मदतीस का गेले सवर्ण हिंदूने त्यांना कुत्र्या मांजरापेक्षा वाईट वागवले म्हणून पोट भरण्याच्या काही साधन नसल्यामुळे ब्रिटिश फौजीत भरती झाले हे लक्षात ठेवले पाहिजे असे ते म्हणाले आपल्या भाषणाच्या शेवटी म्हणाले की महारांवरील लष्करी बंदी उठवावी ब्रिटिशांनी ही बंदी नाही उठवली तर महारांनी चळवळ सुरू करावी. बाबासाहेब आशी बाबासाहेबांनी आपल्या अनुनायांना चेतना दिली.

**महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह :**

भारतातील जातीय व्यवस्थेने अस्पृश्यांना उच्च जातीय हिंदूपासून वेगळे ठेवले होते. साध पाणी पिण्यासाठी त्यांना दुसऱ्यावर अवलंबून राहावा लागत. असे पाण्याच्या मुख्य श्रोतामधून पाणी घ्यायची परवानगी अस्पृश्यांना नव्हती जर चुकून एखाद्या अस्पृश्याने सार्वजनिक पानवाट्याला स्पर्श केला तर सवर्ण हिंदू कडून त्याला देह दंडासारखी भयानक शिक्षा मिळत असे पण अगस्ट 1923 मध्ये मुंबई कायदेमंडळाने एक कायदा पारित केला त्यानुसार सरकारी खर्चाने बांधलेल्या सर्व मालमत्तेवर सर्वांचा वहिवाटाचा हक्क असेल महाडच्या नगरपालिकेने जानेवारी 1924 मध्ये या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय पारित केला परंतु प्रत्यक्षात मात्र त्याची अंमलबजावणी झालीच नाही. होत नाही ते चुकतंय शेवटी बाबासाहेबांनी हा लढा देण्याचा निर्णय घेतला आणि पाण्यासारख्या मूलभूत गरजेच्या प्रश्नासाठी रणांगणात उतरले. कोकणातील महाड हे शहर सत्याग्रहासाठी निवडल्या गेले कारण उच्च जातीय हिंदूंनी या लढ्याकरिता बाबासाहेबांना मदतीची आश्वासन दिले अनंत जीवेत गंगाधर शस्त्रबुद्धे सुरेंद्रनाथ टिपणीस हे महाड नगरपालिकेचे प्रमुखही त्यात होते 20 मार्च 1927 रोजी महाड येथे बाबासाहेबांनी एक सभा घेतली सभा संपल्यानंतर सर्वजण चवदार तळ्याकडे गेले बाबासाहेबांनी सर्वात प्रथम तळ्यामधून पाणी पिले आणि त्यानंतर त्यांच्यासोबत 500 अस्पृर्श बांधवांनी त्या तळ्यात पाणी पिऊन चवदार तळ्याचा सत्याग्रह केला.

**मनुस्मृतीचे दहन :**

मनुस्मृतीमध्ये मनूने चातुर्वण्याचा पुरस्कार केलेला आहे. चातुवर्णाचे पावित्र राखलेच गेले पाहिजे. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र ही उतरंडी रचुन जातिव्यवस्थेला खतपाणी घलण्याच काम मनुने केल. मनुने जातीव्यवस्था निर्माण केली अस जरी म्हणता येत नसल तरी तिचि बीज मनुने नव्याने पेरली अस बाबासाहेब त्याच्या फिलॉसॉफी ऑफ हिंदुइजम या ग्रंथात म्हणतात. त्यांच्या 'शुद्र पुर्वी कोण होते.'? आणि 'जातिव्यवस्थेचे उच्चटन' या ग्रंथात देखिल मनुस्मृतीला त्याचा विरोध का होता हे बाबासाहेबांनी स्पष्ट केले.

विषमतेची बिजे पेरणाऱ्या मनुच्या मनुस्मृतीला आणि तिचा अवलंब करणाऱ्या स्पृश्यांना आम्हीही माणसं आहोत आणि आम्हाला ही जगण्याचा अधिकार आहे. त्यामुळे ज्या कायद्यान्वये आम्हाला गुलामापेक्षा बत्तर जीवन जगण्यासाठी भाग पाडल जात त्या कायद्यालाच आम्ही यापुढे पायदळी तुडवू या विचारांची डरकाळी फोडून बाबासाहेबांनी 25 डिसेंबर 1927 रोजी मनुस्मृतीचे दहन केले. आणि मानवतेचा नवा एल्गार केला.

**काळाराम मंदिर प्रवेश :**

आपल्या भारताला सोनेकी चिडीया म्हणून ओळखले जायचे पण या सोनेकी चिडीयाला लागलेली किड म्हणजे भारतीय जातिव्यवस्था, भारतीय वर्णव्यवस्थेन सर्व अधिकारांची विभागणी स्पृश्य वर्गामध्ये केली होती. अस्पृश्यांनी केवळ स्पृश्य वर्गाची सेवा करावी आणि ते देतील त्यावर आपल पोट भराव असा कायदाच मनुस्मृतिमध्ये लिहून ठेवला होता. जर अस्पृश्य लोकांनी स्पृश्यांच्या चाकरी व्यतिरिक्त कुठल्याही गोष्टीची साधी आशाही केली तर त्यांना देहदंडाची शिक्षा देण्यास येत होती.

अस्पृश्यांना चातुर्वण्यांनी जसा पाण्याचा अधिकार नाकारला होता तसाच मंदिरात जाण्याचा, वेद ऐकण्याचा, बोलण्याचा अधिकारही नाकारला होता. जर अस्पृश्याने वेद ऐकले तर त्याच्या कानात तप्त शिष्याचा रस ओतावा,वेद म्हणायची हिंमत केली तर त्याची जीभ छाटली जावी अशी तरतुदच उच्चवर्णीय

स्पृश्यांनी अंगी बाळगुन ठेवली होती. म्हणून बाबासाहेबांनी आपला मानवी अधिकार सिध्द करण्यासाठी मंदिरात प्रवेश करण्याचे ठरवले. बाबासाहेब म्हणतात की, मंदिरात प्रवेश करून काही अस्पृश्याचे प्रश्न सुटणार नव्हते. पण हा अधिकार जसा स्पृश्यांचा आहे. तेवढाच तो अस्पृश्यांना सुध्दा आहे हे सिध्द करण गरजेच होत म्हणून मी मंदिराचा सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. आपल्या या विचारांनिशी बाबासाहेबांनी 2 मार्च 1930 रोजी महाराष्ट्रामध्यल्या नाशिक येथिल काळाराम मंदिरामध्ये प्रवेश करून सत्यागृह केला बाबासाहेबांनी अस्पृश्यता निवारण्यासाठी जे लढे दिले त्यात काळाराम मंदिराच्या सत्याग्रहाचे स्थान खुप महत्वाचे आहे.

**धर्मांताराची घोषणा ते धर्मांतर**

लहानपणापासून बाबासाहेबांनी जातियतेचे चटके सोसले होते आपल्या समाज बांधवांची अकारण होणारी पिळवणूक बघत बघतच ते मोठे झाले होते. हिंदु धर्मांचा, धर्म शास्त्राचा बारकाईने अभ्यास केल्यानंतर बाबासाहेबांच्या लक्षात आले की हिंदु धर्मांत सुधारणा घडवुन आणणे शक्य नाही. कारण या धर्माचा मुळ पायाच विषमतेवर आधारित आहे. पुर्ण अभ्यासानंतर बाबासाहेब या मतावर येवून पोहचले की हिंदु धर्मात सुधारणा घडवून आणण्याच्या प्रयत्नात अजुन शेकडो पिढ्यांना गुलामित ढकलण्यापेक्षा हिंदु धर्माचा त्याग करणेच अधिक सोयीचे राहील. आपल्या याच विचारातून बाबासाहेबांनी 13 ऑक्टोबर 1935 रोजी नाशिक जवळील येवला येथे धर्मांतराची घोषणा दिली.

धर्मांतराच्या घोषणेनंत बाबासाहेबांनी 21 वर्षे जगातल्या कित्येक धर्माचा अभ्यास केला. अभ्यास आणि सखोल निरीक्षणातून बाबासाहेबांच्या लक्षात आले समतेवर आधारलेला, प्रेम आणि बंधुत्व शिकवणारा भगवान बुध्दांनी स्थापन केलेला बुध्द धम्म हा विज्ञानाला आणि मानवतेला मानणारा धम्म आहे. म्हणून बाबासाहेबांच्या मनात बुध्द धम्माची बिज रोवल्या गेली. शेवटी बाबासाहेबांनी मानवतेला आणि प्रेमाला अग्रस्थान देणाऱ्या बुध्दांचा स्वीकारण्याचा निर्णय घेतला त्यांनी आपल्या लाखो अनुयायांबरोबर 14 ऑक्टोवर 1956 रोजी बौध्द धम्माचा स्वीकार केला.

**निष्कर्ष :**

एवढी तेवढी प्रतिकुलता कोणाच्याही वाट्याला कधीमधी येते. पण जन्माबरोबरच प्रतिकुलता पुढ्यात हजर असलेल्या माणसाने काय करावे? बाबासाहेबांच्या जीवनात प्रतिकुलतेने जे थैमान घातले त्या थैमानाला न घाबरता बाबासाहेब शेवटपर्यंत परिस्थितीशी दोन हात करत राहीले आणि विषमतेच्या डोंगरावर समतेचा झेंडा रोवून दाखवला, बाबासाहेबांचा लढा हा केवळ अस्पृश्यासांठी किंवा एका जातीविशेषसाठी नव्हता तर तो लढा होता मानवता जिवंत ठेवण्यासाठी आणि ती कायम ठेवत राहण्यासाठी.

**संदर्भ**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – धनंजय किर
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संपुर्ण, लेखन आणि भाषणे, महाराष्ट्र शासन
3. जग बदलणारा बापमाणुस – जगदिश ओहोळ

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य व विचार

**प्रा. डॉ. संजय चिताळकर**
मराठी विभाग प्रमुख, शिवळे कॉलेज, मुरबाड, जि. ठाणे

**प्रास्ताविक -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महामानव होते. आंबेडकर यांनी दलित व बहुजन समाज सुधारण्यासाठी तत्कालिन समाजाला शिक्षणाचे महत्व पटवून दिले. त्यांनी चांगले शिकावे, शिक्षण घ्यावे म्हणून 'शिका संघटित व्हा व संघर्ष करा' असा नारा दिला. त्याला प्रतिसाद म्हणून पहिल्या पिढीतील अनेक दलित तरूण शिकून सवरून नोकरीत स्थिरस्थावर झाले. काही प्रख्यात साहित्यिक झाले तर काही नोकरीत उच्च पदावर गेले. आंबेडकर केवळ 'शिका' असा नारा देऊन थांबले नाही तर १९४५ साली पीपल्स एज्यूकेशन सोसायटीची स्थापना करून औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय व मुंबई येथे सिध्दार्थ महाविद्यालय सुरू केले. गरीब व दलित मुलांसाठी त्यांनी वसतिगृहाची स्थापना केली. 'शहराकडे चला' असे दलित बांधवांना आवाहन करून हजारो लाखो तरूणांना प्रेरित करून शिक्षण घेण्यास भाग पाडले. त्यांचे शैक्षणिक कार्य व तत्वज्ञान, उच्च शिक्षणाचे पुढील स्वप्न या संदर्भातील उच्च शिक्षण विषयक विचारांचा येथे परामर्ष घेण्याचा प्रयत्न केला आहे.

आंबेडकर हे स्वत: उच्च विद्या विभूषित होते तसेच ते भौतिकवादी व ऐहिक जीवनाचा पुरस्कार करणारे होते. बौध्द धर्माचा स्वीकार करून खऱ्या अर्थाने दलित समाजाला शिक्षणाच्या माध्यमातून पुढे नेण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी प्रथम दलित समाजाला जागृत केले व गावातील हलके कामे करण्यास परावृत्त केले. उच्च शिक्षण घ्या व चांगले राहणीमान ठेवा, असा मुलगामी विचार त्यांनी मांडला. आपल्या वंचित समाजाचे प्रबोधन व्हावे म्हणून त्यांनी १९२० ला 'मूकनायक' हे वृत्तपत्र सुरू केले. ते त्यांच्या महानिर्वाणानंतर म्हणजे १९५६ पर्यंत चालू होते. परिणामी दलित समाज शिकला, नोकरी मिळवली व शहरात स्थायिक झाला. आंबेडकरांच्या दृष्टिने हे फार मोठे यश होते. म्हणून दलित जनता त्यांना आपल्या 'रथाचे सारथी'म्हणतात. दलित समाजाला सुर्यप्रकाश देणारा, तळपणारा सूर्य वाटतो. दलित जनतेने त्यांना आपले स्फुर्तिस्थान ठरविले आहे.

१९६० नंतर आलेल्या दलित साहित्याच्या प्रवाहात सर्वात जास्त कविता आंबेडकरांच्या जीवनावर व तत्वज्ञानावर होत्या. कथा, कादंबरी, नाटक व आत्मकथन यांच्यामध्येही आंबेडकरांचे तत्वज्ञान अवतरले होते. किंबहुना आंबेडकर ज्या ज्या ठिकाणी गेले, अनेक भाषणे, आंदोलन व सत्याग्रह केला, ती ती ठिकाणे दलित समाजाची आजही पवित्र भूमी मानली जाते. त्याची मनोभावे पूजा केली जाते. आंबेडकरांचे हे शैक्षणिक विचार व कार्य यांचा अंगिकार करून आंबेडकरांचे अनुयायी त्यांचे कार्य व वारसा समर्थपणे पुढे चालवत आहेत.

**आंबेडकरांचे प्रमुख शैक्षणिक कार्य -**

1. आंबेडकरांनी १९४५ ला पीपल्स एज्यूकेशन सोसायटीची स्थापना करून वंचित व दलित बहुजन समाजाला प्राध्यान्याने शिक्षण देण्याचे काम केले.
2. आंबेडकरांच्या शिक्षण विषयक विचारांची कास धरून दलित तरूण शिकला, त्याला आत्मभान आले आणि त्याची अस्मिता जागृत झाली.

3. उच्च शिक्षणामुळे दलित तरूणांचे वाचन, चिंतन व मनन वाढले. त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावत गेल्या. या प्रयत्नातून दलित लेखक संघाची स्थापना झाली.
4. १९५० ला औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्‍यालय सुरू झाले, त्यातून हजारो तरूण उच्च शिक्षण घेऊ लागले व पुढे १९५८ साली मराठवाडा विद्‍यापीठाची स्थापना झाली.
5. यानंतर मुंबईला सिध्दार्थ महाविद्‍यालयाचीही स्थापना झाली. आंबेडकरांच्या प्रेरणेचे 'प्रबुद्ध भारत' हे साप्ताहिक सुरू झाले. त्याचे संपादक दादासाहेब रूपवते हे होते.
6. याच दरम्यान गंगाधर पानतावणे यांनी 'अस्मिता दर्श' हे नियतकालिक सुरू केले. त्यामुळे प्राचार्य म. ना. वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली दलित साहित्याची वाटचाल सुरु झाली.

'जनता', 'मुकनायक' व 'बहिष्कृत भारत' अशी वैचारिक मासिके सुरू करून आंबेडकरांनी पददलितांना शिक्षणाची द्‍वारे खुली करून दिली. 'बहिष्कृत हितकारिणी सभा' स्थापन करून त्या माध्यमातून अस्पृश्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. आंबेडकरांनी शिक्षणाचा संबंध भारतीय स्वातंत्र्याशी जोडला होता. त्यासाठी प्राथमिक शिक्षण हे मोफत व सक्तीचे झाले पाहिजे, असा ब्रिटिश सरकारकडे आग्रह धरला. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करावयाचे असेल तर सर्व शिक्षणाची जबाबदारी सरकारने स्वीकारावी व त्यावर सरकारी नियंत्रण ठेऊन दलितांना प्राध्यान्याने शिक्षण घ्यावे, असे त्यांचे ठाम होते. यावरून त्यांचे हे शैक्षणिक विचार किती दुरदर्शी पणाचे होते, हे स्पष्ट होते.

पुढे भारत स्वतंत्र झाल्यावर आंबेडकरांनी राज्यघटनेमध्ये दलितांना शिक्षणात व नोकरीत राखीव जागा ठेवल्या. त्यामुळे दलित व बहुजन समाजातील अनेक मुले शिकून त्यांनी आंबेडकरांचे तत्वज्ञान खेड्यापाड्यांत पोहचवले. याबरोबरच आर्थिक परिस्थिती मर्यादित असलेल्या मुलांना शिष्यवृत्ती देण्याचे धोरण त्यांनी सरकारकडे धरले. त्यामुळे हजारो दलित तरूण शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात स्थिरावले.

**आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार हे किती उदात्त, व्यापक व चौफेर होते, हे त्यांच्या तत्वज्ञानावरून दिसून येते. याबाबत डॉ. आंबेडकर म्हणतात, "आपले लोक शिक्षणात मागासलेले असल्यामुळे शिक्षण हिच आपल्या लोकांची महत्वाची गरज आहे. शिक्षण हेच त्यांच्या प्रगतीचे प्रभावी साधन आहे." १ अशा प्रकारचीं जाणीव त्यांच्या मनात सदैव जागी होती. म्हणून आपल्या लोकात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी सर्व साधनांचा अवलंब केला.

ब्रिटिश सरकारच्या शिक्षण विषयक स्टार्ट समितीने आंबेडकरांच्या आग्रहानुसार औद्‍योगिक शिक्षणाची शिफारस केली होती. त्यात आंबेडकर म्हणतात, "स्पृश्य हिंदुच्याच शाळांतून अस्पृश्यांचे शिक्षण अधिक सुलभ रीतीने होण्याची व्यवस्था करावी. अस्पृश्य विद्‍यार्थ्यांसाठी असणाऱ्या वसतिगृहाच्या व शिष्यवृत्ती संख्येत वाढ करावी. गिरण्या आणि रेल्वे कारखाने यात औदयागिक शिक्षण घेण्यासाठी कामशिकाऊ विद्‍यार्थी घेण्याची आणि परदेशात यांत्रिक शिक्षण घेण्यासाठी अस्पृश्य विद्‍यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची तरतूद करावी. ही सर्व व्यवस्था पाहण्यासाठी एका स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक करावी."२ आंबेडकरांनी याप्रमाणे सुचवल्याप्रमाणे स्टार्ट समितीने त्याची अंमलबजावणी केली. आजही आंबेडकरांचे विचार किती मुलगामी व क्रांतीकारी होते. याचे प्रत्यंतर येते. आजही हजारो दलित विद्‍यार्थी त्याचा लाभ घेत आहेत.

विद्यार्थ्यांनी प्राधान्याने शिक्षण पूर्ण करावे. राजकारणांत भाग घेऊ नये. यासाठी आंबेडकरांनी ठाणे येथील आगाखान वसतिगृहात १९३० साली विद्यार्थ्यांना भाषण दिले. आपल्या भाषणात ते म्हणतात, "विद्यार्थ्यांनी स्वत:ची लायकी वाढविण्याचे कार्य करीत असतांना राजकारणांत भाग घेऊ नये. स्वालंबनाचा मार्ग चोखाळावा. आपल्या आयुष्यात आपण पुढे आल्याशिवाय राहणार नाही, असा निश्चय करून तुम्ही व्यवहारी जगात उतरलात तरच काही यश मिळेल."३ असा मौलिक उपदेश केला होता.

आंबेडकर हे विद्यापीठातील उच्च शिक्षणाबद्दल किती जागृत होते. विद्यापीठीय शिक्षण शिक्षणाचे महत्व त्यांनी लवकरच ओळखले होते. या संदर्भात मुंबई येथील १९५२ रोजी एल्फिन्स्टन महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलना प्रसंगी आंबेडकरांनी 'आधुनिक विद्यार्थ्यांचे प्रश्न' या विषयावर भाषण दिले. या भाषणात ते म्हणतात, "विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील शिक्षणाची पुनर्घटना करावी. आधुनिक जगातील गरजा पुरविणारे ते शिक्षण असले पाहिजे. विद्यापीठ हे ज्ञानाचे केंद्र असले पाहिजे. कारकूनी करण्याचे नव्हे. विद्यार्थ्यांनी लिनतेने व दिनपणे न वागता धैर्याने नि निर्भयतेने वागले पाहिजे. शालिनतेने कदाचित स्वर्ग मिळेल. परंतु या जगातील सुखाला व संपत्तीला तो पारखा होईल."४ असे प्रतिपादन त्यांनी केले.

आंबेडकरांनी १९५२ साली कोल्हापुरच्या राजाराम महाविद्यालयात विद्यार्थ्यांना ज्ञानाचे महत्व पटवून दिले. या प्रसंगी स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात .त्यांनी सांगितले की, "ज्ञान हाच मनुष्य जीवनाचा पाया आहे. विद्यार्थ्यांनी बौध्दिक शक्तीचे संवर्धन करण्यासाठी आणि आपल्या बुध्दिला चालना देण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले पाहिजेत. त्यांनी विचारशक्ती वाढविली पाहिजे. मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग केला पाहिजे."५ असे आंबेडकरांना मुंबई विद्यापीठ हे प्रशासकाचे नव्हे तर विद्याव्यासंगी माणसांचे महामंडळ व्हावे, असे वाटत होते. जिथे ज्ञानसंपादन आणि ज्ञानाचा प्रसार हे अग्रगण्य कार्य घडून यावे, अशीही त्यांची धारणा होती. या संदर्भात ते म्हणतात, "अध्यापन विद्यापीठ हे अध्यापकांचे विद्यापीठ होते आणि अध्यापनाचे प्राधिकृत निर्देशन विद्यापीठाला बनवीत होते. त्याने स्पष्ट होते की, जिथे समानतेच्या अटीवर विद्यापीठे आणि महाविद्यालये भागीदार होतील."६ आंबेडकरांना शिक्षणाच्या बाबतीत समता हवी होती. या हेतूनेच त्यांनी विद्यापीठीय शिक्षणावर लक्ष केंद्रित करून आपले क्रांतीकारी विचार मांडले आहेत.

आंबेडकरांनी आपल्या समाजाला सर्व क्षेत्रात प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, कारण त्यामुळेच उच्च शिक्षणाचा भागीदार आपला समाज होईल, म्हणून त्यांनी विद्यापीठे व महाविद्यालये यांच्यातील शिक्षण व्यवस्थेवर आपले ओजस्वी विचार मांडले. याबाबत ते म्हणतात, "संलग्न विद्यापीठ असंलग्न होऊ शकत नाही. कारण महाविद्यालयाचे संलग्नीकरण म्हणजे महाविद्यालयाचा सर्वनाश होय. अशा महाविद्यालयामध्ये अध्यापन आणि संशोधन यांच्या व्यवस्थापनावर नियंत्रण ठेवण्यासाठी व पर्यवेक्षन करण्यासाठी विद्यापीठाकडे पर्याप्त शक्ती असल्या पाहिजेत. संलग्न महाविद्यालयांना जे अनुदान आहे. ते त्यांच्या कडून काढून घेण्यासाठी शिफारसींच्या शक्तीने विद्यापीठाला सुसज्ज करता येईल."७ आंबेडकरांचे हे परखड विचार मौलिक आहे तसेच त्यांनी मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेवर मागास आणि दलित वर्गाला प्रतिनिधित्व मिळावे ही काळाची गरज आहे, अशीही त्यांनी महत्वाची मागणी केली होती.

आंबेडकरांनी सुशिक्षित वर्गाने आपली जबाबदारी ओळखून उपेक्षित वर्गाला शिक्षण देणे गरजेचे आहे, हे प्रतिपादन करतांना त्यांनी सामाजिक बांधिलकीच्या हेतूने ज्ञान संपादन करणे व इतरांनीही देण्याचे गरजेचे आहे. या संदर्भात ते म्हणतात, "शिक्षणाचे नियंत्रण सुशिक्षित वर्गाने केले पाहिजे. परंतु त्यांच्या कडे सामाजिक

सद्गुणांचा अभाव आहे. हा वर्ग जनतेला सक्रीय शिक्षण देण्यास विरोध करतो. विद्यापीठाने उपेक्षित वर्गाच्या घराघरांत शिक्षणाची गंगा घेऊन जावी. विद्यापीठाचे मुल्यांकन केवळ त्यांच्या ज्ञानसंपादनाने न होता, त्यांच्या सामाजिक बांधिलकीने झाले पाहिजे." ८ अशी त्यांची दृढ इच्छा होती. आंबेडकरांचा प्रयत्न केवळ या वर्गाला शिक्षण मिळवून देण्याचा होता.

आंबेडकरांनी मागासलेल्या वर्गामध्ये विशेषता अनुसूचित जाती मध्ये उच्च शिक्षण शिक्षणाचा प्रसार व प्रचार करण्याच्या हेतूने मुंबई येथे दि. ०८ जुलै १९४५ साली 'पीपल्स एज्यूकेशन सोसायटी' ची स्थापना केली. मुंबई येथे सिध्दार्थ महाविद्यालय आणि औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय व महाड जि. रायगड येथे महाविद्यालये स्थापन केले. भारतात विशेषता किंबहुना महाराष्ट्रात ही महाविद्यालये आजही अग्रेसर ठरलेली आहेत. आंबेडकरांनी आपल्या पीपल्स एज्यूकेशन सोसायटीची ध्येय धोरण जाहिर करतांना म्हटले की, "आमच्या संस्थेचा हेतू केवळ शिक्षण देण्याचाच नाहीतर विद्यार्थ्यांना शिक्षण अशा पध्दतीने की, त्यामुळे आपल्या देशात बौध्दिक, सामाजिक व नैतिक लोकशाहीचा प्रचार करता येईल." ९ आजही त्यांच्या संस्थेतून शिकलेले हजारो विद्यार्थी सामाजिक जाणिवेच्या भूमिकेतून काम करत आहेत. लोकशाही रुजविण्याचा प्रयत्न करत आहे, मात्र प्रस्थापित सत्ताधारी कारवाया त्यांच्या प्रयत्नात फुट पाडत आहे. दलित पुढारी एकसंघ होऊ शकत नाही. त्यामुळेच आंबेडकरांच्या शिक्षण संस्थेला आजही स्थिरता प्राप्त होऊ शकलेली नाही. आपल्या संस्थेचा उद्देश स्पष्ट करतांना त्यांनी प्राध्यापकांच्या जबाबदारीची जाणीव करून देतांना म्हटले की, "आमची संस्था अयोग्य माणसांना प्राध्यापक म्हणून नेमणारी उकिरड्याची जागा नाही. प्राध्यापकांकडे व्यक्तिमत्त्व असले पाहिजे. त्याने आपल्या अध्यापनाची परिपूर्ण तयारी केली पाहिजे. आपली व्याख्याने साधी आणि मनोरंजक करून अचुक मुद्याची चर्चा केली पाहिजे. ज्ञानामध्ये सखोलता प्राप्त करून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना अधिकाधिक वाचन करावयास प्रोत्साहन व प्रेरणा दिली पाहिजे."१० आंबेडकरांनी हा विचार केवळ विद्यार्थ्यांनी वाचनशक्ती वाढविली पाहिजे, यासाठी मांडला होता.

आंबेडकरांना ज्ञान हिच शक्ती आणि प्रकाश वाटत होता. ज्ञान हे दुधारी तलवारीसारखे आहे. त्याचा वापर चांगल्या वाईट गोष्टीसाठी करता येतो. याबाबत ते म्हणतात, "ज्ञानाला चारित्र्याची जोड मिळाली पाहिजे. त्याचा वापर चांगल्या कामासाठी व्हावा. शिक्षण हे मानवी सभ्यता आणि संस्कृतीचा खऱ्यार्थाने पाया करण्यासाठी ज्ञान आणि चारित्र्य यांचा मेळ साधला पाहिजे. सुशिक्षित वर्गाकडे चारित्र्य नसेल तर त्याच्या आत्मभानासाठी त्याला दुर्बल व वंचित वर्गांना उपदेश करता येणार नाही."११ आंबेडकरांना ज्ञान आणि चारित्र्य महत्वाचे वाटत होते. वंचित व दुर्बल_लोकांसाठी त्यांनी आपल्या ज्ञानाचा वापर करावा. समाजसेवेसाठी चारित्र्य महत्वाचे वाटत होते किंबहुना तो त्यांचा दृढनिश्चय होता.

आंबेडकरांना संपुर्ण देशात बदल करावयाचा होता. त्यासाठी बुध्दिमत्ता, सामाजिक विवेक असायला हवा. आपल्या शैक्षणिक विचारातून त्यांना हिंदू समाजात परिवर्तन घडवायचे होते. त्यासाठी त्यांनी शिक्षण संस्था स्थापन केली होती. ती त्यांनी अगदी मनस्वी व प्रामाणिकपणाने चालवली होती. जेणे करून दलित किंबहुना बहुजन समाजातील मुले शिक्षित व्हावी, अशी त्यांची तळमळ होती. आंबेडकरांचा हा विचार जातीभेद नष्ट व्हावा, दरी कमी व्हावी यासाठी होता व त्यांचा तर्कनिष्ठ विचार अधिक होता. त्यांचा हा विचार बुध्दिमान माणूसच समजून घेऊ शकतो. त्यांच्या चळवळीतून उभे राहिलेल्या अनुयायांनी हे कार्य सुरू ठेवले आहे. मात्र पुढच्या म्हणजे अलिकडच्या पिढीकडून हे कार्य होऊ शकले नाही, याची खंत वाटते.

आंबेडकरांचा शैक्षणिक विचार हा जातीभेद व चातुवर्ण्य व्यवस्थेशी निगडित होता. हा विचार समाज मनावर बिंबवण्यासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले होते. खालच्या स्तरातील लोकांना प्राध्यान्याने शिक्षण मिळाले पाहिजे हा विचार स्पष्ट करतांना ते म्हणतात, "शिक्षण हा समाजातील आर्थिक, राजकीय क्रांतीचा मुलाधार आहे. शिक्षण ही शोषण मुक्तीची पायवाट आहे. देशातील तमाम पददलित स्त्रिंया यांच्या दैन्य व दारिद्र्याचा रामबाण उपाय म्हणजे शिक्षण होय. हे शिक्षण जर मुलींना दिले तर समाजाची प्रगती झपाटयाने होईल."१२ या विचारात त्यांनी मुलांबरोबर मुलींनाही शिक्षण देण्याचे आवाहन केले होते.

आंबेडकरांना शिक्षणात समानता हवी होती. त्याचबरोबर त्या शिक्षणाचा फायदा समाज विकासासाठी व्हावा, अशी त्यांची धारणा होती. ते म्हणतात, "शिक्षण सर्वांसाठी खुले व्हावे, शिक्षण हे विकासासाठीचे स्वातंत्र्य आहे. शिक्षण हाच राष्ट्रीय उन्नतीचा मूलमंत्र आहे. त्यासाठी मुला-मुलींना बालवयात त्यांच्या मनावर बिंबवले पाहिजे. सामाजिक क्रांती व परिवर्तन हे शिक्षणावाचून होऊच शकत नाही. त्यामुळे शिक्षण हे सर्वांना प्राध्यान्याने मिळायला हवे."१३ असा त्यांचा आग्रह होता.

आंबेडकरांना शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, हे जर मिळाले तर माणसाला समाजाबद्दल जाणीव होते आणि ते जर मिळाले नाही तर तो माणुसकी विसरतो. पशुसारखा वागतो म्हणून आंबेडकर शिक्षणाच्या उपयुक्ततेबद्दल म्हणतात, "व्यक्तीला शिक्षण ही एक जाणीव देते. शिक्षणाशिवाय माणूस म्हणजे निव्वळ पशू आहे. उपासमारीने माणूस बलहीन होऊन अल्पायुषी होतो, तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुध्द राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो."१४ असा पुरोगामी विचार मांडतात.

यावरून आंबेडकर हे एक थोर शिक्षणप्रेमी होते त्याचबरोबरच उत्कृष्ट शिक्षणतज्ञही होते. शिक्षण हे शोषणमुक्ती देते म्हणून प्रत्येकाने शिक्षण घेणे ही काळाची गरज आहे, असेही त्यांनी वारंवार प्रतिपादन केलेले आहे. आंबेडकरांच्या या कार्याबद्दल प्राचार्य नरहर कुरूंदकर म्हणतात, "बाबासाहेबांनी जो ज्ञानाचा अग्नी आपल्या जीवनात अखंड प्रज्वलित ठेवला त्याचे दर्शन घेतल्यावर त्यांच्या पुतळ्याकडे सुध्दा ताठ मानेने स्वत:ला ज्ञानाचे ठेकेदार समजणाऱ्या सवर्ण हिंदुना शक्य नाही. स्वत: आंबेडकरांना वाचनाचा अतिशय नाद होता. विद्यार्थ्यी दशेत त्यांना संस्कृत विषय शिकता आला नाही. पुढे ते चिकाटीने संस्कृत शिक्षण शिकले. ग्रंथाशिवाय आपण जगूच शकणार नाही, असे त्यांना वाटे. मृत्यू प्रसंगी त्यांच्या ग्रंथालयात २५००० इतके दुर्मिळ ग्रंथ होते."१५

शिक्षण हेच माणसाला घडविते, असे त्यांचे ठाम मत होते. शिक्षण हे ज्ञान व प्रज्ञा यांचा सुरेख संगम आहे. जी व्यक्ती शिक्षणावर अधिक प्रेम करते, ती खऱ्या अर्थाने शिक्षण प्रेमी आहे. आपल्या देशात सर्वांना सामुदायिक शिक्षण दिले पाहिजे असा त्यांचा खास आग्रह होता. मात्र शिक्षणाचा धंदा किंवा बाजारीकरण झाले तर शिक्षण निकामी ठरते. थोडक्यात आंबेडकरांना जीवनदायी, शास्त्रीय, मानवतावादी, समाजहितवादी, शील व प्रज्ञा यांना सुवर्णमध्य साधणारे शिक्षण अभिप्रेत होते.

**निष्कर्ष** -

एकूणच आंबेडकरांचा शिक्षण विचार लक्षात घेतला तर आजही त्याची प्रचिती येते. आजच्या सरकारने व संस्थाचालकांनी शिक्षणाचा बाजार मांडलेला आहे. त्यामुळे आंबेडकरांचा मतानुसार आजचे शिक्षण निकामी व निरूपयोगी झाले आहे. परिणामी देशात भयंकर बेरोजगारी निर्माण झाली आहे. प्रचंड गुन्हेगारी माजली आहे. उच्च शिक्षणाचा दर्जा घसरला आहे. त्यामुळेच आजच्या तरूणांना शिक्षणाबद्दल आस्था राहिलेली नाही. आज

खऱ्या अर्थाने व्यावसायिक शिक्षणाची गरज आहे. आंबेडकरांनी स्वत: उच्च शिक्षित होऊन शिक्षणसंस्था स्थापन करून वंचितांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय परिवर्तन मुळ शैक्षणिक चळवळीत आहे. हे महत्व आंबेडकरांनी पटवून दिले. त्याबरोबरच वंचित व दारिद्रयात खितपत पडलेल्या दलित मुलांसाठी वसतिगृहे स्थापन करून त्यांना शिक्षण घेण्यास बाध्य केले. हेच आंबेडकरांच्या शैक्षणिक चळवळीचे फार मोठे यश आहे, असे म्हणता येईल.

**समारोप** -

डॉ. आंबेडकरांच्या या शैक्षणिक कार्याचा गौरव करतांना ज्येष्ठ विचारवंत प्रा. संधानशिव म्हणतात, "आंबेडकरांनी ज्याला देशीय मुलाधार आहे, असे शैक्षणिक तत्वज्ञान प्रतिपादन केले आणि अडाणी जनतेमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शैक्षणिक संस्था स्थापन केली. त्यांचे तत्वज्ञान कार्य अजून व्यापकतेने झालेले नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, मानवी विचारांच्या आणि कार्याच्या या क्षेत्रामध्ये त्यांनी सखोल चिंतन केले आहे. यासाठी सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षण या हत्याराचा वापर केला."१६ त्याचबरोबर संधानशिव यांनी आंबेडकरांचे कार्य व्यापकतेने झाले नाही, अशी खंत व्यक्त केली आहे.

आंबेडकरांच्या या ऐतिहासिक शैक्षणिक कार्याची नोंद घेतांना प्राचार्य बा. ह. कल्याणकर म्हणतात, "आंबेडकर यांच्या अस्पृश्यता निर्मुलनाच्या आणि त्या प्रित्यर्थ जाती निर्मुलनाच्या संदर्भात त्यांच्या शैक्षणिक विचारांचा मागोवा इथे प्रयत्न केला आहे. गेल्या हजारो वर्षात जे घडू शकलं नाही, इतकं महान युगांतर आंबेडकर चळवळीने आज केले आहे."१७ अशा प्रकारे हा आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांचा हा विजयच आहे, असे म्हणता येईल.

**संदर्भटीपा-**

१. पृ. १४३,१५५, ४९४, २६४, ४९३ - बाबासाहेब आंबेडकर - धनजंय किर

2. पृ. ४१७, ९६ , ४१२, ४१७/४१८, ४१९, ४२१, ४२३, - बाबासाहेब आंबेडकर - गौरवग्रंथ

3. मराठी वाड्मयाची सांस्कृतिक पाश्र्वभूमी

**संदर्भ ग्रंथ** -

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - गौरवग्रंथ - म. रा. साहित्य व संस्कृती मंडळ, म. रा. मुंबई - तृ. आ. २००६

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - धनजंय किर - पाप्युलर प्रकाशन, मुंबई - स. आ. २०११

३) नरहर कुरूंदकर - धार आणि काठ

४) विजय गायकवाड - आंबेडकरी विचारधारा - वैभव प्रकाशन, मुंबई. प्र. आ. १९९७

५) वि. र. काळे - ज्ञानयोगी डॉ बाबासाहेब आंबेडकर - वैभव प्रकाशन मुंबई - २००४

६) अरूण कांबळे - जनता पत्रातील लेख - पाप्युलर प्रकाशन मुंबई - १९९२

७) प्रदिप गायकवाड - दलितांचे शिक्षण - क्षितिज प्रकाशन, नागपूर - २००४

८) भास्कर कद्रेकर - जनता खास अंक - गायकवाड प्रकाशन, नागपूर - १९३३

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संसदीय लोकशाही विषयक विचार

**प्रा. अक्षय संजय वाकोडे**
राज्यशास्त्र विभाग
श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय चिखली जि.बुलडाणा

**प्रस्तावना :**

भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या नवनिर्मितीमध्ये एक महत्वाची भूमिका पार पाडणारे महामानव होते. ते सांसदीय लोकशाहीचे प्रणेते होते. त्यांच्या मते 'राज्य हे पूर्णतः स्वतंत्र असले पाहिजे. धर्म, जाती, संपत्ती, सामाजिक स्थिती आणि स्त्री-पुरुष भेदावर आधारीत व्यक्ति-व्यक्तिमध्ये कोणताही भेदभाव असता कामा नये.' २६ जानेवारी १९५० रोजी भारत लोकसत्ताक देश म्हणून अस्तित्वात आला. भारतात याच दिवसापासून लोकांचे लोकांनी बनविलेले आणि लोकांसाठी असलेले सरकार अस्तित्वात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामते, लोकशाही यशस्वी करायची असेल तर केवळ राजकीय लोकशाहीवर संतुष्ट न राहता राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रुपांतर केले पाहिजे. राजकीय लोकशाहीचा पाया सामाजिक लोकशाही भक्कमपणे आधारल्याशिवाय राजकीय लोकशाही टिकत नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे समता, स्वातंत्र्य व विश्वबंधूत्व या तत्त्वावर आधारलेला जीवनमार्ग, ही तीन तत्त्वे वेगवेगळी मानता कामा नये. त्यांचा त्रिवेणी संगम आहे. त्यापैकी एक तत्त्व दुसर्या तत्त्वापासून वेगळे काढणे म्हणजे लोकशाहीच्या मुळ हेतुस सुरंग लावण्यासारखे आहे. समतेपासून स्वातंत्र्याला वेगळं करता येणार नाही किंवा स्वातंत्र्याला विश्वबंधूत्वापासून वेगळं करता येणार नाही. समता नसेलतर केवळ स्वातंत्र्यामुळे मुठभर लोकांचा वर्ग सत्ताधारी बनेल. समतेच्यां जोडीला स्वातंत्र्य नसेल तर वैयक्तिक कर्तृत्वशक्ती लोप पावेल. विश्वबंधूत्वाशिवाय स्वातंत्र्य व समता योग्य मार्गाने जाणार नाही. वरील विचारधारा भारतीय संविधानामध्ये समाविष्ट करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीला शक्ती युक्त समता स्वाधिनता, बंधुता तसेच न्याय या चतुसूत्रीचा अवलंब केल्यामूळेच भारतीय संविधान हे वरील तत्त्वावर टिकून आहे.

**एक व्यक्ती एक मत :**

प्रौढ मताधिकारामध्ये एका व्यक्तीला एक मत अभिप्रेत असते. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते एका व्यक्तीला एक मत यातून राजकीय लोकशाही जरी निर्माण होत असली तरी सामाजिक लोकशाही मात्र निर्माण होत नाही. मताधिकार, मूलभूत अधिकार यांचा केवळ घटनेत समावेश करणे पुरेसे नाही. त्या अधिकारांचा वापर करण्याची क्षमता नागरिकांमध्ये निर्माण झली पाहिजे. यावर आंबेडकरांनी भर दिला. स्वातंत्र्यामध्ये केवळ व्यक्तीच्या हक्कांना महत्व नसते तर समाजातील सर्व गटांना विशेषतः दलितांना किंवा शोषित समाजाला स्वातंत्र्य उपभोगण्याचे सामर्थ्य निर्माण करुन घेण्यावर बाबासाहेबांचा भर होता.

सामाजिक लोकशाही निर्माण झाल्याखेरीज खरी लोकशाही निर्माण होऊ शकत नाही आणि सामाजिक लोकशाही निर्माण करण्यासाठी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येकाला दुसऱ्याबद्दल

प्रेम, आदर वाटला पाहिजे. तसेच सर्व लोकांना समान अधिकार असले पाहिजेत. काही लोकांना विशेष अधिकार असणे आणि काहींना ते नसणे यातून समाजात फूट पडते. हे लोकशाहीशी विसंगत आहे, लोकशाहीला घातक आहे, त्यासाठी समता असणे आवश्यक असते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 'स्टेटस अँड मायनॉरिटीज' या आपल्या पुस्तकात संसदीय कार्यकारी पद्धतीपेक्षा इतर पद्धती भारतीय व्यवस्थेसाठी सुचविली होती. अध्यक्षीय पद्धतीत अल्पसंख्याकांचे संरक्षण होईल असे त्यांना वाटत असे. त्यांनी जरी घटनेत संसदीय लोकशाहीचा एक चांगला पर्याय म्हणून स्विकार केलेला असला तरी तिच्या मर्यादा त्यांना माहित असल्या कारणाने त्यांनी मुख्यत्वे करून 'सामाजिक लोकशाही चा आग्रह धरलेला आहे. त्यांच्या मते प्रौढ मतदानाच्या अधिकारामधून सुरू झालेली राजकीय लोकशाही ही सामाजिक लोकशाहीशिवाय विकसित होऊ शकणार नाही. बहुमतही हुकूमशाही बनते पण त्याला जेव्हा सामाजिक विषमतेची जोड मिळते, तेव्हा त्या हुकूमशाहीला प्रस्थापित वर्गाच्या हितसंबंधाचे रक्षण करणारे समाजमान्य नैतिकतेचे अधिष्ठान मिळते. सामाजिक समतेनेच अल्पसंख्याकांच्या हक्कांना सार्वत्रिक आणि सुरक्षीतता मिळू शकते. आणि हेच तत्व डॉ. बाबासाहेबांनी मूलभूत हक्क आणि राज्यांसाठी मार्गदर्शक तत्वांच्या रूपाने भारतीय राज्यघटनेत पेरली आहेत. डॉ. बाबासाहेबांच्या मतानुसार संसदीय लोकशाही यशस्वी होण्यासाठी काही पथ्ये अपेक्षित असतात. समाजात विषमता असल्यास लोकशाहीत धोका निर्माण होतो, आणि अमर्याद विषमतेतून लोकशाहीवरच घाला पडू शकतो. हे जर्मनी, इटली यामधील हुकूमशाहीवरून स्पष्ट होते. त्याचप्रमाणे संसदीय लोकशाहीत सृजनात्मक विरोधाचे अनन्यसाधरण महत्व आहे, असे बाबासाहेबांचे मत आहे. कार्यकारी मंडळ हे कितीही लोकनियुक्त असले तरी त्याचे स्वरूप पक्षीय राहते आणि म्हणून त्याने घेतलेले निर्णयही पक्षीयच असतात. म्हणुन कार्यकारी मंडळास योग्य अंकुश म्हणून विरोधी पक्षाचे महत्व संसदीय लोकशाहीत अनिवार्य बनते. यामुळेच इंग्लंडमध्ये विरोधी पक्षाला मोठा मान व मान्यता असते. त्याला राज्याचा पक्ष म्हणून संबोधल्या जाते. त्याचप्रमाणे विरोधी पक्षनेत्याला कार्यालयीन सुविधा आणि शासकीय कोषागारातून वेतन मिळते. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेबांनी लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी तटस्थ प्रशासनाचे महत्व विशद केले आहे. सर्व प्रगत देशांत 'राजकीय कार्यकारी प्रमुख' व 'प्रशासकीय कार्यकारी प्रमुख असा फरक केला जातो. राजकीय प्रमुख मुख्यत्वे नियमनाचे कार्य करतो. दैनंदिन नियंत्रण राजकीय प्रभावापासून मुक्त असते. म्हणून बाबासाहेबांनी या ठिकाणी घटनात्मक नैतिकतेवर भर दिलेला आहे. घटनेतील शब्दामागे काही मुळ विचार, सांस्कृतिक मुल्ये, परंपरा व संकेतही दडलेले असतात व नेमके हे स्पष्ट करण्यासाठी घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी घटनेतील विविध तरतुदीमधील मूळ हेतू घटना समितीच्या चर्चेत स्पष्ट केला असून 'संसद' व 'न्यायालये' यांच्यात समन्वय साधन्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. संसदीय पद्धतीत बहुमतवाल्या पक्षावर अल्पसंख्यीयांची विश्वासार्हता मिळविण्याची मोठी जबाबदारी असते. केवळ संख्येच्या बळावर कायद्याला नैतिकता प्राप्त होत नाही. ते समाजाला संघटित ठेवणाऱ्या समान नितीमूल्यांवर आधारलेले हवेत. डॉ. बाबासाहेबांच्या मते लोकशाही म्हणजे लोकशाही समाज व्यक्तीला मान देणारा, व्यक्तीविकासासाठी संधी उपलब्ध करून देणारा आणि अन्यायाविरूद्ध जागरूकतेने आवाज उठविणारा समाज.

**संसदीय लोकशाहीविषयक विचार :**

बाबासाहेबांच्या राजकीय चिंतनातील लोकशाही विचार हा केवळ आदर्शाच्या स्वप्नरंजनापासून उपजलेला नव्हता तर भोवतालचया सामाजिक राजकीय वास्तवाच्या मुशीतून निघाला होता. सामान्य माणसावर बाबासाहेबांचा एवढा लोभ आणि विश्वासही होता की, त्यांच्या व्यक्तिगत व सामूहिक प्रतिष्ठेच्या प्रतिष्ठापनेसाठी लोकशाही जीवनमार्गाचा त्यानी ध्यास घेतला. या देशातील सामाजिक संबंधाची फेररचना फक्त लोकशाही राजवटच करू शकेल असा त्यांना विश्वास होता. लोकशाही म्हणजे सहजीवन, लोकशाहीची मुळे सामाजिक संबंधातच आढळतात अशी त्यांची धारणा होती. बाबासाहेबांच्या मते व्यक्तिनिष्ठा आणि व्यक्तिपुजा या बाबी लोकशाहीस मारक ठरतात. अतिरेकी व्यक्तिनिष्ठेतुन लोकशाहीचा लोप होवून हुकुमशाहीचा मार्ग प्रशस्त होतो. बाबासाहेबांच्या लोकशाही विचारात मानवी हक्कांना व त्यांचया संरक्षानाही महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. संसदीय लोकशाहीवर बाबासाहेब आंबेडकरांचा विशेष भर होता. त्यांच्या मते संसदीय पध्दती हीच व्यक्तीच्या अंगी आत्मनिर्भरता, उपक्रमशीलता व जबाबदारीची जाणीव निर्माण करू शकते. सहकार्य, शिस्त व समर्पण, इ. गुणांचा विकास करू शकते. उच्चतर प्रतीचे राष्ट्रीय चारित्र्य घडवून शील, सचोटी, उदयम व धारिष्टय इत्यादीचा परिपोष या पध्दतीतच होवू शकतो. संसदीय लोकशाहीच मानवी जीवंताच्या प्रवाही स्वरूपाशी सुसंगत ठरते, कारण रक्तपात न घडविता सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात मूलभूत स्वरूपाचे बदल घडवून आणण्याचा मूलमंत्र फक्त तिलाच अवगत होता.

संसदीय पध्दतीत दोन महत्वाच्या बाबी आहेत त्यात पहिली बाब ही की, विरोधी पक्ष आणि विरोध वृत्तपत्रे व दुसरी बाब अशी की मुक्त व न्याय निवडणुका. संसदीय लोकशाहीत विरोधी पक्षाचे केवळ स्वागत होते एवढेच नाही तर उचित प्रमाणात सन्मानही केला जातो. शांततापूर्ण मार्गानी सत्तांतर शक्य होणे हे कोणत्याही लोकशाही व्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण आहे. नियतकालीन, मुक्त व न्याय निवडणुका हा संसदीय लोकशाहीचा कणाच म्हणता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते लोकशाहीत अनुवांशिक शास्ति व अनुवांशिक शासित कधीच असता कामा नये. राज्यकर्तेपणाचा अमरपटटा कोणत्याच एका वर्गाला असू नये. शासक शासित यांच्यातील सरहद्दीना ताठर स्वरूप येणे लोकशाहीलाच मारक ठरते.

संसदीय लोकशाहीचे प्रभावी समर्थन संविधान समिती समोर करतांना त्या पध्दतीतील त्रुटीवर बाबासाहेब आंबेडकरांनी बरोबर बोट ठेवले. तसेच या देशातील लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी संघटित व शिस्तबध्द राजकीय पक्षाचाही नितांत आवश्यकता आहे. टीका करण्याचा हक्क हा संसदीय लोकशाहीतील सर्वात महत्वाचा हक्क आहे. आणि संघटित विरोधी पक्ष अस्तित्वात असल्याखेरीज त्या हक्काला काही अर्थ उरत नाही. राजकीय पक्षाखेरीज लोकशाहीची कल्पनाच करणे अशक्य आहे. परंतु केवळ विरोधासाठी विरोध, किंवा विरोधाच्या नावाखाली विध्वंस व अराजक हे बाबासाहेब आंबेडकरांना अमान्य होते. सतत संघर्ष, सारखे स्थगन प्रस्ताव, प्रक्षोभक भाषणे व सभात्याग हे विरोधी पक्षांचे मार्ग लोकशाहीला घातक ठरू शकतात. परस्परांना समजावून घेणे वैचारिक आदान-प्रदानातून विशिष्ट निष्कर्षाप्रत येणे परस्परांविषयी आदर बाळगणे अशी पथ्ये सत्ताधारी व विरोधी या उभयतांना पाळणे लोकशाहीच्या हिताचे असते.

संसदीय लोकशाही पध्दतीचा विचार मांडत असतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीव्यवस्थेचा मुद्दा मांडला. त्यांच्या मते, भारतात काही जाती ह्या अल्पसंख्य आहेत. त्यामुळे मतदान बऱ्याचवेळी जातीय दृष्टिकोनातूनच केले जाते. संसदेत तसेच विधानसभेतही विशिष्ट जातीचेच वर्चस्व राहण्याची शक्यता असते. त्यामुळे जातीव्यवस्था हा संसदीय लोकशाहीतील अडथळा आहे. भारतात संसदीय लोकशाही यशस्वी होईल की नाही याबाबत डॉ. आंबेडकर शांसक होते. त्यांच्यामते ही पध्दती परकी आहे. भारतात ही पध्दती राबवितांना सुरूवातीला काही दिवस त्रास होईल. परंतु कालांतराने ही पध्दती यशस्वी होईल. या पध्दतीत विकास अतिशय संथपणाने होतो. येथे चर्चेवर अधिक भर असतो. विकास असोत की परिवर्तन ते चर्चा करून विचारविनिमयाने घडत असते. बाबासाहेबांच्या मते भारतात हीच पध्दती उपयुक्त आहे. परंतु संसदीय लोकशाहीला स्थैर्य मिळविण्यासाठी भारताला अद्याप अनेक महत्वाच्या प्रश्नांना तोंड द्यावे लागणर आहे. त्यापैकी वंशपरंपरेने मिळालेल्या नेतृत्वाचा प्रश्न आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने ५५० हून अधिक संस्थाने बरखास्त केली. त्यानंतर काही वर्षांनी समाजवादी रचनेचा पुरस्कार करण्याच्या नावाखाली पूर्वीच्या संस्थानिकांना मिळणारा तनखाही बंद केला. परंतु तरीही गावपातळीपासून राज्यपातळी पर्यंत आणि सर्व राजकीय पक्षांत अशी सत्ताधारी घराणी आपल्याकडे आहेतच. राजकारणात नवे तरूण रक्त आणण्याच्या नावाखाली सर्वच राजकीय पक्षांतील बहुतेक सर्व तथाकथीत तरूण आमदार आणि खासदार सत्तेत असणाऱ्यांचेच पुत्र, कन्या, जावई, सूना, नातू, काका, मामा असेच आहेत. संसदीय लोकशाहीच्या सुदृढतेचा विचार करतांना केवळ संसदेचा विचार करणे पुरेशे नाही. मंत्रीमंडळ, प्रशासन, सनदी सेवा, पोलीस यंत्रणा, राज्यपाल आणि घटनेनुसार स्थापन करण्यात आलेले स्वायत्त आयोग अशा यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर कायदा व सुव्यवस्था आणि सुशासन अवलंबून असते. हे दुर्लक्षित करून चालणार नाही. गेल्या अनेक वर्षात यापैकी अनेक संस्था कमकुवत झाल्या आहेत. त्यांचे राजकीयकरण झाले आहे व त्यांची स्वतंत्र निर्णय घेण्याची क्षमताही कमी झाली आहे. माहितीच्या अधिकारानेही यात अपेक्षेप्रमाणे फरक पडलेला नाही. असे आजवरच्या अनुभवावरून सिध्द होते. त्यामुळे संसदीय लोकशाहीला बळकटी प्राप्त करून देण्यासाठी अनेक स्तरावर प्रयत्न करावे लागतील.

**भारतातील लोकशाही समोरील अडथळे :**

इंग्लंडमधील सांसदीय लोकशाही यशस्वी झाली तरी भारतात ती यशस्वी न होण्यात अनेक स्वरूपाचे अडथळे आहेत. त्यांचा सखोल अभ्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला होता. भारतात सांसदीय लोकशाही यशस्वी होण्यासाठी अनेक अडचणी आहेत.

१) भारतीय लोकांची निरक्षरता
२) येथील समाज हा परंपरागत रूढी परंपरा व अंधश्रध्दांनी ग्रस्त झालेला आहे.
३) सांसदीय लोकशाही ही मूळ भारतीय नाही.
४) लोकशाही यशस्वी होण्यासाठी येथे अनुकूल असे सामाजिक वातावरण नाही.
५) मुख्य म्हणजे भारतीय समाजात कमालीची आर्थिक विषमता आहे.
६) लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर भारतात सहिष्णुतेचे वातावरण असले पाहिजे.
७) आपला भारतात विभूतीपुजा हा जनमाणसाचा फार मोठा दोष आहे.

भारतातील सांसदीय लोकशाही यशस्वी होण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढील गोष्टीची आवश्यकता असण्याचे म्हटले आहे.

१) देशात सामाजिक समता असली पाहिजे.

२) देशातील राजकारणात आणि शासनात सुसंघटित आणि शिस्तबध्द विरोधी पक्ष असला पाहिजे.

३) राज्यघटनेत सांगितलेल्या कायदेशीर समतेचे काटेकोर अंमलबजावणी झाली पाहिजे.

४) देशात होणाऱ्या निवडणूका मुक्त व न्याय पध्दतीने झाल्या पाहिजे.

५) भारतीय राज्यघटनेत सांगितलेल्या नीतीनिर्देशक तत्वाचे पालन झाले पाहिजे.

**निष्कर्ष :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते जातीव्यवस्था हा संसदीय लोकशाहीतील अडथळा आहे.तसेच घराणेशाही ही लोकशाहीसाठी मारक आहे. 'भारत आधुनिक काळात जगातील सर्वात मोठा यशस्वी लोकशाही असणारा देश म्हणून ओळखला जातो.' असे असले तरी आज भारताच्या गणराज्यापुढे अनेक समस्या निर्माण झाल्या आहे त्याचे कारण सांसदीय लोकशाही साठी सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती जबाबदार असल्याचे अभ्यासाअंती दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी सांगितलेल्या विचारांची खरी गरज आधुनिक काळात भारताला भासत आहे. जो पर्यंत पारदर्शक वातावरणात निवडणूक होणार नाही, देशामध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय समता प्रस्तापित होणार नाही, जनतेमध्ये जागृकता निर्माण होणार नाही. प्रभावी व शिस्तबध्द विरोधी पक्ष निर्माण होणार नाही तो पर्यंत भारताचे सांसदीय लोकशाही शासन यशस्वी होणार नाही हे ही तेवढेच खरे आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) गोडबोले माधव - भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्निपरीक्षा, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१२

२) गायकवाड जयदेव - संविधान सभेत डॉ. आंबेडकर, पद्‌यगंध प्रकाशन, पुणे, २०००

३) डोळे ना. य.- राजकीय विचारांचा इतिहास, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, १९६९

४) पळशीकर सुहास - डॉ. आंबेडकरांचे विचार, प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी, १९९१

५) भोळे भा. ल.- भारतीय राजकीय विचारवंत, पिंपळापूरे अॅड. कं., नागपूर, १९९५

६) मेश्राम केशव - डॉ. आंबेडकर चिंतन, लोकवाङ्मय गृह,मुंबई १९९८

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लोकशाही समाजवाद

**प्रा. डॉ. प्रदीप महादेव जगताप**
लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला, महाविद्यालय, सोलापूर

**प्रस्तावना**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक,राजकीय,आर्थिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण असे योगदान दिले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारत देशाच्या परिस्थितीला अनुसरून राष्ट्र, राष्ट्रवाद, लोकशाही समाजवाद, कायदे, न्याय, आरक्षण, सामाजिक न्याय यासंदर्भात कार्य करून त्यावर आपले विचार मांडले आहेत. त्यांनी भारतीय समाज व्यवस्थेचा विचार करून संसदीय लोकशाहीचा पुरस्कार केला. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक अटीही सांगितल्या. जातीयता, गरिबी, निरक्षरता या बाबी भारतीय लोकशाही पुढील आव्हाने आहेत असे स्पष्ट केले. लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर प्रथम सामाजिक लोकशाही अस्तित्वात आली पाहिजे व त्यासाठी जातीय मानसिकता संपुष्टात यायला हवी. दुसरे म्हणजे जोपर्यंत गरीबी, दारिद्र्य संपुष्टात येत नाही तोपर्यंत खरी लोकशाही अस्तित्वात येत नाही. म्हणजे लोकशाहीसाठी प्रथम सामाजिक लोकशाही त्यानंतर आर्थिक लोकशाही व त्यानंतरच राजकीय लोकशाही प्रस्थापित होऊ शकेल, असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते.त्या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाही समाजवादा संदर्भात आपले विचार मांडले आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात त्यांच्या लोकशाही समाजवादा संदर्भातील विचार याचा अभ्यास केला आहे.

**गृहीतके**

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संसदीय लोकशाही व्यवस्थेचा पुरस्कार केला आहे.
२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाज व्यवस्थेचा विचार करून भारतात लोकशाही कशी यशस्वी होईल याचा विचार केला आहे.
३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक लोकशाही, आर्थिक लोकशाही आणि राजकीय लोकशाही या क्रमाने लोकशाहीचा विचार केला आहे.
४) आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाही समाजवादाचा पुरस्कार केला आहे.

**उद्दिष्टे**

१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाही विचारांचा अभ्यास करणे.
२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाज व्यवस्थेच्या अनुषंगाने मांडलेल्या लोकशाही विचारांचा आढावा घेणे.
३) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही समाजवादा संदर्भातील विचार समजून घेणे.

**संशोधन पद्धती**

सदर शोध निबंध लिहिण्यासाठी संशोधनाची प्राथमिक साधने व द्वितीय साधने यांचा आधार घेतला आहे. त्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मूळ ग्रंथ कास्ट इन इंडिया,प्रॉब्लेम ऑफ रुपी, स्टेट्स अँड मायनॉरिटी यांचा आधार घेतला आहे. तसेच त्यांच्याविषयी लिहिलेले संदर्भ ग्रंथ यांचाही आधार घेतला आहे.

राज्य हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन असून सामाजिक कल्याण हे राज्याचे उद्‌दिष्ट असले पाहिजे ,असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. त्यांच्या मते, राज्य हे मानवनिर्मित असून ते मानवी गरजेतून निर्माण झाले आहे. राज्याने शांतता,सुव्यवस्था निर्माण करणे एवढेच आपले मर्यादित क्षेत्र न मानता लोकांचे जीवन सुखी, कल्याणकारी कसे होईल,यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. सामाजिक व आर्थिक समता निर्माण करण्याची भूमिका राज्याने लोकशाही मार्गाने पार पाडली पाहिजे. समता निर्माण होण्यासाठी लोकांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात स्वातंत्र्य विषयक मोकळे वातावरण असले पाहिजे. लोकांना आपल्या अधिकारांचा,स्वातंत्र्याचा उपयोग करून घेण्यासाठी पोषक वातावरण उपलब्ध करून दिली पाहिजे. व्यक्ती स्वातंत्र्याचा बळी न देता व्यक्तिविकासासाठी राज्याने प्रयत्नशील असले पाहिजे. लोकशाहीची मूल्य स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता यांची जपणूक केली पाहिजे.

लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात जिच्याद्‌वारे रक्तपाता शिवाय मुलगामी क्रांतिकारक बदल घडवून आणता येतात,अशा प्रकारची शासन व्यवस्था म्हणजे लोकशाही होय,असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. उदारमतवादी विचारसरणीचा प्रभाव त्यांच्यावर असल्याने व्यक्तीवाद आणि मर्यादित शासनाचा त्यांनी पुरस्कार केला. व्यक्तीची प्रतिष्ठा सर्वमान्य व्हावी आणि त्यातून सामाजिक न्यायाची उभारणी व्हावी,ही अपेक्षा लोकशाहीच पूर्ण करू शकते, असे आंबेडकरांचे मत होते. प्रत्येक व्यक्तीला सन्माननीय नागरिक म्हणून जगता येण्यासाठी जे लागते ते सर्व काही लाभेल, अशी समाज व्यवस्था निर्माण करणे हे लोकशाहीचे साध्य असते, असे ते म्हणत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही समाजवादाचे विचार समजून घेण्यासाठी त्यांचे पुढील तीन प्रबंध महत्वपूर्ण आहेत.

**१) ऍडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ द ईस्ट इंडिया कंपनी -**

हा प्रबंध डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी एम.ए. च्या पदवीसाठी लिहिला होता.या प्रबंधामध्ये ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि वित्तव्यवस्था यामध्ये कसे बदल होत गेले आणि त्याचा भारतीय जनतेवर कशाप्रकारे आर्थिक दृष्ट्या प्रतिकूल परिणाम झाला,याचे विवेचन केलेले आहे.

**२) इव्होल्युशन ऑफ प्रोविन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया-**

हा प्रबंध डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पीएच.डी. पदवीसाठी लिहिला होता. यामध्ये त्यांनी ब्रिटिश केंद्र सरकार आणि घटक राज्य यांच्यातील आर्थिक संबंध कसे विकसित झाले आणि त्याचा परिणाम कसा झाला ,याचा आढावा घेतला आहे.

**३) द प्रॉब्लेम ऑफ रुपी इट्स ओरिजिन अँड इट्स सोल्युशन-**

सदर प्रबंध हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी डॉक्टर ऑफ सायन्स या पदवीसाठी लिहिला होता. यामध्ये त्यांनी भारताच्या चलनाच्या उत्क्रांतीची ऐतिहासिक मीमांसा करून भारतासाठी कोणती चांगली चलन पद्धती असावी यासंदर्भात विचार मांडले आहेत.

त्याचबरोबर त्यांचे लोकशाही समाजवादाचे विचार समजून घेण्यासाठी त्यांचे पुढील तीन ग्रंथ महत्वपूर्ण आहेत

१) **ॲनिहिलेशन ऑफ कास्ट-** या ग्रंथामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील जातीय व्यवस्थेमुळे भारताचा आर्थिक विकास आणि प्रगती कशी थांबलेली आहे,याची मीमांसा केलेली आहे.

जातीव्यवस्थेमुळे भांडवल व श्रमाचे उत्पादनाचे महत्त्वाचे दोन घटक त्यांची उपयुक्तता विचारात न घेता जातीनिहाय पद्धतीने वापरले गेल्यामुळे उत्पादन प्रक्रिया अकार्यक्षम बनली आणि आर्थिक प्रगती रोखली गेली. तसेच जातीव्यवस्थेमध्ये पारंपारिक स्वरूपाची आर्थिक सामाजिक रचना असल्यामुळे आर्थिक विकास खुंटला गेला. त्यामुळे भारताचे आर्थिक अतोनात नुकसान झालेले आहे,असे मत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या ग्रंथात मांडले आहे.

**२) व्हाट कॉंग्रेस अँड गांधी हॅव डन टू अनटचेबल्स-**

या ग्रंथात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जाती व्यवस्थेची व अस्पृश्यतेच्या प्रश्नाची आर्थिक दृष्टिकोनातून मीमांसा केलेली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते,अस्पृश्यता ही धार्मिक रचना नसून ती आर्थिक पिळवणूक करणारी रचना आहे की जी गुलामगिरी पेक्षाही वाईट आहे. गुलामगिरीत मालक गुलामांना खाऊ पिऊ घालून त्यांना माणूस म्हणून वागणूक देतो परंतु अस्पृश्यता अशी व्यवस्था आहे की जेथे अव्याहतपणे स्पृश्य मालक बेचबाबदार राहून अस्पृश्य समाजाचे आर्थिक पिळवणूक करीत असतो.

**३)बुद्धीझम ऍण्ड कम्युनिझम-**

या ग्रंथामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मार्क्सवाद आणि त्याची भारतीय समाजाला उपयुक्तता याविषयी विश्लेषण केलेले आहे. आर्थिक शोषण हे वर्ग संघर्षामुळे होते ही कार्ल मार्क्सची विचारसरणी त्यांना मान्य नव्हती. कारण भारतात केवळ आर्थिक शोषण होत नाही तर त्याबरोबरच सामाजिक व धार्मिक शोषणही होत आहे. तसेच मार्क्सचा सर्वंकष रक्तरंजित क्रांतीचा मार्ग त्यांना मान्य नव्हता. रक्तरंजित क्रांती ऐवजी लोकशाहीच्या, सनदशीर,घटनात्मक मार्गाने समाजाची पुनर्रचना करता येईल, यावर त्यांचा विश्वास होता.

**४) स्टेट्स अँड मायनॉरिटीज-**

या ग्रंथामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या सर्वांगीण विकासासाठी कोणते आर्थिक धोरण असावे,यासंदर्भात आपले विचार मांडले आहेत. दारिद्र्य निर्मूलन, शोषणमुक्तता, विषमता निर्मूलन या गोष्टी केल्या पाहिजेत, असे त्यांचे मत होते. खाजगी उद्यमशीलतेला धक्का न लावता उत्पादन क्षमता वाढविणे आणि उत्पादनाचे संपत्तीचे समान वाटप करणे, ही राज्यसंस्थेची जबाबदारी आहे, असे सांगून त्यांनी सदर ग्रंथामध्ये भारताच्या आर्थिक व सामाजिक पुनर्रचनेबाबतचा लोकशाही समाजवाद मांडला आहे. आर्थिक, सामाजिक समता प्रस्थापित झाली तरच राजकीय स्वातंत्र्याला अर्थ प्राप्त होईल, असे त्यांचे ठाम व स्पष्ट मत होते.

लोकशाही समाजवाद प्रस्थापित होण्यासाठी सरकारने पुढील गोष्टी केल्या पाहिजेत,असे मत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले.

१) महत्त्वाचे व पायाभूत उद्योगधंदे राज्याच्या मालकीचे करावेत व त्यांचे संयोजन सरकारद्वारे करावे.

२) सरकारद्वारे प्रत्येक व्यक्तीला विमा देण्यात यावा व त्या विमा योजनेवर राज्याचा अधिकार असावा.

३) जातीचा, धर्माचा विचार न करता सर्व शेतकऱ्यांना जमीन कसण्यासाठी देण्यात यावी, तेथे कोणीही जमीनदार कुळ किंवा भूमीहीन असणार नाहीत.

४) शेतीसाठी होणारा खर्च, बी-बियाणे,खते,पाणी यांची व्यवस्था राज्याकडून केली जाईल.हा खर्च जमीन महसुलाच्या रूपाने शेती उत्पादनातून वसूल केला जावा.

५) शेत जमिनीवर सामूहिक मालकी असावी.

६) उत्पादन घटकांचे व संपत्तीचे समान वाटप करून आर्थिक विषमता कमी करावी.

७) सरकारने देशातील विविध आर्थिक व्यवहारांचे योग्य पद्धतीने नियोजन करावे.नियोजनाची प्रभावी अंमलबजावणी करावी. त्यासाठी देशातील काही प्रमुख क्षेत्रांचे राष्ट्रीयीकरण करून त्यावर सरकारची मालकी निर्माण करावी.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते,लोकशाही यशस्वी करण्यासाठी 'एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य' हा सिद्धांत आवश्यक आहे. राज्यात 'एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य', हे तत्त्व स्वीकारले असले आणि तेथे आर्थिक विषमता असेल तर लोकशाहीचे अस्तित्व टिकू शकत नाही. त्यामुळे लोकशाही समाजवाद हा घटनात्मक कायद्याचा अविभाज्य भाग असण्याची नितांत गरज असते.

**निष्कर्ष**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील दारिद्र्य,गरिबी व जातीय व्यवस्था संपुष्टात आणून लोकशाही प्रस्थापित करण्याचा विचार मांडलेला आहे. सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने राजकीय लोकशाही प्रस्थापित होऊ शकत नाही, हे वास्तव त्यांनी मांडलेले आहे. स्वातंत्र्य,समता,न्याय,बंधुता ही मूल्य प्रत्यक्षात येण्यासाठी लोकशाही समाजवाद आवश्यक आहे. आजच्या बदललेल्या जागतिकीकरणाच्या परिस्थितीमध्ये गरीब गरीब होत आहे व श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहे म्हणजेच एका अर्थाने भांडवलशाही व्यवस्थेकडे वाटचाल सुरू आहे. त्या परिस्थितीमध्ये गरिबी, दारिद्र्य असेल तर भांडवलदारांचे राज्य निर्माण होऊ शकते,हा धोका एका अर्थाने डॉ.आंबेडकरांनी सांगितलेला आहे. त्यामुळे लोकशाही समाजवादाचा स्वीकार करून सर्वसामान्य लोकांचे जीवनमान कसे सुरळीत होईल व कल्याणकारी होईल,याचा विचार करून कल्याणकारी भूमिकेतून सरकारने काम करणे अभिप्रेत आहे. राज्याची कल्याणकारी भूमिका हीच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही समाजवादाची असलेली आपल्याला दिसून येते.

**संदर्भ:-**


1) Dr. B.R.Ambedkar,(2004),'Annihilation of Caste', Samata Prakashan, Nagpur
2) Dr. B.R.Ambedkar, (1994), 'Writings and Speeches',Vol.1, (Bombay: Education Department, Government of Maharashtra)
3) Dr.B.R. Ambedkar : Parliamentary Democracy
4) आंबेडकर बाबासाहेब,(२००२), 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर :लेखन आणि भाषणे', खंड–१८, महाराष्ट्रशासन
5) गायकवाड जयदेव,(२००८), 'संविधानसभेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर', पद्यगंधा प्रकाशन, पुणे
६) कीर धनंजय,(१९८०),'विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर : मानस आणि तत्त्वविचार', रघुवंशी प्रकाशन, मुंबई
७) कसबे रावसाहेब,(२००६), 'आंबेडकर आणि मार्क्स',सुगावा प्रकाशन,पुणे
८) कुबेर वा.ना.,(१९९८), 'डॉ. आंबेडकर : विचारमंथन', सुगावा प्रकाशन, पुणे
९) कसबे रावसाहेब,(२०१०),'डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना', सुगावा प्रकाशन, पुणे
१०) भोळे भा.ल.,(२०१४),'भारतीय राजकीय विचारवंत', पिंपळापुरे प्रकाशन,नागपूर
११) वाघमारे जनार्दन,(२०१८), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही', समाज प्रबोधन पत्रिका, जाने. फेब्रु.मार्च, अंक-२२१

१२) वाघमारे जनार्दन,(२०१७), 'डॉ.आंबेडकर आणि संविधान', समाज प्रबोधन पत्रिका,एप्रिल- जून, अंक-२१८
१३) जाधव नरेंद्र,(२०१२), 'बोल महामानवाचे', खंड-३, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई
१४) पळशीकर सुहास,(१९९१),'डॉ. आंबेडकर यांचे विचार', प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी
१५) किर धनंजय,(१९६६), डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
१६) कसबे रावसाहेब, (१९८५), आंबेडकर आणि मार्क्स, सुगावा प्रकाशन, पुणे
१७) देशपांडे म.द.,(२००६), डॉक्टर आंबेडकर यांचे राजकीय विचार, लोकवाड्.मय गृह, पुणे
१८) जाधव नरेंद्र, (१९९२), डॉ. आंबेडकर यांचे आर्थिक विचार आणि तत्वज्ञान, सुगावा प्रकाशन, पुणे
१९) इंगळे बी.डी.,२०११, आर्थिक विचारांचा इतिहास, असना प्रकाशन, लातूर

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार

**प्रा. डॉ. पुरी तात्या बाळकिसन**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, खोलेश्वर महाविद्यालय अंबाजोगाई, जि. बीड.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आधुनिक भारताचे शिल्पकार म्हटले जाते. भारतीय संविधानाचे शिल्पकार,थोर शिक्षण तज्ञ, सामाजिक चळवळीचे प्रणेते, महान समाज सुधारक, अस्पृश्य उद्धारक, कृषीतज्ञ, जलतज्ञ, पत्रकारिता, राजकीय नेते, विश्वभूषण, लोकशिक्षक असे अनेक पैलूंनी युक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्व होते. भारतात कौटिल्य, दादाभाई नौरोजी, महात्मा फुले, महात्मा गांधी आदी अनेक आर्थिक विचारवंत, तज्ञ होऊन गेले परंतु डॉ. आंबेडकर यांनी अर्थशास्त्राला दिलेले योगदान तसेच राष्ट्रीय विकासासाठी दिलेले योगदान महान आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारतीय इतिहासातील पहिले सर्वश्रेष्ठ व जागतिक कीर्तीचे अर्थतज्ञ होते.

**जीवन परिचय :-**

डॉ. भीमराव आंबेडकर यांचा जन्म भिमाबाई व रामजी सकपाळ यांच्या पोटी 14 एप्रिल 1881 रोजी महू जिल्हा इंदोर (मध्य प्रदेश) या ठिकाणी झाला. त्यांचे मूळ गाव रत्नागिरी जिल्हयातील मंडणगड तालुक्यात अंबावडे होते. प्राथमिक शिक्षण दापोली व सातारा येथील कॅम्प स्कूल मराठी शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण सातारा येथील सरकारी शाळेत घेतले. केशव आंबेडकर या शिक्षकांनी त्यांना आंबेडकर हे आडनाव दिले तशी नोंद शाळेत करण्यात केलेली आहे. माध्यमिक शिक्षण मुंबईतील एलफिस्टन शाळेत घेतले.1907 मध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होणारे आंबेडकर हे पहिले अस्पृश्य विद्यार्थी होते. महाविद्यालयीन शिक्षणासाठी एलफिस्टन महाविद्यालयात (मुंबई) प्रवेश घेतला. बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी महाविद्यालय शिक्षणासाठी 25 रुपये शिष्यवृत्ती दिली.1913 मध्ये बी.ए.ची पदवी घेतली. बडोदा संस्थानात नोकरी करण्याच्या अटीवर सयाजीराव गायकवाड यांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी 11.50 पाऊंड शिष्यवृत्ती दिली. कोलंबिया विद्यापीठात एम.ए. अर्थशास्त्र पदवीसाठी **"प्राचीन भारताचा व्यापार"** हा प्रबंध सादर करून पदवी संपादन केली. काही काळ मुंबई येथील सिडनेहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्य केले.1920 मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे अर्थशास्त्राचा सखोल अभ्यास करण्यासाठी दाखल झाले एम. एस्सी व डी.एस्सी. अशा सर्वोच्च पदव्या प्राप्त केल्या.प्राध्यापक सेलिंगमन या अर्थशास्त्रज्ञाचे डॉ. आंबेडकरांना मार्गदर्शन मिळाले. इंग्लंडमध्ये असताना डॉ. आंबेडकरांनी **"रुपयाचा प्रश्न"** (The Problem Of Rupee) हा डॉ. कॅनन यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंध लिहिला. तसेच कायद्याचा अभ्यास करून बॅरिस्टर ही पदवी प्राप्त केली. भारतात परतल्यावर मुंबई येथील शासकीय विधी महाविद्यालयात काही काळ प्राध्यापक आणि प्राचार्य म्हणून कार्य केले. डॉ. आंबेडकरांना महाराजा सयाजीराव गायकवाड व राजश्री शाहू महाराजांनी खूप सहकार्य केले होते.

[३:२१ PM, २/१/२०२५] डा पुरी सर: 2.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुमुखी प्रतिभाषाली लेखक होते.ते मराठी, इंग्रजी, हिंदी, पाली, संस्कृत, जर्मन, फ्रेंच, बंगाली, गुजराती, कन्नड, पारशी इत्यादी भाषा जाणारे होते. हू वेअर शुद्राज,बुद्ध अँड हिज धम्म, द

अनटचेबल, दि प्रॉब्लेम ऑफ रुपी, थॉट्स ऑन पाकिस्तान आदी ग्रंथ संपदा व इतर लेखन मोठ्या प्रमाणात लिहिले आहे. त्यांनी पूर्ण 22 ग्रंथ आणि पुस्तिका दहा अपूर्ण ग्रंथ दहा निवेदने किंवा साक्षी पुरावे, दहा शोधनिबंध, लेख, परिक्षेने इत्यादी लेखसंग्रह हा इंग्रजी भाषेत लिहिला आहे. भारत सरकारने डॉ. आंबेडकरांचे भाषण, लेखन प्रकाशित केलेले आहेत. डॉ. आंबेडकरांनी उच्च शिक्षण अतिशय कष्टाने पूर्ण केल्यानंतर सामाजिक कार्यात झोकून दिले. अस्पृश्य समाजामध्ये जाणीव जागृती करण्यासाठी 1924 मध्ये बहिष्कृत हित करणी सभेची स्थापना केली व बहिष्कृत भारत हे वर्तमानपत्र सुरू केले. 1927 मध्ये मुंबई विधिमंडळ सदस्य म्हणून कार्य, 1920 महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, 1927 मनुस्मृति दहन, 1930 नाशिक येथे काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, 1930,3,32 लंडन येथे झालेल्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून सहभाग, जातीय निवाडा, 1932 महात्मा गांधी व डॉ. आंबेडकर यांच्यात झालेला पुणेकरार,1935 येवला धर्म परिषद, 1936 मजूर पक्षाची स्थापना,मुंबई विधिमंडळ सदस्य व विरोधी पक्ष नेते, मजूर मंत्री, भारतीय घटना समिती सदस्य, 29 ऑगस्ट 1947 मसुदा समितीचे अध्यक्ष व राज्यघटनेची निर्मिती, पंडित नेहरू सरकारमध्ये कायदेमंत्री,1952 राज्यसभा खासदार म्हणून निवडून गेले,1952 कोलंबिया विद्यापीठाने (अमेरिका) डॉक्टर ऑफ लॉ  व उस्मनीय विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लिटरेचर ची पदवी देऊन सन्मानित केले.1955 मध्ये भारतीय बौद्ध सभेची स्थापना केली व 14 ऑक्टोबर 1956 नागपूर येथे हजारो अनुयासह भारतातीलच प्राचीन बौद्ध धर्माचा स्वीकार केला. डॉ. आंबेडकरांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत हे वर्तमानपत्र सुरू करून लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, सामाजिक एकात्मता निर्मितीसाठी व राष्ट्रविकासासाठी वर्तमानपत्र सुरू केली, तसेच आंबेडकरांनी खडतर ज्ञान साधना करून वंचित, शोषित, पीडित, दलित समाजाच्या शिक्षणासाठी 1946 मध्ये पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली.मुंबई येथे 20 जून 1946 रोजी सिद्धार्थ महाविद्यालय व 19 जून 1950 रोजी छत्रपती संभाजीनगर येथे मिलिंद महाविद्यालय सुरू केले. 6 डिसेंबर 1956 रोजी डॉ. आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. 1990 मध्ये भारत सरकारने मरणोत्तर " भारतरत्न " ही पदवी देऊन डॉ. आंबेडकरांचा गौरव केला.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय व जगातील अनेक देशाच्या अर्थव्यवस्थेचा सखोल अभ्यास करून आपल्या ग्रंथातून, लेखातून, भाषणातून आर्थिक विचार मांडलेले आहेत ते पुढील प्रमाणे.

**1) अर्थशास्त्राचे स्वरूप :-**

भारतात सामाजिक समते बरोबरच आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी डॉ. आंबेडकर यांनी विचार मांडले. जातिव्यवस्थेचे भारतीय अर्थव्यवस्थेतील दुष्परिणाम, देशातील भांडवल,चलन फुगवटा, उद्योग,श्रम विभागणी, स्त्री आर्थिक स्वातंत्र्य इत्यादीमुळे दारिद्र्य, असमानता, शोषण यात वाढ झाल्याने डॉ.आंबेडकरांनी प्रतिपादन केलेले आहे. देशातील भूविकास बँका, खरेदी- विक्री मंडळे,शेतकऱ्यांच्या पतसंस्था यांचा शेती विकासाला फायदा झाला पाहिजे तसेच शेतीचे होणारे तुकडे, विभाजन रोखले पाहिजे व सामूहिक शेती उद्योगाची शासनाची मालकी, कामगार मजूर कल्याण योजना, शेतकरी कुळांना संरक्षण आदी बाबत डॉ.आंबेडकरांनी विचार मांडलेला आहे.

**2) इंग्रजांच्या (ईस्ट इंडिया कंपनी) आर्थिक धोरणाबाबत अभ्यास :-**

ॲडमिनिस्ट्रेशन ॲंड फायनान्स ऑफ द ईस्ट इंडिया कंपनी या शोधनिबंधात आर्थिक विचाराची मांडणी केलेली आहे. डॉ. आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठात १९१५ मध्ये एम.ए. च्या पदवीसाठी शोध निबंध सादर

केला. या शोध निबंधात 1712 ते 1858 या कालावधीत ईस्ट इंडिया कंपनीचा राज्यकारभार व आर्थिक संदर्भातील धोरणाच्या बदला संदर्भात ऐतिहासिक आढावा घेतलेला आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या काळातील जमीन महसूल जमीनदारी व रयतवारी पद्धती अष्टमी ड्युटी स्टॅम्प ड्युटी मिठावरील कर इत्यादीचा विचार केला कंपनीचे धोरण भारताला लुगडणारे, शोषण करणारे असून भारतीयांच्या हाल अपेस्टंना कारणीभूत झालेले आहे.

**3) भारतीय शेती संदर्भात विचार :-**

डॉ.आंबेडकरांनी द जर्नल ऑफ इंडियन इकॉनॉमिक्स सोसायटीज च्या अंकात स्मॉल होल्डिंग इन इंडिया अँड देयर रिमाइंड च्या अंका हा लेख लिहिला. या लेखात त्यांनी म्हटले भारताच्या दृष्टीने शेती हा एक महान उद्योग आहे परंतु शेतजमिनीचा आकार तुकडे लहान असल्याने त्याच्या उत्पादक देवर परिणाम होतो यासाठी उरलेल्या लहान जमिनीची एकत्रीकरण करणे आर्थिक दृष्ट्या किफायत शीर करणे व वारसा हक्काच्या कायद्याने जमिनीचे विपोरीकरण विभाजन होत असल्याने त्यात सुधारणा करणे तसेच शेतामध्ये श्रमाचे काम करणारे शेतमजुरांना कंपनी किंवा औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगाराप्रमाणे फायदे मिळावेत यात आरोग्य विमा नुकसान भरपाई आधीचा समावेश डॉ. आंबेडकरांनी केलेला आहे भारतातील शेतीवर अवलंबून असलेल्या लाखो मजुरांची आर्थिक परिस्थिती यामुळे सुधारेल.असे मत डॉ. आंबेडकरांनी मांडले.

[३:२१ PM, २/१/२०२५] डा पुरी सर: 3

**4) भारतीय रुपयाचा किंवा चलनविषयक विचार :-**

इंग्लंडमध्ये अर्थतज्ञामध्ये भारतीय रुपयाची जडणघडण ही सुवर्ण परिमाणात असावे की सुवर्ण विनिमय असावी हा वाद निर्माण झाला होता. डॉ. आंबेडकरांनी डॉक्टर ऑफ सायन्सच्या पदवीसाठी "रुपयाचा प्रश्न " हा प्रबंध लिहिला. यामध्ये भारताचा रुपया आणि इंग्लंड चा पौंड यांच्या संबंधाचा महत्त्वपूर्ण प्रश्न या अभ्यासात समाविष्ट केला होता. या प्रबंधात आंबेडकरांनी भारतीय रुपयाची उत्क्रांतीची ऐतिहासिक माहिती सादर केली. इंग्लंडमध्ये प्रा.किन्स यांनी सुवर्णविनिमय परिमाणाचा पुरस्कार केला होता.त्यांच्यामध्ये सुवर्णविनिमय परिमाण लवचिक असल्याने भविष्यकालीन अर्थव्यवस्थेसाठी उपयुक्त ठरेल परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केन्सच्या विचाराला विरोध केला व त्यांनी असा विचार मांडला की सुवर्णविनिमय परिमाण स्थिर राहू शकत नाही.सुवर्णविनिमय परिमाणात चलन निर्मितीवर कोणत्याही मर्यादा राहणार नाहीत चलनात वाजवीपेक्षा जास्त वाढ झाली तर त्यामुळे भाववाढ होईल परिणामी रुपयाची किंमत कमी होईल आणि त्यातून विनिमयाचे साधन म्हणून रुपयाचे स्थान अस्थिर होऊ शकेल हे त्यांनी ऐतिहासिक पुराव्याद्वारे स्पष्ट केले डॉक्टर आंबेडकर यांनी चलन निर्माण करणाऱ्या संस्थेवर अंकुश आवश्यक असावा नाहीतर संस्था वाटेल तेव्हा चलनाचा पुरवठा करेल यामुळे चलनपुरवठा वाढेल आणि भाव वाढ होईल भाववाढ मोठ्या प्रमाणात झाली की आर्थिक स्थैर्य धोक्यात येईल असे विचार डॉ. आंबेडकरांनी मांडले.

**5) उद्योगाबाबतचे विचार :-**

डॉ. आंबेडकर यांनी आर्थिक विकासात शेती क्षेत्राला जेवढे महत्त्व दिले तेवढेच मध्ये महत्त्व उद्योग क्षेत्राला दिलेले आहे. भारताच्या शेतीविषयक प्रश्नाचे उत्तर औद्योगीकरणातच आहे असे मत त्यांनी मांडले. देशात उद्योगधंद्याचा विकास करताना औद्योगीकरणातून आर्थिक विषमता व आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होता कामा नये यासाठी त्यांनी उद्योगाचे राष्ट्रीयकरण करावे असे सुचवले. शासनाने सार्वजनिक मालकीचे

काही उद्योग सुरू करावेत त्याचबरोबर महामंडळाची स्थापना करावी. उद्योगाचे राष्ट्रीयकरणामुळे उत्पादनात वाढ होईल आणि कामगारांना योग्य वेतन मिळेल. कामगारांच्या भविष्यकालीन हिताची निर्णय,सामाजिक सुरक्षेचे निर्णय, नैसर्गिक साधन संपत्ती व श्रमशक्ती मोठ्या प्रमाणात देशात असल्याने लघुउद्योग,मोठे उद्योग व शेतीवर आधारित उद्योगांना चालना मिळेल यासाठी उद्योग व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून राष्ट्रीय उत्पन्न वाढवणे शक्य होईल. यातून बेकारी,गरीबी कमी होईल व देशाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल असे विचार डॉ. आंबेडकरांनी मांडले.

**6) नवीन तंत्रज्ञानाविषयी विचार :-**

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीचा प्रचार प्रसार जगभरात व भारतातही उत्पादन क्षेत्रात झालेला होता. आधुनिक यंत्राचा व तंत्राचा वापर वाढल्यामुळे तसेच पश्चिमात्य संस्कृतीला देशातील अनेकांनी विरोध केला.यंत्रामुळे आलेल्या पाश्चिमात्य संस्कृतीला विरोध करणे योग्य नाही असे मत आंबेडकरांनी मांडले. यंत्रामुळे प्रचंड प्रमाणात उत्पादनात वाढ होते त्याचा फायदा मूठभर लोकांना होतो यामुळे पाश्चिमात्य संस्कृतीला विरोध करण्याऐवजी यंत्राचा वापर सर्व समाज घटकाला फायदेशीर आहे. या दृष्टिकोनातून प्रयत्न केले पाहिजेत. समाजाची रचना बदलली की यांत्रिकीकरणाचे सर्व फायदे समाजातील सर्व लोकांना,घटकांना मिळतील अशा प्रकारचे तंत्रज्ञान विषयीचे विचार डॉ. आंबेडकरांनी मांडले.

**7) कामगारविषयक विचार :-**

औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादनाच्या क्षेत्रात अमुलाग्र बदल झालेले आहेत. पारंपरिक उत्पादन पद्धतीची जागा यांत्रिक उत्पादन पद्धतीने घेतल्यामुळे वस्तूचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होऊ लागले यातून भांडवलशाही अर्थव्यवस्था निर्माण झाली.भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलदारांच्या किंवा मूठभर लोकांच्या हातात उत्पादनाची सर्वसाधने केंद्रीत झालेली आहेत. या लोकांनाच भांडवलदार म्हणतात ते सामर्थ्यवान व संपन्न असतात. आर्थिक दृष्ट्या कामगार हे दुर्बल आणि गरीब असतात. जास्त नफा मिळवण्यासाठी भांडवलदार कामगारांचे शोषण करतात. डॉ. आंबेडकर यांनी कामगार विषयक अनेक कायदे नियम, तयार केलेले आहेत. त्यांनी भारतामध्ये कामगारांच्या कामाचे तास सोळा तासावरून आठ तास केले, याबरोबरच त्यांच्या वैद्यकीय रजा आणि वैयक्तिक रजांचा अधिकार प्रदान केला तसेच कामगार प्रश्न मार्गी लावून सरकारला त्यांना विम्याचे कवच देण्यास भाग पाडले. आजच्या काळात डॉ.आंबेडकर यांचे कामगार विषयक विचार अतिशय महत्त्वपूर्ण व उपयुक्त आहेत.

**8) शेतमजुराबाबत विचार :-**

डॉ. आंबेडकर यांच्या मते, औद्योगिक कामगाराना ज्या प्रमाणे सवलती मिळतात,जे फायदे मिळतात ते शेतमजुरांना मिळाले पाहिजेत. भविष्य निर्वाह निधी, आरोग्य विमा, नुकसान भरपाई मजुरांना देखील मिळावी. भूमिहीन शेतमजुरांचे प्रश्न सोडवताना जमीन सुधारणा कायदे करून चालणार नाही तर भूमीहीन शेतमजुरांना जमिनी मिळाल्या पाहिजेत व त्यांच्या आर्थिक परिस्थितीची सुधारणा झाली पाहिजे. अशा प्रकारचे शेतमजुरांच्या कल्याणासाठी डॉ. आंबेडकरांनी विचार मांडलेले आहेत.

**9) करा संबंधी विचार :-**

डॉ. आंबेडकर यांनी मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यातच कर विषयक विचार मांडलेले आहेत. त्यांच्या मते, उत्पन्नापेक्षा कर पात्रतेवर आकारण्यात यावे. उत्पन्नाच्या काही मर्यादेपर्यंत कर आकारण्यात येऊ नयेत.

व्यक्तीच्या राहणीमानावर परिणाम होऊ नये याची काळजी कर आकारताना घेण्यात यावी. त्याचप्रमाणे कर स्थूल उत्पन्नावर नसावे तर मालमत्तेवर असावेत तसेच कर प्रगतीशील असावेत. श्रीमंतांना जास्त व गरिबांना कमी कर असावेत. शेतीवरील जमीन महसुलाचे दर लवचिक असावेत आणि परिस्थितीनुसार बदलणारे असावेत. अशा प्रकारचे करविषयक विचार डॉ. आंबेडकरांनी मांडले.

**10) आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक विचार :-**

ब्रिटिश काळात व्यापाराचे नियंत्रण ब्रिटिशांच्या हाती असल्याने या काळात अनियंत्रित स्वरूपाचा व्यापार होत होता. यामुळे देशात दारिद्र्य, गरिबी पसरलेली होती. भारतात स्वातंत्र्य आंदोलनामुळे परकीय मालावर बहिष्कार, स्वदेशी मालाचा स्वीकार करण्यात भर देणारे स्वदेशी आंदोलन होते. ज्या वस्तू भारतात तयार होत नाहीत, ज्यांची किंमत कमी आहे अशाच वस्तू परदेशातून आयात केल्या जाव्यात कारण भारतात वस्तू निर्मितीचा खर्च जास्त असल्याने अशा वस्तू परदेशी वस्तू पुढे टीकाव धरू शकत नाहीत. डॉ.आंबेडकर यांच्या मते, स्वदेशी मालास प्राधान्य द्यावे पण स्वदेशी वस्तूच्या किमतीमध्ये होणारी भरमसाठ वाढ भारताला परवडणारी नसल्याने वस्तूच्या किमती नियंत्रित असाव्यात या प्रकारचे वास्तववादी विचार डॉ.आंबेडकर यांनी मांडलेले आहेत.

**11) विमा बाबत विचार :-**

डॉ. आंबेडकरानी विमा विषयक विचार मांडत असताना म्हटले आहे की, वीमा बाबत सरकारची मक्तेदारी असावी कारण विम्याच्या राष्ट्रीयकरणामुळे व्यक्तीला खाजगी विमा संस्थेपेक्षा सुरक्षेचा सुरक्षितता मिळते, सरकारला आर्थिक नियोजन पूर्ण करण्यासाठी जास्त व्याजदराने सार्वजनिक कर्ज उभा करावी लागते त्याऐवजी याद्वारे आवश्यक पैसा सरकारला उपलब्ध होऊ शकतो तसेच प्रत्येक नागरिकाला शासनाने उत्पन्नाच्या किंवा मजुरीच्या प्रमाणात आयुर्विमा पत्र देण्याची शक्ती करावी. डॉ. आंबेडकर यांचे विमा विषयीचे विचार अतिशय मौलिक असे आहेत.

**12) राजस्व विषयक विचार :-**

डॉ. आंबेडकर यांनी 1925 मध्ये लिहिलेल्या " प्रादेशिक वित्त " या ग्रंथात राजस्व संबंधीचे विचार मांडलेले आहेत. या ग्रंथात 1833 ते 1921 या कालावधीत भारतीय अर्थव्यवस्थेचा कसा विकास होत गेला हे सांगितलेले आहे. प्रा. सेलिंगमन यांनी म्हटले की, भारतातील प्रादेशिक वित्ता संबंधीचे विश्लेषण करण्यात आलेले आहे यामध्ये डॉ.आंबेडकरांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.थोडक्यात डॉ. आंबेडकरांनी राजस्व विषयक उपयुक्त विचार मांडलेले आहेत.

**13] दारूबंदी बाबतचे विचार :-**

डॉ. आंबेडकर यांच्या मते, दारू उत्पादन व वितरनावर शासनाची बंदी असावी, दारूच्या संदर्भात परवाना पद्धत व शिधावाटप पद्धत शासनाने सुरू करावी,जेणेकरून दारू उत्पादन करणाऱ्यावर व पिणाऱ्यावर नियंत्रण ठेवता येईल व दारू व्यवसायातून प्राप्त होणारा महसूल शेतकरी व शिक्षण यासाठीच खर्च करण्यात यावा असे समाज, राष्ट्रहिताचे विचार मांडले.

**13) पाणीपुरवठा विषयी विचार :-**

1942 ते 46 या कालावधी डॉ.आंबेडकर यांनी आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी अर्थनीती मध्ये फार मोठे योगदान दिलेले आहे. आंबेडकरांनी सुचवलेले जल आणि विद्युत धोरण आजही उपयुक्त आहे.

जलस्त्रोतांमध्ये नद्यांचा विकास करून बहुउद्देशीय जल योजना निर्माण करणे, नदी खोरे प्राधिकरणाच्या संकल्पनेचा स्वीकार करून त्याचा अवलंब करणे, विद्युत शक्ती व जलसंपत्तीचा नियोजनबद्ध व काळजीपूर्वक विकास करण्यासाठी मध्यवर्ती तांत्रिक तज्ञ मंडळाची निर्मिती करून त्याद्वारे जलसंपत्तीचा साठा व विद्युत पुरवठा नियोजित करणे, दामोदर खोरे प्रकल्पावर 1945 मध्ये त्यांनी व्याख्यान दिले. श्रम सिंचन व विद्युत धोरण समितीचे ते अध्यक्ष होते. 1944 मध्ये त्यांनी ऊर्जा प्राधिकरणाची स्थापना केली होती. पाणीटंचाईचा सामना करावा लागत असलेल्या भागात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात यामुळे पावसापासून पडणाऱ्या अतिरिक्त पाण्याचे पाणी व्यवस्थापन व संवर्धन करणे, इतर विकसित देशाप्रमाणेच नौकानयनासाठी बहुउद्देशीय उपयोगासाठी उपयोग करणे,दामोदर, महानदी, सोननदी व इतर आंतरराज्य नद्यावरील प्रकल्पांना चालना देण्याचे प्रयत्न करणे त्याचप्रमाणे पाण्यापुरवठ्याच्या सुविधा तयार करणे, शेतीबरोबरच औद्योगिक विकास व पाण्याचे व्यवस्थापना बाबत डॉ. आंबेडकर यांनी महत्त्वपूर्ण विचार मांडलेले आहेत.

**14) राज्य समाजवादा विषयी विचार :-**

डॉ. आंबेडकर यांनी राज्य समाजवादाच्या संकल्पनेत देशातील मूलभूत उद्योग व अन्य उद्योग शासनाने चालविणे बाबत विचार मांडलेला आहे. देशातील मूलभूत उद्योग शासनाने पुढाकार घेऊन चालू करावेत तसेच देशातील सर्व जमिनीवर शासनाची मालकी असावी, शासनाने जाती,धर्म,पंथ व संप्रदाय असा कुठलाही भेदभाव न करता ती जमीन देशातील जनतेला लागवडीसाठी उपलब्ध करून द्यावी. देशात जमीनदार, मजूर आणि कुळ असे वर्ग राहणार नाहीत. देशात समाजवाद येऊन हुकूमशाही पासून संरक्षण होईल. खऱ्या अर्थाने लोकशाही विकास व संवर्धन होईल. अशा प्रकारचे डॉ. आंबेडकर यांनी राज्य समाजवाद याविषयी विचार मांडलेले आहेत.

[३:२१ PM, २/१/२०२५] डा पुरी सर: 4

**समारोप :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय व जागतिक आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करून भारताच्या आर्थिक विकास, जडणघडणीच्या संदर्भात जे चिंतन केले, विचार मांडले ते अतिशय महत्त्वपूर्ण आहेत.डॉ. आंबेडकरांनी भारताच्या संदर्भात चलन पद्धती, कर, पाणीपुरवठा, शेती, विमा, कामगार, शेतकरी, शेतमजूर, पाणीपुरवठा, व्यापार, उद्योग, तंत्रज्ञान, दारूबंदी, महसूल, संपत्तीचे विकेंद्रीकरण या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण आर्थिक विचार मांडलेले आहेत.आज कोरोना नंतरच्या काळात देशात बेरोजगारीचे प्रमाण वाढलेले आहे. रोजगारासाठी संघर्ष वाढलेला आहे. अर्थव्यवस्थेवर ताण येत आहे. यासाठी देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी डॉ. आंबेडकरांचे विचार महत्त्वपूर्ण उपयुक्त राहणार आहेत.खऱ्या अर्थाने आज जागतिक राजकारण, अर्थकारणांमध्ये भारताचे नावलौकिक उंचावलेले आहे. औद्योगिक संरक्षण उत्पादन क्षेत्रात भारत जागतिक क्षेत्रात एक महासत्ता म्हणून पुढे येत आहे. आज जगातली तिसरी अर्थव्यवस्था होण्याकडे भारताची घोडदौड चालू आहे. या मागे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार आहेत. खऱ्या अर्थाने डॉ. आंबेडकर हे अर्थशास्त्राचेच विद्यार्थी, अर्थतज्ञ होते. अर्थशास्त्रामध्ये नोबेल पुरस्कार प्राप्त डॉ. अमर्त्य सेन यांनी डॉ. आंबेडकरांना अर्थशास्त्रामधील गुरु मांनलेले आहे. यावरूनच डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचाराचे महत्त्व व उपयुक्तता वर्तमान कालीन परिस्थितीत लक्षात येते. थोडक्यात डॉ. आंबेडकरांनी आर्थिक बाबत केलेले चिंतन,

मांडलेले विचार आज स्वातंत्र्योत्तर 75 वर्षानंतरही त्यांच्या विचाराची उपयोगिता प्रासंगिकता दिसून येते.डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक नीती नियोजन व विचारांनी राज्यकर्ते समाज व राष्ट्र विकासासाठी जाणीवपूर्वक विविध योजनांच्या माध्यमातून अंमलबजावणी करताना दिसत आहेत.यावरूनच डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचाराची प्रासंगिकता, उपयुक्तता किती अनन्यसाधारण आहे हे लक्षात येते.

**संदर्भसूची :-**


1) डॉ.खंदारे एस. एम.- जागतिक आर्थिक विचाराचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, संभाजीनगर. (औरंगाबाद)
2) कीर धनंजय - डॉ. बाबासाहेब आंबेडकर,पापुलर प्रकाशन,मुंबई.
3) डॉ. बाचल - भारतातील राजकीय विचारवंत,अनिरुद्ध प्रकाशन,पुणे.
4) डॉ. मून - आर्थिक विचारवंताचा इतिहास,डायमंड पब्लिकेशन, पुणे
5) डॉ गो.दा.पाहीनकर - डॉ बाबासाहेब आंबेडकर, साकेत प्रकाशन, प्रा.लिमिटेड,पुणे.
6) थोरात सुखदेव - बाबासाहेब आंबेडकर : नियोजन, जल व विद्युत विकास भूमिका व योगदान.
7) डॉ.डी. आर.तांदळे - भारतीय विचारवंत,चिन्मय प्रकाशन, संभाजीनगर (औरंगाबाद ).
8) डॉ.विजय कवीमंडळ - आर्थिक विचारांचा इतिहास,श्री मंगेश प्रकाशन,नागपूर.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : मानवतेचे प्रतिक

**प्रा. नरेश आर. धुर्वे**
तिरपुडे समाजकार्य महाविद्यालय,नागपुर

**प्रस्तावना:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील 'महू' या गावी झाला. रत्नागिरी जिल्हयातील दापोलीपासून आठ कि.मी. अंतरावर असलेले आंबावडे हे त्यांचे मूळगाव. त्यांची माता भीमाबाई लहानपणीच वारल्याने वडील रामजी यांनी त्यांचे पालनपोषण केले. सन १९९२ मध्ये भीमराव एलफिन्स्टन कॉलेजमधून बी.ए. ची परीक्षा पास झाले. सातारा व मुंबई येथे शिक्षण घेत असतानांच त्यांना अस्पृस्य म्हणून मिळणा—या अपमानास्पद वागणूकीचे चटके सहन करावे लागले. २ फेब्रुवारी १९१३ रोजी रामजींचे निधन झाले. उच्चशिक्षण घेण्याची त्यांची जिज्ञासा होतीच. मुंबई येथे सयाजीराव गायकवाडांनी त्यांना उच्च शिक्षण अमेरिकेत घेण्यासाठी तीन वर्षासाठी शिष्यवृत्ती मंजूर केली. बाबासाहेबांना अमेरिकेत कोलंबिया विद्यापिठात प्रवेश मिळाला. या काळात अखंड परिश्रम करून विविध विषयांचे ज्ञान आत्मसात केले. पुढील काळात 'अस्पृश्यता निवारण' हेच त्यांनी आपले जीवीतकार्य ठरविले. २० जुलै १९२४ रोजी त्यांनी 'बहिष्कृत हितकारणी सभेची' स्थापना केली. अस्पृश्यांना शिक्षण देणे, त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणणे, आपल्या न्याय सामाजिक व आर्थिक हक्कांसाठी अहिंसक मार्गाने संघटित लढा देण्यासाठी अस्पृश्यांना आत्मनिर्भर बनविणे व त्यांच्या समान हक्कांसाठी निरनिराळया चळवळी करणे यांना त्यांनी पुढील काळात प्राधान्य दिले.

एकोणिसाव्या शतकात भारतीय समाजाला कंलक असलेल्या अस्पृश्यतेच्या निवारणाचे कार्य निरनिराळया समाजसुधारकांनी केले होते. तथापि, या सर्वपेक्षा अतिशय निष्ठेने, स्वानुभवाच्या आधारावर, अस्पृश्यांना गुलामगिरीच्या बंधनातून मुक्त होण्यासाठी जागृत व संघटित करण्याचे, शिक्षणाच्याद्वारे त्यांच्यात नवविचारांचा प्रसार करण्याचे व आत्मसन्मानाचा नवीन मार्ग दाखविण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. उच्च विद्याविभूषित झाल्यानंतरही वैयक्तिक स्वार्थाच्या भूमिकेतून आर्थिक प्रलोभनाचा स्वीकार न करता बाबासाहेबांनी आपले सर्व जीवन दलित बांधवांच्या उन्नतीसाठी समर्पित केले. आपल्या अस्पृश्य बांधवांना अत्याचार व गुलामगिरीतून मुक्त करून भारतीय घटनेनुसार त्यांना आपल्या आर्थिक विकासाची संधी उपलब्ध करून देण्याचे अलौकिक कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. अन्यायाविरूध्द समर्थपणे लढण्यासाठी सज्ज करणारे बंडखोर नेते, अलौकिक बुध्दिमता लाभलेले व सदैव विद्याव्यासंग व ग्रंथलेखन यात रममाण होणारे प्रगाढ विद्वान व प्रजासत्ताक भारताच्या घटनेचे शिल्पकार म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य वेगळे व असामान्य आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य:** प्रारंभीच्या काळापासुन अस्पृश्य समाजात शिक्षणाचा प्रसार करण्याचा कार्यावर त्यांनी भर दिला. कारण शिक्षण हे केवळ व्यक्तीच्या आत्मविकासाचे साधन नसून ते देश विकासाचे साधन आहे. ही जाणीव आपल्या देशात नसल्यामुळेच आम्ही परतंत्र झालो. आता आम्हाला स्वातंत्र मिळाले व चिरकाल टिकावे असे वाटत असेल तर शिक्षण सर्वाना मिळाले पाहिजे. याच भूमिकेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपली शिक्षणविषयक भूमिका मांडतात.

अस्पृश्य समाजाची परंपरागत सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी त्यांना जागुत करणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आवश्यक वाटत होते. संधीचा योग्य विनियोग केल्यास अस्पृश्य व्यक्तीही उच्चविद्याविभूषित होते हे तत्व त्यांनी आपल्या उदाहरणावरून समाजासमोर मांडले. अस्पृश्य समाजाचे योग्य शिक्षण झाल्यास तो समाज आपल्या हक्कांविषयी जागरूक राहील व ते हक्क प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करील असा त्यांचा विश्वास होता. वाचणालये, प्रौढासाठी रात्रीच्या शाळा सुरू केल्या. शिक्षण घेण्यासाठी अस्पृश्य बांधवांना प्रोत्साहित केलेल्या संस्थामध्ये शिक्षणाचे मानवतेच्या दृष्टीने मुल्य जाणवणा—या, दलित विद्यार्थ्याकडे सहानुभूतीने पाहणा—या व त्यांच्या उन्नतीच्या प्रयत्न करणा—या शिक्षकांचीच नेमणूक केली. अस्पृश्यांच्या विकासासाठी त्यांना विशेष सवलती मिळणे आवश्यक आहे याची डॉ. बाबासाहेबांना जाणीव होती. त्यामुळेच गव्हर्नरच्या कार्यकारी

मंडळाच्या सदस्य म्हणून काम करतांना किंवा पुढील काळात घटना समितीमध्ये सदस्य म्हणून काम करतांना अस्पृश्यवर्गाला आपल्या सर्वांगिण प्रगतीसाठी आवश्यक त्या सर्व सवलती मिळतील याविषयी त्यांनी विशेष दक्षता घेतली. विविध वसतिगृहांची स्थापना करून दलित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या सोडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेबांच्या या प्रयत्नामुळे अस्पृश्य समाजाला शिक्षणाची सोय उपलब्ध झाली व शिक्षित झालेला हा समाज आपल्या हक्कासाठी जागृत व कार्यप्रवण झाला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य:** महात्मा जोतीबा फुले, महाराजा सयाजीराव गायकवाड, कोल्हापुरचे छत्रपती शाहू महाराज, गोपाळबाबा वलंगकर, विठठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता निवारण्याचे कार्य सुरू केलेले होते. तथापि, वरीष्ठ जातींच्या मनोभूमीकेत काहीही बदल झाला नाही. डॉ. बाबासाहेबांना शिक्षण घेताना व नोकरी करताना या मानहानीची व अपमानास्पद वागणुकीची जाणीव झाली होती. त्यामुळे आपल्या सार्वजनिक जीवनाची सुरूवात करताना त्यांनी अस्पृश्यांना त्यांचे न्यायहक्क मिळवून देण्याच्या कार्याला प्राध्यान्य दिले. आपल्या बांधवांना अन्यायाचा प्रतिकार करण्यास व आपल्या हक्कांसाठी संघर्ष करण्यास त्यांनी शिकविले. अस्पृश्यांमधील स्वाभिमान, आत्मविश्वास जागृत केला. अस्पृश्य हेही याच देशाचे नागरिक असून त्यांना या देशात समानतेचे सर्व हक्क आहेत, याची जाणीव आपल्या बांधवांना त्यांनी करून दिली. न्यायहक्कांसाठी कोणाच्या सहानुभुतीची गरज नसून अन्यायाविरूध्द संघर्ष करून आपले हक्क आपण मिळविण्याची जाणीव त्यांनी समाजात निर्माण केली. अस्पृश्यांच्या बाबतीत उच्चवर्णीय समाजाच्या विचार व आचारप्रणालीत काही बदल होण्याी शक्यता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत नव्हती. त्यामुळे सामाजिक समतेच्या न्यायहक्कांसाठी अस्पृश्यांना संघटित करणे व अहिंसक मार्गाने संघर्ष करण्यासाठी त्यांना जागृत करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे. डॉ. बाबासाहेबांना महत्वाचे वाटत होते. त्यामुळेच त्यांनी महाडच्या तळयावरील सत्याग्रह व मंदिरप्रवेशाची चळवळ हाती घेतली.

महाड येथे भरलेल्या सत्याग्रह परिषदेतच हिंदू समाजाचा धर्मग्रंथ असलेल्या मनुस्मृतीचे दहन करण्याचा निर्णय घेतला गेला. या ग्रंथातील निनिराळया वचनांनी जातिव्यवस्था व अस्पृश्यतेचे निबर्ध यांचे समर्थन करून हिंदू समाजपध्दती व जातिबंधने यांना बळकटी प्राप्त करून दिली होती. प्रस्थापित जातिव्यवस्था व उच्चनीचतेचे भेदभाव याविरूध्द केलेली ही बंडात्मक कृती असून, अस्पृश्यांचा आत्मविश्वास वाढविणारी घटना होती. डॉ. बाबासाहेबांचा या चळवळींमागे विचार होता. अस्पृश्यांच्या प्रवेशाने मंदिर भ्रष्ट होत नाही किंवा त्यांच्या स्पर्शाने मूर्ती अपवित्र होत नाही हे सिध्द करण्याचा त्याचा या चळवळीमागे हेतू होता. अस्पृश्यता निवारणासाठी सार्वजनिक व्यवस्था सर्वांना खुल्या असल्या पाहिजेत ही यामागे मागणी होती. १९३५ पर्यत निरनिराळया ठिकाणच्या मंदिरातून हे सत्याग्रह केले गेले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकाशाही शासनव्यवहारात लोकांचा सहभाग वाढतो. लोककल्याण हेच आशय सूत्र असलेल्या या शासन पध्दतीत प्रत्येक जाती—जमातीने आपला सहभाग, सत्तेचा योग्य वाटा प्राप्त केला पाहिजे. म्हणजे निर्णय प्रक्रियेतील आपले अस्तित्व कायम राखण्यासाठी प्रत्येकाने समर्थ असले पाहिजे. शासन व्यवहारातील आपल्या अस्तित्वाचे, सामर्थ्याचे दर्शन हे आपल्या अंगी असलेल्या बुध्दिकौशल्यावर आधारित आहे. हे बुध्दिकौशल्य प्राप्तीचा मार्ग म्हणजे शिक्षण. हे शिक्षण प्राप्त केल्यानंतर सरकारतील आपला प्रवेश, सहभाग सुनिश्चित होतो. म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात, सरकार ही एक जबरदस्त महत्वाची संस्था आहे. सरकार ज्याप्रमाणे मनात आणील त्याप्रमाणे सर्व घडून येईल. पण आपण हे विसरता कामा नये की, सरकार कोणत्या गोष्टी घडवून आणील हे सरकारी नोकरावर सर्वस्वी अवलंबून राहील. कारण सरकारचे मत म्हणजे सरकारच्या नोकरांचे मत. आपल्याला आपल्या हिताचे काही करवून घ्यावयाचे असेल, तर सरकारी नोकरीत आपला प्रवेश आपण करवून घेतला पाहिजे. नाही तर जशी आपली हेळसांड होत आहे तशी ती नेहमीच होणार आहे. ती न व्हावी असा जर आपला हेतू असेल तर अस्पृश्य वर्गाच्या लोकांनी सरकारी नाकरीत आपला जास्त प्रमाणात शिरकाव होईल अशा व्यवस्था करावयास पाहिजे. यास्तव बहिष्कृत लोकांनी प्राथमिक शिक्षणाकडे दूर्लक्ष न करता उच्चशिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवावे.

सर्व हिंदू जातीतील स्त्रियांची कुटंबातील स्थिती व समाजात असणारी स्त्रियांची प्रतिष्ठा याबाबत आंबेडकरांनी बारकाईने निरीक्षण,चिंतन केले होते. भारतीय स्त्रिया या पिढयानपिढया कधी वडील, कधी पती तर कधी मुलांवर अवलंबुन होत्या. आर्थिकदृष्टया तर भारतीय स्त्रिया फारच परावलंबी होत्या. पतीच्या मृत्यूनंतर तर

स्त्रियांची अवस्था फारच वाईट होई. वडिलांचा, सास—यांचा तिला आधार घ्यावा लागे. पण तोही मिळेलच याची शाश्वती नव्हती. माहेरी भावजया तर सासरी नंणदा व जावांचा छळ तिला सहन करावा लागे. अत्यंत अपमानास्पद व परावलंबी जिणे स्त्रियांना जगावे लागत. या सर्व परिस्थिती मधून स्त्रियांना बाहेर काढण्याचे काम हिंदु कोड बिलाच्या माध्यमातून आंबेडकरांनी केले आहे.

स्त्रिया हिंदू कोड बिलामुळे वारसा हक्क मिळाला. त्यामुळे तिची कुंटुबातील किंमत वाढली. स्त्रियांच्या संमतीशिवाय मालमत्तेसंबधी कोणताही निर्णय पती किंवा पिता यांना कायद्यानेच घेता येत नाही. स्त्रियांना आपल्या हक्काची जाणीव झाली. काही स्त्रिया दया व उपकाराच्या किंवा बंधूप्रेमाच्या भूमिकेतून विवाहानंतर वडिलाच्या मालमत्तेवर हक्क सांगत नसल्या तरी त्या कायद्याने हक्क सांगू शकतात. हिंदू कोड बिलाने स्त्रि धनाचे अनेक प्रकार काढून टाकून सर्व स्त्री धन एकच आहे व त्यास वारशाचा नियमही एकच लागतो अशी तरतूद त्यांनी केली. स्त्री धनाच्या बाबतीत मुलीच्या हिश्श्याचा अर्धा हिस्सा वारशाने मुलालाही मिळावा ही तरतूद करून बाबासाहेबांनी वडिलांच्या मालमत्तेत जसा मुलीला मुलाच्या अर्धा हिस्सा मिळता तसा आईच्या मालमतेत मुलीला अर्धा वाटा दिला. या संदर्भात डॉ. बाबासाहेब म्हणाले होते' हे विधेयक मुलगा व मुलगी यांच्या सामाजिक दर्जामध्ये समानता राखण्याचा प्रयत्न करते'. हिंदू कोड बिलामुळे स्त्रियांच्या बाबतीत केल्या जाणा—या अन्याय—अत्याचाराला आळा बसला. डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिलासंदर्भात जे अलौकिक कार्य केले ते पाहता भारतीय स्त्रियांना सदैव त्यांच्या ऋणात राहावे लागेल.

''उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हतबल होवून अल्पायुषी होतो, तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुध्द राहिल्यास जिवंतपणी तो दुस—याचा गुलाम बनतो'' अशा गुलामाला त्याच्या गुलामाची जाणीव करून द्यावी म्हणजे तो बंड करून उठेल. या तत्वानुसार आपल्या लढयाचा एक दूरदर्शी योजना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मांडतात. या योजनेचा  आशय त्यांच्या एका विचार सुत्रातून व्यक्त होतो. ते विचार सूत्र म्हणजे 'शिका—संघटित व्हा—आणि संघर्ष करा'.

गव्हर्नरच्या कायदे कौन्सिलचे सभासद म्हणून काम करतांना,ब्रिटीश शासनाबरोबर धोरण ठरविताना, कायदामंत्री म्हणून काम करतांना, भारतीय घटनेचा आराखडा ठरवितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्याच्या हक्काविषयी असलेली वचनबध्दता कधीही सोडली नाही. १९२६ ते १९३६ या काळात मुंबईच्या विधिमंडळावर सदस्य म्हणून काम करतांना त्यांनी अस्पृश्यांचे कल्याण, प्राथमिक शिक्षणातील दोष, दारूबंदीची आवश्यकता, अंदाजपत्रकातील त्रूटी ई. विषयावर आपले विद्वतापुर्वक विचार सांगितले. सायमन कमिशनला दिलेल्या निवेदनाच्या प्रांतिक कायदेमंडळात अस्पृश्याचे हितसंबंध व हक्कांचे रक्षण करणसाठी कोणत्या तरतुदी हव्या त्याची मागणी केली. शिवाय अस्पृश्यांच्या शिक्षणाची सोय, त्यावर समान खर्च करण्याची तरतूद, सैन्य व पोलीसदलात अस्पृश्यांना नोकरीत अग्रहक्क देण्याची तीस वर्षाची तरतूद इत्यादी मागण्या केल्या. १९३७ ते १९४२ च्या काळात मजूर पक्षाने शेतकरी व कामगारांच्या प्रश्नाविषयी विधिमंडळात व बाहेर आवाज उठविला. आद्यौगिक कलह बिल व वतनदारी खोतीची पद्वत रदद् करण्यासाठी आवाज उठविला. मजूरांच्या कामाचे तास आठ केले. मजूरांना निवारा व त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय केली.

वृत्तपत्राच्याद्वारे अस्पृश्यांवर होणारे अन्याय व अत्याचार समाजासमोर मांडणे, स्पृश्य समाजातही परिवर्तनाचा विचार रूजविणे हा वृत्तपत्र सुरू करण्यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रमुख हेतू होता. अस्पृश्यांच्या विविध चळवळीमागील भूमिका स्पष्ट करणे व चळवळीला विरोध करणा—याना सडेतोड उत्तर देण्यासाठी डॉ. बाबासाहेबांना वृत्तपत्राची गरज वाटत होती. म्हणून १९२० मध्ये छत्रपती शाहू महारांजानी दिलेल्या आर्थिक सहायाच्या मदतीने मूकनायक' नावाचे वृत्तपत्र सुरू केले. अस्पृश्यांवर अन्याय करणा—या विविध विषयांची चर्चा त्यांनी या वृत्तपत्रातून केली, तसेच अस्पृश्यांना जागृत करण्याचा, संघटित करण्याचा त्यांनी या वृत्तपत्राच्या माध्यमातून प्रयत्न केला. मराठी भाषेवर प्रभुत्व असतानाही त्यांनी सर्व ग्रथलेखन इंग्रजीतून केले. ब्रिटीश राज्यकर्त्यांना भारतातील अस्पृश्यांची स्थिती समजावी, त्यांच्यावरील अन्याय व अत्याचाराचे ज्ञान व्हावे व सुशिक्षित अस्पृश्य समाजालाही नवविचारांची, तत्वांची जाणीव व्हावा ही भूमिका यामागे होती.

अस्पृश्यतेचे निर्मुलन करण्यासाठी त्यांनी घटनात्मक तरतूदी केल्या. दलित जाती व जमातींना राखीव जागा, सोई—सवलती, या तरतुदीच्या अंमलबजावणीचे स्वतंत्र कार्य व त्यांच्या मूल्यमापनाची सोय करून त्यांनी आपल्या बांधवांसाठी अनमोल कार्य केले. अतिशय परिश्रमपुर्वक व समाजातील सर्व घटकांना समान हक्क देणारे हिंदू कोड बील त्यांनी तयार केले पण, ते दुर सारले गेल्याने त्यांनी मंत्रिपदाचा, राजीनामा दिला व त्यांनी शैक्षणिक कार्याकडे आपले लक्ष केंद्रित केले.

हिंदु धर्मात अस्पृश्यांना माणूसकीचे अधिकार मिळणार नाहीत असे त्यांना वाटत होते. अस्पृश्यांना मनुष्यपण मिळविण्यासाठी धर्मातर अपरिहार्य आहे याची जाणीव झाली, म्हणून १४ आक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे ऐतिहासिक समारंभात आपल्या असंख्य अनुयायांसह त्यांनी बौध्दधर्माची दीक्षा घेतली. धर्मातर म्हणजे त्यांनी जोपालेल्या आदर्श समाजरचनेच्या कल्पनेच्या दृष्टीने टाकलेले पहिले पाउलच होते.

विसाव्या शतकात सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात असामान्य कार्य करणा–या व्यक्तीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव सर्वश्रेष्ठ मानले जाते. वर्षानुवर्षे परावलंबी व असहाय जीवन जगणा–या अस्पृश्यांना माणूस म्हणून स्वतंत्र जीवन जगण्याचा हक्क डॉ. बाबासाहेबांनी मिळवून दिला. या कार्यासाठी त्यांनी आपले संपुर्ण जिवन व्यतीत केले. अस्पृश्यांना समान हक्क कोणाची सहानुभूती किंवा भूतदया म्हणून मिळावेत हे त्यांना मान्य नव्हते. समान हक्काच्या या न्याय मागणीसाठी, अस्पृश्य समाज जागृत व संघटित व्हावा, स्वतःच्या पायावर उभा रहावा म्हणून त्यांनी प्रयत्न केले. अस्पृश्यांच्या आत्मविश्वास वाढविला व त्यांना आत्मसंयमनाने जगण्यास शिकविले. माणूस म्हणून जगण्याचा हक्कांसाठी त्यांनी समाजाला बौध्दधर्माचा संदेश दिला. त्यांनी अस्पृश्यांमधील माणूस जागा केला व त्याला ताठ मानेने जगण्यास शिकविले. ही एक अतिशय महत्वाची परिवर्तनीय सामाजिक घटनाच होय.

आर्थिक व्यवस्थेसंबधी बाबासाहेबांनी प्रामुख्याने मूलभूत व मुख्य उद्योगधंदे हे सरकारी क्षेत्रात असावे ही भूमिका स्वतंत्र मजूर पक्षाच्या कार्यक्रमात १९३७ साली मांडली. पुढे १९४६ मध्ये विजपुरवठी व जलसिंचन हे सरकारी क्षेत्रात असावे अशी भूमिका मांडली. त्याशिवाय शिक्षण, आरोग्य व विमा हे सरकारी क्षेत्राात असावे अशीही भूमिका मांडली. मजूर वर्गाकरिता पुर्ण सामाजिक संरक्षण असावे, जमीनीचे समान वाटप, कुळकायदा सुधारणा, सरंजामीप्रणीत महार वतन व खोती पध्दतीचा विरोध, लहान शेतक–यांना कर्जपुरवठा, किमान वेतन इत्यादी धोरणाचा पुरस्कार केला. आर्थिक विकासासंबधी डॉ. बाबासाहेबांनी १९१८ साली स्पष्ट भूमीका मांडली व तीच पुढे औद्योगिकीकरणामधूनच शेतीचा विकास होईल असे मत मांडले. हयाशिवाय शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक, जलसिंचन व विद्युत हयांचा विकासावर भर दिला. त्याचसोबत शिक्षण–विशेषतः तांत्रिक शिक्षण – हयावर भर दिलेला आहे. डॉ. बाबासाहेत 'आर्थिक नियोजनाचा' देशाच्या नियोजित विकासासाठी पुरस्कार करतात. शेती, उद्योगधंदे, सेवा व इतर बाबींच्या विकासाबरोबर आर्थिक नियोजन केंद्र मजूर व दलित असावे ही स्पष्ट भूमिका मांडतात. दलितांसाठी वेगळी उपयोजना असावी ही त्यांची भूमीका होती. जातीप्रणीत आर्थिक व सामाजिक भेदभावापासून संरक्षण देण्यासाठी विशिष्ट उपायांचे समर्थन केले.त्यात राखीव जांगाच्या धोरणांचा समावेश होतो. राखीव जागांचे धोरण व तत्सम धोरण हे अमेरिकेमध्ये प्रथम १९६९ च्या दरम्यान आले व नंतर इतर देशांनी त्यांचे अनुकरण केले. हे बाबासाहेबांचे मोठे योगदान आहे.

**सदंर्भ –**


१. गायकवाड, यादव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन आणि कार्य, १९९३, कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद.
२. थोरात, सुखदेव, बाबासाहेब आंबेडकर नियोजन,जल व विद्युत विकास भूमिका व योगदान,२००५, सुगावा प्रकाशन, सदाशिवपेठ, पुणे ४११०३०.
३. डोंगरे, कृष्णकांत कवडूजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत नागपूर शहराचे योगदान, २०१२, बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपूर २७.
४. भिडे, जी. एल., पाटील, एन. डी., महाराष्टातील समाजसुधारणेचा इतिहास, २००१,फडके प्रकाशन, कोल्हापूर – ४१६०१२
५. खैरमोडे, चांगदेव भवानराम, डॉ भीमराव रामजी आंबेडकर खंड ७,१२, २००२, सुगावा प्रकाशन, पुणे ४११०३०.
६. गाठाळ, एस.एस., आंबेडकरी चळवळीचा इतिहास,२०१०, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद.